# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३

# सामाजिक मानवशास्त्र

**(समाजशास्त्र : स्पेशल पेपर–११ (अ) आणि १६ (अ))**

सेमिस्टर–५ व ६ करिता

(शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१८
बी. ए. (सामाजिक मानवशास्त्र) भाग-३ समाजशास्त्र पेपर ११ (अ) आणि १६ (अ) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ४००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN-978-81-8486-632-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## ■ समाजशास्त्र समन्वय समिती ■


अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) जगन कराडे,**
विभागप्रमुख, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शैलजा माने**
  आर्टस्, कॉमर्स कॉलेज, नागठाणे,
  जि. सातारा
- **डॉ. उषा पाटील**
  महावीर महाविद्यालय,
  कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र-५ घटक क्रमांक | सत्र-६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **श्री. सतिश देसाई**<br>पद्मभूषण डॉ. वसंतराव जाधव महाविद्यालय, तासगाव | १ | - |
| **प्रा. आर. एस. यादव**<br>सौ. एम. आर. जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज | १ | - |
| **श्री. जयंत घाटगे**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठवडगांव | २ | - |
| **श्री. पांडुरंग सारंग**<br>सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगुड, ता. कागल | ३ | - |
| **प्रा. एम. एम. कांबळे**<br>दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, इचलकरंजी | ४ | - |
| **डॉ. अरुण पौडमल**<br>यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) महाविद्यालय, कोल्हापूर | - | १ |
| **श्री. आनंदराव साळोखे**<br>कमला कॉलेज, कोल्हापूर | - | २ |
| **प्रा. प्रकाश बाळू कांबळे**<br>भोगावती महाविद्यालय, कुरुकली | - | ३ |
| **डॉ. अर्चना कांबळे (जगतकर)**<br>न्यू कॉलेज, कोल्हापूर | - | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. अर्चना कांबळे (जगतकर)**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
न्यू कॉलेज, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागांतर्गत बी. ए. भाग-३ अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत. या वर्गासाठी तुम्ही समाजशास्त्राचे सत्रपद्धतीनुसार एकूण १० पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी सामाजिक मानवशास्त्र (सत्र ५ पेपर क्र. ११ (अ) व सत्र ६ पेपर क्र. १६ (अ)) असे आहेत.

'सामाजिक मानवशास्त्र' या पेपरमध्ये सत्र क्र. ५ साठी चार युनिटचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक मानवशास्त्राचे क्षेत्र आणि सामाजिक मानवशास्त्र, भारतातील आदिवासी समुदाय, आदिवासींचे सामाजिक जीवन, आदिवासींचा धर्म आणि जादू या युनिटचा समावेश केला आहे. तसेच सत्र क्र. ६ साठी आदिवासींची अर्थव्यवस्था, आदिवासी समस्या, आदिवासी विकास आणि महाराष्ट्रातील आदिवासी समुदाय : भिल्ल या घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

शेवटी संपादक या नात्याने मी सर्वप्रथम मा. कुलगुरू डॉ. डी. बी. शिंदे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्राचे संचालक कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे, शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागप्रमुख व अभ्यासमंडळाचे चेअरमन डॉ. राजेंद्र पाटील, अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. मच्छिंद्र सकटे, समाजशास्त्र विद्याशाखेशी संबंधित सर्व प्राध्यापक आणि दूर शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच मला संपादकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य झाले हे मी प्रामाणिकपणे कबूल करू इच्छिते. वरील सर्वांची मी शतशः ऋणी आहे.

**■ संपादक ■**

**डॉ. अर्चना कांबळे (जगतकर)**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
न्यू कॉलेज, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | घटकाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ पेपर–११ (अ)** | |
| १. | सामाजिक मानवशास्त्राचे क्षेत्र आणि सामाजिक मानवशास्त्र | १ |
| २. | भारतातील आदिवासी समुदाय | ४० |
| ३. | आदिवासींचे सामाजिक जीव | ५८ |
| ४. | आदिवासींचा धर्म आणि जादू | १०१ |
| | **सेमिस्टर–६ पेपर–१६ (ब)** | |
| १. | आदिवासींची अर्थव्यवस्था | १२३ |
| २. | आदिवासी समस्या | १४५ |
| ३. | आदिवासी विकास | १६९ |
| ४. | महाराष्ट्रातील आदिवासी समुदाय : भिल्ल | २१३ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक–१

# सामाजिक मानवशास्त्राचे क्षेत्र आणि सामाजिक मानवशास्त्र

## (Field of Social Anthropology and Social Anthropology)

## प्रकरणाची प्रस्तावना (Block Introduction)

या अभ्यासक्रमाद्वारे आपण सामाजिक मानवशास्त्र या विषयाचा परिचय करून घेणार आहोत. सामाजिक मानवशास्त्र ही मानवशास्त्र विषयाची एक शाखा (Branch) आहे. म्हणून आपण पहिल्या प्रकरणामध्ये मानवशास्त्र या विषयाचा परिचय करून घेणार आहोत.

पहिल्या प्रकरणाचे एकूण चार विभाग केलेले आहेत. पहिल्या विभागात मानवशास्त्राचा अर्थ, व्याख्या व स्वरूप समजून घेणार आहोत. दुसऱ्या विभागात मानवशास्त्राच्या विविध शाखांचा उदा. शारीरिक मानवशास्त्र, सांस्कृतिक मानवशास्त्र व उपयोजित मानवशास्त्र यांचा अभ्यास करणार आहोत. तिसऱ्या विभागामध्ये सामाजिक मानवशास्त्राचा अर्थ, व्याख्या, स्वरुप समजून घेणार आहोत आणि शेवटच्या चौथ्या विभागात सामाजिक मानवशास्त्रात आदिवासी समाजाचा अभ्यास करताना वापरली जाणारी 'क्षेत्र कार्यपद्धत' तिची व्याख्या, वैशिष्ट्ये आणि महत्त्व समजून घेणार आहोत.

### घटक संरचना

१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

- १.३.१ मानवशास्त्र : अर्थ, व्याख्या व स्वरूप
- १.३.२ मानवशास्त्राच्या शाखा
  - अ) शारीरिक मानवशास्त्र
  - ब) सांस्कृतिक मानवशास्त्र
  - क) उपयोजित मानवशास्त्र
- १.३.३ सामाजिक मानवशास्त्र : अर्थ व स्वरूप

१.३.४ क्षेत्र कार्य पद्धती : वैशिष्ट्ये आणि महत्त्व

अ) क्षेत्र कार्य पद्धतीची वैशिष्ट्ये

ब) क्षेत्र कार्य पद्धतीचे महत्त्व

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला,

- मानवशास्त्राची व्याख्या सांगता येईल.
- मानवशास्त्राचे स्वरुप स्पष्ट करता येईल
- मानवशास्त्राच्या शाखा सांगता येतील.
- सामाजिक मानवशास्त्राचा अर्थ व स्वरुप स्पष्ट करता येईल.
- क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीचे स्वरुप स्पष्ट करता येईल.
- क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीचे महत्त्व सांगता येईल.

## १.२ प्रास्ताविक (Introduction)

या प्रकरणामध्ये आपण मानवशास्त्र विषयाचा परिचय करून घेणार आहोत. आपण समाजशास्त्राचे विद्यार्थी असताना मानवशास्त्राचा का अभ्यास करणार आहोत ते पाहूया. ज्याप्रमाणे समाजशास्त्राच्या ग्रामीण समाजशास्त्र, नागरी समाजशास्त्र, आदिवासी समाजशास्त्र अशा शाखा आहेत. त्याचप्रमाणे मानवशास्त्राच्या देखील शारिरीक मानवशास्त्र, सांस्कृतिक मानवशास्त्र, सामाजिक मानवशास्त्र अशा शाखा आहेत. समाजशास्त्राची आदिवासी समाजशास्त्र व मानवशास्त्राची सामाजिक मानवशास्त्र या दोन्ही शाखा 'आदिवासी जमातींचा' अभ्यास करतात. म्हणून समाजशास्त्रात आदिवासी समाजाचा अभ्यास करण्यासाठी सामाजिक मानवशास्त्र या शाखेचा अभ्यास केला जातो आणि सामाजिक मानवशास्त्र ही मानवशास्त्राची शाखा असल्यामुळे आपण प्रथम मानवशास्त्राचा अभ्यास करणार आहोत.

## १.३ विषय विवेचन

### ❒ मानवशास्त्राचा अर्थ (Meaning of Anthropology)

'मानवशास्त्र' या शब्दाला इंग्रजीमध्ये 'ॲन्थ्रॉपॉलॉजी' (Anthropology) म्हणतात. हा शब्द ॲन्थ्रॉपॉस (Anthropos) आणि लोगस (Logus) यापासून निर्माण झाला आहे. 'ॲन्थ्रॉपॉस' म्हणजे 'मानव' आणि 'लोगस' म्हणजे शास्त्र होय. याचा अर्थ मानवाचे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय. प्रसिद्ध ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल यांनी 'मानवशास्त्र' हा शब्द प्रथम उपयोगात आणला. त्यांच्या मते मानवशास्त्र म्हणजे 'मानवाची स्वतःबद्दलची बडबड' (Talk about himself) होय. ॲरिस्टॉटल यांना 'मानवशास्त्राचे जनक' (Father of Anthropology) म्हटले जाते.

'जिज्ञासा' ही एक मानवाची सहजप्रवृत्ती आहे. या जिज्ञासेपोटी मानवाने सभोवतालच्या परिस्थितीचा अभ्यास केला. विविध स्वरुपाचे ज्ञान संपादन केले. यातून अनेक नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांचा उदय झाला. मानवाच्या स्वतःबद्दलच्या जिज्ञासेतून मानवशास्त्राचा उदय झाला आहे.

### ❑ मानवशास्त्राची व्याख्या (Definition of Anthropology)

अनेक मानवशास्त्रज्ञांनी मानवशास्त्राच्या विविध व्याख्या सांगितलेल्या आहेत. त्यापैकी काही निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. **हर्स्कोविट्स** : ''मानव आणि त्याची कार्यनिर्मिती यांचा अभ्यास म्हणजे मानवशास्त्र होय.'' ("Anthropology is the study of man and his works." **- Herskovits**)

२. **जेकब आणि स्टर्न** : ''पृथ्वीतलावरील मानवाच्या उत्पत्तीपासून शारीरिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचा आणि मानवीय वर्तनाचा वैज्ञानिकरित्या अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय.'' ("Anthropology is the scientific study of the physical, social and cultural development and behaviour of human beings since their apperance on earth." **- J & S**)

३. **डॉ. मुजुदार आणि मदन** : ''मानवाच्या शारीरिक, सांस्कृतिक व सामाजिक उत्पत्ती व विकासाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय.'' ("Anthropology studies the emergence and development of man from the physical, cultural and social point of view." - **Dr. Mujumdar and Madan**)

४. **ए. एल. क्रोबर** : ''मानवी समुहाचे आणि समुह वर्तनाचे तसेच त्यांनी केलेल्या उत्पादनाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय. ("Anthropology is the science of groups of man and their behaviour and productions." - **A. L. Krober**)

५. **फ्रांझ बोअस** : ''मानवशास्त्र मानवाचा एक सामाजिक प्राणी म्हणून अभ्यास करते.'' ("Anthropology deals with man as a social being." - **Frenz Boas**)

६. **मानवशास्त्र परिभाषा कोश** : ''मानवशास्त्र म्हणजे मानवाचा अभ्यास होय'' ("Anthropology is the study of man." - **T. K. Penniman**)

७. **टी. के. पेन्निमन** : ''मानवशास्त्र हे मानवविषयक विज्ञान आहे.'' ("Anthropology is the science of man." - **T. K. Penniman**)

८. **बील्स व हॉइजर** : ''मानवाचा शारीरिक व सांस्कृतिक विकास ठरविणाऱ्या तत्त्वप्रणाली शोधून काढणे हे मानवशास्त्राचे प्रमुख कार्य आहे. ("Anthropology is th search for a set of principles which governs man's physical and cultural development." - **Beals and Hoijer**)

९. **इ. ए. होबेल** : ''मानव व त्याच्या सर्व कृती यांचा अभ्यास म्हणजे मानवशास्त्र होय. मानवशास्त्र हे संस्कृतीविषयक विज्ञान देखील आहे. म्हणून मानवशास्त्र हे एक प्रमुख सामाजिक विज्ञान आहे.'' ("Anthropology is the study of man and of all his works. Anthropology is also the science of culture as such it is a major social science." - **E. A. Hoebel**)

मानवशास्त्र हे मानवाचा अभ्यास करते. परंतु समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र ही सुद्धा मानवाचाच अभ्यास करतात. पण ही शास्त्रे मानवाच्या विशिष्ट पैलूंचा (special aspect) अभ्यास करतात. मानवशास्त्र हे मानवाच्या सर्व पैलूंचा (all aspect) अभ्यास करते. मानवशास्त्र मानवाचा समग्र अभ्यास करते. प्राणी जगतात मानवाचे स्थान अद्वितीय आहे. मानव व मानवेत्तर प्राण्यामध्ये बरेचसे साम्य असले तरी काही अंशी भेद सुद्धा आहे. मानव हा दोन पायावर उभा राहणारा एकमेव प्राणी आहे. मानवाच्या मेंदुची रचना, स्मरणशक्ती, हाताच्या बोटांची रचना, पाठीचा कणा इत्यादीच्या जोरावर त्याने आपली नैसर्गिक जीवन जगण्याची पद्धत सोडून नवीन सामाजिक जीवन पद्धती शोधून काढली, तिलाच 'संस्कृती' म्हणतात. त्या संस्कृतीचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो.

## ❒ मानवशास्त्राचे स्वरुप (Nature of Anthropology)

मानवशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र असून ते इतर सामाजिक शास्त्राहून वेगळे व स्वतंत्र शास्त्र

आहे. मानवशास्त्रात एकाच वेळी मानवाचा जैविक व सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. मानवाची ज्यावेळी उत्पत्ती झाली त्यावेळेपासून ते आजपर्यंतच्या मानवाच्या कार्याचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. मानवाचा शारिरिक, सांस्कृतिक व सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास करणारे मानवशास्त्र हे एकमेव शास्त्र आहे. त्याचे स्वरूप आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## १. मानवाचा जैविक व सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास :-

मानव हा जैविक (Biological) प्राणी व सामाजिक (Social) प्राणी आहे. त्यामुळे त्याच्या सामाजिक जीवनाची पाळेमुळे जैव-मानसिक प्रकृतीत आढळतात. पण मानव नेहमीच जैव मानसिक प्रकृतीत जखडून राहिलेला नाही. मानवाने संघटित जीवन जगावे किंवा आपल्या जैविक गरजा सुलभ मार्गाने पूर्ण कराव्यात या गोष्टी प्रकृतीने मानवावर लादल्या आहेत. परंतु समाज हा प्रगत असावा की अप्रगत असावा, समाजात लोकशाही असावी की हुकुमशाही असावी या गोष्टी प्रकृतीने मानवावर लादलेल्या नाहीत. भुक लागल्यानंतर अन्न खावे ही गोष्ट प्रकृतीने मानवावर लादलेली आहे. पण कोणते अन्न, कोणत्या वेळी व कशा प्रकारे खावे या गोष्टी प्रकृतीने मानवावर लादलेल्या नाहीत. या गोष्टी संस्कृतीने मानवावर लादलेल्या असतात.

## २. मानव व त्याच्या कार्याचा अभ्यास :-

मानवशास्त्रात मानवाचा आणि त्याच्या कार्याचा (Man and his works) अभ्यास केला जातो. अशी मानवशास्त्राची व्याख्या हर्स्कोविट्स यांनी केली आहे. मानवाचा त्याच्या उत्पत्तीपासून आजपर्यंतच्या प्रगत मानवाचा आणि त्यांच्या कार्याचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. प्राचीन काळापासून आजपर्यंत मानवाच्या शारिरीक व सामाजिक जीवनात कसे बदल होत गेले. मानवाने संस्कृती कशी निर्माण केली. संस्कृतीमध्ये आचार-विचार, कला, ज्ञान, कौशल्य, रितीरिवाज, साधने, हत्यारे यांचा समावेश कसा झाला, याचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. त्याचप्रमाणे मानवाच्या शरीरात, जननदरात वंशात कसे बदल घडून आले आहेत. त्याचाही अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. उदा. पृथ्वीतलावर वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या वंशाचे लोक राहात होते. पण सध्या शुद्ध स्वरुपात पूर्वीचे वंश आढळून येत नाहीत. विशिष्ट शारिरीक लक्षणांचा समुच्चय म्हणजे 'वंश' होय.

## ३. मानवाचा तौलनिक दृष्टिकोनातून अभ्यास :-

मानवशास्त्रात मानवाच्या साम्य व भेदांचा तुलनात्मक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. मानवाच्या शारिरीक रचनेचा, वंशाचा, समुहातील वर्तन प्रकारांचा साम्य व भेद पाहताना तुलनात्मक दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. विशेषतः मानवी जीवनाच्या कोणकोणत्या घटकात आर्थिक परस्पर संबंध आहेत हे पाहण्यासाठी तुलनात्मक पद्धतीचा वापर केला जातो. उदा. एडवर्ड टायलर यांनी कुटुंब

संघटनेतील कार्यिक परस्परसंबंध स्पष्ट करताना प्रतिपादन केले आहे की, विवाहानंतर पतीने आपल्या पत्नीच्या घरी रहावयास जाण्याची प्रथा ज्या कुटुंबात आहे, अशा प्रकारच्या कुटुंबात जावयाने सासुला टाळावे, अशी आचारपद्धती रुढ झालेली आहे म्हणजेच या रुढीचा संबंध मातृसत्ताक कुटुंब पद्धतीशी आहे.

### ४. प्राथमिक अवस्थेतील मानवाचा अभ्यास :-

मानवशास्त्र मानवाचा व त्याच्या कार्याचा अभ्यास करत असले तरी प्रत्यक्षात केवळ प्राथमिक अवस्थेत राहणाऱ्या मानवाचाच अभ्यास केला जातो. आदिवासी, रानटी किंवा वनवासी जमातींचा अभ्यास करण्यावर मानवशास्त्रात भर दिला जातो. मानवशास्त्राचा मुख्य उद्देश मानवाची व्युत्पत्ती कशी झाली व त्याच्या सामाजिक जीवनाला कशी सुरुवात झाली हे जाणून घेण्याचा आहे. प्राथमिक समाजाचे जीवन कसे असेल या प्रश्नाचे उत्तर प्राथमिक अवस्थेत राहणाऱ्या लोकांच्या अभ्यासातून मिळू शकते. प्राथमिक अवस्थेत आज केवळ आदिवासी जीवन जगतात म्हणून मानवशास्त्रात आदिवासी समाजाचा अभ्यास केला जातो.

### ५. समग्र स्वरुपाचा अभ्यास :-

मानवशास्त्रात मानवाचा म्हणजेच आदिवासी समाजाचा समग्र जीवनाचा अभ्यास केला जातो. इतर सामाजिक शास्त्रे मानवी जीवनाच्या विशिष्ट पैलूंचा अभ्यास करतात. पण मानवशास्त्रात आदिवासींच्या समग्र जीवनाचा अभ्यास केला जातो. उदा. राज्यशास्त्र हे मानवाच्या राजकीय संबंधाचा, अर्थशास्त्र मानवाच्या आर्थिक संबंधाचा अभ्यास करतात. पण मानवशास्त्र मानवाच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्व संबंधाचा अभ्यास करते. म्हणजेच मानवशास्त्र मानवाचा-आदिवासींचा समग्र जीवनाचा अभ्यास करते. मानवशास्त्रात मानवाच्या अभ्यासाला सीमारेषा नाहीत. मानवासंबंधीत जे जे ज्ञान मिळेल ते ज्ञान संपादन मानवशास्त्रात केले जाते. क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीद्वारे संशोधक एकदा आदिवासी जमातीत अभ्यास करण्यासाठी गेला की त्या जमातीविषयी सर्व रुढी, प्रथा, परंपरा, धर्म, शिष्टाचार इत्यादीविषयी सर्व माहिती जमा करतो. म्हणजेच समग्र स्वरुपाचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो.

### ६. प्रत्यक्ष अभ्यास :-

मानवशास्त्र इतर शास्त्राप्रमाणे घटनेशी संबंधीत व्यक्ती किंवा पुराव्याच्या आधारे माहितीचे संकलन करीत नाही. संशोधक प्रत्यक्ष ज्या आदिवासी जमातीचा अभ्यास करावयाचा आहे त्या जमातीत प्रत्यक्ष स्वतः जाऊन अनेक दिवस व्यतीत करून माहितीचे संकलन करतो. माहिती संकलनात तो इतर पुराव्यांच्या आधारे कोणतेही अनुमान काढत नाही. जोपर्यंत त्या घटनेची संशोधकाला प्रत्यक्ष अनुभूती

येत नाही तोपर्यंत संशोधक कोणतेही अनुमान काढत नाही. संशोधक स्वतःच पुरावा गोळा करतो व त्यावरून निष्कर्ष मांडतो. मुलाखत किंवा प्रश्नावलीपेक्षा तो स्वतः निरीक्षणावर भर देतो. मानवशास्त्रात वापरली जाणारी क्षेत्र कार्य पद्धत प्रत्यक्ष अभ्यास पद्धत म्हणून ओळखली जाते. क्षेत्र कार्यपद्धतीत संशोधक स्वतः ज्या घटकाचा अभ्यास करायचा आहे तेथे २-३ वर्षे जाऊन राहतो व 'याची देही याची डोळा' या उक्तीप्रमाणे स्वतःला जेवढे अनुभव येतील त्याबाबत अनुमान काढत असतो.

## ७. सुक्ष्म रचनात्मक व विगमनात्मक अभ्यास :-

सुक्ष्मरचनात्मक अभ्यास म्हणजे एखाद्या विशाल घटकाचा अभ्यास करण्याऐवजी त्यातील लहान (सूक्ष्म) घटकाचा अभ्यास करून विशाल घटकाची रचना समजून घेणे होय. आपण दैनंदिन व्यवहारात यालाच शितावरून भाताची परीक्षा म्हणतो. विगमनात्मक अभ्यासाचा देखील वापर मानवशास्त्रात केला जातो. विगमन (Induction) म्हणजे विशिष्ट गोष्टींच्या अनुभवावरून सामान्य सिद्धांत प्रस्थापित करण्याची क्रिया होय. उदा. मानव मर्त्य आहे आणि रामा मानव आहे ही दोन विधाने सत्य असतील तर तीसरे सामान्य विधान सत्य असेल ते म्हणजे रामा मर्त्य आहे. ज्ञान संपादनाच्या या पद्धतीला 'विगमन' पद्धत म्हणतात. विशिष्टापासून सामान्याकडे गमन म्हणजे विगमन होय.

## ८. मानवशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे :-

मानवशास्त्राबाबत मानवशास्त्रज्ञात एकमत नसले तरी मानवशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. मॅलिनॉवस्की, रॅडाक्लिफ ब्राऊन, फोर्टेस नॅडेल या मानवशास्त्रज्ञांच्या मते मानवशास्त्र हे नैसर्गिक (Natural) शास्त्र आहे. कारण मानव हा एक जैविक प्राणी असून तो निसर्गाचाच एक भाग आहे. त्यामुळे मानवाला निसर्गाचे नियम लागू पडतात. संस्कृती हे मानवाच्या गरजपूर्तीचे साधन आहे. त्यामुळे संस्कृती व निसर्ग यामध्ये एकरुपता दिसून येते, असे वरील मानवशास्त्रज्ञांचे मत आहे. पण क्रोबर, बिडने, इव्हांस प्रिचर्ड इत्यादी मानवशास्त्रज्ञांच्या मते, संस्कृती व निसर्ग यामध्ये एकरुपता मानने अप्रस्तुत आहे. कारण निसर्गाचे नियम सर्वत्र एकसारखे असले तरी संस्कृती मात्र सर्वत्र एकसारखी नाही. अणु आणि रेणु यांची रचना एकसारखी असते पण संस्कृती मात्र सर्वत्र एकसारखी नसते. मानवी समाज ही नैतीक व सामाजिक व्यवस्था आहे. या सामाजिक व्यवस्थेचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो म्हणून मानवशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे.

थोडक्यात, मानवशास्त्राचे स्वरुप इतर शास्त्राहून वेगळे आहे. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र ही शास्त्रेदेखिल मानवाचाच अभ्यास करतात. पण ती मानवी सामाजिक जीवनाचा अभ्यास करतात. मानवशास्त्रात मात्र मानवाचा जैविक व सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. अभ्यास विषयात फरक असल्यामुळे मानवशास्त्राला वेगळे स्वरूप प्राप्त झालेले आहे.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ✻

१. मानवशास्त्र हे ................. शास्त्र आहे.

*(अ) सामाजिक (ब) नैसर्गिक (क) आदर्शवादी (ड) कल्पनावादी.*

२. मानवशास्त्रात .................. चा अभ्यास केला जातो.

*(अ) प्राण्यांचा (ब) मानवाचा (क) पशुंचा (ड) पक्ष्यांचा.*

३. ................. मानवशास्त्र ही मानवशास्त्राची शाखा आहे.

*(अ) नैसर्गिक (ब) भौतिक (क) अभौतिक (ड) सामाजिक.*

४. मानवशास्त्रात .............. समाजाचा अभ्यास केला जातो.

*(अ) ग्रामीण (ब) नागरी (क) आदिवासी (ड) आधुनिक.*

५. मानवशास्त्राचा दृष्टीकोन ................... स्वरुपाचा आहे.

*(अ) समग्र (ब) विशिष्ट (क) लघु (ड) मानवी.*

### १.३.२ मानवशास्त्राच्या शाखा (Braches of Social Anthropology)

मानवशास्त्राच्या स्वरुपात आपण पाहिले आहे की, मानवशास्त्रात मानवाचा जैविक व सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. यासाठी मानवाच्या उत्पत्तीपासून ते आजपर्यंतच्या मानवी जीवनाचा समावेश आहे. हा सर्व अभ्यास केवळ एका शाखेत करणे अवघड व अशक्य आहे. तसेच दिवसेंदिवस मानवशास्त्राच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत. त्यामुळे मानवशास्त्राच्या विविध शाखांचा उदय झाला आहे. मानवशास्त्राच्या शाखा खालीलप्रमाणे आहेत.

### अ) शारीरिक मानवशास्त्र (Physical Anthropology)

१. मानव उत्पत्तीशास्त्र (Human Genetics )

२. मानवी जीवाश्मशास्त्र ( Human Palentology)

३. मानवमीती (Anthropometry)

४. द्विहस्तक सस्तन प्राणीशास्त्र (Primatology)

### ब) सांस्कृतिक मानवशास्त्र

१. प्रागैतिहासिक पुराणवस्तुशास्त्र (Prehistoric Archaeology)

२. भाषाशास्त्र (Linguistics)

३. मानवजातीशास्त्र (Ethnology)

४. सामाजिक मानवशास्त्र (Social Anthropology)

**क) उपयोजित मानवशास्त्र (Applied Anthropology)**

## (अ) शारीरिक मानवशास्त्र :-

मानव हा एक जैविक प्राणी आहे या दृष्टीकोनातून मानवाच्या जीवशास्त्रीय बाबींचा अभ्यास शारीरिक मानवशास्त्रात केला जातो. मानवाच्या शरीराचा, उत्क्रांतीचा, वंशाचा अभ्यास या शाखेत केला जातो. मानवी लोकसंख्येचे अध्ययन करून शारिरीक लक्षणांच्या आधारावर विभिन्न मानव समुहातील भेद स्पष्ट केले जातात.

❒ **शारीरिक मानवशास्त्राची व्याख्या :-**

१. **जे. इ. मेनचिप :** ''शारीरिक मानवशास्त्र हे मानवी शरीराच्या दृष्य भागाचा अभ्यास करते.'' (Physical Anthropology is the study if bodily appearance of man. - **J. E. Manchip**)

२. **व्हॉबेल :** ''शारीरिक मानवशास्त्र मानवाच्या शारीरिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करते.'' ("Physical Anthropology is therefore the study of the physical characteristics of the human race as such." - **Hoeble**)

३. **हरस्कोव्हिटस् :** ''शारीरिक मानवशास्त्र हे मुलभूत अर्थाने मानवी जीवशास्त्र आहे.'' (Physical Anthropology is in essence human biology." - **Herskovits**)

४. **पिडिंगटन :** ''शारीरिक मानवशास्त्र हे मानवी शरीराच्या वैशिष्ट्यांशी संबंधीत आहे.'' ("Physical Anthropology is concerned with the bodily characteristics of man." - **Piddington**)

वरील व्याख्यांचा विचार केल्यास शारीरिक मानवशास्त्र हे मानवी जीवशास्त्र आहे असे आपणास म्हणता येईल. मानवी शरीराचे जे दृश्य भाग आहेत त्यांचे सविस्तर अध्ययन शारीरिक मानवशास्त्रात केले जाते. शारीरिक मानवशास्त्राच्या काही प्रमुख शाखा पुढीलप्रमाणे आहेत.

**१. मानवी उत्पत्तीशास्त्र (Human Genetics)**

शारीरिक मानवशास्त्र ही मानवशास्त्राची एक महत्त्वाची शाखा असून ती मानवाच्या उत्पत्तीविषयी अभ्यास करते. कोलीन यांच्या मते, ''मानव उत्पत्तीशास्त्र ही जीवशास्त्राची शाखा असून त्यामध्ये मानवी

वंशाचा विकासाच्या नियमांचा व तत्त्वांचा अभ्यास करतात की ज्यामध्ये लहान वनस्पती, प्राणी आणि मानव यांचे निरीक्षण केले जाते.'' ("Genetics is that branch of biology which deals with the laws or principles of heredity and variation observed in plants in animal and in man." - Colin)

मानवाच्या अनुवंशिकतेची यंत्रणा, अनुवंशिकतेधील बदल, मानवाची पर्यावरणाशी अनुकूलन साधण्याची प्रक्रिया इत्यादी गोष्टींचा अभ्यास मानव उत्पत्तीशास्त्रात केला जातो.

### २. मानवी जीवाश्मशास्त्र (Human Palentology)

मानवी जीवाश्मशास्त्रामध्ये मानवाची कवटी, हाडे इत्यादी मानवी अवशेषांचा अभ्यास केला जातो.मानव व पशु यामध्ये भिन्नता कशी व केंव्हा निर्माण झाली. मानव हा मुळचा शाकाहारी आहे की मांसाहारी आहे. यासाठी दातांच्या ठेवणीचा देखील अभ्यास या शाखेत केला जातो. मानवाच्या दातांच्या अभ्यासावरून मानवाच्या विकासाचा व उत्क्रांतीचा मार्ग शोधता येतो. यासाठी हा अभ्यास केला जातो.

### ३. मानवमीती (Anthropometry)

'मानवमीती' या शब्दाचा अर्थ मानवाचे मापन असा होतो. या शाखेत मानवाची अंगयष्टी (Stature), उंची (Height), वजन (Weight) अवयवांची लांबी (Lenth of the limbs) इत्यादींचे प्रत्यक्ष मापन करून त्यांचे संपूर्ण शरीराशी कसे प्रमाण आहे, याचे अध्ययन केले जाते. काही अवयवांची मापे पूर्वी घेता येत नव्हती. उदा. त्वचा, केस, डोळा इत्यादी पण आता विज्ञानाच्या प्रगतीमुळे (नवनवीन तंत्राच्या व यंत्राच्या शोधामुळे) यांचे मापे घेणे शक्य झाले आहे. त्यामुळे मानवमिती ही शाखा दिवसेंदिवस विकसित होत आहे.

जैवमीती (Biometry) मानवमीती प्रमाणेच मानवाच्या शारीरिक लक्षणांचा अभ्यास करणारी एक शाखा आहे. शारिरीक वैशिष्ट्यांच्यावर वंश आधारित असतो. म्हणून जैवमीती शास्त्रात वंशाचा जैविक दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. मानवाच्या जैविक वैशिष्ट्यांचा संख्याशास्त्रीय अभ्यास जैवमीती होय. विशिष्ट क्षेत्रातील जन्म, विकास, मृत्यू या बाबतच्या जैविक अध्ययनांचे संख्याशास्त्रीय विश्लेषण म्हणजे जैवमीती होय.

### ४. द्विहस्तक सस्तन प्राणीशास्त्र (Primatology)

या शाखेत द्विहस्तक सस्तन प्राण्यांचा अभ्यास केला जातो. हा अभ्यास प्रायोगिक, वैद्यकीय तसेच परिस्थिती विज्ञानाच्या दृष्टीकोनातून केला जातो. मानव व मानवसदृश्य प्राण्यांच्या शरिरामध्ये विविध जीवनपद्धतीमुळे काय फरक पडतो याचा अभ्यास केला जातो. द्विहस्तक सस्तन प्राण्यांच्या मध्ये मानवाचा

विकास कसा झाला. विविध मानवी जीवन पद्धतीचा मानवी शरीरावर कसा प्रभाव पडतो इत्यादी बाबींचा अभ्यास या शाखेत केला जातो.

## (ब) सांस्कृतिक मानवशास्त्र :-

मानव हा जसा जैविक प्राणी आहे तसा तो सामाजिक प्राणी आहे. सामाजिक जिवन जगण्यासाठी त्याने संस्कृती निर्माण केली आहे. संस्कृती निर्माण करणे हे केवळ मानवाला शक्य झाले आहे. म्हणून मानवाच्या समग्र अध्ययनात संस्कृतीला विशेष महत्त्व आहे. सांस्कृतिक मानवाशास्त्रात विविध संस्कृतींचा उदय, विकास, रचना, कार्ये इत्यादींचा अभ्यास केला जातो. संस्कृती हा एक सामाजिक वारसा आहे आणि तो शिकून आत्मसात केला जातो. प्रत्येक समाजाची स्वतंत्र जीवनपद्धती म्हणजे स्वतंत्र संस्कृती आहे. संस्कृतीमध्ये तत्त्वज्ञान, धर्म, रुढी, प्रथा, परंपरा, संस्था, यंत्रे, हत्यारे इत्यादी अनेक घटकांचा समावेश होतो.

❒ **संस्कृतीची व्याख्या :-**

१. **हॉबेल :** ‘‘शिक्षित वर्तन प्रकारांचा समुच्चय म्हणजे संस्कृती होय.’’ ("Culture is the sum total of learned behaviour patterns." - **Hoebel**)

२. **हर्स्कीव्हिटस :** ‘‘मानवी वर्तनाचा शिकून आत्मसात केलेला भाग म्हणजे संस्कृती होय.’’ ("Culture is the learned portion of human behaviour." - **Herskovits**)

❒ **सांस्कृतिक मानवशास्त्राची व्याख्या :-**

१. **बील्स** आणि **हॉईजर :** ‘‘सांस्कृतिक मानवशास्त्र मानवी संस्कृतीचा उदय आणि इतिहास, उत्क्रांती आणि विकास व प्रत्येक ठिकाणच्या आणि वेळेच्या संस्कृतीची रचना आणि कार्ये यांचा अभ्यास करते.’’ ("Cultural Anthropology studies the origins and history of man's culture their evolution and development and the structures and functioning of human culture in every place and time." - **Beals** & **Hozier**)

२. **हॉबेल :** ‘‘मानवशास्त्राचा जो भाग मानवाच्या रुढी, प्रथा, परंपरांवर केंद्रीत झालेला आहे. त्याला सांस्कृतिक मानवशास्त्र म्हणतात.’’ ("The phase of Anthropology that devotes its attention to the customs of mankind is called cultural Anthropology." - **Hoebel**)

संस्कृतीच्या विविध बाजूंचा सविस्तर अभ्यास सांस्कृतिक मानवशास्त्रात केला जातो. संस्कृतीचा उदय, विस्तार व विकास कसा झाला. स्थलकालपरत्वे संस्कृतीची रचना व कार्य यात कसे बदल होत

गेले. संस्कृतीचे परिवर्तन व संक्रमण कसे होते. संस्कृती कशी आत्मसात केली जाते. संस्कृतीमुळे मानवाचे पर्यावरणाशी कसे अनुकुलन साधले जाते. इत्यादी अनेक प्रश्नांचे अध्ययन सांस्कृतिक मानवशास्त्रात केले जाते. सांस्कृतीक मानवशास्त्राचे अभ्यासक्षेत्र व्यापक असल्यामुळे तीच्या अनेक उपशाखा उदयास आल्या आहेत.

## ❒ सांस्कृतिक मानवशास्त्राच्या शाखा :-

### १. **प्रागैतिहासिक पुरातत्त्वशास्त्र** (Prehistoric Archaeology)

मानवी जीवनाच्या ज्या काळातील इतिहासदत्त पुरावे सापडत नाहीत त्या कालावधीला इतिहास पुर्वकाळ किंवा प्रागैतिहासिक काल असे म्हणतात. या काळातील इतिहासदत्त पुरावे नसले तरी उत्खननात सापडलेल्या वस्तुंच्या पुराव्यावरून मानवी जीवनाचा उलगडा केला जातो. यासाठी पुरातत्त्वशास्त्र (Archaeology), भुविज्ञान (Geology) तसेच जिवाश्मशास्त्र (Palaeontology) यांची मदत घेतली जाते. प्राचीन काळी मानव ओबड-धोबड अशी दगडांची हत्यारे वापरत होता. असे जॉन फियर यांनी उत्खननात सापडलेल्या वस्तूंवरून म्हटले आहे. चार्लस डार्विन यांच्या जीव उत्क्रांतीवाद ग्रंथ, भुगर्भशास्त्रीय ज्ञान, वनस्पती व प्राणी यांचा अभ्यास, थॉसन यांच्या प्राचिन हत्यारांचा अभ्यास यावर आधारित मानवी विकासाचे अश्मयुग, ब्रांझयुग लोहयुग असे टप्पे शोधून काढले आहेत.

### २. **भाषाशास्त्र** (Linguistics)

सांस्कृतिक मानवशास्त्राच्या या शाखेत भाषेचा अभ्यास केला जातो. भाषा हे त्या समाजाच्या आचार विचारांच्या देवाणघेवाणीचे महत्त्वपूर्ण साधन असते. विविध मानवी समुहांच्या विविध भाषा आहेत. त्यातील काही भाषांना लिपी आहे. तर काही आदिवासी भाषांना लिपी नाही. त्या फक्त बोली भाषा आहेत. भाषांचे प्रकार, त्यांची उच्चारण पद्धती, वापराच्या पद्धती, बोलीतील विविधता, एका भाषेचा दुसऱ्या भाषेशी असणारा संबंध भाषेतील प्रतिके इत्यादींचा अभ्यास या शाखेत केला जातो. भाषा हे संस्कृतीचा महत्त्वाचा घटक असल्याकारणाने संस्कृतीचा अभ्यास करताना भाषेचा अभ्यास करावाच लागतो.

### ३. **मानवजातीशास्त्र** (Ethnology)

मानवजाती शास्त्रात मानवी वंशाचा अभ्यास केला जातो. ''मानव व मानववंश, त्यांचे परस्पर संबंध व त्यांची गुणवैशिष्ट्ये यांचा विचार करणारे मानवजातीशास्त्र हे एक विज्ञान आहे.'' अशी ऑक्सफोर्ड शब्दकोशात मानवजातीशास्त्राची व्याख्या केली आहे. मानववंश पूर्वीइतके आज शुद्ध स्वरूपात राहिलेले नाहीत. त्यामध्ये मिश्रणाची प्रक्रिया चालू आहे. भौगोलिक किंवा सामाजिक कोणत्या-ना-कोणत्या कारणामुळे ही मिश्रणाची प्रक्रिया आजही चालू आहे, असे मानवशास्त्रज्ञांचे मत आहे.

विविध मानववंशाचा तुलनात्मक अभ्यास, मानववंशाची स्थित्यंतरे इत्यादींचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो.

मानवजाती शास्त्राप्रमाणे 'मानवजाती वर्णनशास्त्र' (Ethnography) ही सांस्कृतिक मानवशास्त्राची नवीन उदयास आलेली एक ज्ञान शाखा आहे. यामध्ये मानवसमाजाचा केवळ वर्णनात्मक अभ्यास केला जातो. विशिष्ट आदिवासी जमातींचा किंवा वांशीक समुहांचा चालीरितींचे किंवा संस्कृतीचे जीवन पद्धतींचे वर्णन करणे हाच उद्देश या शास्त्राचा असतो. कोणतेही अनुमान किंवा निष्कर्ष न काढता जसेच्या तसे एखाद्या समुहाचे वर्णन मानवजाती शास्त्रात केले जाते. मानवजाती शास्त्रात सुद्धा वर्णन केले जाते. पण त्याचबरोबर विविध समुहातील जीवनपद्धतीचा तुलनात्मक अभ्यासदेखील या शाखेत केला जातो. साम्य व भेद, विविध वैशिष्ट्ये, यांचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. उदा. जीवनपद्धती, भाषा, शिष्टाचार, आचार-विचार, घरे, धर्मश्रद्धा इत्यादी बाबतीत लहानसहान साम्य व भेद आढळतात. त्याचा अभ्यास मानवजातीशास्त्रात केला जातो.

### ४. **सामाजिक मानवशास्त्र** (Social Anthropology)

सांस्कृतिक मानवशास्त्राची सर्वात महत्त्वाची शाखा म्हणजे सामाजिक मानवशास्त्र होय. मानवाच्या सामाजिक जीवनाला केव्हा सुरुवात झाली. विविध सामाजिक जिवनाचे प्रकार कसे उदयाला आले. विशेषतः विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, धर्मसंस्था इत्यादी संस्थांचा उदय, विकास, त्यांची रचना व कार्ये इत्यादींचा अभ्यास या शाखेत केला जातो. मानवी सामाजिक जीवनाला सुरुवात आदिम समुदायापासून झाली म्हणून सामाजिक मानवशास्त्रात आदिवासी समुदायांचा अभ्यास केला जातो. एडवर्ड टायलर यांनी संस्कृतीची कल्पना आधारभूत मानून मानवशास्त्र व इतिहास यांच्यातील सिद्धांताच्या मदतीने आदिवासींचा अभ्यास केला. एमील डुरखाई यांनी समाजाचे स्वतंत्र अस्तित्व मानून ऑस्ट्रेलियन आदिवासी जमातींचा अभ्यास केला. सामाजिक मानवशास्त्राचा सविस्तर अभ्यास आपण पुढे करणार आहोत.

## (क) उपयोजित मानवशास्त्र (Applied Anthropology)

मानवशास्त्रातील अभ्यासाचे निष्कर्ष मानवी जीवनातील विविध समस्या सोडविण्यासाठी प्रत्यक्षात कसे वापरता येतील याचे स्पष्टीकरण उपयोजित मानवशास्त्र या शाखेत केले जाते. शारिरीक व सामाजिक या मानवशास्त्राच्या शाखातील काढलेले निष्कर्ष किंवा सिद्धांत प्रत्यक्ष परिस्थितीला लागू करण्याचे काम ही शाखा करते. मानवशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग जनकल्याणासाठी करणे हा उपयोजित मानवशास्त्राचा मुख्य उद्देश आहे. ज्याप्रमाणे औषधशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग मानवी रोगांच्या नियंत्रणासाठी केला जातो. जीवशास्त्रातील ज्ञानाचा उपयोग विविध जीवांच्या विकासासाठी केला जातो. त्याचप्रमाणे मानवशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग अखील मानवाच्या विकासासाठी केला जातो.

सांस्कृतिक मानवशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग मानवाच्या जीवनविषयक समस्या सोडवण्यासाठी केला जातो. युरोप खंडात अठराव्या शतकात औद्योगिक क्रांती झाली आणि वस्तुंचे प्रचंड उत्पादन होवू लागले. उत्पादित मालाच्या विक्रीसाठी ब्रिटीशांनी नवीन वसाहती स्थापन केल्या. व्यापाराच्या वाढीसाठी व राजकीय अंमल प्रस्थापित करण्यासाठी ब्रिटीशांना सामाजिक मानवशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग झाला. ब्रिटीशांना राज्यकारभार चालवण्यासाठी स्थानिक समाजाच्या भाषा, चालिरीती, वर्तनप्रकार, जीवनपद्धती इ. माहिती हवी होती. ती त्यांना सामाजिक मानवशास्त्रातून मिळाली. भारतामध्ये ब्रिटीश अधिकाऱ्यांना आपल्या साम्राज्य निर्मितीच्यावेळी अनेक अडचणी आल्या. त्यावेळी त्यांना सामाजिक मानवशास्त्रज्ञांनी मदत केल्याची अनेक उदाहरणे आहेत. एकदा छोटा नागपूर भागातील उरॉव आदिवासी गावामध्ये रेल्वे पुलाचे काम सुरू होते. पण धार्मिक कारणास्तव उरॉव लोकांनी रेल्वेपुलास विरोध केला म्हणून ठेकेदाराने त्यांच्या धार्मिक जीवनातील झेंड्याचे महत्त्व ओळखून रेल्वे इंजिनचे चित्र असणारा झेंडा उरॉव लोकांना भेट दिला. गावच्या यात्रेच्यावेळी अनेक उरॉव लोक आपापले झेंडे घेवून एकत्र आले त्यावेळी त्यांच्यामध्ये झेंड्यांच्या श्रेष्ठत्वावरून खूप मोठी मारामारी झाली. पोलिसांनी तात्पुरता हस्तक्षेप करून प्रकरण मिटविले. पण दरवर्षी अशी घटना घडू नये म्हणून तेथील जिल्हाध्यक्षांनी प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ डॉ. शरदचंद्र रॉय यांचा सल्ला घेतला व इतर उरॉव लोकांना विमानाचे चित्र असणारा झेंडा दिला. तेव्हापासून यात्रेच्यावेळी होणारा संघर्ष टळला.

चार्लस डार्विन यांनी जीव उत्क्रांतीवाद (Origin of Species) सिद्धांत मांडताना आदिवासींच्या अभ्यासाची मदत घेतली होती. हर्बर्ट स्पेन्सर यांनी सामाजिक उत्क्रांतीवाद (Social Evolution) हा सिद्धांत मांडताना आदिवासींचा अभ्यास केला होता. तसेच 'ऑगस्त काँत' यांनी (Positivism) विज्ञानवाद किंवा प्रत्यक्षवाद सिद्धांत मांडताना आदिवासींचा अभ्यास केला होता. एडव्हर्ड टायलर, मॅक्स मुल्लर, प्रिअेर व मॅरेट यांनी धर्माचे अध्ययन करताना आदिवासींच्या अभ्यासाची मदत घेतली होती.

मानवाने यंत्रे कशी हाताळावीत मानवाचे कृत्रिम अवयव कसे असावेत. माणसाने कोणते कपडे वापरावेत इत्यादी समस्या सोडवण्यासाठी शारिरीक मानवशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग होतो.

उपयोजित मानवशास्त्र ही अगदी अलिकडच्या काळात उदयास आलेली मानवशास्त्राची शाखा असून तिचे दिवसेंदिवस महत्त्व वाढत चालले आहे. विशेषतः पहिल्या जागतिक महायुद्धानंतर मानवशास्त्राचे महत्त्व लोकांना पटू लागले. त्यावेळीपासून आजपर्यंत या ज्ञानशाखेने गगनभरारी घेतलेली आहे. युद्धाच्यावेळी अनेक देशांना सैनिकांची निवड, त्यांचे प्रशिक्षण व नागरिकांचे सहकार्य याबाबत मानवशास्त्रज्ञांनी मोलाची मदत केली होती. उदा. कोरियाच्या युद्धात माहिती पत्रकांचा पाऊस पाडून जो प्रभावी प्रचार केला होता. त्याचे श्रेय मानवशास्त्रज्ञांनाच दिले जाते. युद्धकाळाप्रमाणे शांततेच्या काळातही मानवशास्त्रज्ञांनी दिलेले योगदान मोलाचे आहे. औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनाच्या पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल झाले व मानवी सामाजिक परिवर्तनाचा वेग वाढला. त्यामुळे समाजात अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या. त्यांचा सुक्ष्म अभ्यास मानवशास्त्रज्ञांनी केला व त्यावर उपाय सुचवले. उदा. वंश आणि

वंशश्रेष्ठतावाद यांचा सुक्ष्म अभ्यास करून शारिरीक रंगाचा व बुद्धीमत्तेचा कोणताच संबंध नाही असे अनुान काढले व वंशद्वेष कमी केला. अशा प्रकारे उपयोजित मानवशास्त्रात मानवी समाजाला उपयोगी पडणारे ज्ञान व उपाय योजनांची माहिती दिलेली असते.

### ⁂ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ⁂

१. हॉबेल यांची शारिरीक मानवशास्त्रज्ञांची व्याख्या सांगा.
--------------------------------------------------------------------------------

२. मानवाची कवटी किंवा हाडे यांचा अभ्यास मानवशास्त्राच्या कोणत्या शाखेत केला जातो.
--------------------------------------------------------------------------------

३. प्रागैतिहासीक काळ म्हणजे काय ?
--------------------------------------------------------------------------------

४. मानवजातीशास्त्रात कशाचा अभ्यास केला जातो ?
--------------------------------------------------------------------------------

५. मानवशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग जनकल्याणासाठी करणे हा मानवशास्त्राच्या कोणत्या शाखेचा मुख्य उद्देश आहे ?
--------------------------------------------------------------------------------

## १.३.३ सामाजिक मानवशास्त्र (Social Anthropology)

सामाजिक मानवशास्त्राचा अर्थ - सामाजिक मानवशास्त्र ही सांस्कृतिक मानवशास्त्राची एक महत्त्वाची शाखा आहे. सामाजिक मानवशास्त्रात मानवाच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास केला जातो. मानवाचे सामाजिक संबंध, सामाजिक वर्तन, सामाजिक संघटन, सामाजिक संस्था इत्यादींचा सविस्तर अभ्यास या शाखेत केला जातो. उदा. सामाजिक संस्थांचे प्रकार, उदय, रचना, कामे, वैशिष्ट्ये इत्यादींचा अभ्यास सामाजिक मानवशास्त्रात केला जातो. मानवी सामाजिक जीवनाचे स्वरूप समजून घेणे, हा सामाजिक मानवशास्त्राचा मुख्य उद्देश आहे.

- **सामाजिक मानवशास्त्राची व्याख्या** (Definition of Social Anthropology) –

१. **हॉबेल :** ''सामाजिक मानवशास्त्र हे सामाजिक वर्तन आणि सामाजिक संघटन यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करते.'' ("The interest of social Anthropology is in the social behaviour and the organization of social groups." - Hoebel)

२. **रॅडक्लिफ ब्राऊन :** ''विविध प्रकारच्या समाजांच्या पद्धतशीरपणे केलेल्या तुलनेवर आधारलेले संपूर्ण मानव समाजाच्या स्वरुपाचे अन्वेषण म्हणजे सामाजिक मानवशास्त्र होय.'' ("Social Anthropology is the investigation of the nature of human society by the systematic comparison of societies of diverse kinds." - **Radeliffe Brown**)

३. **डॉ. एस. सी. दुबे :** ''सामाजिक मानवशास्त्र हे सांस्कृतिक मानवशास्त्राचा असा भाग आहे की ज्यात संस्कृतीशी संबंधीत असलेल्या भौतिक पैलूंचा अभ्यास करण्यापेक्षा समुहाची संरचना आणि धर्म यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करते.'' ("Social Anthropology is the part of cultural Anthropology which devotes its primary attention to the study of social structure and religion rather than material aspects of culture." - **S. C. Dube**)

४. **मुजुमदार आणि मदन :** ''सामाजिक जिवनाचा विकास आणि सामाजिक जीवनाचे विविध प्रकार यांचा अभ्यास म्हणजे सामाजिक मानवशास्त्र होय.'' ("Social Anthropology is the study if development of social life and types of social life." - **Mujumdar and Madan**)

५. **एम. एन. श्रीनिवास :** ''सामाजिक मानवशास्त्रात मानवी समाजाचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. यात सर्व समाजाचा म्हणजे आदिवासी, नागरी आणि ऐतिहातिक समाजाचा समावेश होतो.'' ("Social Anthropology is comparitive study of human societies. Ideally it includes all societies primitive, civilized and historic." - **M. N. Shrinivas**)

## अ) सामाजिक मानवशास्त्राचे स्वरूप (Nature of Social Anthropology)

### ❐ मानवशास्त्र (Anthropology)

सामाजिक मानवशास्त्र ही मानवशास्त्राची शाखा आहे. मानवशास्त्रात मानवाचा अभ्यास करण्यात येतो. मानवाचा अभ्यास करणाऱ्या वेगवेगळ्या ज्ञानशाखा आहेत. त्यांना एकत्र करण्याची आवश्यकता १८५९ साली फ्रेंच शास्त्रज्ञ श्री. पॉल ब्रोका याने मांडली. पुढे सामान्य मानवशास्त्राचा (General Anthropology) उदय झाला असे सॉल टॅक्स (Sol-Tax) यांनी म्हटले आहे. तसे पाहिले तर 'पॉलब्रोका' पूर्वकाळात ॲरिस्टॉटलने सर्वात प्रथम 'Anthropologist' हा शब्द उपयोगात आणला. त्यावरून ॲरिस्टॉटल यांना ''मानवशास्त्राचा आद्य जनक'' (Father of Anthropology) असे म्हटले जाते. १७८९ मध्ये जर्मनशास्त्रज्ञ कांट (Kant) याने मानवाच्या उत्पत्तीसंबंधी 'Anthropologist' हे पुस्तक प्रसिद्ध केले.

## ❐ "Anthropology" संज्ञेचा अर्थ :–

मानवशास्त्रीला इंग्रजीत 'Anthropology' असा शब्द वापरण्यात येतो. 'Anthropology' ही संकल्पना 'Anthropos' म्हणजे मानव आणि 'Logos' म्हणजे शास्त्र अशा दोन शब्दांपासून बनली आहे. हे शब्द लॅटिन व ग्रीक भाषेतील आहेत. 'Anthropology' या संकल्पनेचा अर्थ 'Science of Man' म्हणजे 'मानवाचे शास्त्र' असा होतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास ''ज्या शास्त्रात मानवाचा सर्वांगीण अभ्यास करण्यात येतो, त्या शास्त्राला मानवशास्त्र असे म्हणतात.''

## ❐ मानवशास्त्राची व्याख्या –

- **मानवशास्त्रीय परिभाषा कोष :** ''मानवशास्त्रात मानवाचे अध्ययन केले जाते.''
- **फ्रान्स बोऊस :** ''मानवशास्त्राचा संबंध प्रामुख्याने मानवी समाजाच्या इतिहासाशी असलेला दिसतो.''
- **क्रोबर :** ''मानवी समूहाचे आणि समूह वर्तनाचे तसेच त्यांनी केलेल्या उत्पादनाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय.''
- **जेकब आणि स्टर्न :** ''पृथ्वीतलावरील मानवाच्या उत्पत्तीपासून शारीरिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचा आणि मानवी वर्तनाचा वैज्ञानिकरित्या अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय.''
- **डॉ. मुजुमदार आणि मदन** यांच्या मते, ''मानवाच्या शारीरिक, सांस्कृतिक व सामाजिक उत्पत्ती आणि विकासाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय.''
- **स्टिफेन फुक्स**च्या मते, ''मानव जेव्हा या भूतलावर जन्माला आला तेव्हापासून मानवी उत्पत्ती, मानवी वंश, त्यातील भिन्नता, सांस्कृतिक विकास व अन्य घटकांचा अभ्यास मानवशास्त्रात संपन्न होतो.''
- **हॉबेल** यांनी ''मानवाने केलेल्या सर्व कार्याचा अभ्यास मानवशास्त्रात केला पाहिजे.'' असे मत व्यक्त करून मानवशास्त्राला 'संस्कृतीचे विज्ञान' म्हटले आहे. त्यांचे मत इतर सर्व सामाजिक शास्त्रात मानवशास्त्र प्रमुख असून या शास्त्रात मानवाच्या विभिन्न अंगाचा अभ्यास करण्यात येतो.

१. मानवशास्त्र मानवाचा सर्वांगीण अभ्यास करणारे एकमेव विज्ञान होय.

२. मानवशास्त्रात मानवाचा समग्र अभ्यास करण्यात येतो.

३. मानवाची उत्पत्ती, जीवनातील आरंभिक अवस्था, शरीरशास्त्र, मानवी वंश, मानवाने सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक व इतर अंगात केलेल्या कार्याचे कोणत्याही प्रकारच्या मर्यादा लक्षात न घेता अभ्यास केला जातो.

४. या अभ्यासात प्रामुख्याने तुलनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येतो.

५. मानवशास्त्र आदिवासी जमातींच्या अभ्यासाशी निगडीत असल्याचे दिसते. परंतु याचा अर्थ या शास्त्रात प्रगत समाजाच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करण्यात येते असे नाही. मानवशास्त्रीय अभ्यासात सामाजीकरणास विशेष स्थान असते.

### ❒ मानवी अध्ययनावर भर :-

१. सॉलटॉक्स मताप्रमाणे, ''मानवशास्त्र म्हणजे सकल मानववंशाचा व अखिल मानव जातीचा सविस्तर अभ्यास करणारे शास्त्र होय.'' याचा अर्थ असा की, मानवशास्त्राचा अभ्यास कोणत्याही एका मानवी वंशापुरता व एखाद्या मानवी समाजापुरताच मर्यादित नाही. पृथ्वीतलावरील सर्वच मानवी समाजाचा अभ्यास मानवशास्त्राच्या कक्षेत येतो. क्लॅकहॅन च्या मताप्रमाणे, ''मानवाच्या विविध अंगाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रामध्ये मानवशास्त्रातच तेवढे मानवाचे सर्वस्पर्शी अभ्यास समाविष्ट असल्याचे दिसते.''

२. डॉ. मुजुमदार व मदन यांच्या मताप्रमाणे, ''मानवाच्या अभ्यासाला काळाचे असे बंधन नसते.'' वर्तमानकालीन मानवाप्रमाणेच भूतकालीन समाजातील मानवाचा अभ्यास मानवशास्त्रात करण्यात येतो. मानवाची उत्पत्ती कशा प्रकारे झाली असावी? मानवाचा शारीरिक विकास कोणकोणत्या टप्प्यातून झाला असावा? मानवाचे मानवपूर्व व उपमानव स्वरूप कसे होते? याचा अभ्यास मानवशास्त्रात करण्यात येतो. मानवाच्या अभ्यासावर ज्याप्रमाणे कालमानाच्या मर्यादा असतात. त्याचप्रमाणे स्थलमर्यादा पण नसतात. मानव हा कोणत्याही खंडातील दुर्गम प्रदेशातील आदिवासी किंवा प्रगत समाजातील, विकसित देशातील असू शकतो. मानवाचा अभ्यास करताना सांस्कृतिक स्तरांचा विचार महत्त्वाचा मानन्यात येत नाही.

३. मानवाच्या शरीररचनेचा, मानवी उत्क्रांती, जननशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे अशी मर्यादा नसते. मानवी अभ्यासात मानवी भावना, विचार क्रिया प्रतिमानांचा अभ्यास समाविष्ट असतो. हरस्कोव्हिटसच्या मताप्रमाणे मानवाने केलेल्या कार्याचा अभ्यास मानवशास्त्राचा विषय मानला पाहिजे.

## १.३.४ क्षेत्र कार्य पद्धत (Field Work Method)

### ❒ क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीचा अर्थ (Meaning of Field Work Method)

क्षेत्र कार्य पद्धत ही सामाजिक मानवशास्त्रात वापरली जाणारी महत्त्वाची अभ्यासपद्धत आहे. क्षेत्र कार्यपद्धत म्हणजे संशोधकाला ज्या समाजाचा अभ्यास करायचा आहे त्या समाजात त्याने प्रत्यक्ष जाऊन किमान ३ ते ४ वर्षे तेथे राहून त्या समाजाचा अभ्यास करणे होय. या अभ्यास पद्धतीत संशोधक स्वतः

त्या समाजात तीन-चार वर्षे वास्तव्य करतो. हा भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. संशोधकाचा प्रत्यक्ष संवाद त्या समाजातील लोकांशी असतो. संशोधक स्वतःच्या डोळ्यांनी हेतुपुरस्सर त्यांच्या जीवनाचे निरीक्षण करतो व त्यांच्या नोंदी ठेवतो. आदिवासी जमातींचा अभ्यास करण्यासाठी ही पद्धत वापरली जाते.

क्षेत्र कार्यपद्धतीचा उदय अगदी अलीकडच्या काळातील आहे. १९ व्या शतकाच्या अगोदर आदिवासींचा केवळ वर्णनात्मक स्वरूपाचा अभ्यास केला होता. प्रवासी, धर्मप्रसारक, प्रशासकीय व्यक्ती इत्यादींनी आदिवासींचे केलेले वर्णन हे एकांगी व अतिरंजित स्वरूपाचे होते. काही व्यक्तींनी आदिवासींचे वस्तुस्थिती निदर्शक वर्णन केलेले होते. उदा. आंद्रे बेटले (Andrew Battel) यांनी 'कांगो' जेरेमी लोबो (Jerome Lobo) यांनी ॲबिसिनोयातील, विल्यम बोस्मन (William Bosman) यांनी गोल्डकोस्ट इत्यादींनी केलेले लिखाण वस्तुस्थिती निदर्शक होते. परंतु शास्त्रीय पद्धतींचा वापर केला नसल्यामुळे त्यात अनेक उणिवा होत्या. पण वरील विचारवंतांच्या प्रेरणेळे आदिवासींच्या शास्त्रीय अभ्यासाला चालना मिळाली.

क्षेत्र कार्य पद्धतीचा प्रथम वापर २० व्या शतकात प्रो रॅडक्लिफ ब्राऊन यांनी केला. त्यांनी अंदमान बेटावरील आदिवासींचा अभ्यास प्रत्यक्ष त्यांच्या सान्निध्यात दोन वर्षे राहून केला. क्षेत्र कार्य पद्धतीच्या इतिहासातील हा अभ्यास पथदर्शक म्हणून ओळखला जातो. याच दरम्यान १९१४-१८ या काळात मॅलिनोवस्की (Malinowski) यांनी टॉब्रिॲंड बेटावरील आदिवासींचा अभ्यास त्यांची भाषा आत्मसात करून त्यांच्या सान्निध्यात सलग चार वर्षे राहून केला. नंतर अनेक सामाजिक मानवशास्त्रज्ञांनी क्षेत्र कार्य पद्धतीचा वापर करून विविध आदिवासी जमातींचा अभ्यास केला.

### १.३.४.१ अ) क्षेत्र कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये (Characteristics of Field Work Method)

क्षेत्र कार्य पद्धत म्हणजे संशोधकाने ज्या आदिवासी जमातीचा अभ्यास करायचा आहे त्या जमातीत प्रत्यक्ष स्वतः जाऊन तीन-चार वर्षे राहून, त्यांच्याशी मैत्री व घनिष्ठ संबंध निर्माण करून त्यांच्या दैनंदिन जीवनाचे निरीक्षण करणे होय. हे काम तितकेसे सोपे नाही. आदिवासींना आपलेसे करण्यासाठी एक वर्षाहून अधिक काळ लागतो. आदिवासींची भाषा आत्मसात करणे, त्यांच्याशी मैत्री करणे, त्यांना बोलते करणे या गोष्टी सहज शक्य नसतात. पण ते सामाजिक मानवशास्त्रज्ञ साध्य करतात. या क्षेत्र कार्य पद्धतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

#### १. अध्ययनाचा कालावधी (Time for Study)

आदिवासी जमातीचा अभ्यास करताना संशोधकाला आदिवासी सामाजिक जीवनाची पूर्ण माहिती करून घ्यावी लागते. यासाठी बराचसा कालावधी लागतो. सहज भेटीतून अगर अल्पकाळात ही माहिती संपादित करणे अशक्य असते. काहीवेळा दिसते तसे नसते, तर काहीवेळा किरकोळ वाटणारी घटना महत्त्वाची असु शकते. यासाठी परिपूर्ण माहितीची गरज असते. त्यामुळे बराचसा कालावधी लागतो.

आदिवासी जीवनाची पूर्ण माहिती होण्यासाठी किमान तीन-चार वर्षाचा कालावधी लागतो, असे अनेक मानवशास्त्रज्ञांचे मत आहे.

आदिवासी लोकांध्ये राहून त्यांना आपलेसे करावे लागते. त्यांची भाषा शिकावी लागते. त्यांच्याशी भावनिक नाते निर्माण व्हावे लागते. पण भौतिक सान्निध्या (Physical Proximity) शिवाय भावनिक नाती निर्माण करता येत नाहीत. यासाठी बराचसा कालावधी लागतो. केवळ दीर्घकालावधी महत्त्वाचा नाही. या कालावधीचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा लागतो. आदिवासी समाजात घडून येणाऱ्या सामाजिक घटना उदा. धार्मिक समारंभ, वैवाहीक समारंभ, न्याय निवाडा, वधु-वर निवड, जादू इत्यादीची तपशिलवार माहिती संपादित करावी लागते. या घटना नेहमी घडणाऱ्या नसतात. किंवा त्यांची ठराविक वेळ नसते, ज्यावेळी या घटना घडतात तेथे संशोधक हजर असेलच असे नाही. काही वेळा या घटना वर्षा-दोन वर्षातून एकदा घडत असतात. यामुळेही अध्ययनाचा कालावधी अधिक लागतो.

आदिवासी जीवनाचे यथार्थ आकलन संशोधकाला होण्यासाठी त्याने आदिवासींमध्ये भौतिक सान्निध्याबरोबर मानसिक एकरूप झाले पाहिजे. त्याशिवाय आदिवासींच्या भावभावनांचे वर्णन संशोधकाला करता येणार नाही. संशोधकाने आदिवासीमध्ये वावरताना आपला धर्म, आपली संस्कृती, आपल्या आवडी-निवडी, छंद नाद, सवयी बाजूला ठेवाव्या लागतात. आपण एक संशोधक आहोत यापलिकडे संशोधकाच्या मनात कोणताही हेतु नसावा. तरच आदिवासींच्या वास्तव जीवनाचा संशोधकाला जवळून अभ्यास करता येईल. आदिवासी जिवनातील चुका संशोधकाने काढू नयेत. आदिवासी जीवनात ढवळाढवळ संशोधकाने करू नये. आदिवासी लोकांना विश्वासात घेवून त्यांच्या समग्र जीवनपद्धतीचा अभ्यास संशोधकाने केला पाहिजे. यासाठी अधिक कालावधीची गरज असते.

## २. **अध्ययनाची भाषा** (Language of Study)

आदिवासींचा वस्तुनिष्ठ अभ्यास होण्यासाठी संशोधकाने आदिवासींमध्ये किमान ३ ते ४ वर्षे वास्तव्य केले पाहिजे. आदिवासींच्या बरोबर खेळीमेळीने वागले पाहिजे. त्यांच्याशी सुसंवाद साधता आला पाहिजे. त्यासाठी संशोधकाला आदिवासींच्या भाषेचे ज्ञान असले पाहिजे. संशोधकाला आदिवासींची भाषा चांगल्या रितीने बोलता आली पाहिजे. अर्थपूर्ण संवादासाठी संशोधक व आदिवासी यांची एकच भाषा असली पाहिजे. आदिवासींची भाषा आधुनिक समाजातील भाषेहून वेगळी असते. कारण आदिवासींची भाषा बोलीभाषा असते. त्यांच्या भाषेला लिपी नसते. सुरुवातीला संशोधकाला दुभाषाची मदत घ्यावी लागते. पण कायमस्वरूपी दुभाषाची मदत घेणे शक्य नसते. आदिवासींच्या बरोबर मानसिकरित्या एकरुप होण्यासाठी प्रत्यक्ष संशोधक व आदिवासी यांच्या संवादाची गरज असते. आदिवासी संशोधकाची भाषा शिकणार नाहीत म्हणून संशोधकाला आदिवासींची भाषा कितीही अवघड वाटत असली तरी शिकावीच लागते.

भाषा हे आचार-विचाराच्या देवाणघेवाणीचे उत्तम साधन आहे. त्यामुळे भाषा शिकल्यावर आदिवासींचे आचार-विचार संशोधकाला समजून घेता येतात. भाषेच्या सहाय्याने आदिवासींच्या अंतरमनाचा वेध घेता येतो. त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होता येते. त्यांच्या सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक जिवनात देखील सहभागी होता येते. भाषा हा एक संस्कृतीचा घटक आहे. आदिवासीबरोबर भावनीक नाते निर्माण करता येते. त्यामुळे आदिवासी जीवनाची वास्तवता समजते. मॅलिनोवस्की यांनी टोब्रिअँड आदिवासींचा अभ्यास त्यांची भाषा शिकूनच केला. सध्या अनेक संशोधक प्रथम आदिवासी भाषेचा अभ्यास करतात. त्यामुळे आदिवासींची भाषा शिकणे हे क्षेत्र कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य मानले जाते.

### ३. **अध्ययनाचे क्षेत्र** (Field of Study)

क्षेत्र कार्यपद्धतीचा वापर करून अध्ययन करताना अध्ययनाचे क्षेत्र निवडणे हा भाग अत्यंत महत्त्वाचा असतो. आदिवासींचा समग्र अभ्यास करायचा की विशिष्ट अंगाचा अभ्यास करायचा, हे प्रथम निश्चित केले पाहिजे. कारण अध्ययन क्षेत्राची निवड यावरच अवलंबून असते. अनेक मानवशास्त्रज्ञांच्या मते आदिवासींचा समग्र अभ्यास करावा. कारण आदिवासींच्या चालीरिती, रुढी, प्रथा, परंपरा, वर्तनप्रकार एकमेकांशी सहसंबंधीत असतात. उदा. बैगा जमातीतील सर्व स्त्रिया आपल्या शरिरावर गोंदण काढून घेतात. यावेळी स्त्रियांना खूप वेदना होतात. तरीही त्या आपले संपूर्ण शरीर गोंदून घेतात. कारण मृत्यूनंतर प्रत्येक स्त्री स्वर्गात जाते. तिथे तिच्या शरीरावर जेवढे दागिने गोंदलेले असतात तेवढे सर्व दागिने तिला देवाकडून मिळणार असतात अशी त्यांची धार्मिक श्रद्धा आहे. त्यामुळे प्रत्येक बैगा स्त्री आपल्या संपूर्ण शरीरावर गोंदण काढून घेत असते. त्यामुळे आदिवासींचा समग्र अभ्यास करावा. कारण कोणती नोंद कुठे उपयोगी पडेल, हे प्रथमदर्शनी सांगता येत नाही. समग्र अध्ययनात आदिवासींच्या सर्व दैनंदिन वर्तनाची नोंद घेतली जाते.

इव्हान्स प्रिचर्ड यांनी आदिवासींचा समग्र जीवनाचा अभ्यास करताना दैनंदिन जीवनातील बारीकसारीक गोष्टींची नोंद ठेवली पाहिजे, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. या नोंदीचा अहवाल लेखनात समावेश होईल किंवा नाही, हे सांगता येत नाही. कारण एखादे किरकोळ वाटणारे वर्तन कधी-कधी महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकू शकते. उदा. तोडा जमातीत म्हैशीची धार काढण्याचे काम केवळ पुरुष करतात. स्त्रीयांना म्हैशीच्या गोठ्यात जाण्यास बंदी आहे. याचे कारण तोडा जमातीत म्हैशींना धार्मिक महत्त्व आहे. आदिवासींची जीवनपद्धती, प्रथा, मूल्ये, सवयी याबाबतची संपूर्ण माहिती मिळवण्यासाठी अशा बाबींची नोंद घेणे आवश्यक असते. म्हणून संशोधकांचा अभ्यासाचा दृष्टीकोन समग्र असावा.

### ४. **संशोधकाचे गुण किंवा पात्रता** (Elegibility of Researcher's)

क्षेत्र कार्य पद्धतीने आदिवासी समाजाचे अध्ययन करणे हे काम अवघड आहे. रानटी, अज्ञानी

आणि रांगड्या आदिवासी समाजाचे अध्ययन करणे हे संशोधकासमोर फार मोठे आव्हान असते. आदिवासीमध्ये प्रत्यक्ष जाऊन राहणे, त्यांची भाषा शिकणे, त्यांना आपलेसे करणे या गोष्टी सहज शक्य नाहीत. त्यासाठी संशोधकसुद्धा तेवढाच हुशार, धाडशी, जिद्दी व संयमी असावा लागतो. त्यासाठी त्याच्याकडे विशिष्ट गुण किंवा पात्रता असणे अपरिहार्य आहे. अज्ञानाच्या खाईत लोटलेल्या, परंपरेत बरबटलेल्या आणि पशुतुल्य जीवन जगणाऱ्या आदिवासींमध्ये तीन ते चार वर्षे राहून अभ्यास करण्यासाठी संशोधकाच्या अंगी विशिष्ट गुण किंवा पात्रता असावी लागते.

## ❐ संशोधकाचे गुण किंवा पात्रता –

### (अ) प्रशिक्षण (Academic Training)

आदिवासींमध्ये जाऊन राहणे आणि त्यांची जीवनपद्धती न्याहाळणे (अवलोकन करणे) ही बाब सहजशक्य नाही. त्यासाठी संशोधक प्रशिक्षीत असावा लागतो. ज्या भौगोलिक प्रदेशात आदिवासी राहतात त्याची व त्यांच्या जीवनपद्धतीविषयी वर्णनात्मक माहिती संशोधकाला असणे गरजेचे आहे. संशोधकाला अभ्यास करण्यापूर्वी सामाजिक मानवशास्त्राचे प्रशिक्षण असणे गरजेचे आहे. सामाजिक मानवशास्त्राचे अध्ययन केल्यामुळे संशोधकाला संशोधन करत असताना कोणत्या बाबी महत्त्वाच्या आहेत व कोणत्या महत्त्वाच्या नाहीत यातील फरक कळून येईल व नियोजित वेळेत संशोधनाचे काम पूर्ण होईल. सामाजिक मानवशास्त्रात सैद्धांतिक ज्ञानाची मांडणी केली असल्यामुळे संशोधकाला निरीक्षण करणे व त्याच्या नोंदी ठेवणे सोपे जाईल. आदिवासींच्या दैनंदिन जीवनातील बारीकसारीक गोष्टींची नोंद घेणे सहजशक्य होते. आदिवासी वर्तनाचा उचीत अर्थ समजून येईल. म्हणूनच मार्गारेट मीड म्हणतात ''सैद्धांतिक ज्ञानाविना अभ्यासकाचे अवलोकन पुरेसे न होण्याचा व अवलोकन केलेल्या बाबींचा योग्य तो अन्वयार्थ न लावता येण्याचा धोका असतो.'' ("There is also the danger that without theoretical tools the field anthropologist may not see enough and may not sense the significance of what he does see.")

सैद्धांतिक ज्ञान नसणाऱ्या पण असामान्य प्रतिभा असणाऱ्या काही बुद्धीमान व्यक्तींनी संशोधन करून त्यांचे लिखाण पुस्तकस्वरूपात प्रकट केले आहे. उदा. डुबॉइस यांचे 'हिंदू मॅनर्स कस्टम्स अँड सेरेनीज' (हिंदूंचे शिष्टाचार, रितीरिवाज व धार्मिक समारंभ) हे पुस्तक १८१६ साली प्रकाशित झाले होते. त्याचप्रमाणे लेन (Lane) यांचे 'ॲन अकाऊंट ऑफ दी मॅनर्स अँड कस्टस ऑफ दी मॉडर्न इजिप्शीयन' (आधुनिक इजिप्तमधील लोकांच्या शिष्टाचारांचा व रितीरिवाजांचा वृत्तांत) हे पुस्तक १८३६ साली प्रकाशित केले होते. या पुस्तकांचे महत्त्व आपल्याला नाकारता येणार नाही. पण सामाजिक मानवशास्त्रातील सैद्धांतिक ज्ञान असलेली व्यक्ती यापेक्षा अधिक सखोल व परिपूर्ण माहितीचे चांगल्या प्रकारे वर्णन करु शकेल.

## (ब) विशिष्ट प्रकारचा स्वभाव :-

संशोधक प्रशिक्षीत असलाच पाहिजे यात काहीही शंका नाही. पण त्याचा विशिष्ट स्वरूपाचा स्वभाव देखील असला पाहिजे. संशोधकाच्या स्वभावाचा परिणाम अभ्यासावर होणार असतो. संशोधक संशोधनात यशस्वी होण्यासाठी त्याच्याकडे असामान्य जिद्द, समरस होण्याची वृत्ती व सहानुभूती यांची गरज असते.

### १. असामान्य जिद्द :-

बहुतेक आदिवासी जमाती दूर डोंगर-दऱ्या, कड्या-कपाऱ्यात किंवा जंगलात राहतात. त्याठिकाणी कोणत्याच सोईसुविधा नसतात. तेथील वातावरणाची व जीवनपद्धतीची संशोधकाला सवय नसते. त्यामुळे अशा परिस्थितीत संशोधकाला असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. तेथील वातावरण, निवास, भोजन, पाणी इत्यादी सर्वच बाबी आरोग्यास विघातक असतात. या प्रतिकूल परिस्थितीत संशोधक राहावे लागते. यासाठी त्यांच्याजवळ असामान्य जिद्द असावी लागते.

माणूस हा सवयीचा गुलाम आहे. संशोधक हा सुद्धा एक माणूस असल्यामुळे त्यांच्याही काही सवयी असतात. त्या सवयी आधुनिक समाज जिवनाशी निगडीत असतात. प्रातःविधीपासून रात्री झोपेपर्यंत अनेक सवयी संशोधकाच्या असतात. गुरूवर्य डॉ. गुरुनाथ नाडगोंडे यांनी 'भारतीय आदिवासी' या पुस्तकात उदाहरण दिले आहे. श्रीमती गोदावरी परुळेकर यांनी महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील 'वारली' जमातीच्या समस्या जाणून घेण्यासाठी तेथे राहण्याचा निश्चय केला. पण आंघोळीसाठी न्हाणीघर व पाणी नसल्यामुळे त्यांना वस्तीपासून मैलभर चालावे तर लागलेच शिवाय एका छोट्याशा घाणेरड्या पाण्याच्या डबक्यात आंघोळ करावी लागली. पण त्यांनी आपली जिद्द सोडली नाही. या प्रकारच्या अनेक अडचणींना तोंड देण्यासाठी संशोधकाकडे असामान्य जिद्दच असावी लागते.

### २. एकरूप होण्याची प्रवृत्ती :-

संशोधकाचा स्वभाव केवळ जिद्दी असून चालत नाही. आदिवासी जीवनाचे धागे-दोरे समजून घेण्यासाठी त्यांना त्यांच्याशी एकरूप व्हावे लागते. आदिवासींना आपलेसे करून घ्यावे लागते. तेव्हांच ते संशोधकांशी दिलखुलास बोलू लागतात. रुढी, प्रथा, परंपरा विशेषतः जादू, धर्म व मंत्रतंत्र याची माहिती मिळवणे सहजशक्य नसते. यासाठी आदिवासींच्या हृदयात संशोधकाने स्थान निर्माण केले पाहिजे. संशोधक हा आपल्या पैकीच एक व्यक्ती आहे, असा भास संशोधकाला निर्माण करावा लागतो. बऱ्याच वेळा आदिवासींच्या सण समारंभाच्यावेळी सहभागी व्हायचे असल्यास त्यांच्या सारखे संशोधकाला अर्धनग्न व्हावे लागते कारण आदिवासी नृत्याच्यावेळी त्यांचेच कपडे वापरावे लागतात. काहीवेळा प्रसाद म्हणून कच्चे मांस खावे लागते या गोष्टी केल्याशिवाय संशोधकाला आदिवासींच्या बरोबर भावनिक एकरुपता साधता येत नाही.

## ३. आवड व सहानुभूती :–

आवड असेल तर सवड होते असे म्हटले जाते. संशोधकाला आदिवासींच्या अभ्यासाची आवड निर्माण झाली पाहिजे. आदिवासींच्याबद्दल त्यांच्या मनात आस्था व सहानुभूती असली पाहिजे. आदिवासी जीवनाबद्दल संशोधकाच्या मनात घृणा, तिरस्कार, मत्सर किंवा उदासिनता असून चालणार नाही. त्यांचा अभ्यासावर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते. आधुनिकतेचा व विज्ञानाचा जराही गंध नसणारे आदिवासी निष्पाप व भोळेभाबडे असतात. त्यांचे गलिच्छ राहणीमान, निरर्थक वाटणाऱ्या रुढी, प्रथा, परंपरा व त्यांचे दारिद्र्य यामुळे संशोधकाच्या मनात त्यांच्याविषयी अनादर निर्माण होण्याची शक्यता असते. अशा वेळी संशोधकाचा स्वभाव बदलून चालणार नाही.

बहुतेक आदिवासी आपले अस्तित्व टिकवण्यासाठी निकराचे प्रयत्न करत असतात. खायला पोटभर अन्न नाही. अंगावर कपडे नाहीत, राहायला चांगले घर नाही. उत्पन्नाची कोणतीच साधने नाहीत, शिक्षण नाही अशा आदिवासी समाजाबद्दल संशोधकाला सहानुभूती असेल तरच तो त्यांच्याशी एकरूप होऊन संवाद साधू शकेल व तो संशोधनात यशस्वी होईल. यासाठी संशोधकाच्या स्वभावात आदिवासींविषयी आवड व सहानुभूती असली पाहिजे.

## ४. कल्पनात्मक आंतरदृष्टी (Imaginative insight)

संशोधकाकडे कल्पनात्मक आंतरदृष्टी असली पाहिजे. संशोधक हा चित्रकार किंवा फोटोग्राफर नसतो. पाहिलेल्या दृष्याचा योग्य तो अन्वयार्थ लावण्याची क्षमता म्हणजे कल्पनात्मक आंतरदृष्टी होय. डॉ. अंबादास माडगुळकर व प्रा. शशिकांत फडणीस यांच्यामते संशोधकाकडे मानवशास्त्राच्या सखोल ज्ञानाबरोबर थोडीशी प्रतिभासुद्धा असली पाहिजे. म्हणजे नेमक्या शब्दात योग्य वर्णन करता येते. मिळालेल्या माहितीमध्ये महत्त्वाची बाब कोणती आहे हे संशोधकाला समजले की त्याचे वर्णन सविस्तर करता येते.

## ५. लेखनकौशल्य :–

कल्पनात्मक आंतरदृष्टीबरोबरच संशोधकाकडे लेखन कौशल्य पाहिजे. संशोधकाला आदिवासींची जीवनपद्धती समजून चालणार नाही तर ती इतरांनाही समजावी यासाठी संपादित केलेल्या माहितीचे लेखन केले पाहिजे. लेखन योग्य प्रकारे झाले नाही तर त्या माहितीलाही काही अर्थ राहात नाही. आदिवासी जीवनाचे योग्य शब्दात लेखन करण्यासाठी संशोधकाकडे लेखन कौशल्य असावे लागते. संशोधकाच्या बुद्धीपटलावर उमटलेले विचार योग्य शब्दात उतरवण्याची कला म्हणजे लेखन कौशल्य होय. आदिवासी जीवनातील सुभाषिते, गाणी, दंतकथा, म्हणी, कोडी, उखाणे इत्यादींना संशोधकाने समजून घेऊन त्यांचे भाव–भावना सहीत अचूक लेखन केले पाहिजे. आदिवासी जीवनातील विचार व तत्त्वज्ञान आधुनिक समाजापर्यंत जसेच्या तसे पोहोचवले पाहिजेत. त्यामुळे आधुनिक समाजातील लोकांचे आदिवासींविषयी

गैरसमज दूर होतील. संशोधकालासुद्धा असामान्य जिद्दीवर कठोर परिश्रम घेऊन केलेल्या आदिवासींच्या अभ्यासाचे समाधान मिळेल.

वरीलप्रमाणे क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीची वैशिष्ट्ये सांगता येतील. क्षेत्रकार्य अभ्यास पद्धती, इतर अभ्यास पद्धतीपेक्षा पूर्णपणे वेगळी असून तीचा वापर करून एखाद्या आदिवासी जमातीचा अभ्यास करणे ही कठीण बाब आहे. तरीसुद्धा अनेक मानवशास्त्रज्ञांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर या अभ्यास पद्धतीचा वापर करून अनेक आदिवासी जमातींचा अभ्यास केला आहे. उदा.

१. प्रा. रेडक्लिफ ब्राऊन - अंदमान बेटावरील आदिवासींचा अभ्यास.

२. मॅलिनॉस्की - ट्रोब्रिअँड.

३. प्रा. शापेरा (Schapera) - आफ्रिकेतील बेचून आदिवासींचा अभ्यास.

४. प्रा. नाडेल - नैजेरियातील सूप आदिवासी.

आदिवासी समाज हा मानवी समाजाचाच एक अविभाज्य घटक आहे. मानवी सामाजिक जीवनाला येथूनच सुरुवात झाली. मानवी जीवनाच्या विकासाची पहिली अवस्था म्हणजे आदिवासी होय. अशा आदिवासींचा यथार्थ व वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी केवळ क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतच उपयोगी पडते. मानवशास्त्राच्या दृष्टीकोनातून आदिवासींच्या समग्र जीवनाचा अभ्यास करण्यासाठी केवळ क्षेत्रकार्य पद्धतच उपयोगी आहे, असे अनेक मानवशास्त्रज्ञांचे मत आहे. आदिवासींच्या धर्म, रुढी, प्रथा, परंपरा, विवाह पद्धत, श्रद्धा, कल्पना, भाव-भावना, समजूती इत्यादी सर्वांगिण जीवनाचा वास्तव अभ्यास होण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जातो.

### १.३.४.२ ब) क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीचे महत्त्व (Importance of Field Work Method)

सामाजिक मानवशास्त्रात आदिवासी सामाजिक जीवनाचे समग्र अध्ययन केले जाते. आदिवासींची संस्कृती, धर्म, रुढी, प्रथा, परंपरा, जादू, दैनंदिन जीवनमान, आचार, विचार, शिष्टाचार इत्यादींचा अभ्यास केला जातो. उदा. ऐतिहासिक पद्धत (Historical Method), तुलनात्मक पद्धत (comparative Method), प्रकार्यात्मक पद्धती (Functional Method) तसेच क्षेत्र कार्य पद्धत (Field Work Method). यापैकी क्षेत्र कार्यपद्धत ही सर्वात जास्त उपयुक्त पद्धत मानली जाते. आदिवासी समाज हा रानटी, मागास, अशिक्षित, लाजरा, बुजरा, अलिप्त जीवन जगणारा असल्यामुळे त्याच्या अभ्यासासाठी क्षेत्र कार्यपद्धतच महत्त्वाची मानली जाते.

**१. सखोल अध्ययन :-**

क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीमुळे आदिवासी जिवनाचे सखोल अध्ययन केले जाते. या पद्धतीत

अभ्यासक/ संशोधक आदिवासी समाजात प्रत्यक्ष तीन-चार वर्षे राहात असल्यामुळे तो आदिवासी समाजाशी एकरूप होतो. त्यांचे दैनंदिन जीवन तो जवळून पाहू शकतो. काहीवेळा त्याचा प्रत्यक्ष अनुभवदेखील तो घेतो. त्यांची भाषा शिकल्यामुळे त्यांच्या समग्र संस्कृतीचे अध्ययन करणे सोपे जाते. आदिवासींच्या मध्येच खाणे-पिणे, उठणे-बसणे असल्यामुळे त्यांच्या जीवनातील सर्व सुख-दुःखाची संशोधकाला जाणीव होते. विविध समारंभात संशोधक प्रत्यक्ष सहभागी होत असल्यामुळे त्यातील कोणतीच बाब छुपी राहात नाही. सत्य माहिती संशोधकाला मिळत असल्यामुळे आदिवासी जीवनाची पाळेमुळे शोधून काढणे सोयीस्कर जाते.

आदिवासी दरिद्री, अज्ञानी असले तरी त्यांच्या आयुष्यात सुखाचे प्रसंग सुद्धा असतात. याची जाणीव क्षेत्र कार्यपद्धतीनेच झाली आहे. आपल्या दृष्टीकोनातून आदिवासी गरीब आहेत. पण ते स्वतःला जंगलचे राजे समजतात. आपला कोणताही सण-समारंभ उत्सव ते मनापासून आनंदात साजरा करतात. सुखाबरोबरच दुःखाची देखील त्यांना जाणीव असते. असे आदिवासींचे सखोल अध्ययन केवळ क्षेत्र कार्यपद्धतीमुळेच होऊ शकते.

## २. अध्ययनाच्या इतर पद्धती निरुपयोगी :-

सामाजिक मानवशास्त्रात क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीप्रमाणे इतर अनेक पद्धतींचा वापर केला जातो. पण त्या पद्धतीवर अनेक प्रकारच्या मर्यादा येतात म्हणून त्या पद्धती निरुपयोगी समजल्या जातात. त्या पद्धती व त्यांच्या मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) ऐतिहासिक पद्धत** : विशिष्ट समाजात विशेषांचे विश्लेषण विशिष्ट घटनांच्या परंपरेने करण्याच्या पद्धतीला ऐतिहासिक पद्धती म्हणतात. या पद्धतीद्वारे सामाजिक मानवशास्त्रज्ञ कोणत्याही समाज, संस्था आणि संस्कृतीच्या उदयाची आणि विकासाची माहिती संपादन करतात. यासाठी शिलालेख, नाणी, दानपत्रे, आत्मकथा इत्यादींचे सहाय्य घेतले जाते. पण आदिवासी समाजात लिखित साधनांचा अभाव असल्यामुळे ही पद्धत वापरणे शक्य होत नाही. आदिवासीमध्ये फक्त बोली भाषा आहे. त्यांच्या भाषेला लिपी नाही. ऐतिहासिक पद्धतीमुळे केवळ घटनांचा क्रम समजतो. या पद्धतीमध्ये वास्तव अनुभवापेक्षा तार्कीक अनुभवाना प्राधान्य दिले जाते. तसेच या पद्धतीने काढलेले निष्कर्ष कितपत खरे आहेत याचे परिक्षण करता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये सामाजिक मानवशास्त्रात ऐतिहासिक पद्धत निरुपयोगी ठरते.

**ब) तुलनात्मक पद्धत** : सामाजिक संशोधनात फार वर्षापासून तुलनात्मक पद्धतीचा वापर केला जातो. ॲरिस्टॉटलने राज्यसंस्थांचा अभ्यास करताना प्रथम तुलनात्मक पद्धतीचा वापर केला होता. तुलनात्मक पद्धतीने अभ्यास करताना दोन किंवा अधिक घटक एकत्र करून

त्यांच्यातील साम्य व भेद काढले जातात व त्यावर आधारित सामान्य नियम शोधून काढले जातात. पण आजच्या परिस्थितीत समग्र विश्वात व्यापक स्वरूपात प्रत्येक घटक असल्यामुळे त्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे अशक्य व कठीण झाले आहे. साम्य व भेदांच्या आधारे तयार केलेले सामान्य नियम सर्व विस्तृत घटकांना समान स्वरुपात लागू होऊ शकत नाहीत. त्यामुळे तुलनात्मक पद्धत निरुपयोगी ठरते.

**क) प्रकार्यात्मक पद्धत** : समाजात प्रत्येक घटकाचे कार्य निश्चित असते. समाजातील प्रत्येक घटकात परस्पर संबंधीत असतो. समाजातील कोणताच घटक स्वतंत्र नसतो तसाच तो कार्यहीन सुद्धा नसतो. यातून समाजात एक संघटित व्यवस्था उदयास येते. असे प्रकार्यवादी समर्थकांचे मत आहे. या पद्धतीनुसार प्रत्येक घटकाच्या कार्यावर भर दिला आहे. पण घटकाच्या रचनेवरसुद्धा घटकाचे महत्त्व अवलंबून असते. आदिवासींच्या बाबतीत घटकांना कार्यप्रणाली असते याची जाणीव नसते. किंवा काहीवेळा वेगळेच उत्तर मिळू शकते. एकाच घटकाची अनेक कार्ये असल्यामुळे संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असते. मॅलिनोवस्कींच्या मते, केवळ सामाजिक संस्थांच्या बाबतीत याचा विचार करावा.

**ड) प्रश्नावली व मुलाखत** : आदिवासी समाजाचा अभ्यास करण्यासाठी खानेसुमारी (Census), प्रश्नावली (Questionaire), मुलाखत (Interview) इत्यादी अभ्यास पद्धतींचा वापर करणे काही वेळेला अशक्य असते. आदिवासींची केवळ बोली भाषा आहे. त्यांच्या भाषेला लिपी नाही. त्याचप्रमाणे बहुतांशी आदिवासी आजही निरक्षर आहेत. त्यामुळे त्यांच्याशी संवाद साधने कठीण जाते. म्हणून याही पद्धती निरुपयोगी ठरतात.

### ३. आदिवासी विकास :–

आदिवासींचा विकास किंवा जीवनमान कसे उंचवावे याबाबत अनेक मानवशास्त्रज्ञांध्ये दुत आहे. प्रत्येक आदिवासी समाजाची जीवनपद्धती व नैसर्गिक परिस्थिती भिन्न आहे. पण क्षेत्र कार्य पद्धतीद्वारे प्रत्येक आदिवासींचा स्वतंत्र अभ्यास करून त्या आदिवासी जमातीच्या विकासासंदर्भात संशोधकाला आपली स्वतंत्र मते मांडता येतात. त्याद्वारे जास्तीत-जास्त परिणामकारक विकासाचे मार्ग शोधून काढता येतात. शिवाय इतर पद्धतींना आदिवासी समाजात अनेक मर्यादा येतात. त्यामुळे समग्र व परिपूर्ण अभ्यासाची शक्यता कमी असते. जर संपूर्ण जीवनपद्धतीची माहिती संपादीत करता आली नसली तर विकासाचे नियम किंवा मार्ग सुचवणे कठीण जाईल. त्या दृष्टीकोनातून क्षेत्र कार्य पद्धतीला महत्त्व आहे.

### ४. आदिवासी समस्यांचे निराकरण :–

आदिवासी समुदायात अज्ञान, दारिद्र्य, निरक्षरता, कुपोषण, विस्थापन इत्यादी अनेक सामाजिक समस्या आहेत. क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीद्वारे या समस्यांच्या निराकरणासाठी मार्ग सुचवता येतात.

दिर्घकाळ वास्तव्य केल्यामुळे संशोधकाला समस्येविषयी संपूर्ण माहिती झालेली असते. समस्येच्या मुळापर्यंत जाऊन तिच्या निराकरणाविषयी मार्ग सुचवणे क्षेत्र कार्य पद्धतीद्वारे सोपे जाते. अलिकडेच म्हणजेच सन २००८-०९ च्या वर्षाच्या शेवटी महाराष्ट्र शासनाने सर्वच आदिवासींना त्यांच्या जमिनी त्यांच्या नावे करून देण्याचे ठरवले आहे. तसा कायदाही केलेला आहे. ज्या भौगोलिक प्रदेशात वर्षानुवर्षे आदिवासी राहतात किंवा जंगलात वास करतात तेथील जमीन आदिवासींच्या नावे करणे हा निर्णय कौतुकास्पद आहे.

### ५. आदिवासींबद्दलचे गैरसमज दूर करणे :-

या अभ्यास पद्धतीद्वारे आदिवासींबद्दलचे प्रगत समाजातील गैरसमज दूर करणे शक्य होते. आतापर्यंत आदिवासीविषयींचे लिखाण केवळ वर्णनात्मक, एकांगी व अतिरंजीत असल्यामुळे त्यांच्याबद्दल अनेक गैरसमज प्रगत समाजात पसरलेले आहेत. उदा. आदिवासी म्हणजे रानटी, पशुतुल्य, संस्कारहीन, व्यवहारशुन्य, अर्धनग्न अवस्थेत जीवन जगणारा समुदाय आहे. पण वास्तव यापेक्षा वेगळे आहे. इव्हान्स प्रिचर्ड म्हणतात, ''आदिवासी समाजाबद्दलचे हे अंदाज एकापेक्षा एक पराकोटीचे होते.'' ("There seems to have a pendulum swing from extreme to extreme in speculations about primitive man." - Evans Pritchard) मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी समाजात प्रत्यक्ष राहून त्यांच्या समग्र जीवनाची माहिती शास्त्रीय पद्धतीने संपादित केली. त्यामुळे आदिवासींबद्दलचे अनेक गैरसमज दूर झाले आहेत.

### ६. वास्तव दर्शन :-

क्षेत्रकार्य पद्धतीमुळे आदिवासी जमातींचे वास्तव दर्शन होते कारण संशोधक स्वतःच सहभागी निरिक्षणाद्वारे आदिवासी जमातीत अनेक वर्षे वास्तव्य करतो व माहितीचे संकलन करतो. शिवाय क्षेत्र कार्य पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे यामधील संशोधक प्रशिक्षीत असतो. त्यामुळे वस्तुनिष्ठ माहिती संकलीत करण्यात संशोधकाला यश मिळते. अनेक दिवसांच्या वास्तव्यामुळे संशोधक आदिवासींच्या वास्तव जीवनाचे दर्शन आपल्या अभ्यासातून घडवू शकतो. हे अनेक उदाहरणावरून आता सिद्ध झाले आहे. मॅलिनॉवस्की यांचे 'अर्गोनॉटस् ऑफ दी वेस्टर्न पॅसिफिक' हे पुस्तक, डॉ. मार्गारेट मिड यांचे 'कमिंग ऑफ एज एन सामोओ' हे पुस्तक या प्रकारच्या पुस्तकातून आदिवासी समाज जीवनाचे वास्तववादी निष्कर्ष पहावयास मिळतात.

सामाजिक मानवशास्त्राला शास्त्रीय स्वरुपाचा दर्जा प्राप्त करून देण्यामध्ये क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीचा महत्त्वाचा वाटा आहे. वर्षानुवर्षे दुर्लक्षिल्या गेलेल्या आदिवासी जमातींना उजेडात आणण्याचे काम क्षेत्रकार्य पद्धतीने केले आहे. मानव असूनदेखील ज्यांचे जीवन मानवेतर प्राण्याप्रमाणे होते त्यांना न्याय देण्याचे कार्य या पद्धतीने केले आहे. पशुतुल्य प्राणी म्हणून ज्यांना ओळखले जात होते त्यांचे

मानवप्राण्यात रुपांतर करण्याचे काम या पद्धतीने केले आहे म्हणून क्षेत्र कार्य पद्धत अत्यंत महत्त्वाची आहे.

### ※ स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ※

❒ **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. क्षेत्र कार्य पद्धतीचा प्रथम वापर कोणी केला.

---------------------------------------------------------------

२. क्षेत्र कार्य पद्धतीचा वापर करणारे संशोधक आदिवासी समाजात किती वर्षे राहतात.

---------------------------------------------------------------

३. आदिवासींचा समग्र दृष्टीकोनातून अभ्यास करावा, असे कोणी स्पष्टपणे नमूद केले आहे.

---------------------------------------------------------------

४. संशोधकाचा प्रथम आवश्यक गुण कोणता आहे.

---------------------------------------------------------------

५. 'वारली' जमातीच्या समस्या कोणी जाणून घेतल्या होत्या.

---------------------------------------------------------------

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ※ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ※

१. (अ) सामाजिक.

२. (ब) मानवाचा.

३. (ड) सामाजिक.

४. (क) आदिवासी.

५. (अ) समग्र.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ❊

१. शारीरिक मानवशास्त्र मानवाच्या शारीरिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करते.

२. मानवी जीवाश्मशास्त्रामध्ये मानवाची कवटी व हाडे यांचा अभ्यास केला आहे.

३. मानवी जीवनाच्या ज्या काळातील इतिहासदत्त पुरावे सापडत नाहीत त्या काळाला प्रागैतिहासिक काळ म्हणतात.

४. मानवजातीशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग जनकल्याणासाठी करणे हा उपयोजित मानवशास्त्र या शाखेचा मुख्य उद्देश आहे.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ❊

१. आदिवासी

२. सांस्कृतिक.

३. विवाहावर

४. भाषा

५. आदिवासी

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ❊

१. रेडक्लिफ ब्राऊन यांनी क्षेत्र कार्य अभ्यास पद्धतीचा प्रथम वापर केला.

२. क्षेत्र कार्य पद्धतीचा वापर करणारे संशोधक आदिवासींमध्ये किमान तीन ते चार वर्षे वास्तव्य करतात.

३. इव्हान्स प्रिचर्ड यांनी आदिवासींचा समग्र दृष्टीकोनातून अभ्यास करावा, असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

४. प्रशिक्षण हा संशोधकाचा प्रथम आवश्यक गुण आहे.

५. श्रीमती गोदावरी परुळेकर यांनी वारली जमातीच्या समस्या जाणून घेतल्या.

# १.५ सारांश

### १.३.१ मानवशास्त्र –

मानवशास्त्राला इंग्रजीमध्ये Anthropology म्हणतात. हा शब्द Anthropos म्हणजे 'मानव' व Logos म्हणजे शास्त्र या दोन शब्दांपासून बनलेला आहे. मानवाचे शास्त्र ते मानवशास्त्र होय. ॲरिस्टॉटल यांच्या मते 'मानवाची स्वतःबद्दलची बडबड' म्हणजे मानवशास्त्र होय. मानवशास्त्र हा शब्द प्रथम वापरात ॲरिस्टॉटल यांनी आणला म्हणून त्यांना मानवशास्त्राचे जनक म्हणतात. मानवाच्या 'जिज्ञासू' वृत्तीतून

'मानवशास्त्राचा' उगम झालेला आहे. ''मानव आणि त्याची कार्यनिर्मिती यांचा अभ्यास म्हणजे मानवशास्त्र होय.'' अशी हरस्कोव्हिटस् यांनी मानवशास्त्राची व्याख्या केली आहे. मुजुदार आणि मदन यांच्या मते, ''मानवाच्या शारीरिक सांस्कृतिक व सामाजिक उत्पत्तीचे व विकासाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय.'' मानवशास्त्रात मानवाचा जैविक व सामाजिक प्राणी या दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. थोडक्यात मानवशास्त्रात मानवाच्या सर्व पैलूंचा अभ्यास केला जातो.

### ❑ मानवशास्त्राचे स्वरूप :-

मानवशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे. पण मानवशास्त्रात मानवाचा शारीरिक, सांस्कृतिक व सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. मानवशास्त्राचे स्वरूप पुढील प्रमाणे सांगता येईल.

१. मानवाचा जैविक व सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. मानव हा निसर्गाचा घटक असला तरी त्याने निसर्गावर मात करून आपली वेगळी जीवनपद्धती निर्माण केली आहे. मानवाने संघटीत जीवन जगावे हे प्रकृतीने म्हणजेच निसर्गाने लादलेले नाही. मानवी जीवनात अशा अनेक गोष्टी पहावयास मिळतात.

२. मानव व त्याच्या कार्याचा अभ्यास केला जातो. मानवाच्या प्राचीन काळापासून आजपर्यंत शारिरीक व सामाजिक जीवनात कसकसे बदल होत गेले याचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. शारिरीक अवयवात, वंशात, शरीर रचनेत सामाजिक जीवनात म्हणजेच संस्कृतीत कसकसे बदल होत गेले याचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो.

३. मानवाचा तुलनात्मक दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. मानवाच्या शरीररचनेत असणारे परस्परसंबंध, मानवी जीवनातील विविध संस्थांतील असणारे परस्पर संबंध यांचा साम्य व भेद या दृष्टीकोनातून तुलनात्मक अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. उदा. ज्याला ऐकू येत नाही तो बोलू शकत नाही. किंवा मातृसत्ताक कुटुंबात जावयाने सासुला टाळावे ही प्रथा रुढ आहे.

४. प्राथमिक अवस्थेतील मानवाचा अभ्यास केला जातो. मानवशास्त्रात आधुनिक व प्राथमिक स्वरुपातील जीवन जगणाऱ्या मानवाचा अभ्यास केला जातो. पण प्रत्यक्षात प्राथमिक जीवन जगणाऱ्या 'आदिवासी' समाजाच्या अभ्यासावर भर दिला जातो.

५. समग्र स्वरुपाचा अभ्यास केला जातो. मानवशास्त्रात समग्र म्हणजे संपूर्ण सामाजिक जीवनाचा अभ्यास केला जातो. मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचा उदा. राजकीय, शैक्षणिक, धार्मिक इत्यादींचा सर्वांगिण अभ्यास केला जातो.

६. प्रत्यक्ष अभ्यास केला जातो. मानवशास्त्रात मानवी जीवनाचा प्रत्यक्ष अभ्यास केला जातो.

संशोधक प्रत्यक्ष ज्या समाजाचा अभ्यास करायचा आहे तेथे स्वतः जातो तीन ते चार वर्षे राहतो. प्रत्यक्ष स्वतःच्या डोळ्यांनी घटनांचे निरीक्षण करतो व अहवाल लेखन करतो.

७. सुक्ष्मरचनात्मक व विगमनात्मक अभ्यास केला जातो. मानवशास्त्रात मानवाचा म्हणजे सर्वच मानवांचा अभ्यास न करता प्रतिनिधीक स्वरुपात काही मानवांचा अभ्यास करून त्याचे निष्कर्ष संपूर्ण मानवजातीला लागू केले जातात, याला सुक्ष्मरचनात्मक अभ्यास म्हणतात. विगमन म्हणजे 'विशिष्ठत्वाकडून सामान्यत्वाकडे जाणे होय' विशिष्ठ गोष्टींच्या अनुभवावरून सामान्य विधानांची निर्मिती करणे.

८. मानवशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे. मानवशास्त्रात मानवाचा जैविक व सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास केला जात असला तरी मानवशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे.

### १.३.२ मानवशास्त्राच्या शाखा :–

मानवशास्त्रात एकाच वेळी मानवाचा शारिरीक, सांस्कृतिक, सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास केला जात असल्यामुळे आणि प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या मानवाचा अभ्यास केला जात असल्यामुळे मानवशास्त्राची व्याप्ती प्रचंड वाढली आहे. हा सर्व अभ्यास एकाच शाखेत करणे अशक्य व अयोग्य असल्यामुळे याच्या पुढील शाखा निर्माण करण्यात आल्या आहेत.

### १. शारीरिक मानवशास्त्र :–

मानव हा एक जैविक प्राणी आहे, या दृष्टीकोनातून मानवाच्या जैविक बाबींचा उदा. शरीर रचना, उत्क्रांती, वंश यांचा अभ्यास मानवशास्त्राच्या शारिरीक मानवशास्त्र या शाखेत केला जातो. म्हणून हरस्कोव्हिटस् म्हणतात ''शारिरीक मानवशास्त्र हे मुलभूत अर्थाने मानवी जीवशास्त्र आहे.'' शारीरिक मानवशास्त्राच्या सुद्धा अ) मानवउत्पत्तीशास्त्र ब) मानवी जीवाश्मशास्त्र क) मानवमीती ड) द्विहस्तक सस्तन प्राणी अशा चार उपशाखा आहेत.

### २. सांस्कृतिक मानवशास्त्र :–

मानव हा सामाजिक–सांस्कृतिक प्राणी आहे. मानवाने नैसर्गिक नियमांना बाजूला करत स्वतःची जीवनपद्धती विकसित केली, त्याला संस्कृती म्हणतात. सांस्कृतिक मानवशास्त्रात मानवाच्या संस्कृतीचा सर्वांगिण अभ्यास केला जातो. संस्कृतीचा उदय, विकास, रचना, परिवर्तन याचबरोबर धर्म, रुढी, प्रथा, परंपरा, सणसमारंभ, उत्सव, शिष्टाचार इत्यादींचासमग्र अभ्यास सांस्कृतिक मानवशास्त्रात केला जातो. सांस्कृतिक मानवशास्त्राच्या व्याख्येबाबत बील्स आणि हॉइजर म्हणतात, ''सांस्कृतिक मानवशास्त्र मानवी संस्कृतीचा उदय आणि इतिहास, उत्क्रांती आणि विकास व प्रत्येक ठिकाणच्या आणि वेळेच्या

संस्कृतीची रचना आणि काये यांचा अभ्यास करते.'' सांस्कृतिक मानवशास्त्राच्या- (अ) प्रागैतिहासिक पुरातत्त्वशास्त्र (ब) भाषाशास्त्र (क) मानवजातीशास्त्र (ड) सामाजिक मानवशास्त्र अशा उपशाखा आहेत.

**३. उपयोजित मानवशास्त्र :-**

मानवशास्त्र हे उपयोजित शास्त्र आहे. मानवशास्त्रातील ज्ञानचा उपयोग समाजातील विविध समस्या व प्रश्नांच्या निर्मुलनासाठी केला जातो. मानवाच्या विकासासाठी मानवशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग केला जातो. हे उपयोग हळूहळू वाढत गेल्यामुळे 'उपयोजित मानवशास्त्र' ही मानवशास्त्राची स्वतंत्र ज्ञानशाखा उदयास आली आहे.

### १.३.३ सामाजिक मानवशास्त्र :-

सामाजिक मानवशास्त्र ही सांस्कृतिक मानवशास्त्राची महत्त्वाची शाखा आहे. मानवाचे सामाजिक संबंध, सामाजिक जीवन, सामाजिक संघटन, सामाजिक संस्था, सामाजिक समुह इत्यादींचा सविस्तर अभ्यास केला जातो म्हणून हॉबेल म्हणतात. ''सामाजिक मानवशास्त्र हे सामाजिक वर्तन आणि सामाजिक संघटन यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करते.'' सामाजिक मानवशास्त्रात सर्व समाजाचा सर्व काळातील समाजांचा समग्र जीवनाचे अध्ययन केले जाते. आदिवासी ग्रामीण-नागरी, भारतीय-अमेरिकन, प्रगत-अप्रगत अशा सर्व काळातील व सर्व ठिकाणच्या मानवी सामाजिक जीवनाचा अभ्यास सामाजिक मानवशास्त्रात केला जातो.

जगातील सर्व समाजांचा व सर्व काळातील समाजांचा सर्वांगिण अभ्यास करणे हा सामाजिक मानवशास्त्राचा उद्देश आहे. हा अभ्यास एकाच शाखेत करणे अशक्य व अयोग्य आहे म्हणून मानवशास्त्राच्या अनेक उपशाखा उदयास आलेल्या आहेत.

१. **कौटुंबीक मानवशास्त्र** : या शाखेत कुटुंबाची वैशिष्ट, महत्त्व, कार्ये, प्रकार इत्यादींचा अभ्यास केला जातो.

२. **आर्थिक मानवशास्त्र** : या शाखेत आर्थिक क्रियांचा व आर्थिक क्रियांचा मानवी जीवनावर पडलेल्या प्रभावांचा अभ्यास केला जातो.

३. **राजकीय मानवशास्त्र** : समाजातील राजकीय संघटन कशा प्रकारचे आहे. राजकीय व्यवस्था, कायदे, न्यायदान पद्धत, नियंत्रण व्यवस्था, शिक्षा दंड इत्यादींचा या शाखेत अभ्यास केला जातो.

४. **प्रतिकशास्त्र आणि भाषाशास्त्र** : मानवी जीवन प्रतिक व्यवस्थेने व्यापलेले असते. अशा प्रतिकांचा अभ्यास प्रतिकशास्त्रात तर भाषाशास्त्रात भाषेचा, भाषेच्या लिपीचा इत्यादींचा अभ्यास केला जातो.

५. **विचार आणि कला** : विचार म्हणजे तत्त्वज्ञान, धर्म, विज्ञान, जीवनविषयक दृष्टीकोण इत्यादींचा व कला मानवी जीवन सुखी, आनंदी व समृद्ध बनवते त्या कलेचा अभ्यास या शाखेत केला जातो.

## ❑ सामाजिक मानवशास्त्राचे महत्त्व :-

सामाजिक मानवशास्त्र हे अगदी अलिकडच्या काळात उदयास आलेले असून त्याचा विकास जलद्गतीने झाला आहे. म्हणजेच त्याचे महत्त्व समाजाला कळले आहे. त्यामुळेच या शाखेचा विस्तार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. सामाजिक मानवशास्त्राचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे.

१. आदिवासी समाजाचे यथार्थ आकलन होते. या शाखेत शक्यतो आदिवासींच्या अभ्यासावर जास्त भर दिला जातो. शिवाय आदिवासींचा प्रत्यक्ष अभ्यास केला जातो. त्यामुळे सामाजिक मानवशास्त्रामुळे आदिवासी समाजाचे यथार्थ आकलन होते.

२. आदिवासी समस्यांचे निराकरण करता येते. सामाजिक मानवशास्त्रात आदिवासींचा प्रत्यक्ष अभ्यास करताना त्यांच्या समस्यांचे अध्ययन केले जाते. या अध्ययनाच्या जोरावर समस्यांच्या निराकरणासाठी उपाय सुचवता येतात.

३. आदिवासींच्या कल्याणासाठी व विकासाच्या दृष्टीने सामाजिक मानवशास्त्राचे महत्त्व आहे. सामाजिक मानवशास्त्रात आदिवासींचा सर्वांगिण अभ्यास केला जातो. त्यामुळे आदिवासी कल्याण कार्यक्रम किंवा विकासाचे आराखडे तयार करता येतात.

४. आदिवासी संस्कृतीचा ऱ्हास होत चालला आहे. एक दिवस आदिवासी संस्कृतीचा पुर्ण ऱ्हास होईल आणि आपल्याला संस्कृतीचा अभ्यास करता येणार नाही. या शाखेत केवळ संस्कृतीचे अध्ययन केले जात नाही तर संवर्धन (जपणूक) केली जाते.

५. वंशवाद दूर करण्याच्या दृष्टीने सामाजिक मानवशास्त्राचे महत्त्व आहे. सम ाजात वंश श्रेष्ठत्वाचा वाद आहे. एका वंशाचे लोक दुसऱ्या वंशाला विनाकारण तुच्छ मानतात. त्यामुळे त्यांच्यात वाद निर्माण होतो. सामाजिक मानवशास्त्रात विविध वंशाचा तुलनात्मक अभ्यास करून हा वाद मिटवला आहे.

६. औद्योगिक संबंध सुधारण्याच्या दृष्टीने महत्त्व सामाजिक मानवशास्त्रात औद्योगिक समुहाचा अभ्यास केला जातो. यामध्ये मालक व कामगार वर्गाचा अभ्यास करून औद्योगिक संबंध सुधारण्यावर भर दिला जातो.

७. **धर्म प्रसाराच्या दृष्टीने महत्त्व** : सामाजिक मानवशास्त्रात सर्वांगिण/समग्र जीवनाचा अभ्यास केला जातो. या अभ्यासाच्या आधारावर अनेक मिशनरी आपल्या धर्माचा प्रसार

करतात. उदा. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आदिवासी समाजात केलेला ख्रिश्चन धर्माचा प्रसार होय.

८. **देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्व** : प्रत्येक देशात विकासासाठी मोठ-मोठ्या योजना किंवा प्रकल्प राबवले जातात. यावेळी सरकारला काही अडचणी येतात. त्यातील पुर्नवसनाची अडचण मोठी असते किंवा इतर सामाजिक अडथळे निर्माण होतात. त्यावेळी सामाजिक मानवशास्त्र सहाय्य करते.

## १.३.४ क्षेत्र कार्य पद्धत :-

सामाजिक मानवशास्त्रात अनेक अभ्यास पद्धती वापरल्या जातात पण जास्तीत जास्त वापरली जाणारी व महत्त्वाची पद्धत म्हणजे क्षेत्र कार्य पद्धत होय. क्षेत्र कार्य पद्धत म्हणजे संशोधकाला ज्या जमातीचा अभ्यास करायचा आहे, त्या जमातीत प्रत्यक्ष जाऊन किमान ३ ते ४ वर्षे राहून तेथील लोकांच्या जीवनपद्धतीचे वर्णन करणे होय. या पद्धतीचा प्रथम वापर प्रा. रेडक्लिफ ब्राऊन यांनी अंदमान बेटावरील आदिवासींचा अभ्यास करताना केला होता. नंतर त्या पद्धतीत अनेक सुधारणा घडून आल्या आहेत व अनेक मानवशास्त्रज्ञांनी या पद्धतीचा अभ्यास केला आहे.

## अ) क्षेत्रकार्य पद्धतीची वैशिष्ट्ये :-

### १. अध्ययनाचा कालावधी :-

क्षेत्र कार्य पद्धतीत संशोधकाला ज्या समाजाचा अभ्यास करायचा आहे त्या समाजात प्रत्यक्ष ३ ते ४ वर्षे राहावे लागते. आदिवासीसारख्या समाजाचे समग्र अध्ययन सामाजिक मानवशास्त्रात केले जाते. यासाठी क्षेत्र कार्यपद्धतीचा वापर केला जातो. समग्र अध्ययन करणे आणि तेही आदिवासींचे करायचे झाल्यास अधिक कालावधी हा लागणारच. अनोळखी संशोधकाला आदिवासींमध्ये आपली ओळख निर्माण करून त्यांना आपले करावे लागते. त्यांना आपले करण्यासाठी त्यांची भाषा शिकावी लागते. ज्या घटनांचे निरीक्षण करायचे आहे त्या कधी पहावयास मिळतील हे सांगता येत नाही. काही घटना दैनंदिन असतात काही साप्ताहीक, मासीक तर काही वार्षिक असतात. तसेच प्रत्येकवेळी संशोधक तेथे हजर असेल असे नाही. त्यामुळे या पद्धतीसाठी अधिक कालावधी लागतो.

### २. अध्ययनाची भाषा :-

क्षेत्र कार्यपद्धतीत भाषा हा घटक महत्त्वाचा आहे. कारण संशोधक ज्या आदिवासी समाजाचे अध्ययन करणार असतो तेथे त्याचे ३ ते ४ वर्षे वास्तव्य असते. त्यामुळे त्यांची भाषा संशोधकाला बोलता आली पाहिजे. शक्यतो संशोधकाची भाषा व आदिवासींची भाषा यामध्ये पूर्ण तफावत असते.

आदिवासी अज्ञानी, अशिक्षीत असल्यामुळे ते संशोधकाची भाषा शिकणार नाहीत. संशोधकालाच आदिवासींची भाषा शिकावी लागते. दुभाषाची मदत फार काळ घेता येत नाही. तसेच आदिवासींची भाषा आल्याशिवाय संशोधक त्यांच्या मनामध्ये आपले आदराचे स्थान निर्माण करू शकणार नाही. आदिवासींच्या भाषेला लिपी नसल्यामुळे ती भाषा शिकणे अवघड असते.

### ३. अध्ययनाचे क्षेत्र :-

अध्ययन क्षेत्राला क्षेत्र कार्यपद्धतीत महत्त्वाचे स्थान आहे. आदिवासींचा समग्र अभ्यास करायचा की, विशिष्ट अभ्यास करायचा हे निश्चित केले पाहिजे. यावरून अध्ययनाचे क्षेत्र निवडले जाते. पण आदिवासींचा अभ्यास करताना समग्र अभ्यास करण्यावर जास्त भर दिला जातो.

### ४. संशोधकाचे गुण :-

अज्ञानी, रानटी आणि रांगड्या आदिवासींचे अध्ययन करणे हे अवघड काम आहे. आदिवासींमध्ये प्रत्यक्ष जाऊन राहणे, त्यांची भाषा शिकणे, त्यांना आपलेसे करणे या गोष्टी सहज शक्य होणाऱ्या नाहीत. त्यासाठी संशोधकसुद्धा तेवढाच हुशार, धाडसी, जिद्दी व संयमी असावा लागतो. आदिवासींचा क्षेत्र कार्यपद्धतीद्वारे अभ्यास करणाऱ्या संशोधकांकडे पुढील गुण असावे लागतात.

१. **प्रशिक्षण** : जिद्द व चिकाटीच्या जोरावर केवळ संशोधक आदिवासीमध्ये राहू शकतो पण त्याने अभ्यास कसा करावा, निरीक्षण कसे करावे, अहवाल लेखन कसे करावे, दैनंदिन नोंदी कोणत्या व कशा ठेवाव्यात याचे सैद्धांतिक ज्ञान संशोधकाकडे असणे आवश्यक आहे. यासाठी संशोधक प्रशिक्षीत असावा लागतो.

२. **विशिष्ट प्रकारचा स्वभाव** : आदिवासींमध्ये जाऊन राहणे, त्यांची भाषा शिकणे व त्यांना आपलेसे करून घेणे या बाबी सहजशक्य होणाऱ्या नाहीत. त्यासाठी संशोधकांचा स्वभाव विशिष्ट असला पाहिजे. उदा.

(अ) **असामान्य जिद्द** : संशोधकाला अनेक अडचणी येणार असल्यामुळे त्याकडे असामान्य जिद्द असली पाहिजे. आदिवासी जंगल-दऱ्याखोऱ्यात आधुनिक समाजापासून अलिप्त जीवन जगत असतात. अशा समाजात संशोधकाला अनेक गैरसोयींना तोंड द्यावे लागते.

(ब) **एकरुप होण्याची प्रवृत्ती** : आदिवासी जीवनातील नाजुक धागेदोरे समजून घेण्यासाठी त्यांच्या अंतकरणात संशोधकाने स्थान निर्माण केले पाहिजे. म्हणजे केवळ भौतिक सान्निध्यापेक्षा मानसिक जवळीकता संशोधनाने निर्माण केली पाहिजे.

(क) **आवड व सहानुभूती** : संशोधकाला आदिवासी समाजाच्या अभ्यासाची आवड निर्माण झाली पाहिजे. आदिवासींबद्दल संशोधकाच्या मनात प्रेम, दया, माया, ममता व सहानुभूती असली पाहिजे. नाहीतर वास्तव अभ्यासाची शक्यता कमी असते.

(ड) **कल्पनात्मक आंतरदृष्टी** : संशोधक हा फोटोग्राफर किंवा चित्रकार नसतो. आदिवासींच्या प्रत्यक्ष पाहिलेल्या घटनेचे संशोधकाला योग्य वर्णन करता आले पाहिजे. यासाठी कल्पनात्मक आंतरदृष्टी संशोधकाकडे असली पाहिजे.

(इ) **लेखन कौशल्य** : आदिवासींचे डोळ्यांनी पाहिलेल्या घटना शब्दात व्यक्त करण्याचे सामर्थ्य संशोधकाकडे असले पाहिजे. संशोधकाच्या बुद्धीपटलावर उमटलेले विचार योग्य शब्दात मांडण्याची कला म्हणजे लेखनकौशल्य होय.

## ब) क्षेत्र कार्य पद्धतीचे महत्त्व :-

आदिवासी समाजाचा अभ्यास करण्यासाठी सामाजिक मानवशास्त्रात अनेक पद्धतींचा वापर केला जातो. पण त्या सर्वांध्ये क्षेत्र कार्य पद्धत जास्त उपयोगी व महत्त्वपूर्ण आहे. हे आपल्याला पुढील गोष्टींवरून सांगता येईल.

१. **सखोल अध्ययन** : क्षेत्र कार्य पद्धतीमुळे आदिवासी किंवा इतर कोणत्याही समाजाचे सखोल अध्ययन करता येते. एकाच समाजात सलग ३ ते ४ वर्षे संशोधक राहात असल्यामुळे तेथील जीवनपद्धतींचे सर्वांगिण अध्ययन करता येते. शिवाय संशोधक हा प्रशिक्षीत असल्यामुळे कोणतीही चुक संशोधकाकडून होण्याची शक्यता नसते.

२. **अध्ययनाच्या इतर पद्धती कुचकाम्या** : सामाजिक मानवशास्त्रात ऐतिहासिक, तुलनात्मक, प्रकार्यात्मक, प्रश्नावली, मुलाखत इत्यादी पद्धती वापरल्या जातात. पण त्यांचा उपयोग आदिवासींच्या अध्ङ्गनासाठी करताना अनेक मर्यादा येतात. उदा. ऐतिहासिक पद्धत कोणत्याही समाज, संस्था आणि संस्कृतीच्या उदयाची आणि विकासाची माहिती संपादण्यासाठी वापरतात. यासाठी शिलालेख, नाणी, दानपत्रे, आत्मकथा इत्यादींचे सहाय्य घेतले जाते. पण आदिवासी समाजात या ऐतिहासिक वस्तू सापडत नाहीत. कारण त्यांच्या भाषेला लिपी नाही किंवा ते नाण्यांचा वापर करत नाहीत.

३. **आदिवासी विकास** : क्षेत्र कार्यपद्धतीमुळे आदिवासींचा समग्र अभ्यास केला असल्यामुळे त्यांच्या विकासासाठी अनेक योजना-मार्ग-पर्याय सुचवता येतात.

४. **आदिवासी समस्यांचे निराकरण** : क्षेत्र कार्यपद्धतीमुळे आदिवासी समस्यांचा सखोल अभ्यास करता येतो. या अभ्यासातून त्यांच्या समस्यांचे निराकरण करता येते.

५. आदिवासींबद्दलचा गैरसमज दूर करता येतो. गरीब, अज्ञानी, अडाणी व रानटी आदिवासींना असंस्कृत म्हणून पूर्वी ओळखले जात होते. पण क्षेत्र कार्यपद्धतीद्वारे अभ्यास करून आदिवासींच्या संस्कृतीचा अभ्यास करून तीची जगाला आज ओळख करून दिली आहे.

६. वास्तव दर्शन : क्षेत्र कार्य पद्धतीत प्रशिक्षण घेतलेला संशोधक स्वतः त्या समाजात ३ ते ४ वर्षे राहात असल्यामुळे त्याला जी माहिती मिळते ती एकांगी नसून वास्तव असते. त्यामुळे क्षेत्र कार्यपद्धतीमुळे वास्तव दर्शन होते. सामाजिक मानवशास्त्राला शास्त्राचे स्वरूप व महत्त्व प्राप्त करून देण्यामध्ये क्षेत्र कार्यपद्धतीचे मोलाचे योगदान आहे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. मानवशास्त्राचे स्वरुप विशद करा.

२. मानवशास्त्राच्या शाखा स्पष्ट करा.

३. सामाजिक मानवशास्त्राची व्याप्ती विशद करा.

४. सामाजिक मानवशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.

५. क्षेत्र कार्य पद्धतीची वैशिष्ट्ये विशद करा.

६. क्षेत्र कार्य पद्धतीचे महत्त्व विशद करा.

### (ब) टीपा लिहा.

१. शारीरिक मानवशास्त्र.

२. सांस्कृतिक मानवशास्त्र.

३. उपयोजित मानवशास्त्र.

४. क्षेत्रकार्य पद्धत.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

- **डॉ. रामनाथ शर्मा, डॉ. राजेंद्र कुमार शर्मा** : 'मानवशास्त्र'.
- **डॉ. धर्मवीर महाजन** : 'सामाजिक मानवशास्त्र'
- **डॉ. विलास संगवे** : 'सामाजिक मानवशास्त्र'

- **डॉ. य. श्री. मेहेंदळे** : ‘मानवशास्त्र’
- **डॉ. बोबडे, लोटे** : ‘सामाजिक मानवशास्त्र’
- **प्रा. एन. आर. रजपूत** : ‘सामाजिक मानवशास्त्र’
- **डॉ. गुरुनाथ नाडगोंडे** : ‘भारतीय आदिवासी’
- **डॉ. अंबादास माडगुळकर, प्रा. शशिकांत फडणीस** : ‘आदिवासी समाज’
- **प्रो. म. फ. नेस्तुर्ख** : ‘मानवजाती’
- **प्रा. सुमन पाटे** : ‘सामाजिक मानवशास्त्र’
- **प्रा. मधुसूदन शारंगपाणी** : ‘सामाजिक मानवशास्त्र’
- **प्रा. ए. वाय. कोंडेकर, डॉ. सौ. मंगला पाटील, प्रा. पी. व्ही. चांदोरकर** : ‘सामाजिक मानवशास्त्र’.

घटक–२

# भारतातील आदिवासी समुदाय

## (Tribal Society in India)

**घटक संरचना**

२.१ उद्दिष्ट्ये

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ भारतीय आदिवासींचे भौगोलिक वर्गीकरण

२.३.२ भारतीय आदिवासींचे वांशिक वर्गीकरण

२.३.३ भारतीय आदिवासींचे भाषिक वर्गीकरण

२.४ सारांश

२.५ स्वयं–अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ चिंतन आणि कार्य

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

या युनिटचा अभ्यासानंतर आपण,

१. भारतीय आदिवासींचे भौगोलिक वर्गीकरण जाणून घेवू शकू.

२. भारतीय आदिवासींचे वांशिक वर्गीकरण जाणून घेवू शकू.

३. भारतीय आदिवासींचे भाषिक वर्गीकरण जाणून घेवू शकू.

## २.२ प्रास्ताविक (Introduction)

आदिवासी समाजाला राष्ट्र बांधणीच्या कार्यक्रमात सामावून घेणे भारताच्या दृष्टीने विचार करता

अत्यंत आवश्यक आहे कारण त्यांच्या योग्य प्रकारच्या समायोजनाशिवाय संपूर्ण जगात २०२० सालापर्यंत महासत्ता म्हणून उदयाला येणे भारताला शक्य होणार नाही. दुसऱ्या बाजूला हे ही तितकेच सत्य आहे की आदिवासी समाज हा बिगर आदिवासींपेक्षा भिन्न आहे. उत्तर-ईशान्य भागातील आदिवासींची बंडखोरी आणि मध्यप्रदेशातील बस्तर भागातील आदिवासीनी उभारलेले बंड याबाबी आपण अदिवासींविषयी एकत्रितपणे आणि अधिक गांभिर्याने विचार करणे कसे गरजेचे आहे. यावरून हेच स्पष्ट होते की आदिवासींना समजून घेण्यात आपण काही तरी चूक केली आहे. याबरोबरीने हे ही तितकेच सत्य आहे की बिगर आदिवासी व प्रामुख्याने हिंदूंच्या मनात आदिवासींविषयी काही पूर्वग्रह आहेत. दीर्घ काळापासून आदिवासी हे रानटी असून त्यांच्यात विकासाला अत्यल्प संधी आहेत असा समाज बिगर आदिवासींच्यात आढळतो. परिणामी भारतातील आदिवासी समाजाविषयी योग्य ज्ञान मिळविणे आपल्यासाठी अत्यंत निकडीचे बनले आहे.

## २.३ विषय विवेचन (Presentation of Subject matter)

या पुस्तकाच्या पहिल्या युनिटध्ये तुम्ही सामाजिक मानवास्त्राचे स्वरूप व महत्व याचा सखोल अभ्यास केला आहे. त्याबरोबरच सामाजिक मानवशास्त्र प्रामुख्याने आदिवासी समाजाच्या व्आदिवासीमधील विविध संस्था त्यांच्या समस्या अणि विकास याबाबींच्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करते हे ही आपल्या लक्षात आले आहे. जागतिक पातळीवर होत असणारे प्रचंड परिवर्तन आणि त्यांचा आदिवासी समाजावर पडत असलेला प्रभाव यामुळे आदिवासी समाज हा बुडत अगर नष्ट होत चाललेला समाज आहे म्हणूनच आदिवासी समाजाचा तात्काळ अभ्यास करणे किंवा त्यांच्या सर्वांगीण अभ्यासाची हीच खरी वेळ आहे हे प्रकर्षाने जाणवते. या युनिटध्ये आपण भारतातील आदिवासींचे भौगोलिव्क, वांशिक व भाषिक वर्गीकरण आपण अभ्यासणार आहोत. हा अभ्यास आपल्याला आदिवासींच्या विविध सामाजिक संस्थाचा अभ्यास करताना च्वण्एयांच्या समस्या व विकासासाठी राबवावयाच्या योजना आणि त्यांच्यातील विविध चळवळींच्या अभ्यासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

### २.३.१ भारतीय आदिवासींचे भौगोलिक वर्गीकरण (Geographical Distribution of Indian Tribes)

भारताच्या विविध भागात आदिवासी लोकांची वस्ती असल्याचे आपणास आढळते. भारताचा प्राकृतिक रचना आणि आदिवासी लोकसंख्या या दोन्ही बाबी आदिवासी लोकांचे विभागिय समूहात वर्गीकरण करण्यास आणि त्यांच्या प्रादेशिक वर्गीकरणास सहाय्यभूत ठरतात. गुहा (१९५१-१९५५) यांनी आदिवासीचे प्रादेशिक वर्गिकरण निश्चित कले आहे. यामध्ये (१) भारताचा उत्तर व उत्तरपूर्व हिमालयाच्या पायथ्याचा भाग (२) गंगेचा मैदानी भाग आणि गंगेचा मैदानी भाग आणि द्विपकल्पीय भारत यामधील दऱ्याखोऱ्यांचा भाग व पठारांचा भाग ज्यात पश्चिम घटातील काही डोंगरांचा समावेश

होतो (३) द्विपकल्पीय भारत या विभागांचा समावेश केला असून या विभागांना (अ) उत्तर व उत्तरपूर्व विभाग (ब) मध्य विभाग व (क) दक्षिण विभाग या नावांनी ओळखले जाते.

अ) उत्तर व उत्तरपूर्व विभाग : सर्वसाधारणपणे हा विभाग पश्चिमेकडील २३° ३०° उत्तर ते २८° उत्तर आणि पूर्वेकडील ७७° ३३° पूर्व ते ९७° पूर्व यामध्ये असून या विभागात पश्चिमेकडे सिमाला आणि पूर्वेकडील लुशाई टेकडयांचा आणि मिशमी प्रदेशाचा समावेश होतो. या विभागात जम्मू आणि काश्मिर, हिमाचल प्रदेश, उत्तरप्रदेशमधील तराईचा भाग इत्यादींचा आदिवासी विभागात समावेश होतो.

ब) मध्य विभाग : या विभागाचा सर्वसाधारण अक्षवृत्तीय विस्तार २०° उत्तर ते २५° उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार ७३° पूर्व ते ९०° पूर्व असा आहे.यामध्ये पश्चिम बंगाल, बिहार, उत्तरप्रदेशचा दक्षिण भाग, मध्य प्रदेश, ओरिसा, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्राचा समावेश होतो. राज्यांची संख्या आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने हा विभाग सर्वात मोठा आहे.

क) दक्षिण विभाग किंवा द्विपकल्पीय भारत : या विभागाचा अक्षवृत्तीय विस्तार ८° उत्तर ते २०° उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार ७५° पूर्व ते ८५° पूर्व असा आहे. या विभागात आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या राज्यातील आदिवासी विभाग आणि आंदमान-निकोबार या राज्यात वास्तव्य करणाऱ्या आदिवासी जमातींचा या विभागात समावेश होतो.

दुबे (१९६०) यांनी भारतातील आदिवासींचे १) उत्तर आणि उत्तर पूर्व विभाग, २) मध्य विभाग, ३) दक्षिण विभाग, ४) पश्चिम विभाग. या चार भौगोलिक विभागात वर्गीकरण केले आहे. यापैकी पहिले तीन विभाग गुहा यांनी आदिवासींच्या केलेल्या भौगोलिक वर्गीकरणाशी मिळतेजुळते आहेत. चौथा विभाग हा मध्यविभागातील पश्चिमेकडील वक्राकार भाग आहे. यात राजस्थान आणि गुजरात व महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या काही भागांचा समावेश केला आहे. अटल (१९६५) आदिवासी जमातींचे वर्गीकरण उत्तर आणि उत्तरपुर्व विभाग, पश्चिम व उत्तर-पश्चिम विभाग, मध्य विभाग आणि दक्षिण विभाग या चार गटात केले आहे.

याप्रमाणेच रॉय बर्मन (१९७१) यांनी विविध विभागात राहणाऱ्या आदिवासींचे त्यांच्या ऐतिहासिक, वांशिक आणि सामाजिक-सांस्कृतिक संबंधांच्या आधारावर पाच क्षेत्रिय विभागात विभाजन केले आहे. ते खालीलप्रमाणे :-

**अ) उत्तर-पूर्व भारत** : यामध्ये आसाम, मेघालया, नागालँड मणीपूर, अरूणाचल प्रदेश, मिझोराम आणि त्रिपुरा यांचा समावेश होतो.

**ब) उत्तर आणि उत्तर-पूर्व भारत मधील हिमालयाचा विभाग** : यात उत्तर प्रदेश व हिमाचल प्रदेशचा उत्तरेकडील पर्वतीय भाग समाविष्ट होतो.

**क) मध्य आणि पूर्व भारत** : यात पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, मध्य प्रदेश आणि आंध्रप्रदेशचा समावेश होता.

**ड) दक्षिण भारत** : यात तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटकचा समावेश होतो.

**इ) पश्चिम भारत** : यात राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्राचा समावेश होतो.

अशा प्रकारे वरिलप्रमाणे आदिवासीच्या केलेल्या भौगोलिक वर्गीकरणाचा आणि त्यांच्या भौगोलिक, परिस्थितीकीय, सामाजिक, आर्थिक च्वणरशासकिय वांशिक घटकांच्या आधारावर एल. पी. विद्यार्थी आणि बिनय कुमार यांनी आदिवासींचे एका उप-विभागासह चार भौगोलिक विभागांत वर्गीकरण केले आहे. ते पुढीलप्रमाणे :-

**१. हिमालय विभाग** : (अ) हिमालय विभाग, (ब) मध्य हिमालय विभाग, (क) उत्तर-पश्चिम किंवा वायव्य हिमालय विभाग.

**अ) मध्य हिमालयिन विभाग** : या विभागात आसाम व्नागालँड आणि पश्चिम बंगालचा पर्वतीय भाग उत्तर-पूर्व/ईशान्य हिमालय विभागात दार्जिलिंग, अरूणाचलप्रदेश, नागालँड, मणीपूर वमिझोराम आणि त्रिपूराचा समावेश होतो.तर उत्तरप्रदेशचा तराई भाग आणि बिहारचा मध्य हिमालय विभागात समावेश होतो. हिमाचल प्रदेश आणि जम्मू -काश्मिरचा उत्तर-पश्चिम /ईशान्य हिमालय या विभागात येतो. भारतातील एकूण जमातींच्या १/८ लोकसंख्या या विभागात राहते.

**ब) मध्य हिमालय विभाग** : या विभागात बिहार, पश्चिम बंगाल, ओरिसा आणि मध्यप्रदेशचा समावेश होतो. यात आदिवासी जमातींची लोकसंख्या २ कोटी पेक्षा म्हणजे एकूण भारतीय आदिवासी लोकांपैकी ५५ टक्के आदिवासी लोकसंख्येचे केंद्रीकरण या विभागात आढळते.

**क) पश्चिम भारतीय विभाग** : यामध्ये राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, गोवा, दादरा आणि नगरहवेली यांचा समावेश होतो व यामध्ये आदिवासींची लोकसंख्या सुरे १ कोटी असल्याचे आढळते.

**ड) दक्षिण भारतीय विभाग** : या विभागात आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक आणि केरळ या भागांचा समावेश होतो. या विभागातील आदिवासींची संख्या केवळ १.६६ टक्के आहे.

**इ) बेटांचा विभाग** : आंदमान निकोबार बेटांचा आणि लक्षद्विपचा या विभागात समावेश होतो. या विभागात सुमारे ५४.३ टक्के आदिवासी लोकसंख्येचे अस्तित्व आढळते.

वरील विविध मानवशास्त्रज्ञांनी आणि विचारवंतांनी आदिवासीच्या केलेल्या भौगोलिक वर्गीकरणाच्या आधारावर आपण भारतातील आदिवासींचे खालील तीन भौगोलिक विभागात वर्गीकरण करु शकतो.

**अ) उत्तर ईशान्य विभाग** : या विभागात पूर्व पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश आणि आसाममधील डोंगरी भाग, मिझोराम, नागालँड, मणिपूर व त्रिपूरा इत्यादींचा समावेश होतो.

या विभागात आपणास प्रामुख्याने थारू, नागा, खासी, लांबा या आदिवासी जमाती आढळतात. याबरोबरच पंजाबमधील गद्दी, भोट; आसाममधील खासी, गारो, अबीर, डफला, कुकी, मिझो, मिकीर, नागा; हिमाचलप्रदेशातील गद्दी, गुर्जर, लाब, लहौल; बिहारमधील आसूर, थारू, मुसाहर, उरॉव, मणिपूरातील अंगामी, मिझो, को, पैते, पुरूम आणि त्रिपुरातील कुकी, खासी, मुंडा, दिआंग, जमातिया या आदिवासी जमाती आढळतात.

**ब) मध्यविभाग** : भारतातील आदिवासी लोकसंख्येच्या दृष्टीने हा विभाग महत्त्वाचा आहे. कारण सर्वात जास्त आदिवासींचे या विभागात केंद्रीकरण झालेले आहे. या विभागात बंगाल, बिहार, उत्तर प्रदेशातील काही भाग, दक्षिण महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि ओरिसा या राज्यांचा समावेश होतो.

या विभागातील काही महत्त्वाच्या आदिवासी जमातींमध्ये बिहारमधील असूर, बैगा, बिरहोर, हो, गोंड, खोंड, मुंडा, कोरवा, उरॉव, संथाळ, भूमिज, सबरिया, बंजारे; बंगालमधील हो, कोल, गारो, लेपचा, कोरवा; राजस्थानातील भिल्ल, गरासिया, दुबळा, कोरकू, कातकरी, वारली; मध्यप्रदेशातील कोरल, गदबा, खोंड, परधान, कोलाम; महाराष्ट्रातील भिल्ल, गोंड, कोलाम, कोळी, ठाकूर, वारली, मुंडा, उरॉव; गुजरातमधील कोरकू, भिल्ल, गदबा, दुबळा, परधान, वाघरी; ओरिसातील बैगा, बोदो, चेंचू, जुआंग, संथाल, कोया, जतपूस या जमातीचा उल्लेख करावा लागेल.

क) दक्षिण विभाग : या विभागात हैद्राबाद, म्हैसूर, कूर्ग, त्रावणकोर, कोचीन, आंध्र व मद्रास आणि अंदमान व निकोबार हे भाग येतात. या विभागातील काही महत्त्वाच्या आदिवासी जमाती खालीलप्रमाणे :-

आंध्रधील चेंचू, कोया, कोंडादोरा, येनाडी, कोलाम, डोंगरी रेड्डी, वाल्मिकी, परधान; म्हैसूरमधील गेदूल, कूर्ग, भिल्ल, गोंड, वारली, तोडा, होलेय; तामिळनाडू तोडा, कादर, कूरूमन, मुथुवन, पुलियन, मल्याली, कुरूंबा, उरळी, विशवन, आदियन आणि केरळमधील इरवल, मलरयन, विशवन, मन्नन, मालसर तर आंदमान निकोबार बेटावरील आंदमानी, चारीअर, कोरा, टाबो, बो, यरीर, जारबाज, निकोबारी यांचा समावेश या विभागात होतो.

अशा प्रकारे भारतातील आदिवासींचे उत्तर ईशान्य विभाग, मध्य विभाग व दक्षिण विभाग या तीन विभागात भौगोलिक वर्गीकरण करता येते. यापैकी उत्तर व इशान्य विभाग हा राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण हा भाग चीन, ब्रह्मदेश व पाकिस्तान

यांच्या सीमेलगतचा विभाग आहे. नागा जमात याच विभागात येते. आजपर्यंत तरी आपण या विभागात वास्तव्य करणाऱ्या आदिवासी जमातींची परिपूर्ण माहिती संकलित करण्यात अपयशी ठरलो आहोत. या उलट आदिवासी लोकांच्या केंद्रीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या मध्य विभागातील आदिवासी जमातींची पुरेशी माहिती मिळविण्यात आपणाला चांगलेच यश लाभले आहे.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ❊

१. डॉ. गुहा यांनी १९५१ साली मांडलेले आदिवासींच्या भौगोलिक विभागांची नावे लिहा.

---------------------------------------------------------------

२. उत्तर ईशान्य विभागातील चार महत्त्वपूर्ण आदिवासी जमातींची नावे लिहा.

---------------------------------------------------------------

३. आदिवासी लोकसंख्येच्या केंद्रीकरणाच्या दृष्टीने कोणता भौगोलिक विभाग महत्त्वाचा आहे.

---------------------------------------------------------------

४. राजकीय दृष्ट्या आदिवासी लोकांचा कोणता भौगोलिक विभाग महत्त्वाचा आहे.

---------------------------------------------------------------

## २.३.२ भारतीय आदिवासींचे वांशिक वर्गिकरण (Racial Classification of Indian tribes)

भारतातील आदिवासींच्या भौगोलिक वर्गीकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपण भारतीय आदिवासींच्या वांशिक वर्गिकरणाचा अभ्यास करणार आहोत. पण हा अभ्यास सुरू करण्यापूर्वी आपणास वंश ही संकल्पना नेमकी काय आहे याचा अत्यंत थोडक्यात आढावा घ्यावा लागणार आहे. क्रोबर यांच्या म्हणण्यानुसार ''वंश ही एक प्रमाणीकृत अशी जीवशास्त्रीय संकल्पना आहे. हा अनुवंशिकतेवर एकत्र आलेला एक समूह; एक प्रजाती किंवा जैविक वंश किंवा उप-प्रकार आहे'' तर युनिस्कोने ''मानववंशशास्त्रीय दृष्ट्या वंश हा शब्द एखाद्या समुहाचे इतर समूहांपासून वेगळेपण निश्चित करणाऱ्या अनुवंशिकतेच्या आधारावर विकसीत झालेल्या शारीरिक विविधतेसाठी वापरावा लागतो'' अशा शब्दात वंश ही संकल्पना स्पष्ट केली आहे.

भारतीय आणि परदेशी संशोधकांनीही भारतीय वंशावर संशोधन कार्य केले आहे. या संदर्भात सर एच. एच. रिस्ले, ए.सी. हडन . जे. एच. हटन. बी एस. गुहा आणि डी.एन. मजुदार यांचा विशेष

उल्लेख करावा लागेल. भारतीय समाजातील हिंदू धर्मीय व आदिवासी या दोन मोठया विभागातील वांशिक लक्षणांचा शोध घेण्याचा प्रयत्न या संशोधकांकडून प्रामुख्याने झाल्याचे दिसून येते. जगाच्या इतर विभागात ज्याप्रमाणे शुध्द वंश आढळत नाहीत, त्याचप्रमाणे भारतातही शुध्दस्वरूपात वंश आढळत नाहीत. सर्वप्रथम १९०१ साली सर हर्बर्ट रिस्ले यांनी भारतीय लोकांचे वांशिक वर्गिकरण करण्याचा प्रयत्न केला असल्याचे आढळून येते. रिस्ले यांनी भारतीय लोकांचे शारीरिक वैशिष्टयांच्या आधारावर सात वांशिक गटात विभाजन केले आहे. यामध्ये त्यांनी आंदमान बेडावर आढळणाऱ्या निग्रिटो लोकांचा समावेश केलेला नाही कारण त्यांच्या मते या लोकांचा भारतीयंशी फारसा संबंध नाही. त्यांनी सात वांशिक गटांचे पुढिल प्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे.

१. **तुर्की–इराणियन** (The Turko-Iranian) : सध्या पाकिस्तानमध्ये समाविष्ट होत असलेल्या बलुचिस्तान व अफगाणिस्तान मध्ये या लोकांचे वास्तव्य आढळते. सर्वसामांन्य सरासरीपेक्षा अधिक उंची असलेले असे हे लोक आहेत. या लोकांचे डोळे काळे व करडे असून त्यांच्या चेहऱ्यावर केस आढळतात व त्यांना विपूल केससंभार लाभला आहे. त्यांचे नाक लांब पण अखंड असून त्यांचा रंग उजळ आहे.

२. **इंडो–आर्यन** (The Indo-Aryan) : या वांशिक गटातील लोकांचे पूर्व पंजाब राजस्थान आणि काश्मिर भागात वस्तव्य आढळून येते. या विभागात आढळणारे उंच जाट व खत्री हे या वांशिक गटाचे चांगले उदाहरण आहे. या लोकांध्ये उंच देहयष्टी, अरूंद नाकासह लांब डोके, रंग उजळ, डोळे गडद काळे, केस भरपूर व उंचीच्या बाबतीत हे लोक उंच या शारीरिक गुणवैशिष्टयांनी युक्त असल्याचे आढळते.

३. **सिंथो–द्रवीडियन** (The Scyhto-Dravidian) : या वांशिक गटाच्या नावावरूनच हे स्पष्ट होते की हा वांशिक गट म्हणजे सिंथियन आणि द्रवीडियन या दोन वांशिक गटांच्या संकरातून निर्माण झाला आहे. मध्य प्रदेश, सौराष्ट्र व कुर्ग भागातील जंगल पट्टयात हे लोक आढळतात. या विभागातील उच्च सामाजिक गटांत सिंथियन तर निम्न सामाजिक गटांत द्रवीडियन वांशिक लक्षणांचा प्रभाव आढळतो. रूंद डोके, पातळ नाक, रंग उजळ, मध्यम उंची व विरळ केस ही या वांशिक गटाची शारीरिक लक्षणे असल्याचे आढळते.

४. **आर्य–द्रवीड** (The Aryo-Dravidian) : या वांशिक गटाचे लोक प्रामुख्याने भारतातील उत्तर प्रदेश, राजस्थान व बिहार राज्यांत जास्त संख्येत आढळतात. इंडो आर्यन आणि द्रवीडियन वांशिक गटातील संयोगातून हा वांशिक गट निर्माण झाला असावा असे मानले जाते. या वांशिक गटात लांब पण मध्यम मस्तकाकडे झुकणारे डोके, मध्यम प्रकारचे पण रूंद नाक, हलक्या तपकिरी रंगापासून काळा रंग आणि कमी उंची अशी शारीरिक लक्षणे आढळतात.

५. **मंगोलो–द्रवीडियन** (The Mongolo-Dravidian) : या वांशिक गटाचे अस्तित्व बंगाल आणि ओरिसामध्ये आढळते. बंगाली ब्राम्हण, बंगाली कायस्थ व आणि बंगाली मुसलमान याच्यामध्ये या वांशिक गटाची लक्षणे, मोठया प्रमाणात आढळून येतात. रिस्ले यांच्या मताप्रमाणे मंगोलियन व द्रवीडियन वंशांच्या संयोगातून हा वंश तयार झाला असावा. याबरोबरच इंडो आर्यन वांशिक गटाशी यांचे काही रक्तसंबंध असावेत. रंगाने काळे असलेल्या या लोकांच्या चेहऱ्यावर अधिक केस आढळतात. त्यांचे डोके रूंद व गोल असून नाक मध्यम प्रकारचे पण रूंदपणाकडे झुकलेले असते. त्यांची उंची मध्यम पण गिडडयात जमा होणारी आढळते.

६. **मंगोलॉईड** (The Mongoloid) : या वांाशिक गटाचे लोक प्रामुख्याने हिमालयालगतच्या पट्टयामध्ये आढळतात. नेपाळ, भूतान, आसाम आणि ब्रम्हदेश या भागात या वंशाचे लोक आढळतात. डोके रूंद, नाक रूंद नाकात जमा होणारे, रंग काळा पण पिवळसर झाक असलेला, उंचीने गिड्डे व्व डोळयाच्या पापणीवर कातडयाचा एक जादा पडदा असणारे व आणि विरळ केस लाभलेले लोक या वांशिक गटात समाविष्ट होतात.

७. **द्रावीडियन** (The Dravidian) : या वांशिक गटातील लोकांचे अस्तित्व दक्षिण भारतात आणि प्रामुख्याने मद्रास, हैद्राबाद, दक्षिण मध्य प्रदेश व आणि छोटा नागपूर या भागात आढळून येते. दक्षिण भारतातील पनियन व छोटा नागपूर भागातील संथाळ लोकांध्ये या वांशिक गटाची लक्षणे पुरेपुरपणे आढळतात. या गटातील लोकांचा रंग अगदी काळा डोळे देखील काळे, केस भरपूर पण कुरळे, नाक रूंद, डोके लांब ही शारीरिक लक्षणे आढळतात.

अशा प्रकारे सर हर्बर्ट रिस्ले यांनी भारतातील लोकांचे वांशिक वर्गिकरण केले असले तरी ते आज दोन कारणांुळे स्विकारले जात नाही. ती कारणे खालीलप्रमाणे :-

१. रिस्ले यांनी वंशासाठी वापरलेली आर्य व द्रवीडियन ही नावे वांशिक गटांची नसून भाषा गटांची नावे आहेत.

२. रिस्ले यांनी वर स्पष्ट केलेल्या वर्गिकरणात निग्रीटो वंशाचा उल्लेख नाही. पण भारतीय वंशामध्ये निग्रीटो वंशांची लक्षणे आढळतात हे हॅडन, हटन वरिगोरी या अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. यांच्या अभ्यासानुसार दक्षिण भारतातील कादर व वायव्य भारतातील अंगामी नागांध्ये निग्रीटो शारीरिक लक्षणे स्पष्टपणे आढळतात.

भारतातील लोकांचे वांशिक वर्गीकरण करण्याचा आणखी एक प्रयत्न १९३१ साली डॉ. बी. एस. गुहा यांनी केला आहे. त्यांनी भारतातील लोकांचे ६ प्रमुख प्रकारांत व ९ उपप्रकारांत वर्गीकरण केले आहे. ते खालीलप्रमाणे :-

१. निग्रीटो

२. प्रोटोऑस्ट्रोलॉईड

३. मंगोलॉईड

अ) पॅलिओ-मंगोलॉईडस

- लांब डोकी.
- रूंद डोकी.

ब) तिबेटो-मंगोलॉईड

४. मेडिटरेनियन

अ) पॅलिओ -मेडिटरेनियन.

ब) मेडिटरेनियन.

क) पौर्वात्य प्रकार.

५. पश्चिमेकडील रूंद डोक्याचे लोक.

अ) आल्पिवाईड.

ब) डिनारिक.

क) आर्मेनाईड.

६. नॉर्डिक.

१९५२ साली डॉ. गुहा यांनी प्रामुख्याने भारतीय आदिवासीमधील वांशिक संमिश्रतेबाबत खालील निष्कर्ष मांडले आहेत.

१. दक्षिण भारतातील कादर, इरूला आणि पनियनस या वेटोळेयुक्त केस असलेल्या आदिवासींमध्ये निग्रीटो वंश लक्षणे आढळतात.

२. मध्य भारतात आढळणाऱ्या आदिवासी जमाती प्रोटो-ऑस्ट्रोलॉईड वंशासी संबंधति आहेत.

३. दक्षिण पूर्व भारतातील आदिवासींत चेहऱ्याची विशिष्ट ठेवण आणि डॉळे याबाबत मंगोलॉईड वंश लक्षणे आढळतात.

४. मध्यम स्वरूपाचा बांधा, उंच डोके व मध्यम नाक लाभलेले मंगोलॉईद वंशियांपेक्षा किंचित वेगळे आदिवासी ब्रम्हपूत्रा खोऱ्यात वास्तव्य करतात.

गुहा यांच्या मतानुसार भारतीय आदिवासींचे तीन वांशिक गटात विभाजन करता येईल :-

१. **प्रोटो-ऑस्ट्रोलॉईड** : या वंशाच्या लोकांची शारीरिक लक्षणे अशी : लांब डोके, चपटे रूंद पण मुळात दबलेले नाक, तपकिरी पासून पूर्ण काळा रंग . गिडडे, केस कुरळे, आणि ओठ मांसल. मुंडा, ओरियन, हो, गोंड खोंड अशा दक्षिण व मध्यभारतातील आदिवासूंध्ये ही शार्रीरिक लक्षणे आढळतात.

२. **मंगोलॉईड** : या वंशाच्या लोकांची शार्रीरिक वैशिष्ट्ये- सपाट चेहरा व लक्षणीय हनुवटी, बदामासारखे, तिरकस, पापणीवर अधिक पडदा लाभलेले डोळे आणि विरळ केस. ईशान्य चीनमधून या वंशाचे लोक तिबेटध्ये आले व भारतात सरकले. आसाम, बंगाल भागात या वैशिष्टयांनी युक्त लोक आढळतात.

३. **निग्रीटो** : या वंशाच्या लोकांची शारीरिक वैशिष्टये थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत. डोके - मध्यम, लांब व गोलही आढळते. नाक रूंद व चपटे, रंग काळा, उंची ५ फूटांपेक्षा कमी आणि केस कुरळे व वेटोळेयुक्त लोकरीसारखे. या वंशाचे लोक केवळ आदिवासींमध्येच आहेत. वायव्य भारतातील नागा व दक्षिण भारतातील कादिर, पलियन इरूला या लोकांत ही वैशिष्ट्ये आढळतात.

थोडक्यात, भारतातील आदिवासींचे वांशिक वर्गीकरण स्पष्ट करत असताना आपण असे म्हणू शकत नाही की भारतातील आदिवासी केवळ एकाच वंश गटाचे प्रतिनिधित्व करतात तर आपणास हे स्पष्टपणे जाणवते की, भारतीय आदिवासी लोकांध्ये विविध वांशिक वैशिष्ट्यांचा संयोग झाला आहे. पण हे ही तितकेच सत्य आहे की, आपल्याला भारतातील आदिवासी लोकांत निग्रीटो, प्रोटोऑस्ट्रोलॉईड व मंगोलॉईड वांशिक वैशिष्ट्ये आढळतात.

## ⁂ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ⁂

१. क्रोबर यांनी दिलेली वंशाची व्याख्या स्पष्ट करा.

------------------------------------------------------------------

२. युनिस्कोने दिलेली वंशाची व्याख्या लिहा.

------------------------------------------------------------------

३. वंश ही एक सामाजिक-सांस्कृतिक संकल्पना आहे, हे विधान सत्य आहे का.

------------------------------------------------------------------

४. सर हार्बर्ट रिस्ले यांनी विषद केलेले सात वांशिक गट कोणते.

-----------------------------------------------------------------

५. भारतीय समाजातील आदिवासीमधील वांशिक गटांचे स्पष्टीकरण करताना डॉ. बी. एस. गुहा यांनी किती समूहांचे स्पष्टीकरण केले आहे.

-----------------------------------------------------------------

## २.३.३ भारतीय आदिवासींचे भाषिक वर्गीकरण (Linguistic Classification of Indian Tribes)

भारतीय आदिवासींच्या भौगोलिक व वांसिक वर्गीकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपण त्यांच्या भाषिक वर्गीकरणाचा अभ्यास आपण करणार आहोत. भारतामध्ये फार प्राचिन काळापासून अनेक भाषा बोलल्या जातात. परिणामी, भाषिक दृष्टीने आदिवासींचे वर्गीकरण करणे आपणास शक्य होते. भारताचा व्यापक आकार व भारतात वास्तव्य करणाऱ्या विविध वंशाच्या लोकांुळे भारत हा विविध भाषांचे माहेरघरच बनला आहे. सर ग्रियसन यांनी सन १८९० मध्ये भारताची भाषिक पाहणी केली असता त्यांच्या असे निदर्सनास आले की भारतात **१७९** भाषा व **५४४** बोलीभाषा अस्तित्वात आहेत. इतकेच नव्हे तए या **१७९** भाषांपैकी **११६** भाषा आदिम भाषा असून भारतातील केवळ १ टक्के लोकांकडूनच त्या बोलल्या जातात. भारतात प्रचलित असलेल्या व बोलल्या जाणाऱ्या भाषांचे चार समूहांत वर्गीकरण करता येते. याचाच उल्लेख चार भाषा कुटुंबे असा केला जातो. ही भाषा कुटुंबे खालीलप्रमाणे आहेतः

१) ऑस्ट्रिक भाषा कुटुंब (Austric family)

२) तिबेटी चिनी भाषा कुटुंब (Tibeto Chinese family-Sino-Tibetan)

३) द्रविडी भाषा कुटुंब (The Dravidian Family)

४) इंडो-युरोपियन भाषा कुटुंब (The Indo-European Family)

### १. ऑस्ट्रिक भाषा कुटुंब (Austric family)

जगाच्या विविध भागात या भाषा कुटुंबात समाविष्ट भाषा बोलल्या जातात, हे या भाषा कुटुंबाचे एक महत्वाचे वैशिष्टय आहे. भारताबाबत विचार करावयाचा झाल्यास या भाषा कुटुंबात समाविष्ट भाषा प्रामुख्याने प्रोटो-ऑस्ट्रोलॉईड व मंगोलॉईड या वांशिक समूहांकडून वापरल्या जातात. या भाषांचा जेंव्हा इंडाचायनात स्वीकार करण्यात आला तेंव्हा त्यांच्यात बदल झाले व त्यातून मॉन व खेुरिक या भाषांचा उगम झाला. पण भारतातील या भाषांचा वापर करणाऱ्या लोकांची संख्या सातत्याने कमी होत आहे, कारण या भाषांची जागा आर्यन भाषा घेत आहेत. या भाषा कुटुंबात खालील भाषा समाविष्ट होतात.

१) निकोबारी समूह.

२) खासी भाषा समूह.

३) मुंडा आणि कोल भाषा समूह.

१. **निकोबारी समूह** : निकोबार भागातील आदिवासींकडून निकोबारी भाषा वापरल्या जातात.

२. **खासी भाषा समूह** : आसाममधील खासी आदिवासींकडून खासी भाषा समूहातील भाषा वापरल्या जातात.

३. **मुंडा आणि कोल भाषा समूह :** पण मुंडा व कोल भाषासमूहातील भाषा मात्र भारताच्या विविध भागांत प्रचलित असल्याचे आढळते. यामध्ये पश्चिम बंगाल, बिहार आणि मध्य प्रदेश, दक्षिण भारत व ओरिसातील गंजाम जिल्ह्यात कोल व मुंडा भाषा समूहातील भाषा बोलल्या जातात. या भाषा कुटुंबात समाविष्ट होणाऱ्या भाषा व त्यांचा वापर करणारे आदिवासी खालीलप्रमाणे संतालीः ही भाषा खासी, गारो, कुकी, डफला, मिझो या आसाममधील आदिवासी, हो, कोल, मुंडा, गारो, भूमिज कारवा या पश्चिम बंगाल मधील आदिवासी, आणि बिहार मधील असूर, बैगा, गोंड, मुंडा, संताल बिरहोर या आदिवासी भागात बोलल्या जातात.

- **मुंडारी व हो** : या भाषा आसम व बिहारमधील आदिवासी मध्ये बोलल्या जातात.
- **खडिया सावरा** : या भाषा ओरिसातील आदिवासींकडून बोलल्या जातात.
- **कोरकू** : ही भाषा मध्य प्रदेशातील ाादिवासींकडून वापरल्या जातात.
- **भूमिज** : पूर्व भारतातील आदिवासींकडून ही भाषा बोलली जाते.

थोडक्यात, पश्चिम बंगाल, बिहार, आसाम, ओरिसा, आणि मध्य प्रदेशातील आदिवासी लोक मुंडा व कोरकू भाषांचा वापर करतात. पण बंगाली, हिंदी, ओरिसाआणि मराठी या प्रगत भाषांच्या या भागातील प्रचलनामुळे ऑस्ट्रिक भाषांचे शुध्द स्वरूप कमी कमी होत आहे. याबरोबरच या भाषांत लिखित स्वरूपात वांङ्‌य देखील नाही.या भागातील आदिवासींना आपल्या भाषेबरोबरच त्या त्या भागातील प्रभावी भाषा शिकणे गरजेचे झाले आहे. परिणामी या भाषा कुटुंबातील भाषांचे भवितव्य धोक्यात आले आहे.

## २. तिबेटी चिनी भाषा कुटुंब (Tibeto Chinese family-Sino-Tibetan)

हा भाषा समूह तिबेटी व चिनी भाषांचे प्रतिनिधित्व करतो ज्यामध्ये (अ) सयामी-चिनी व थाई उपसमूह (ब) तिबेटी-ब्रम्ही उपसमूह व (क) येनेसी उपसमुह या तीन भाषांचा समावेश होतो. यापैकी

येनेसी हा भाषाप्रकार भारतात वापरला जात नाही. तर थाई सयामी-चिनी भाषामध्ये खामती आणि पहाकील या भाषांचा समावेश होत असला तरी भारतामधील केवळ ईशान्य भागात यापैकी खामती भाषा उपयोगात असल्याचे आढळते. तिबेटी-ब्रम्ही भाषा भारताच्या दृष्टीने महत्वाच्या असून चिन मध्ये उदयाला ाालेली भाषा ब्रम्हपुत्रेच्या मार्गाने भारतात प्रवेश करती झाली आहे म्हणूनच या भाषा कुटुंबाला तिबेटी-चिनी भाषा समूह असे संबोधले जाते. या भाषामध्ये पुढिलप्रमाणे उपभाषा समूह समाविष्ट आहेत.

१. **तिबेटी-हिमालीयन शाखा** : दार्जिलिंगमधील बहपटी.

२. **हिमालयाच्या दक्षिणेकडील समुह :** चंबा, लहाली, स्वामगली, कानुरी इत्यादी.

३. **हिमालयीन समूह** : रोग किंवा लेपचा, टोटो इत्यादी

४. **अरूणाचल शाखा** : अका किंवा हरूसो, श्बोर, मिरी, डफा, मिसहिम इत्यादी.

५. **आसाम शाखा** :-

   **(अ) बरा किंवा बोडो समूह :** कचरी, डिसा किंवा डोंगरी कचरी, गारो, त्रिपुरा, इत्यादी.

   **(ब) नागा समूह :** १) नागा उपसमूह अंगामी, एओ, सिमा, रेंगम इत्यादी २) नागा-बोडो उपसमूह - काच्चा नागा, काबऊ नागा इत्यादी.

   **(क) काचीन समूह :** सिंगपो

   **(ड) कुकी-चीन समूह :** मनिपुरी, थाडो, सोकटी, रालटी व्लुशाई इत्यादी.

थोडक्याात तिबेटी ब्रम्ही भाषांचा अवलंब वरीलप्रमाणे भारतातील आदिवासींकडून केला जात असला तरी आज त्यांच्यावर ऑस्ट्रिक भाषा समूहातील प्रगत भाषांचा प्रभाव पडत असल्यामुळे या भाषांचा अस्त जवळ आला आहे.

## ३. द्रविडी भाषा कुटुंब (The Dravidian Family)

ऑस्ट्रिक व तिबेटी-चिनी भाषाकुटुंबांपेक्षा द्रविडी भाषाकुटुंबातील भाषा अधिक संपन्न आहेत. द्रविडी लोकांबरोबर इ. स. पूर्वी ३५०० मध्ये या भाषांनी भारतात प्रवेश केला आहे. प्रामुख्याने मेडिटेरियन व दिनारिक वंशगटांकडून या भाषा बोलल्या जातात. संपन्नतेच्या आधारावर या भाषांचे खालील दोन उपसम ूहांध्ये आपण वर्गिकरण करू शकतो.

अ) **संपन्न द्रविडी भाषा** : यामध्ये प्रामुख्याने चार भाषांचा समावेश हो असून त्या **तमिळी, मल्याळम, कन्नड** व **तेलगू** या भाषा होत. दक्षिण भारताातील प्रगत लोकांध्ये या भाषांना महत्व असून या भाषांत समृध्द वाङमय याची निर्मितीही केली आहे. सुरे २७ टक्के लोकांकडून या भाषा बोलल्या जातात.

ब) **असंपन्न द्रविडी भाषा : तुलू, कुर्गी, तोडा, गोंडी, कुकी, उरॉव, माल्टो** किंवा **माल्टर** आणि **ब्रुही** या भाषांचा या विभागात समावेश करता येतो.दक्षिणेतील लोकांध्ये या अविकसीत भाषांचे अस्तित्व आढळते. चेंचू, कोया, युनाडी, कोंडारेडडी या आंध्रप्रदेशातील आदिवासी जमाती; कादर ही त्रावणकोर-कोचिन; मलयन, मन्नन, विशवन, पुलयन या केरळमधील आदिवासी जमाती तर तोडा, कादर, कुरूंबा, कोरगा, उरळी या तामिळनाडूतील आणि कुर्ग, गोंड, चेंचू, कोया या म्हैसूर प्रांतातील आदिवासी जमाती असंपन्न द्रविडी भाषा बोलतात.

थोडक्यात, द्रविडी भाषाकुटुंबातील भाषांचे अस्तित्व मध्य आणि उत्तर भारतात अत्यंत नगन्य स्वरूपात पहावयास मिळते केवळ दक्षिण भारतीयांकडून या भाषाकुटुंबातील भाषा बोलल्या जातात . यापैकी गोंडी ही एक आदिवासींतील प्रमुख भाषा असून सुरे १५ ते २० लाख लोक ही भाषा बोलतात. पण या भाषा कुटुंबातील संपन्न भाषा असंपन्न भाषांवर प्रभाव पाडत आहेत. परिणामी काही गोंड आदिवासी लोकांनी तेलगू भाषेचा स्विकार केल्याचे दिसून येते. याबरोबरच हिंदी व मराठी भाषांचा या भाषांवरील प्रभाव सातत्याने वाढत चालला आहे.

## ४. इंडो-युरोपियन भाषा कुटुंब (The Indo-European Family)

भारतीय भाषांच्या वरील तीन भाषापक्षा इंडो-युरोपियन भाषाकुटुंब हा गट अधिक महत्वाचा आहे. जगातील बहुसंख्य लोकांकडून या भाषाकुटुंबातील भाषा बोलल्या जातात याबरोबरच जगातील बहुसंख्य भाषांचा या भाषाकुटुंबात समावेश झाल्याचे आढळते. या कुटुंबातील भाषा शाखा म्हणजे केटिक, जर्मेनिक, इटालिक, इंडो-पोर्तुगीज, ग्रीक , हिटिटि, टोखेरियन, अल्बेनियम, लेट्टो-स्लाविक, आर्मेनियम व आर्यन भाषा शाखा होत.

भारतीय लोक आर्यन भाषा कुटुंबात समाविष्ट होणाऱ्या भाषा बोलतात. यामध्ये संस्कृत, हिंदी, बंगाली, पंजाबी, गुजराथी, मराठी ओरिया या भाषांचा समावेश होतो.

अ) भारताच्या वायव्य भागात पंजाबी व सिंधी भाषा बोलल्या जातात. सिंधी भाषेत वांङयही निर्माण झाले आहे.

ब) भारताच्या दक्षिण भागात बंगाली, तामिळी व मराठी भाषा आढळून येतात. या भाषा १३ व्या शतकात उदयाला आल्या असून या भाषा वाङ्मय निर्निर्तीच्या दृष्टीने संपन्न आहेत.

क) भारताच्या पूर्व भागात ओरिया, बंगाली, आसामी व बिहारी भाषा बोलल्या जातात.

ड) भारताच्या पूर्व मध्य विभागात पूर्व हिंदीचे अस्तित्व असून ही भाषा अर्धागधीने प्रभावित झालेली आहे. यामध्ये अवधी, बेघती व छत्तीसगडी या बोलीभाषांचेही अस्तित्व आढळते.

इ) भारताच्या मध्य विभागात अस्सल हिंदी किंवा पश्चिमी हिंदी, पंजाबी, गुजराथी व राजस्थानी भाषा बोलल्या जातात.

ई) भारताच्या उत्तर विभागात पूर्वपहारी किंवा नेपाळी, मध्यपहारी व पश्चिम पहारी भाषा प्रचलित आहेत.

उ) सिंहली, जिप्सी या भारताच्या अतिरिक्त गटात समाविष्त होणाऱ्या भाषा आहेत.

या भाषा कुटुंबात समाविष्ट होणाऱ्या सर्व भाषांचा वापर हा बिगर आदिवासींकडूनच केला जातो. या भाषाकुटुंबातील बहुतेक भाषा संपन्न आहेत. याबरोबरच इतर सर्व भाषांवर याच भाषांचा प्रभाव पडत आहे. याच्याच परिणामी यापैकी काही भाषा आदिवासींकडून स्विकारल्या व बोलल्या जात असल्याचे दिसून येते. शिवाय जे आदिवासी प्रगत लोकांच्या संपर्कात आले आहेत त्यांच्याकडून आपल्या भाषांचा त्याग करून आर्यन भाषांचाही स्विकार होत असल्याचे दिसून येते, याच्याच प्रभावाने हळूहळू आदिवासी भाषांचे अस्तित्व संपुष्टात येण्याची भिती निर्माण झाली आहे.

### * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ *

१. १८९० साली भारतीय भाषांची पाहणी कोणी केली.

----------------------------------------------------------------

२. सर ग्रियसन यांना भारतात किती भाषा व किती बोलीभाषा आढळून आल्या.

----------------------------------------------------------------

३. भारतातील चार भाषा कुटुंबांची नावे लिहा.

----------------------------------------------------------------

४. ऑस्ट्रिक भाषाकुटुंबात कोणत्या भाषा समाविष्ट होतात.

----------------------------------------------------------------

५ कोणते भाषा कुटुंब हे सर्वाधिक विकसित भाषा कुटुंब आहे.

----------------------------------------------------------------

## २.४ सारांश (Let us Sum Up)

या दुसऱ्या युनिटमध्ये आपण भारतातील आदिवासींच्या भौगोलिक वर्गीकरणाच्या अध्ङ्गनानंतर

आपण भारतीय आदिवासींचे वांशिक वर्गीकरण समजून घेतले आहे. क्रोबर यांच्या मते, ''भारतीय आणि परदेशी संशोधकांनीही भारतीय वंशावर संशोधन कार्य केले आहे. या संदर्भात सर एच. एच. रिस्ले, ए. सी. हडन. जे. एच. हटन. बी एस. गुहा आणि डी. एन. मजुमदार यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. रिस्ले यांनी भारतीय लोकांचे शारीरिक वैशिष्ट्यांच्या आधारावर सात वांशिक गटात विभाजन केले आहे. त्यामध्ये (१) तुर्कीइराणियन, (२) इंडो-आर्यन, (३) सिंथोद्रवीडियन, (४) आर्यद्रवीड, (५) मंगोलो-द्रवीडियन, (६) मंगोलॉईड, (७) द्रावीडियन यांचा समावेश आहे. पण रिस्ले यांचे आदिवासी लोकांच्या वांशिक वर्गीकरणाबाबतचे विचार आज स्विकारले जात नाहीत. यानंतर डॉ. बी. एस. गुहा यांनीही भारतीय आदिवासीमधील वांशिकतेचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी भारतीय आदिवासींचे वांशिक वर्गीकरण ६ मुख्य व ९ उपप्रकारांत केले आहे. आदिवासींचे वांशिक वर्गीकरण स्पष्ट करत असताना आपण असे म्हणू शकत नाही की भारतातील आदिवासी केवळ एकाच वंश गटाचे प्रतिनिधित्व करतात, तर आपणास हे स्पष्टपणे जाणवते की भारतीय आदिवासी लोकांध्ये विविध वांशिक वैशिष्टयांचा संयोग झाला आहे. पण हे ही तितकेच सत्य आहे की आपल्याला भारतातील आदिवासी लोकांत निग्रीटो, प्रोटोऑस्ट्रोलॉईड व मंगोलॉईड वांशिक वैशिष्ट्ये आढळतात.

या युनिटच्या शेवटी आपण भारतील आदिवासीच्या भाषिक वर्गीकरणाचा अभ्यास केला आहे. १८९० साली सर ग्रियसन यांनी भारताची भाषिक पाहणी केली. त्यात त्यांना १७९ भाषा व ५४४ बोलीभाषा आढळून आल्या. आज आपण भारतीयांचे - (१) ऑस्ट्रिक भाषा कुटुंब, (२) तिबेटी चिनी भाषा, (३) द्रविडी भाषा कुटुंब, (४) इंडो-युरोपियन भाषा कुटुंब या चार भाषा कुटुंबांमध्ये वर्गीकरण करू शकतो.

## २.५ स्वयं-अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

### ※ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ※

१. डॉ. गुहा यांनी १९५१ साली मांडलेले आदिवासींच्या भौगोलिक विभागांची नावे : (अ) उत्तर व उत्तरपूर्व विभाग, (ब) मध्य विभाग व (क) दक्षिण विभाग ही आहेत.

२. उत्तर ईशान्य विभागातील चार महत्त्वपूर्ण आदिवासी जमात थारू, नागा, खासी लांबा या आहेत.

३. आदिवासी लोकसंख्येच्या केंद्रीकरणाच्या दृष्टीने मध्य भौगोलिक विभाग महत्त्वाचा आहे.

४. राजकीय दृष्ट्या आदिवासी लोकांचा उत्तर-ईशान्य हा भौगोलिक विभाग महत्त्वाचा आहे.

## ✲ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ✲

१. क्रोबर यांच्या मते, ''वंश ही एक जैविक संकल्पना आहे. हा अनुवंशिकतेवर आधारलेला एक समूह आहे.''

२. युनिस्कोने ''मानववंशशास्त्रीय दृष्ट्या वंश हा शब्द एखाद्या समुहाचे इतर समूहांपासून वेगळेपण निश्चित करणाऱ्या अनुवंशिकतेच्या आधारावर विकसीत झालेल्या शारीरिक विविधतेसाठी वापरावा लागतो.''

३. नाही. वंश ही सामाजिक - सांस्कृतिक संकल्पना नसून ती एक जीवशास्त्रीय संकल्पना आहे.

४. सर एच. एच. रिस्ले यांनी भारतीय लोकांचे )१) तुर्कीइराणियन, (२) इंडो-आर्यन, (३) सिंथो-द्रवीडियन, (४) आर्यद्रवीड, (५) मंगोलो-द्रवीडियन, (६) मंगोलॉईड व (७) द्रावीडियन या सात वांशिक प्रकारांत वर्गीकरण केले आहे.

५. डॉ. बी. एस. गुहा यांनी भारतीय आदिवासींचे ६ मुख्य वंशात व ९ उपसमूहांत स्पष्टीकरण दिले आहे.

## ✲ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ✲

१. सर ग्रियसन यांनी १८९० साली भारताची भाषिक पाहणी केली होती.

२. सर ग्रियसन यांना भारतात १७९ भाषा व ५४४ बोलीभाषांचे अस्तित्व आढळून आले होते.

३. आज आपण भारतीयांचे (अ) ऑस्ट्रिक भाषा कुटुंब, (ब) तिबेटी चिनी भाषा, (क) द्रविडी भाषा कुटुंब, (ड) इंडो-युरोपियन भाषा कुटुंब. या चार भाषा कुटुंबांध्ये वर्गीकरण करू शकतो.

४. ऑस्ट्रिक भाषा कुटुंबामध्ये - (अ) मुंडा आणि कोल भाषा समूह, (ब) खासी भाषा समूह आणि (क) निकोबारी भाषांचा समावेश होतो.

५. द्रावीडियन भाषाकुटुंब हे अधिक विकसित भाषाकुटुंब आहे.

# २.६ सरावासाठी प्रश्न

❋ भारतीय आदिवासींच्या भौगोलिक आणि वांशिक वर्गीकरणावर निबंध लिहा.

## २.७ चिंतन आणि कार्य

❋ हाकारा आणि आदिवासी संशोधन पत्रिकेच्या विविध अंकांचे वाचन करून परिवर्तनाचा महाराष्ट्रातील आदिवासींवर होणारा परिणाम यावर एक टीप लिहा.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **Doshi S. L.** : *"Social Anthropology"*, Rawat Publications, Jaipur, 2001.

२. **Majumdar D. N.** and **Madan T. N.** : *"An Introduction to Social Anthropology",* National Publication House, New Delhi, 1988.

३. **Majumdar D. N.** : *"Races and Cultures of India",* Kalyani Publications, New Delhi, 1990.

४. **Vidyarthi L. P.** and **Rai Binay Kumar** : *"The Tribal Culture of India",* Concept publication Company, New Delhi, 1976.

५. **नाडगोंडे गुरूनाथ** : *''भारतीय आदिवासी''*, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे २००३.


❀ ❀ ❀

घटक-३

# आदिवासींचे सामाजिक जीवन

## (Tribal Social Life)

घटक संरचना (Unit Structure)

३.१ प्रस्तावना (Introduction)

३.२ उद्दिष्ट्ये (Objectives)

३.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

- ३.३.१ जोडीदार निवडीच्या पद्धती (ways of acquiring mates)
- ३.३.२ आधिमान्य विवाहाचे प्रकार (Types of preferential marriage)
- ३.३.३ कुटुंब : आदिवासी कुटुंबाची वैशिष्ट्ये (Family : Characteristics of Tribal Family)
- ३.३.४ कुल आणि कुलप्रतिकवाद : वैशिष्ट्ये आणि कार्य (Clan and Totemism : Characteristics and Function)

३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check your progress)

३.५ सारांश (Let us sum up)

३.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your Progress)

३.७ स्वाध्याय किंवा गृहपाठ (Exercise/Home Assignment)

३.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

३.९ परिभाषिक शब्द किंवा संज्ञा (Glossary)

३.१० अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

### ३.१ प्रस्तावना (Introduction)

मानवाच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक सामाजिक संस्था मानवाने निर्माण केल्या आहेत. विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, धर्मसंस्था, शिक्षणसंस्था, राज्यसंस्था इ. या मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवत असतात. मानवाने सामाजिक मानवशास्त्रात आदिवासींच्या अभ्यासावर भर देऊन आदिवासींच्या सामाजिक

जीवनाचा सांगोपांग अभ्यास केला आहे. आदिवासींच्या सामाजिक जीवनातील विवाहसंस्था, कुटुंबसंस्था. या मूलभूत व महत्त्वाच्या सामाजिक संस्था आहेत. आपण या प्रकरणात या दोन महत्त्वाच्या व मुलभूत सामाजिक संस्थांचा तसेच कुल आणि कुलप्रतिकवादचा अभ्यास करणार आहोत.

आदिवासी समाज हा एक वेगळा समाज आहे. प्रगत समाजाचे जीवन व आदिवासी जीवन यात फार फरक आहे. जगण्याची साधी राहणी. स्वतःच्या जमातीपुरती वेगळी नियमनपद्धती संस्कृतीची काटेकोर जोपासना यामुळे आदिवासी जीवन हे अगदी वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदिवासींच्या विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, धर्मसंस्था, राज्यसंस्था, युवा मंडळे, आप्तसंबंध या सर्व सामाजिक संस्था अगदी परंपरागतपणे चालत आलेल्या आहेत. त्यात फारसा बदल ते स्वीकारत नाहीत. त्यामुळे आदिवासी सामाजिक जीवनाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. आदिवासींच्यातील सामाजिक संस्था देखील परंपरागत व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. यापैकी आदिवासी विवाह, जोडीदार निवडीच्या पद्धती आणि अधिमान्य विवाहप्रकार, कुटुंब, कुल आणि कुलप्रतिकवाद आदी सामाजिक संस्थांतील महत्त्वाच्या घटकांविषयी आपण या प्रकरणात क्रमशः अभ्यास करणार आहोत.

## ३.२ उद्दिष्ट्ये (Objectives)

- आदिवासी विवाहातील जोडीदार निवडीच्या पद्धती – विषयी माहिती करून घेणे.
- आदिवासीतील प्रकार समजून घेणे
- आदिवासी कुटुंबाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये माहित करून घेणे
- आदिवासीतील कुल आणि कुलप्रतिकासंबंधी माहिती करून घेणे.

## ३.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

आदिवासी सामाजिक संस्था या प्रकरणात आपण आदिवासी समाजातील महत्त्वाच्या व मुलभूत अशा तीन सामाजिक संस्थांचा अभ्यास करणार आहोत. मानवी जीवन नियमीत व नियंत्रीत करण्यासाठी अनेक सामाजिक संस्था आवश्यक असतात. अगदी प्राचीन काळापासून मानवाने आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी मानवी जीवनाला नियंत्रीत केले आहे. या नियमांचे पालन केले तरच मानवी जीवनाच्या गरजांची पूर्तता होईल. समूहाच्या, समाजाच्या सर्व सदस्यांना आपल्या गरजांची पूर्तता करता केईल व यामुळेच मानवाचे व पर्यायाने समूहांचे, समाजांचे अस्तित्व टिकविता येईल. याची कल्पना अगदी प्राचीन आदिम मानवाला देखील आली होती व त्यातूनच आदिवासींच्यातदेखील सामाजिक जिवनाला नियमित व नियंत्रीत करणाऱ्या अनेक सामाजिक संस्था निर्माण झाल्या. आदिवासींच्या अनेक सामाजिक संस्था

निर्माण झाल्या. आदिवासींच्या अनेक सामाजिक संस्थांपैकी आपण या ठिकाणी विवाहसंस्था, कुटुंबसंस्था आणि कुल, कुलप्रतिकवादासंदर्भात अभ्यास करणार आहोत.

## ३.३.१ आदिवासी विवाह

विवाह ही मानवी जीवनातील एक प्राचीन सामाजिक संस्था आहे. सर्वच समाजात विवाहसंस्था आढळते. विवाह हा सर्व सामाजिक संस्थांचा पाया आहे. कारण विवाहावरच कुटुंबसंस्था व समाजाची निर्मिती व अस्तित्व आधारलेले असते. प्रजोत्पादन, अपत्यसंगोपन यासाठी मुख्यतः विवाहसंस्था, कुटुंबसंस्था आवश्यक असतात. माणसामध्ये कामवासना ही निरंतर (Continuous) असते. ती इतर प्राण्यात, सजिवांत मात्र आंतरिक (intermittent) किंवा हंगामी (seasonal) किंवा चक्रीय (Cyclical) स्वरूपाची असते. मनुष्य प्राण्यात कामवासना जरी निरंतर असली तरी आपल्या लैंगिक गरजांची पूर्तता स्वैरपणे करता येत नाही. विशिष्ट प्रकारच्या नियमनानुसार, वर्तनानुसार विशिष्ट जोडीदाराशीच लैंगिक गरजपूर्ती करता येते. समाजाचे असे सदैव बंधन असते. त्यामुळे समाजमान्य वैषयिक संबंधाचा प्रकार (Pattern) म्हणजे विवाह होय. विवाहाच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे :-

१. ''विवाह ही स्त्री आणि पुरुषांना कौटुंबिक जीवनात प्रवेश देणारी संस्था आहे.'' - **(इ. एस्. बोगार्डस)**

   ("Marriage is an Institution for admitting men and women for family life." - **E. S. Bogardus**)

२. ''स्थायी होईल या भावनेने सुरू झालेला व समाजाची मान्यता असलेला स्त्री पुरुष समागम म्हणजे विवाह होय.'' - **(मेल्वील, हरस्कोविटझ)**

   ("Marriage is socially sanctioned mating entered into with the assumprion of permanency." - **Melville, Herskovits**)

३. ''विवाह म्हणजे एक किंवा अनेक पुरुषांचा एका किंवा अनेक स्त्रियांशी असलेला संबंध होय. या संबंधास प्रथा किंवा कायद्याने मान्यता दिली जाते. तसेच त्यात अंतर्भुत होणाऱ्या दोन्ही पक्षाविषयी तसेच त्यांच्याकडून जन्मास येणाऱ्या मुलांबाबत काही अधिकार आणि कर्तव्यांचा समावेश होतो.'' - **विल्यम वेस्टरमार्क.**

   ("Marriage is relation of one or more men to one or more womenwhich is recognised by custom or Law and involves certain rights and duties both in the case of parties enterning the union and in the case of children born of it." - **Edward Westermark**)

४. ''स्त्री-पुरुष समागमाच्या प्रकारापैकी ज्या प्रकारांना समाजाचे सर्वात जास्त अनुमोदन मिळते ते प्रकार म्हणजे त्या समाजातील विवाह होय.'' - **रॉबर्ट एच. लोई.**

("The forms of mating enjoying of highest approbation constitute `marriage' in a given society." - **Robert H. Lowie**)

आदिवासी विवाहाचा विचार करताना काही महत्त्वाच्या गोष्टी निदर्शनास येतात. त्या म्हणजे आदिवासी विवाह हा एक करार आहे. एक तडजोड आहे. त्यामुळे घटस्फोट पद्धतीदेखील साधी व सरळसोपी आहे. विवाहपूर्व आणि विवाहबाह्य लैंगिक संबंधांना समाजाचा प्रखर विरोध नसतो.

आदिवासींच्यामध्ये विवाहातील जोडीदारांच्या संख्येवरून एक विवाह (Monogamy) आणि बहुविवाह (Polygamy) आणि समुह अथवा संघ विवाह (Group Marriage) असे बहुविवाहाचे तीन उपप्रकार आढळून येतात.

आदिवासी विवाहास कराराचे स्वरूप असले तरी देखील जोडीदार निवडताना समाजाने घातलेले अनेक नियम किंवा बंधने पाळावी लागतात. अंतर्विवाह (Endogamy) म्हणजे एखाद्या विशिष्ट समुहातील व्यक्तींना त्या समुहातील व्यक्तीशीच लग्न करणे (Marrying in) ही प्रथा होय. या उलट एखाद्या विशिष्ट समुहातील व्यक्तींना त्या समुहात लग्न करण्यास प्रतिबंध असतो. म्हणजेच समुहाबाहेरील व्यक्तीबरोबर लग्न करणे (Marrying Out) ही पद्धत होय. यालाच बहिर्विवाह (Exogamy) असे म्हणतात.

थोडक्यात, या अंतर्विवाह (Endogamy) आणि बहिर्विवाह (Exogamy) विवाहबंधन प्रकारांचे व नियमांचे कारण वा स्पष्टीकरण आदिवासी जमातींनी अतिशय योग्यपणे दिलेले आढळते.

## ३.३.२ जोडीदार निवडीच्या पद्धती (Ways of acquiring mates)

आदिवासी समाजात लोकांनी कोणत्या मार्गांनी वधु मिळवावी याविषयीदेखील समाजाने नियम केलेले असतात. पण अंतर्विवाहाचे नियम आणि बहिर्विवाहाचे नियम जसे सक्तीचे असतात तशी सक्ती वधु-वर निवडीच्या म्हणजेच जोडीदार निवडीच्याबाबतीत फारशी नसते. वधु कोणती करावी, वधु कशी मिळवावी याबाबत कुटुंबाचेही लक्ष असते. आदिवासी समाजात वधुला विनामूल्य (Gratis) स्विकारली जात नाही. वधुपित्याला प्रचलित रितीरिवाजानुसार काहीतरी मोबदला (Compensation) देऊन वरपित्याने आपल्या मुलासाठी वधू आणावी, असा सामान्य नियम प्रचलित आहे. प्रगत समाजात वराला वधुपक्षाने हुंडा (Dowry) द्यावा लागतो पण आदिवासी समाजात मात्र मूल्य देऊनच वधू मिळविणे आवश्यक समजले जाते. कारण आदिवासी समाजात कुटुंबात स्त्री ही उपयुक्त व्यक्ती असते. घरकामात, अर्थोत्पादनात स्त्री ही हातभार लावणारी असते. तसेच स्त्री ही जननक्षम असते. या सर्व कारणामुळे ती

कुटुंबाची परिसंपत्ती (Asset) मानली जात असते. अशी वधु वरपक्षाच्या घरी देताना वधुपित्याला नुकसान सोसावे लागते. त्याची भरपाई (Compensation) म्हणून वरपक्षाने वधुपित्याला कोणत्यातरी स्वरूपात काही ना काही मूल्य द्यावे, अशी प्रथा आदिवासी समाजात सुरू झाली. या प्रथेनुसार विशिष्ट रितींनी वधुमूल्य (bride price) देऊन वधु मिळविण्याच्या पद्धती समाजात रुढ झाल्या. त्याला विशेष मान्यता मिळत असे. अशा वधुमूल्य देण्याच्या विवाहपद्धतींना रुढ संप्रदायानुरुप पद्धती (Orthodox means) असे म्हणतात. पण वधुमूल्य देऊ न शकणाऱ्यांसाठी इतर काही मार्गांने वधु मिळविण्याचे प्रकार सुरू झाले. त्यालाच रुढ संप्रदायानुरुप नसलेल्या पद्धती (unorthodox means) असे म्हणतात. या जोडीदार निवडीच्या पद्धतींचा समग्र अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

## अ) रुढ संप्रदायानुसार पद्धती (Orthodox Means)

वधु पक्षाला योग्य तो मोबदला देऊन वधू मिळविण्याच्या पद्धतींना रुढ संप्रदायानुरुप पद्धती असे म्हणतात. वधुमूल्य देण्याची प्रथा या पद्धतीमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकाराने पूर्ण केली जाते. या रुढ संप्रदायानुरुप असणाऱ्या जोडीदार निवडीच्या विवाहपद्धतींचे मुख्यतः तीन प्रकार आहेत.

१) क्रय विवाह (Marriage by Purchase)

२) सेवा विवाह (Marriage by Service)

३) विनिमय विवाह (Marriage by Exchange)

या रुढ संप्रदायानुरुप असणाऱ्या जोडीदार निवडीच्या विवाहपद्धतीचा सारांशाने पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल.

### १. क्रय विवाह (Marriage by Purchase)

मूल्य देऊन वधू विकत घेण्याची पद्धत आदिम समाजात सर्वत्र रुढ असून ती विशेष पसंत केली जाते. क्रय विवाहामध्ये सन्मानाने वधुमूल्य देऊन वधू विकतच घेतली जाते. किरगीझ (Kirgiz), युरोक (Erok) जमातीत पती जितके जास्त वधुमूल्य देतो त्यानुसार त्याची प्रतिष्ठा वाढते. इंग्लंडधील प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ हॉबहाऊस, व्हीलर व गिन्सबर्ग यांनी पाहणी केलेल्या ४३४ आदिम जमातीपैकी ३०३ आदिम जमातीत वधुमूल्याची प्रथा प्रचलित होती. आफ्रिकेतील सर्वच आदिवासी जमातीत वधुमूल्य देण्याची क्रय विवाह पद्धती आढळते. भारतातील संथाल, हो, गोंड, नागा, कुकी, खरिया, उराँव, भिल्ल, कोळी, वारली, कातकरी, ठाकूर, दुबळा, गरासिया इ. जमातीत क्रय विवाहाची पद्धती आढळून येते. हो जमातीत शक्य होणार नाही इतके जास्त वधुमूल्य असते. तर रेंगामा नागा जमातीत वधुमूल्य हे फारच कमी आहे. वारली जमातीत वधुमूल्य हे रक्कम, धान्य, दागिने, जनावरे, कपडे किंवा भांडी इ. स्वरूपात देण्यात येते. वधुमूल्य किती द्यावे, हे काळानुरुप बदलत असते. उदा. महादेव कोळी जमातीत पूर्वी २५ ते ३२ रु.

वधुमूल्य दिले जायचे त्यानंतर वधुमूल्य हे ३८० रु. झाले. तर आज या वधुमूल्यात बरीच वाढ झाली आहे. वधुमूल्य ठरविताना अनेक गोष्टी लक्षात घेतल्या जातात. वधुपक्ष व वरपक्ष यांचा समाजातील दर्जा, देण्याघेण्याची आर्थिक परिस्थिती यानुसार वधुमूल्य कमी वा जास्ती हे प्रमाण ठरते. वधुचे **सौंदर्य, प्रकृती, कार्यशक्ती,** वधुचे **वैयक्तिक गुण** यानुसार वधुमूल्य ठरते. कुमारी वधुला अधिक वधुमूल्य तर विधवा, परित्यक्ता - (Repudiated wife) या अवस्थेतील वधुला कमी वधुमूल्य दिले जाते. इतकेच काय पण कॅलिफोर्नियातील युरोक Erok सारख्या काही जमातीत वधुच्या आईसाठी किती वधुमूल्य देण्यात आले होते, ही बाब देखील विचारात घेतली जाते. काही जमातीत प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा तिच्या आईसाठी दिल्या गेलेल्या वधुमूल्याच्या परिमाणावरच निर्धारित केली जाते. म्हणूनच किरगीझ (Kirgiz) जमातीत वधुमूल्य वाढत जाणे हे श्रेष्ठ मानतात.

यावरून वधुमूल्य देणे हा आर्थिक व्यवहार दिसत असला तरी त्यामध्ये सामाजिक बाजू विशेष महत्त्वाची आहे. वधुपित्याने वधुसाठीचे मिळालेले मूल्य आपल्याजवळ ठेव म्हणून ठेवावे. जर पत्नीला घटस्फोट दिला तर ती आपल्या वडिलांच्या घरी येईल. तेव्हा वधुपित्याने हे विवाहाच्यावेळी घेतलेले वधुमूल्य परत दिले पाहिजे. असे देखिल अनेक जमातीत बंधन असते. वधुमूल्य काही वेळा एकदम देणे शक्य नसल्याने हप्त्याहप्त्याने देण्याची पद्धत आढळते. मुले होतील तसे हे हप्ते द्यावेत असे ठरते. काही जमातीत मुले मोठी झाल्यावर स्वतः आईसाठीचे वधुमूल्य चुकते करतात. बापाने कबुल केलेल्या वधुमूल्याची फेड मुलगा करतो. वधुमूल्यात इथे व्यापारी वृत्ती नसून ते प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. संथाल जमातीत पूर्वी रितीरिवाजानुसार दिले जाणारे १२ रुपयांचे वधुमूल्य असे, यापैकी वधुपित्याला ३ रु., वधुच्या आईला ५ रु. वधुच्या आईच्या आईला २ रु. आणि वधुच्या बापाच्या आईला २ रु. असे वाटले जाई. स्त्रीजवळ असणाऱ्या श्रमशक्तीबद्दल वधुमूल्य द्यावे लागते. कारण मुलगी देणे वधुपित्याला नुकसानीचे ठरते. ती नुकसानभरपाई म्हणून वधुपित्याला वधुमूल्य देतात. तसेच स्त्रीजवळ असणाऱ्या संततीप्राप्ती किंवा जननशक्तीबद्दलही वधुमूल्य असते. कारण स्त्रीला होणाऱ्या संततीचा वरपक्षाला फायदा होणार असतो. तर काही जमातीत केवळ याच कारणासाठी वधुमूल्य दिले जाते व हा हेतू सफल झाला नाही तर म्हणजेच मुले झाली नाहीत तर दिलेले वधुमूल्य परत मागितले जाते. म्हणून उत्तर भारतातील खासी जमातीत वर निम्मा भागच वधुमूल्य लग्नाच्यावेळी देतो व उरलेला निम्मा भाग पत्नीला मुले झाली तरच देतात. मुले झालीच नाहीत तर किंवा मुल होण्याच्या आधीच बायको मृत्यू पावली तर बोंगा जमातीतील वर कायदेशीर हक्क बजावून वधुमूल्याची रक्कम परत घेतात. तर बांटू (Bantu) जमातीत जनावरांच्या स्वरुपात वधुमूल्य दिले जाते. त्यास **लोबोला** (Lobola) असे म्हणतात आणि हे वधुमूल्य दिले तरच पतीचा त्याला होणाऱ्या मुलांवर हक्क होतो. अन्यथा लोबोला न दिल्यास ती मुले केवळ वधुपित्याच्या म्हणजेच वधुपक्षाच्या मालकीची होतात. म्हणून जनावरे द्याल तरच मुले मिळतील, अशा आशयाच्या म्हणी बांटू लोकांत प्रचलित आहेत. म्हणूनच वधुमूल्याला (bridge price) संतती मूल्य (progeny) हा शब्द अलिकडील मानवशास्त्रज्ञ वापरू लागले आहेत.

क्रयविवाहात विविध कारणासाठी वधु विकत घेतात. वधु खरेदीची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतात. वधुच्या पालनपोषणाचा खर्च भागविणे, वधुपित्याची नुकसानभरपाई देणे, वधुला होणाऱ्या संततीचा हक्क मिळविणे, वधु मिळविणाऱ्या संपत्तीवर हक्क मिळविणे, वधू आणि वर पक्षात आर्थिक सहकार्य वाढविणे इ. विविध सामाजिक दृष्टीने क्रयविवाह महत्त्वाचा व प्रतिष्ठेचा जोडीदार निवडीचा मार्ग समजला जातो. रॉबर्ट लोई यांनी क्रयविवाह हा दोन कुटुंबातील प्रेमभाव, आर्थिक सामर्थ्यभाव अशा अनेक दृष्टींनी महत्त्वाचा प्रकार मानला असून सर्वाधिक जमातींनी क्रय विवाहास प्राधान्य दिल्याचे स्पष्ट केले आहे.

## २. सेवा विवाह (Marriage by Service)

आदिवासी समाजात जोडीदार निवडताना वधुमूल्य देण्याची प्रथा सर्वत्र आहे. परंतु मूल्य देऊन वधू मिळविणे सर्वांनाच शक्य होते असे नाही. गरीब कुटुंबातील वरास वधुमूल्याची रक्कम जमा करणे किंवा आवश्यक त्या वस्तू भांडी, जनावरे यांची जमवाजमव करून देणे शक्य नसते. जेव्हा काही जमातीत फारच मोठी रक्कम वधुमूल्य म्हणून द्यावी लागते तेव्हा ही अतिरिक्त (excessive) वधुमूल्याची प्रथा अनेक जमातीतील कुटुंबातील वरास अडचणीची ठरते. तेव्हा अशा लोकांना वधू मिळविणे सुलभ व्हावे म्हणून सेवा विवाहाचा मार्ग प्रचारात आला व रुढ झाला. सेवा विवाहाच्या पद्धतीत वराला वधुच्या घरी सेवा चाकरी करून तिच्या वडिलांच्या संमतीने तिच्याशी विवाह करून स्वतंत्र संसार थाटता येतो. अगर तिच्याच घरी कायमचे राहता येते. सेवा विवाह हा गरीब मुलांसाठी उपलब्ध असला तरी तो एक कष्टदायक असा प्रकार आहे. वधुमूल्य देण्यास असमर्थ असलेला आदिवासी युवक आपल्या भावी सासऱ्याकडे मजूर म्हणून काम करतो आणि त्याच्या मजुरीतून वधुमूल्याची रक्कम वसुल केली जाते. रक्कम पूर्ण होईतोपर्यंत त्या तरुणाला वधुपित्याकडे काम करावे लागते. रक्कम पूर्ण फिटल्यानंतर त्या तरुणाचा विवाह करून दिला जातो. पण काहीवेळा हा सेवा कालावधी निश्चित असत नाही. काही जमातीत ही सेवा एक वर्षापर्यंत अल्पकालीन (Temporary) असते. तर बऱ्याच जमातीत ती ७/८ वर्षाइतकी दीर्घकालीन असते. वधुमूल्याची रक्कम सेवेच्या माध्यमातून पूर्ण होईपर्यंत किंवा वराची सेवा वधुपित्याला पसंत पडेपर्यंत हा विवाह होत नाही. सेवा कालावधीत वर वधु-पित्याच्या घरीच राहात असला तरी त्याचा आणि मुलीचा संबंध येऊ दिला जात नाही. काही जमातीत मात्र असा संबंध आल्यास काही हरकत घेतली जात नाही. सेवा काळात वराला जी कामे सांगितली जातात ती सर्व कामे उत्तम रितीने करून आपली गुणवत्ता, कार्यकुशलता सिद्ध करून दाखववावी लागते. वराचा हा सामन्यता परीक्षेचा काळ समजला जातो. वराला अतिशय अवघड व कष्टाची कामे सांगितली जातात. एवढेच नाही तर त्याला अर्धपोटी राहून अपमानास्पद वागणुक सहन करावी लागते. चुकची (Chukchi) सारख्या जमातीत सेवा करणाऱ्या वराला रेनडियरची शिकार करण्यासारखी अवघड कामे नेहमी करावी लागतात. तसेच अत्यंत कडाक्याच्या थंडीतदेखिल वधुकडील मंडळी राहात असलेल्या तंबुच्या बाहेर झोपावे लागते. अशाप्रकारे वराचे काम आणि त्याचा स्वभाव वधुपित्याला पसंत पडल्यानंतर त्याचा विवाह करून दिला जातो. काही

जमातीत कायमचीच चाकरी करण्याच्या अटीवर लग्न लावून दिले जाते आणि जर वराचा स्वभाव किंवा वराची सेवाचाकरी पसंत पडली नाही तर त्याच्या सेवेचा मोबदला देऊन किंवा अजिबात मोबदला न देता त्याला घरी परत पाठविले जाते. सैबेरियातील चुकची (chukchi), कोयार्क (koryak), युकाधीर (yukaghir) या शिकारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या जमातीत सेवा विवाहाची प्रथा प्रचलित आहे.

अमेरिका, आफ्रिका देशातील अनेक जमातीत हीच प्रथा आहे. इव्हान्स प्रिचार्ड यांनी अभ्यासलेल्या २४१ जमातीपैकी २० जमातीत त्यांना सेवा विवाहाची प्रथा आढळली. भारतात गोंड जमातीत वराला २ ते ५ वर्षे भावी वधुच्या पित्याकडे सेवा करावी लागते. अशा वराला लांबडा किंवा लामेटा असे म्हणतात. बैगा जमातीत अशा वराला लामसेन (lamsena) म्हणतात. गहारिया (gahariya) म्हणतात. मन्नन, पलियन या जमातीत वराला वधुपित्याच्या घरी ६ महिने ते १ वर्ष सेवा करावी लागते. महाराष्ट्रातील वारली जमातीत सेवा विवाहाची प्रथा अगदी रुढ आहे. वारली जमातीतील अशा सेवा काळातील वराला घरोरी किंवा खंदाड्या असे म्हणतात. सेवा काळात त्याला हा घरोरी पसंत पडला तर वधुवर पती-पत्नीच्या नात्याने वागू लागतात व त्यांना घरातच पडवीवजा वेगळी खोली देण्यात येते. आणि या सेवा काळात जरी त्यांना मुले झाली तरी अनैतिक मानले जात नाही. घरोरी काही काळानंतर बायकोला घेऊन वेगळा राहू शकतो किंवा सासऱ्याजवळ देखील कायमचा राहू शकतो. उत्तर भारतातील बिरहोर जमातीत वधुपिता नियोजित वरास वधुमूल्याची रक्कम कर्ज म्हणून देतो आणि ही रक्कम वर सेवा काळात हप्त्याने फेडतो. नेपाळमधील गुरखा लोक जौरसरखासा (jaunsar-khasa) या जमातीच्या शेतीवर भू-मजूर म्हणून काम करतात आणि त्यांचा सेवाकाळ संपताच खासा जमातीतील मुलाशी त्यांचा विवाह होतो. काही जमातीत याच पद्धतीने वधु मिळविण्याची पद्धती सोडून देऊन सेवा करूनच विवाह करावा, ही पद्धतच सुरू केली आहे. सेवा विवाह हा क्रय विवाहासारखा प्रतिष्ठेचा ठरत नाही. खुद्द वराला देखील आपण घरगड्यासारखे राबत आहोत याची जाणीव असते. ज्या वधुपित्याची आर्थिक स्थिती बरी असते ते तर कष्ट नापसंत करून घरी पाठवतात. मात्र सेवा करून वधु मिळविण्याची प्रथा ही देखील अत्यंत प्राचीन आहे. अगदी जुन्या ख्रिश्चन धर्मग्रंथात जेकब या वराने सात वर्षे चाकरी करून राशेल ही वधू मिळविली, असा स्पष्ट उल्लेख आहे. क्रय विवाहाच्या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी अनेक आदिम जमातींनी सेवा विवाहाचा मार्ग स्विकारल्याचे दिसते.

### ३. विनिमय विवाह : साटे-लोटे विवाह (Marriage by Exchange)

आपल्या घरची मुलगी दुसऱ्याच्या घरी देणे आणि त्यांच्या घरची मुलगी आपल्या घरी आणणे अशा देवाण-घेवाणीच्या विवाहाला 'विनिमय विवाह' किंवा 'साटे-लोटे विवाह' असे म्हणतात. अशा प्रकारच्या विवाहामुळे दोन्ही घरच्या वरांना वधुमूल्य द्यावे लागण्याचा प्रश्न आपोआपच सुटतो किंवा सेवा करण्याचे देखील कारण उरत नाही. त्यामुळे वधु आणि वर या दोन्ही पक्षांचे काहीच नुकसान होत नाही म्हणून वधु मिळविण्याचा हा अतिशय साधा सोपा मार्ग समजला जातो. अनेकदा वधुमूल्य देणे शक्य

नसल्यामुळे व्यक्तीला विवाह करणे कठीण असते. म्हणून सेवा विवाहाबरोबरच विनिमय विवाह किंवा साटेलोटे विवाह अस्तित्वात आला. या विवाह प्रकारात एका कुटुंबातील बहिण भाऊ दुसऱ्या कुटुंबातील भाऊ बहिणीशी विवाह करतात. त्यामुळे या विवाह प्रकारात कुणी कुणालाच वधुमूल्य देत नाहीत. आपल्या मुलीच्या बदल्यात त्या कुटुंबातील मुलगी सून म्हणून आणली जाते. म्हणून बोअस म्हणतात की, दोन्ही कुटुंबे एकमेकास काहीही न देता वधुमूल्य देतात. तर लोवी म्हणतात हा कोणत्याही प्रकारचे नुकसान नसलेला विवाह प्रकार आहे. अमेरिकेतील शोशोन इंडियन्स (ShoshoneIndians) जमातीत या विवाहाचे स्वागत केले जाते. अरब लोकांत तर अशी म्हण प्रचलित आहे की, 'तुझी बहिण मला दे व माझी बहिण तुला घे!' यामुळे प्रत्येक कुटुंबातील मुलाच्या बायकोचा भाऊ हा त्याच्या बहिणीचा नवराही होत असतो. म्हणजेच एकाच व्यक्तीशी बायकोच्या भावाचे व बहिणीच्या नवऱ्याचे नाते प्रस्थापित होते. यामुळेच मराठी भाषेत बायकोचा भाऊ व बहिणीचा नवरा यांना 'मेहुणा' हा एकच शब्द वापरला जातो. यावरून महाराष्ट्रात हा विवाहप्रकार मोठ्या प्रमाणात प्रचलित असल्याचे दिसते. भारताच्या विविध भागातील आदिम जमातीतून वधु मिळविण्याची ही प्रथा अजूनही प्रचलित आहे. केरळमधील इरुलार कुरिचियन, उल्लतन (Ullotans), विश्वान (Vishwans), उरली (Uralis), मलपंदरम, कुरियन इ. काही आदिम जमातीत ही पद्धत अतिशय लोकप्रिय आहे. काही जमातीत अशी बाहेर देण्यासारखी मुलगी वराच्या कुटुंबात नसेल तर अविवाहित राहण्याची वेळ येते किंवा कुटुंबातील कितीही लहान वयाची मुलगीदेखील बाहेर देण्याचा प्रघात यामुळेच आला आहे. विनिमय विवाह हा वधु मिळविण्याचा अतिशय साधा व सोपा मार्ग असला तरी मुख्य अडचण असते ती म्हणजे यासाठी दोन्ही कुटुंबात विवाहयोग्य मुलगा आणि मुलगी असणे आवश्यक असते आणि अशी दोन्ही कुटुंबे एकत्र येऊन त्यांच्यात विनिमय व्हावा लागतो. या गोष्टी नेहमी जुळून येणे अगदी कठीण असते. या गोष्टीसाठी बऱ्याचदा तीन चार वर्ष वयाच्या लहान मुलींचेही मग विवाह होतात. अमेरिकेतील शोशोन जमातीत मात्र वधुप्राप्तीच्या या मार्गाला अगदीच विशेष प्राधान्य दिले जाते. तर 'उरली' जमातीत वराला अनेक बहिणी असतील तर अनेक घरात आपली एक-एक बहिण देणे याप्रमाणे अनेक घरातील एक-एक मुलगी करून घेणे अशा प्रकारे अनेक मुलीशी विवाह करता येतो आणि अजूनही 'उरली' जमातीत हा विनिमय विवाह फारच प्रचलित आहे.

### ब) रुढ संप्रदायानुरुप नसलेल्या पद्धती : रुढ संप्रदायाविरुद्ध पद्धती (Unorthodox Means)

रुढ संप्रदायानुसार वधुपित्याला वधुमूल्य देणे आवश्यक असते परंतु जेव्हा रुढीनुसार वधुमूल्य न देता वेगळ्या पद्धतीने विवाह केला जातो. तेव्हा अशा पद्धतीस रुढ संप्रदायानुसार नसलेल्या पद्धती किंवा रुढ संप्रदायाविरुद्ध पद्धती असे म्हणतात. अशा पद्धतीच्या विवाहाचे आदिवासी समाज स्वागत करीत नाही. पण या पद्धतींना विरोधही केला जातो असेही नाही. याचा निषेध किंवा दंड इ. न करता समाज त्या विवाहास स्विकृती देतो. पण या विवाहांना समाज फारसे प्रशस्तही मानत नाहीत. या रुढ

संप्रदायानुरुप नसलेल्या अथवा रुढ संप्रदायाविरुद्धच्या जोडीदार निवडीचे मुख्यतः खालील मार्ग अथवा विवाहप्रकार आहेत.

१) अपहरण विवाह (Marriage by Capture)

२) परीक्षण विवाह (Marriage by Trial)

३) सहपलायन विवाह (Marriage by Elopement)

४) हठागमन विवाह/अनादर विवाह (Marriage by Mitual Intrusion)

५) पारस्पारिक संमती विवाह (Marriage by Mitual Consent)

उपरोक्त रुढ संप्रदायानुरुप नसलेल्या जोडीदार निवडीच्या पद्धतींचा सविस्तर अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

## १. अपहरण विवाह (Marriage by Capture)

वराला एखादी मुलगी पसंत असल्यास वर वधुला तिच्या मनाविरुद्ध जबरदस्तीने पळवून नेऊन तिच्याशी विवाह करतो. वधुपक्षाकडील लोकांच्या विरोधाचा विचार न करता जबरदस्तीने वधुचे अपहरण करण्यात येते त्यामुळे वधुपित्यास कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळत नाही. वधुचे जबरदस्तीने अपहरण करून तिच्याशी विवाह करण्याची ही प्रथा प्राचीन काळापासून प्रचलित आहे. मॅकलेनन (Maclannen) या मानवशास्त्रज्ञाच्या मते, अपहरण ही सर्वात प्राचीन पद्धत आहे. विवाह संस्थेच्या विकासातील वधु मिळविण्याची ही सर्वात पहिली अवस्था आहे. महाभारतातील सुभद्राहरण किंवा रुक्मिणीहरण हे अपहरण विवाहाचे उदाहरण आहे. प्राचीन समाजातून ही प्रथा प्रचारात येण्यास काही विशिष्ट गोष्टी कारणीभूत झाल्या असल्या पाहिजेत. परक्या लोकांना लुबाडून आपला उदरनिर्वाह करण्याची सवय जडलेल्या जमातींना दुसऱ्या जमातीतील मुलींचे अपहरण करण्यात काही गैर आहे असे वाटत नाही. त्यामुळे अशा जमाती परक्या मुलींचे अपहरण नेहमी करीत असतात. तसेच स्त्री बालहत्या (Female inflanticide) करण्याचा प्रघात पडलेल्या जमातींना मुलींची कमतरता भासत असल्याने अन्य जमातीतून सक्तीने उपवर मुली मिळविण्याखेरीज गत्यंतर असत नाही. भारताच्या इशान्य प्रदेशातील नागा लोकांध्ये अशी परिस्थिती आढळून येते. शिवाय अतिरिक्त वधुमूल्य (Excessive bride price) देण्याची प्रथा असलेल्या जमातीतील सर्वच पुरुषांना असे मूल्य देऊन वधु मिळविणे परवडत नाही. म्हणून वधुमूल्य देण्याचे चुकविण्यासाठी काही वरांना अपहरणाचा मार्ग पत्करावा लागतो. मध्य भारतातील हो जमातीतील अपहरण विवाह प्रथेस देखील अवास्तव वधुमूल्य हेच कारण ठरले आहे. याशिवाय तरुणांच्यात साहस प्रवृत्ती असते. साहस प्रवृत्तीला प्रकटीकरणासाठी भरपूर वाव असल्याने हा अपहरण विवाह प्रकार लोकप्रिय होतो. अपहरण विवाह शौर्याचे निदर्शक ठरतो. भारतातील विविध राज्यात हा विवाहप्रकार आढळून येतो. नागा, बोंदो, गोंड, हो, बिरहोर, मुंडा, भुमिज, खरिया, भिल्ल, मुथूवन, वारली, कोलाम

इ. अनेक जमातीत अपहरण विवाहप्रकार चालतो. आफ्रिकेतील बहिमा (Bahima) आणि बुशमन (Bushman) या जमातीत अपहरण विवाह हा नेहमीचाच प्रकार आहे. प्रिती भोजनाच्यावेळी वर वधुचा हात पकडतो. वधुपक्षाकडील लोक वराला घेरून मारतात. या हाणामारीत त्याने वधुचा हात न सोडल्यास त्याचा विवाह होतो. भारतातील आदिम जमातीत ही प्रथा प्रत्यक्ष अपहरण (Physical Capture) व औपचारिक अपहरण (Ceremoninal Capture) अशा दोन्ही अपहरणाच्या पद्धती आढळतात. प्रत्यक्ष अपहरणात वर हा वधुला खरोखरच जबरदस्तीने पळवून नेतो तर औपचारिक अपहरणात मात्र अपहरणाचे नाटक केले जाते. गोंड, खरिया, संथाल, कोलाम, वारली इ. जमातीत औपचारिक अपहरण केले जाते किंवा एखाद्या सार्वजनिक ठिकाणी अगर समारंभप्रसंगी प्रियकराने आपल्या प्रेयसीच्या मस्तकावर चारचौघांसमक्ष मोठ्या धिटाईने सिंदूर टाकण्यात किंवा कुंकूम तिलक लावण्यात यश मिळविले म्हणजे त्याने तिचे अपहरण केले असेच समजले जाते व नंतर रितसर वाटाघाटी होऊन दोघांचे लग्न लावले जाते. बहुतेकवेळा तो प्रियकर कुंकुमतिलक लावून जवळपासच्या गावी निघून गेला असेल तर वडील मंडळींनी बोलणी करून लग्न ठरविल्याखेरीज तो आपल्या घरी परत येत नाही आणि कुंकुमतिलक लावल्यामुळे हे लग्न जुळविलेच पाहिजे असे त्यांच्यावर बंधन येते. बिहारमधील संथाल जमातीत अशा तऱ्हेच्या अभिनयात्मक अपहरणाला 'इतुत बापला' असे म्हणतात. गोंड जमातीत त्यास 'पोसी ओथुर' म्हणतात. तर बोंदो जमातीत 'गुबाई गोंदो रंगोन' असे म्हणतात. मुथूवन, कोरग, इरुलार, मल-पदरम्, मलवेदन, कट्टू नायकन, उरळी, कुरूमन, मलक्करन इ. आदिम जमातीत अद्यापही औपचारिक अपहरण विवाह प्रकार सुरूच आहे. मित्रमंडळींच्या सहकार्याने अपहरण केलेल्या युवतीसह त्या तरुणाला त्यांचे नातलग जंगलातून शोधून काढतात आणि मग दोघांचे रितीरिवाजानुसार लग्न लावले जाते. बऱ्याचदा वधुने सासरी जाताना नाखुषी दाखविणे, जोरजोरात रडणे या गोष्टीविरुद्ध अपहरण करून वधू मिळविणे बरे असाही यापाठीमागे सिद्धांत सांगितला जातो. विदर्भातील कोलम जमातीतील तरुण जंगलातील जळण गोळा करावयास गेलेल्या स्त्रियांची लपून वाट बघतात. त्यातील इच्छुक तरुणीवर झडप घालून पळवून नेण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा त्या सर्व स्त्रिया लाथा, बुक्क्या, नखांनी ओरबाडणे इ. प्रतिकार करतात. यात तरुण हारला तर विवाह होत नाही. उलट त्यास दंड भरावा लागतो किंवा पसंत तरुणीचा हात धरून गावच्या सरहद्दीपर्यंत यावे लागते. यावेळीही स्त्रिया त्या तरुणाला बेदम मारहाण करतात. तो तरुण घाबरला हात सोडला, पळाला तर सोयरिक तुटली असे मानले जाते. अलिकडे या प्रथा संपत चालल्या असल्या तरी या प्रथा विधी म्हणून पाळल्या जातात. सामान्यतः 'दुय्यम बायको' मिळविण्यासाठी अपहरणाच्या मार्गाचा अधूनमधून अवलंब केला जातो. अतिरिक्त वधुमूल्य टाळणे, शौर्य, पराक्रमाचे प्रकटीकरण करणे, वधुंची संख्या अल्प असणे इ. कारणास्तव हा अपहरण विवाह प्रकार प्रचलित झाला.

### २. परीक्षण विवाह (Marriage by Trial)

कित्येक आदिम जमातीत निर्धारित कसोटीस उतरलेल्या वरालाच जमातीतील एखाद्या मुलीशी अगर त्याला आवडणाऱ्या विशिष्ट मुलीशी विवाह करण्याची जमातीकडून परवानगी मिळते. अशा रितीने

ठराविक कसोटीत अथवा परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर होणाऱ्या विवाहाला परीक्षण विवाह असे म्हणतात. या विवाहाच्या प्रकारात वराच्या अंगच्या धैर्य, शौर्य, शक्ती, चिकाटी इ. गुणांची कसून परीक्षा घेतली जाते आणि त्यात यशस्वी झाल्याशिवाय वराला कोणतीही वधू मिळु शकत नाही.

आदिवासी जीवन अतिशय खडतर असते. अनेक संकटांशी मुकाबला करावा लागतो. परिस्थितीशी झगडावे लागते. आणि म्हणूनच आदिवासी तरुणाला संसारात पडताना अनेक परीक्षेचे कसोटीचे बंधन लादणे आवश्यक समजतात. कष्टमय जीवनाचे उपयुक्त गुण त्या वराजवळ आहेत काय हे तपासूनच पाहिले जाते. योग्य व लायक व्यक्तीलाच विवाहाचा मान, प्रतिष्ठाप्राप्ती प्राप्त व्हावी, अशी दक्षता या विवाहप्रकरात घेतली जाते. महाराष्ट्रातील कोळी जमातीत खवळलेल्या सागरात तरुणाने आपली नाव सोडून मोठ्यातला मोठा मासा त्याने मारून आणायचा असतो. आफ्रिकेतील बुशमन (Bushman) जमातीच्या वराला अवघड शिकार, विशेषतः गेंड्याची शिकार करावी लागते. गाला (Galla) जमातीच्या तरुणाला शत्रुचे मुंडके (शीर) आणुन तरुणीपुढे ठेवावे लागते. इजिप्तमधील अरब युवकाला वधुच्या नातलगांनी दिलेला चाबकाचा मार हसतमुखाने खावा लागतो. दक्षिण भारतातील आदिवासीत मोठ्या आवाजाची भिती दाखवून भयंकर बैलाला उधळून लावतात. त्याच्या शिंगांना गुंडाळलेले कापड अंगाला कसलीही इजा न होऊ देता प्रियकराने प्रथम सोडवून आणले पाहिजे. असा नियम आहे. यात प्रियकराला यश लाभले म्हणजे त्याला आपल्या प्रेयसीला घेऊन जंगलात जावे लागते. तेथे जाळ लावून दोघे शेकत व गप्पा मारत असताना प्रेयसीने जळक्या लाकडाचे शरीराला चटके दिले तरी प्रियकराने हु की चू करता कामा नये, अशी अपेक्षा असते. या दुसऱ्या दिव्य प्रसंगातून पार पडल्याबरोबर दोघांचे लग्न लावले जाते. कोलाम जम ातीतील तरुणाला पसंत तरुणीचा बळजबरीने हात धरून भरवस्तीतून गावच्या वेशीपर्यंत न्यावे लागते. अशा प्रसंगी मार, शिव्या, खाव्या लागतात. यात यश आले तरच विवाह होतो. परिक्षण विवाहाचा 'गोल गधेडो' नावाचा एक नमुनेदार प्रकार गुजरातमधील भिल्ल जमातीत आजही आढळून येतो. भिल्ल जमातीत होळीच्या सणाचे विशेष महत्त्व असते. यावेळी 'गोल गधेडो' नावाच्या नृत्य गाण्यांचे आयोजन केले जाते. हे नृत्य झाडाच्या किंवा बांबूच्या भोवती करतात. या लोकनृत्यात भाग घेणाऱ्या विवाहित व अविवाहित स्त्री पुरुषांची विशिष्ट प्रकारे रचना केली जाते. झाडाभोवतालचा पहिला फेर हा स्त्रियांचा असतो आणि त्यांच्यामागे पुरुषांचा दुसरा फेर असतो. यावेळी स्त्रीया फेर धरून नाचत असतात. पुरुषही त्यात सहभागी होतात. हे लोकनृत्य संपल्यानंतर विवाहास उत्सुक असणाऱ्या तरुणांनी झाडाभोवतीच्या तरुणींचे कडे मोडून चपळाईने पुढे जाणे. झाडावर चढून झाडाच्या शेंड्याला बांधलेले गुळ, खोबरे आणि नारळ काढून घ्यावे लागते. पण जेव्हा तरुण झाडावर चढण्याचा प्रयत्न करत असतो. तेव्हा सर्व स्त्रीया त्या तरुणावर हल्ला करतात. लाथा, बुक्क्या मारतात. केस ओढणे, कपडे फाडणे, दगड मारणे, झाडूने मारणे, नखांनी ओरबडणे, इतकेच नव्हे तर चावणे इ. प्रकारे त्या तरुणाला झाडावर चढण्यापासून रोखले जाते. प्रचंड मार खाऊनदेखील तो तरुण झाडावर चढतो आणि झाडाच्या शेंड्यावर बांधलेले गुळखोबरे हस्तगत करतो. असा तरुण शुरवीर समजला जातो आणि त्या समारंभात उपस्थित

असलेल्या नाच, गात झाडाभोवती फिरणाऱ्या कोणत्याही अविवाहित मुलीशी विवाह करण्याचा अधिकार त्याला मिळतो व अशा तरुणाशी विवाह करणे मुलीलाही प्रतिष्ठेचे वाटते. हा विवाह समाजमान्य व मोठा श्रेष्ठ मानला जातो.

### ३. सहपलायन विवाह (Marriage by Elopement)

आपल्या जीवनाचा जोडीदार निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य कोणत्याही जमातीत दिलेले आढळत नाही. ज्या त्या जमातीतील प्रचलित रितीरिवाजानुसार वराला विशिष्ट समूहातील व्यक्तींची वधू म्हणून निवड करावी लागते. तसेच ही निवड करताना कुटुंबातील लोकांची मते विचारात घ्यावी लागतात. या सर्व बंधनांच्यामुळे साहजिकच वराला आपल्या इच्छेनुसार पाहिजे त्या मुलीशी विवाह करता येत नाही. तर मुलीची देखील अशीच अडचण होते. तिला हव्या त्या मुलाशी विवाह करता येत नाही. आई-वडील आपण ठरविलेल्या मुला-मुलीशी विवाह करावा, याबाबत ठाम असतात. अशावेळी ज्या तरुण-तरुणींचे एकमेकांशी प्रेम आहे, त्यांचा सहजासहजी आपला विवाह होणार नाही, यावर विचार होतो. त्यांच्या प्रेमाच्या आविष्काराला व आवडीनिवडीला वाव मिळत नाही. म्हणून प्रेमात पडलेल्या तरुण तरुणींना पळून जाण्याशिवाय पर्याय नसतो. आपल्या कुटूंबातील लोकांचा अथवा नातेवाईकांचा विचार न करता दूर पळून जाऊन विवाह करण्याचा मार्ग ते निवडतात. अशा प्रकारच्या विवाहाला सहपलायन विवाह असे म्हणतात. वधु-वरांनी संगनमताने पळून जाऊन कुटूंबियांच्या मनाविरुद्ध केलेल्या विवाहाला सहपलायन विवाह असे म्हणतात. सुरुवातीला मुला-मुलींचे आईवडील आणि नातेवाईक विरोध करतात. अनेकदा त्या दोघांच्या कुटुंबात भांडणे होतात. पण हा विरोध कायम टिकतो, असे नाही. काही दिवसानंतर पळून जाऊन विवाह केलेले पती-पत्नी आपल्या कुटुंबियांकडे येतात. तोपर्यंत त्यांचा राग कमी झालेला असतो. जरी थोडाफार राग असला तरी समजून घेतले जाते. दोघांच्या विवाहाला घरात एकत्र राहण्याला मान्यता दिली जाते किंवा त्या दोघा पती-पत्नींना वेगळे राहण्याची सोय करून दिली जाते. प्रत्येकच जमातीत सहपलायन विवाह प्रकारची उदाहरणे थोड्याफार प्रमाणात नेहमी घडत असतात. भारताच्या आदिम जमातीतदेखील अशी अनेक उदाहरणे आढळून येतात. छोटा नागपुरमधील 'हो' जमातीत अशा प्रकारच्या विवाहाला 'राजीखुशी विवाह' असे म्हणतात. आपल्या लग्नाला कुटुंबियांचा कडवा विरोध होत आहे, असे दिसताच प्रियकर व त्याची प्रेयसी मिळून आपले गाव सोडून दुसऱ्या गावी पती-पत्नी सारखे राहतात आणि आपल्या या विवाहाला कुटुंबियांची मान्यता मिळेपर्यंत आपल्या गावी परत येत नाहीत. ऑस्ट्रेलियातील कुरनह (Kurnah) जमातीत पळून जाणाऱ्या वधुवरांना बेदम मारतात. परंतु गावकऱ्यांना चुकवून हे वधुवर गावाबाहेर गेले आणि एक मूल झाल्यानंतर परत ते गावी आले तर त्यांचा विवाह मान्य केला जातो. चेयन्ने (Cheyenne) जमातीत बहिणीचा विवाह ठरविण्याचा अधिकार भावाचा असतो. भावाने तिचा विवाह कोणाशीच ठरविला नसेल आणि स्वतः पसंत केलेल्या मुलाबरोबर ती जर पळून गेली तर त्यांच्या विवाहास मान्यता मिळते. परंतु भावाने तिचाच विवाह निश्चित केल्यानंतर जर ती आपल्या प्रियकरासोबत पळून गेली तर अत्यंत वाईट परिस्थिती उद्‌भवू शकते. तसेच जेव्हा

एकाच कुलाच्या तरुणतरुणीचे प्रेम जमले असेल तर कुलनियमानुसार त्यांना विवाह करता येत नाही. अशावेळी ते दोघेही पळून जातात. अशाप्रकारचा विवाह पद्धतीत कोणत्याही प्रकारचा विवाह विधी केला जात नाही. अगर वधुमूल्याची देवघेव होत नाही. सामान्यता अशा सहपलायनाने विवाहित वधु-वरास त्यांच्या गावच्या समाजात जमातीत परत सामावून घेतले जाते. अशा प्रकारची सहपलायन विवाहाची उदाहरणे आता आपल्या आजच्या सुशिक्षीत समाजात देखील फारच मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत.

## ४. हठागमन विवाह (Marriage by Mitual Intrusion)

अपहरण विवाहाच्या अगदी विरुद्ध प्रकार म्हणजे हठागमन विवाह होय. अपहरण विवाहात पुरुष पुढाकार घेतो तर हठागमन विवाहात स्त्री पुढाकार घेते व आपल्याला हवा असलेला पती हट्टाने मिळविते. म्हणजे एखाद्या मुलीला आवडलेला तरुण तिच्याशी रितसर विवाह करण्यास अगर तिच्याबरोबर पलायन करण्यास तयार नसला तर ती प्रेयसी स्वतः पुढाकार घेऊन आगंतुकपणे प्रियकराच्या घरी जाते आणि त्याच्याशी लग्न करण्याचा हट्ट धरून बसते आणि घरातील इतर माणसांप्रमाणे रहावयास सुरुवात करते. तिच्या प्रियकराच्या आई-वडिलांनी तिची समजूत घातली, तिला मारहाण केली किंवा बळजबरीने घराबाहेर हाकलण्याचा प्रयत्न केला तरी सर्व अपमान व अत्याचार सहन करून ती आपला हट्ट सोडत नाही. उपासमार सहन करते. घरातील सर्व कामे, जनावरासारखी कामे करते. नाईलाज म्हणून तिच्या प्रियकराच्या घरची मंडळी तिचा सुन म्हणून स्वीकार करतात. अशा प्रकारे प्रेयसीने प्रियकराच्या घरी येऊन हट्ट धरल्याने संती मिळालेल्या विवाहाला हठागमन विवाह असे म्हणतात. हठागमनासाठी हटून बसलेल्या तरुणीला प्रथम प्रेमाने समजावून सांगतात. परंतु तरीही ती आपला हट्ट सोडत नाही. म्हणून तिला एकदम फारच अपमानास्पद वागणुक दिली जाते. तिचा छळ केला जातो. तरीही ती तरुणी आपल्या निश्चयावर ठाम राहते आणि तिथेच राहते. शेवटी त्या तरुणास तिच्याशी विवाह करण्याशिवाय पर्याय नसतो. हठागमन विवाह हा अपहरण विवाहाच्या विरुद्ध आहे. कारण अपहरण विवाहामध्ये तरुण पुढाकार घेतो आणि आपल्याला पसंत असलेल्या तरुणीशी तिच्या मनाविरुद्ध विवाह करतो. तर हठागमन विवाहात तरुणी पुढाकार घेते आणि त्या तरुणाची किंवा त्या सासरच्या घराची मंडळी यांची इच्छा नसताना देखील त्याला विवाह करण्यास भाग पाडते. उत्तर भारतातील कमार, हो, बिरहोर, उराँव, मुंडा, संथाल या जमातीत हठागमन विवाहाची पद्धत आहे. ठाणे जिल्ह्यातील वारली आणि विदर्भातील कोरकू जमातीत ही पद्धत आहे. महाराष्ट्रात मराठी भाषेत अशा तरुणीला 'घरघुशी' असे म्हणतात. महाराष्ट्रात यावरूनच या विवाहाला घरघुशी विवाह असे म्हणतात. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील वारली, यवतमाळमधील कोलाम आणि वऱ्हाडातील कोरकू जमातीत घरघुशी विवाहाची पद्धत अजूनही आहे. कमार जमातीत अशा विवाहाला पैठू विवाह असे म्हणतात. 'हो' आणि बिरहोर जमातीत अशा विवाहाला **'अनादर विवाह'** असे म्हणतात. संथाल जमातीत या प्रथेला 'निरबोलोक बापला' असे म्हणतात. अपहरण विवाहाच्या 'इतुत बापला' या प्रथेच्या अगदी विरुद्ध अशी ही प्रथा आहे. या

प्रथेनुसार आपल्याला आवडलेल्या तरुणाशी रितसर लग्न होण्याची आशा नसलेली पण त्याच्याशीच लग्न व्हावे अशी तीव्र इच्छा बाळगणारी मुलगी तांदळापासून तयार केलेल्या 'पाचावी' नावाच्या दारुचे भांडे हातत घेऊन प्रियकराच्या घरात प्रवेश करते व तेथेच सुन म्हणून राहण्याचा हट्ट धरून बसते. तिला घरातून हाकलून काढण्यासाठी मारहाण केली जात नाही. तर घरात विस्तवावर लाल मिरच्या टाकून मोठा खाट तयार केला जातो. पण मिरचीच्या धुराचे दिव्य सहन करून मुलगी तिथेच राहिली म्हणजे त्या घरात सून म्हणून राहण्याचा तिचा अधिकार प्राप्त होतो. कुटुंबातील लोकांनी तिला हाकलण्याचे विविध प्रयत्न करून, अपमान, छळ करूनदेखिल ती घर सोडून जात नाही. हट्ट व दृढ आग्रहाने ती आपल्या निश्चयावर ठाम राहते. या दृढ आग्रहाखातर शेवटी झालेल्या विवाहास 'दृढागमन विवाह' असेही म्हणतात.

### ५. पारस्परिक संमती विवाह (Marriage by Mitual Consent)

आदिवासी समाजात बालवयात विवाह होत नाहीत. प्रौढ वयात विवाह करण्याचीच प्रथा सर्वत्र आहे आणि आदिवासीत तरुण-तरुणींना एकमेकांत मिसळण्याची मोकळीक असते. युवागृहासारख्या वेगळ्या संस्था आदिवासीत आहेत. युवागृहातून आदिवासी तरुण-तरुणी एकत्र येतात. नाचगाणी, करमणुक कार्यक्रम, परस्पर थट्टा मस्करी इ. सर्व घडते. सर्वच तरुण-तरुणी वयस्क असतात. त्यामुळे प्रेम अविष्काराला मोकळीक असते. समाजमान्यता असते. साहजिकच तरुण-तरुणींच्या विवाहाबाबत परस्पर संमतीचे प्रकार सुरू होतात. आपल्या जीवनाचा जोडीदार शोधण्याची मोकळीक युवागृहात दिलेली असते. याचसाठी युवागृहे कार्यरत असतात. अशा वेळी तरुण-तरुणींच्यात प्रेसंबंध जुळून येतात. परस्पर संमतीने विवाहाचा दोघे निर्णय घेऊ शकतात. सुरुवातीला समाजात थट्टा होते. निंदानालस्ती केली जाते. तसेच या विवाहाला सन्मानाचे स्थान फारसे नसते. हा प्रतिष्ठेचा विवाहदेखील मानला जात नाही. कारण यात वधुमूल्य दिले जात नसते. पण तरुण-तरुणींची एकमेकांना परस्पर संमती असल्याने विवाह टाळता देखील येत नाही. गोंड सारख्या जमातीत तर वधु मिळविण्याचे अनेक प्रकार असले तरी परस्पर संमती विवाहाचा प्रकाराच विशेष प्रचलित आहे. आपल्या पसंतीच्या प्रियकराच्या अंगावर प्रेयसीने चारचौघांसमक्ष हळदीचे पाणी टाकले म्हणजे त्यांचा विवाह झाला असे मानले जाते आणि ते दोघे पती-पत्नी म्हणून एकत्र राहतात.

## ३.३.३ अधिमान्य विवाहाचे प्रकार (Types of Preferential Marriage)

विवाहाचा जोडीदार निवडताना वधु-वर यांना अनेक निर्बंध घातले जातात. कोणत्या समुहातील जोडीदार निवडता येईल. कोणत्या नाही याविषयी अंतर्विवाहाचे नियम, बहिर्विवाहाचे नियम काटेकोरपणे पाळावे लागतात. अशा नियमानुसार होणाऱ्या विवाहाला निर्धारित विवाह (Prescribed Marriage) असे म्हणतात. अशा निर्धारित विवाहात सक्तीचा अंश जास्ती असतो. परंतु या उलट व्यक्तीने आपल्या नात्यातील विशिष्ट व्यक्तींशी लग्न करण्यास विशेष अधिकार दिलेले असतात. अशा विशिष्ट नात्यातील,

समुहातील व्यक्तीमध्ये होणाऱ्या विवाहांना समाजाची मान्यता असते. यात सक्ती किंवा बंधन नसते. पण पसंतीचा अंश जास्ती असतो. अशा पसंतीला प्राधान्य देणाऱ्या नियमानुसार किंवा प्रथानुसार होणाऱ्या विवाहांना अधिमान्य विवाह (Preferential Marriage) असे म्हणतात. यामध्ये विशिष्ट नात्यातील व्यक्तीशी एकमेकांचे विवाह व्हावेत, याबाबत समाजाचा आग्रह असतो. सक्ती नव्हे पण समाजाची त्यासाठी अधिक पसंती असते. म्हणून या विवाहांना अधिमान्य विवाह प्रकार असे म्हणतात. ते अधिमान्य विवाहाचे मुख्य चार प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१) आते-मामे भावंडांचा विवाह (Cross Cousin Marriage)

२) चुलत अगर मावस भावंडांचा विवाह (Parallel Cousin Marriage)

३) दीर-भावजय विवाह (Levirate)

४) मेहुणा-मेहुणी विवाह (Sororate)

वरील अधिमान्य विवाह प्रकारांची सविस्तर अशी माहिती आपणास पुढीलप्रमाणे घेता येईल.

## १. आते-मामे भावंडांचा विवाह (Cross Cousin Marriage)

अधिमान्य विवाहाचा हा प्रकार विशेष महत्त्वाचा आहे कारण आदिवासी समाजात बहिण आणि भाऊ यांची मुले परस्परांची आते-मामे भावंडे म्हणून ओळखली जातात आणि आदिवासी समाजात भावा-बहिणीच्या मुला-मुलींनी एकमेकांशी विवाह करणे हा त्यांचा अधिकार समजला जातो. आपल्या समाजात देखील आते मामे भावंडांचा विवाह आढळून येतो. म्हणून आते-मामे बहिण भावांत थट्टा करण्याची प्रथा दिसून येते. आतेभाऊ आणि मामे बहिण आणि मामेभाऊ व आतेबहिण या भावंडांनी विवाह करण्यास समाजात अधिक पसंती दिली जाते. प्रगत समाजात देखील असे विवाह घडून येतात. म्हणून अशा भावंडाकडे लहानपणापासूनच हक्काची नवरा बायको या नात्याने पाहिले जाते. या पद्धतीनुसार आते मामे भावंडांच्या विवाहाचे

(अ) समपक्ष आते मामे भावंडांचा विवाह (Symmetrical Cross Cousin Marriage) आणि (ब) असमपक्ष आते मामे भावंडांचा विवाह (Asymmetrical Cross Cousin Marriage) असे दोन प्रकार पडतात.

### अ) समपक्ष आते मामे भावंडांचा विवाह (Symmetrical Cross Cousin Marriage)

म्हणजे यात आत्या आणि मामा या दोन्ही पक्षांना समान लेखले जाते. त्यामुळे या भावंडांची विवाहासाठी दुहेरी देवाण-घेवाण होऊ शकते. या विवाहात कोणाशी विवाह करावयाचा व कोणाशी नाही, असे बंधन नसते. मामाचा मुलगा, मुलगी दोघेही अनुक्रमे आतेची मुलगी मुलगा विवाहासाठी निवडू शकतात.

## ब) असमपक्ष आते मामे भावंडांचा विवाह (Asymmetrical Cross Cousin Marriage)

यात आत्या व मामा हे दोन्ही पक्ष समान लेखले जात नाहीत. यापैकी एक पक्ष आपणास दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ समजतो. त्यामुळे मुलगा, मुलगी विवाहासाठी देण्यावर काही बंधने घातली जातात. यानुसार मुलगा फक्त आपल्या मामे बहिणीशी व मुलगी फक्त आपल्या आतेभावाशी विवाह करु शकते किंवा याउलट मुलगा फक्त आतेबहिणीशीच व मुलगी फक्त मामेभावाशीच विवाह करु शकते.

सर्वसाधारणतः जो पक्ष स्वतःला श्रेष्ठ समजतो तो कनिष्ठ पक्षातील मुलीशी आपल्या मुलाचा विवाह घडवून आणतो. मात्र कनिष्ठ पक्षाकडे आपली मुलगी देत नाही. यात मामे बहिण व आतेभाऊ यांच्यातील विवाहच अधिक प्रचलित आहे. महाराष्ट्रात मामाच्या मुलीशी लग्न करण्याचा प्रघात जवळजवळ सर्वत्र दिसून येतो. आईचा भाऊ व सासरा यांना 'मामा' हा एकच शब्द वापरतात. तर मुली आपल्या वडिलांच्या बहिणीस आणि नवऱ्याच्या आईस 'आती' असेच म्हणतात. ते या आते-मामे भावंडांच्या विवाह प्रकारामुळेच प्रचलित आहे.

या विवाह प्रकारास इतकी अधिमान्यता आहे की, अशा तऱ्हेच्या विवाहात येणारी महत्त्वाची अडचण सुद्धा दूर केली आहे.

मामे भावंडांचा विवाह करावयाचा असेल तर मुलाला मामा असायला पाहिजे आणि त्या मामाला मुलगी असायला पाहिजे. पण अशी परिस्थिती नसेल तर विवाहात अडचण येते. म्हणून या नियमांचे पालन होण्यासाठी 'प्रतिस्थापनेचे तत्त्व' (Rule of Substitution) अंलात आणले आहे. या तत्त्वानुसार मुलाला सख्खा मामा नसल्यास चुलत मामाला सख्ख्या मामासारखे समजले जाते व त्या चुलत मामाच्या मुलीशी विवाह करण्यास पसंती दिली जाते. चुलत मामाही नसल्यास आई ज्याला भाऊ मानते त्याची मामा म्हणून प्रतिस्थापना होते. आणि मामाला जर मुलगी नसेल तर मामाच्या चुलत भावाची अगर मामाच्या मावस भावाची अगर मामा ज्या मुलीला आपली मुलगी मानतो त्या मुलीची मामाची मुलगी म्हणूनच विवाहासाठी पसंतीक्रमाने निवड केली जाते.

आते मामे भावंडांचा विवाह प्रचलित होण्याची किंवा लोकप्रिय होण्याची कारणे पाहताना तीन चार महत्त्वाचे मुद्दे पुढे येतात ते म्हणजे.

- **वधुमूल्याची बचत कारणे** : आदिवासीत वधुमूल्य देणे अनिवार्य असते. पण जवळच्या नात्यातील या विवाहात अतिरिक्त वधुमूल्य (Excessive bride price) मागितले जात नाही. कुवतीचा विचार केला जातो. तसेच पूर्वी आत्यांच्यासाठी तिच्या विवाहात किती वधुमूल्य घेतले होते तितकेच वधुमूल्य आत्याची मुलगी करताना वधुपक्षाला देण्याचे निश्चित होते. यालाच गोंड जमातीत 'दुधलौटवा' म्हणजे दुध परत करण्याची प्रथा म्हणतात.

- **मालमत्तेचे संरक्षण करणे** : भावाचे अगर बहिणीचे कुटूंब म्हणजे अतिशय जवळचे किंवा आपल्याच कुटुंबाचा एक भाग असतो. आपलीच मुलगी आपल्या घरात दिली घेतली तर आपल्या मालमत्तेचे रक्षण होईल व परक्या घरात आपली मालमत्ता जाणार नाही.

- **सामाजिक ऐक्यभावात वाढ** : दोन घराणी अगोदरच नात्यांनी जोडलेली असतात. त्यातच पुन्हा बहिण आणि भाऊ आपल्या मुलांची एकमेकांशी लग्न लावून देऊन पुन्हा ऐक्यभाव (Solidarity) वाढवितात.

- **सांस्कृतीक परंपरेची जोपासना** : दोन कुटुंबे या सांस्कृतिक परंपरेच्या विवाह प्रकारामुळे एकत्र येतात. ही परंपरा समाजात टिकवण्यासाठी या विवाहाचा पुरस्कार केला जातो.

सदर महत्त्वाच्या कारणास्तव आते मामे भावंडांचा विवाह हा प्रकार अनेक जमातीसह आजपर्यंत प्रगत समाजात देखील लोकप्रिय बनून परंपरागतपणे टिकून आहे.

## २. चुलत अगर मावस भावंडांचा विवाह (Parallel Cousin Marriage)

अधिमान्य विवाहाचा हा दुसरा प्रकार आहे. या विवाहप्रकारात चुलत भाऊ बहिण किंवा मावस भाऊ बहिण यांच्यात विवाह केला जातो. हा विवाह प्रकार आते मामे भावंडांच्या विवाहप्रकाराइतका सार्वत्रिक नाही. भारतात प्रगत समाजात तसेच काही आदिवासी समाजातही हा विषय निषिद्ध मानला जातो. कारण अगदी जवळच्या रक्ताच्या नात्यातील लोकांत विवाह झाल्यास त्याचा शारिरीकदृष्ट्या विपरित व विकृत परिणाम होतो म्हणून ते टाळावेत असे विज्ञानवादी सांगतात. परंतु अरबस्तानातील वाळवंटी प्रदेशातील बदाउन या भटक्या जमातीत ही विवाह प्रथा प्रामुख्याने दिसून येते. चुलत भाऊ व बहिण या एकमेकांशी विवाह करण्याचा पूर्ण अधिकार जन्मतःच मिळतो. चुलत भावाने जर या अधिकाराचा त्याग केला तरच त्या चुलत बहिणीला इतर पुरुषाची वर म्हणून निवड करता येते. पण अशा पूर्व परवानगीशिवाय जर चुलत बहिणीने विवाह केला तर तिचा व तिच्या वडिलांचा देखिल खून करण्याचा अधिकार तिच्या चुलत भावाला मिळतो. बदाउन जमातीत ही प्रथा रुढ होण्याचे मुख्य कारण तेथील भौतिक पर्यावरण हेच आहे. उंट पालनावर उदरनिर्वाह करणारे बदाउन हे भटके आहेत. अफाट वाळवंटात त्यांना सतत पाणी व हिरव्या गवताच्या कुरणासाठी भटकावे लागते. शिवाय उंटांची देखभाल, शत्रुच्या टोळ्यांपासून संरक्षण ही त्यांची नित्याची गरज असते. यासाठी आपल्या टोळीतील मुलगा टोळीतच राहावा तो बाहेर जाणार नाही याची काळजी त्यांना घ्यावी लागते. यासाठी त्यांनी आपल्या चुलत बहिणीशीच विवाह करण्यास बदाउनी अधिक पसंती देतात. मुळातच टोळीतील सर्वचजण रक्तसंबंधित नातेवाईक असतात. अशा प्रकारे चुलतभाऊ बहिण यांचा विवाह झाल्याने त्यांच्यातील एकता वाढीस लागते. टोळीतील सदस्यांचे व उंटांचे संरक्षण यासाठी टोळीशी एकरूप झालेले विवाहीत दांपत्य व त्यांची मुले हा या विवाहाचा मोठा उपयोग आहे. अशा विवाहामुळे प्रत्येक तरुण मुलगा

आपल्या टोळीतच राहतो. विवाहाच्या निमित्ताने बाहेर पडत नाही आणि त्या तरुण मुलाचे आपल्या चुलत्याशी असलेले रक्ताच्या नात्याचे संबंध त्याच्या मुलीशी विवाह केल्याने निर्माण झालेल्या लग्नाच्या नात्याने अधिक दृढ होतात. कोणत्याही समाजातील जमातींना बहिर्विवाहाचा नियम लोकांच्या आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीनुसार कठीण ठरतात म्हणून निकटच्या नात्यातच विवाह करण्याची प्रथा येऊन त्यातूनच चुलत अगर मावस भावंडांचे विवाह प्रकार सुरू झाले.

## ३. दीर भावजय विवाह (Levirate)

ज्याप्रमाणे रक्तसंबंधित नात्यातील विशिष्ट व्यक्तीच्या विवाहांना अधिमान्य विवाह म्हणून प्राधान्य दिले जाते. त्याच प्रमाणे विवाहामुळे निर्माण झालेल्या नात्यातील विशिष्ट व्यक्तींना देखील विशिष्ट परिस्थितीमध्ये विवाह करण्यास मान्यता दिली जाते. विवाहाचा हक्कच दिला जातो. साधारणतः विधवांनी आणि विधुरांनी पुनर्विवाह करण्याच्या संदर्भात असा अग्रहक्क देण्यात येतो आणि त्यांनी आधिच्या लग्नामुळे निर्माण झालेल्या नात्यातील विशिष्ट व्यक्तीशीच विवाह केला पाहिजे, असा समाजाचा आग्रह असतो. अशा नात्यातील व्यक्तीमध्ये दीर व भावजय आणि मेहुणा व मेहुणी यांचे विवाह हे अधिमान्य विवाह होत. जेव्हा स्त्रीला पतीच्या निधनानंतर पतीच्या कोणत्यातरी भावाबरोबर पुनर्विवाह करावा लागतो तेव्हा अशा विवाहाला दीर भावजय विवाह असे म्हणतात. या विवाहाचे पुन्हा दोन उपप्रकार पडतात.

### ❑ अप्रतिबद्ध दीर भावजय विवाह (Unrestricted Levirate)

ज्यावेळी विधवेला तिने तिच्या कोणत्याही दिराबरोबर विवाह करण्यास परवानगी असते त्या विवाहाला अप्रतिबद्ध दीर भावजय विवाह असे म्हणतात.

### ❑ प्रतिबद्ध दीर भावजय विवाह (Restricted Levirate)

या विवाहात विधवेला तिच्या मोठ्या किंवा धाकट्या दीराशीच विवाह करण्यास परवानगी असते. कोणत्याही दीराबरोबर तिला विवाह करता येत नाही. अर्थात ज्यावेळी विधवेला तिच्या ज्येष्ठ दीराबरोबर विवाह करून दिला जातो तेंव्हा त्या विवाहास ज्येष्ठ दीर भावजय विवाह (Senior Levirate) असे म्हणतात. याउलट कनिष्ठ दीर भावजय विवाहात केवळ पतीच्या कनिष्ठ भावाबरोबरच विवाह करून दिला जातो. म्हणून त्यास कनिष्ठ दीरभावजय विवाह (Junior Levirate) असे म्हणतात.

दीर भावजय विवाहाच्या या प्रकारापैकी प्रतिबद्ध दीर भावजय विवाह हा प्रकार सर्वात जास्ती आढळून येतो. विधवेला विवाहासाठी आपल्या दीरामधून निवड करण्याची सहसा मोकळीक दिलेली नसते. तर विधवेने विशिष्ट दिराशीच लग्न केले पाहिजे असा दंडक घातलेला असतो आणि त्यामध्येही धाकट्या दिराशीच विवाह करण्यास अधिक पसंती दिलेली असते. कनिष्ठ दीर भावजय विवाहासच प्राधान्य देण्याचे कारण कनिष्ठ दीर अविवाहीत असण्याची अधिक शक्यता असते. तर मोठ्या दीराचे

आधीच लग्न झाले असण्याची शक्यता असल्याने त्या दीराला आपल्या विधवा भावजयीशी विवाह करण्याची उत्सुकता असत नाही. तर काही वेळा अतिरिक्त वधुमूल्य (excessive bridge price) देण्याची पात्रता नसल्याने धाकट्या दीराचे लग्न होण्याची शक्यतादेखील कमी असते. अशा परिस्थितीत विधवेला आपल्या धाकट्या दीराशी विवाह करावयास सांगणे उपयुक्त ठरते. दीर भावजय विवाहच्या प्रथेध्ये दीर मात्र अशा विवाहाकडे हक्क (right) आणि कर्तव्यता किंवा दायित्व (obligation) या दृष्टीकोनातून बघत असतो. भिल्ल जमातीत विधवा स्त्रीने आपल्या धाकट्या दीराला रितीरिवाजाप्रमाणे काही रुपये नुकसानभरपाई (compensation) म्हणून दिल्याखेरीज दुसऱ्याशी विवाह करावयास परवानगी मिळत नाही. यावरून दिराच्या या हक्काला समाजाची मान्यता असते हे स्पष्ट आहे. विधवा भावजयीशी लग्न करून तिचे व तिच्या मुलाबाळांचे पालनपोषण करणे हे आपले कर्तव्य आहे, असे दीराला वाटत असते. या प्रबळ भावनेमुळेच या नवीन विवाहाची जबाबदारी दीर स्वीकारत असतो. दीराचे आधी लग्न झालेले असले तरी तो विधवा भावजयीशी परत विवाह करतो व तिचा सांभाळ करतो. इतकेच नव्हे तर विधवा भावजय वयाने बरीच मोठी जरी असली तरी देखील दीर तिच्याशी कर्तव्य भावनेने लग्न करतो. महाराष्ट्रातही भिल्ल, कोरकू, गोंड, गोवारी, बंजारी, कातकरी, वारली आदी आदिम जमातीतून दीर भावजय विवाह सर्रास होतात. वारली जमातीत विधवेने नवऱ्याच्या लहान भावापैकी कोणाही एकाबरोबर विवाह करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य तिला असते. मग त्या दीराची पहिली बायको हयात असली तरी काही अडचण येत नाही. विधवेला दीर नसतील तर या अडचणीवरही प्रतिस्थापनेचे तत्त्व (rule of substitution) अंमलात आणून निराकरण केले जाते. म्हणून विधवा स्त्रीला सख्खा दीर नसेल तर चुलत दीराशी लग्न करावे लागते आणि चुलत दीर नसेल तर पतीच्या कुलातील जवळच्या अगर दुरच्या नातेवाईकांशी लग्न करावे लागते. थोडक्यात सासरच्या घराण्यातच तिला राहावे लागते. दीर भावजय विवाहाची प्रथा रुढ होण्यास काही महत्त्वाची कारणे सांगितली जातात. ती म्हणजे विवाहने एकत्र आलेल्या दोन कुटुंबातील सामुहिक हित टिकवणे, वधुमूल्य टिकविणे, मुलाबाळांचा सांभाळ करणे, विधवा स्त्रीला आधार देणे. दीराचा हक्क व कर्तव्य पार पाडणे इत्यादी अनेक कारणे यामागे आहेत.

## ४. मेहुणा मेहुणी विवाह (Sororate)

जेव्हा पतीला पत्नीच्या निधनानंतर तिच्या कोणत्या तरी बहिणीबरोबर पुनर्विवाह करावा लागतो तेव्हा अशा विवाहाला 'मेहुणा-मेहुणी विवाह' (sororate) असे म्हणतात. मेहुणा-मेहुणी विवाह हा देखील एक लोकप्रिय व सार्वत्रिक अधिमान्य विवाह प्रकार आहे.

### ❑ अप्रतिबद्ध मेहुणा मेहुणी विवाह (Unrestricted sororate)

म्हणजे जेव्हा पतीला मृत पत्नीच्या कोणत्याही बहिणीबरोबर विवाह करण्यास मोकळीक असते तेव्हा त्यास अप्रतिबद्ध मेहुणा-मेहुणी विवाह असे म्हणतात.

## ❑ प्रतिबद्ध मेहुणा मेहुणी विवाह (Restricted sororate)

म्हणजे ज्यावेळी पतीला मृत पत्नीच्या लहान बहिणीशीच विवाह करावा असे बंधन असते अथवा काही वेळा मृत पत्नीच्या मोठ्या बहिणीशीच विवाह करावा असे बंधन असते तेव्हा अशा विवाहाला प्रतिबद्ध मेहुणा-मेहुणी विवाह असे म्हणतात.

विधुराला जर थोरल्या मेहुणीशीच लग्न करावे लागत असेल तर त्यास 'मेहुणा-ज्येष्ठ मेहुणी विवाह' (Senior sororate) असे म्हणतात. जर विधुराला आपल्या धाकट्या मेहुणीशीच विवाह करावा लागणार असेल तर त्यास 'मेहुणा-कनिष्ठ मेहुणी विवाह' (Junior sororate) असे म्हणतात.

मेहुणा-मेहुणी विवाहात प्रतिबद्ध मेहुणा-मेहुणी विवाहच सर्वत्र व सर्वात जास्ती प्रमाणात आढळून येतो. कारण विधुराला विवाह करण्यासाठी आपल्या मेहुणीमधून निवड करण्याची मोकळीक सहसा दिलेली असत नाही. किंबहुना विधुराने विशिष्ट मेहुणीशीच विवाह केला पाहिजे असा दंडक घातलेला असतो. त्यामध्येही धाकट्या मेहुणीशीच विवाह करण्यास प्राधान्य दिलेले असते. त्यामध्येही धाकट्या मेहुणीशीच विवाह करण्यास प्राधान्य दिलेले असते. कारण विधुराच्या थोरल्या मेहुणीचे आधीच लग्न झाले असण्याची शक्यता असल्याने त्याला धाकट्या मेहुणीशीच विवाह करणे भाग पडते. त्यामुळे 'मेहुणा-कनिष्ठ मेहुणी विवाह' (Junior sororate) हा प्रकार फार मोठ्या प्रमाणावर व सर्वत्र आढळून येतो. मेहुणा-मेहुणी विवाहाचे जगातील सर्वच समाजात, जमातीत प्रचलन आढळून येते. दीर भावजय विवाह व मेहुणा मेहुणी विवाह हे परस्पर पुरकच आहेत. म्हणून ज्या-ज्या जमातीत दीर भावजय विवाहाची प्रथा आहे त्या-त्या जमातीत मेहुणा मेहुणी विवाहाची पद्धत दिसून येते. भारतात आता प्रगत समाजातूनही हे विवाह प्रकार प्रचारास आले आहेत. ठाकूर जमातीत मात्र दीर भावजय विवाह पद्धत निषिद्ध मानली आहे. पण मेहुणा मेहुणी विवाहाची पद्धत मात्र विशेष पसंत केली जाते. मराठी भाषा बोलणाऱ्या अनेक जमातीत मावशी हा शब्द सावत्र आईला वापरतात. तसेच 'मेहुणी म्हणजे अर्धी बायको' किंवा 'आई मेल्यावर बाप मावसा' असे अनेक वाक्प्रचार रुढ आहेत. यावरून मेहुणा-मेहुणी विवाह प्रकाराची सार्वत्रिकता व लोकप्रियता लक्षात येते. मेहुणा मेहुणी विवाह हा प्रकार देखील अगदी अनिवार्य समजला जातो. म्हणूनच जर मेहुणी नसेल तर अडचण येते. म्हणून प्रतिस्थापनेचे तत्त्व (Rule of Substitution) अंलात आणून कोणत्याही परिस्थितीत असा विवाह झाला पाहिजे अशी सोय केली जाते. यासाठी विधुराला जर सख्खी मेहुणी नसेल तर चुलत मेहुणीशी लग्न केले पाहिजे आणि चुलत मेहुणी नसल्यास त्याने मृत पत्नीच्या माहेरच्या घरातील कोणत्यातरी मुलीशी लग्न केले पाहिजे, अशा रितीने विधुराला त्याच्या सासरच्या कुटुंबातील मुलीशीच लग्न करावे लागते.

मेहुणा मेहुणी विवाह प्रथा अनेक कारणामुळे रुढ झाली ती म्हणजे विवाहाने एकत्र आलेल्या दोन कुटुंबातील सामुहिक हित टिकवणे, मुलाबाळांचे संगोपन करणे, मालमत्तेची नुकसान भरपाई करून घेणे, मेहुणीचे हक्क व कर्तव्य बजावणे इत्यादी.

वरीलप्रमाणे अधिमान्य विवाहाचे चार प्रमुख प्रकार सर्वात अधिक प्रमाणात, सर्वत्र लोकप्रिय झाले आहेत.

परंतु या अधिमान्य विवाह प्रकाराखेरीज अन्य काही विशेष अधिमान्य विवाह प्रकारही मर्यादित प्रमाणात आढळून येतात. ते म्हणजे 'मामा-भाची विवाह', 'जावई-विधवा सासू विवाह', 'आजोबा-नात विवाह', 'बाप-विधवा सून विवाह', 'मुलगा-सावत्र आई विवाह', 'भाचा-विधवा मामी विवाह', 'काका-पुतणी विवाह', 'पुतण्या-आत्या विवाह' इत्यादी विवाह प्रकारासह बायकोच्या विधवा भावजयीशी विवाह करणे, बायकोच्या भावाच्या मुलीशी विवाह करणे इत्यादी विवाह प्रकारही मर्यादित प्रमाणात अधिमान्य विवाहप्रकार म्हणून काही तुरळक आदिवासी जमातीत आढळून येतात.

## ३.३.५ कुटूंब : आदिवासी कुटुंबाची वैशिष्ट्ये (Family : Characteristics of Tribal Family)

प्रत्येक मानवी समाजात कुटुंबसंस्था आढळते. कुटुंबाशिवाय मानवी समाजाची कल्पनाच करता येत नाही. मानवी समाजातील प्रथम व मुलभूत सामाजिक संघटन म्हणून कुटुंबसंस्थेचा उल्लेख करावा लागतो. सर्वच सामाजिक समुहात कुटुंब एक मुलभूत आणि प्राथमिक स्वरूपाचा सामाजिक समुह आहे. म्हणून चार्लस कुले (Charles Cooley) यांनी कुटुंबाला प्राथमिक समुह (Primary group) असे म्हटले आहे. कुटुंब ही मानवी समाजाची प्राचीन सामाजिक संस्था आहे. म्हणूनच मानवी समाजाचा इतिहास म्हणजे कुटुंबाचा इतिहास होय.

समाजरचनेत विविध प्रकारचे सामाजिक समुह व संस्था यांची निर्मिती होत असते. परंतु आप्तसंबंधांच्या बंधनावर (Bond of Kinship System) आधारलेल्या सामाजिक समुहाला कुटुंब असे म्हणतात. आप्तसंबंध हे रक्ताच्या नात्याने प्रस्थापित असतात आणि माता-पिता (Parents) व त्यांची मुले यांच्यामध्ये असे रक्ताचे नाते असते. त्यामुळे माता-पिता व त्यांची अपत्ये या सदस्यांचा मिळून कुटुंब हा एक सामाजिक समुह तयार होतो. मानव समाजात कुटुंबास विशेष महत्त्व आहे. कारण लैंगिक गरजेची पूर्तता करणे आणि प्रजोत्पादन ही दोन फार महत्त्वाची कार्ये कुटुंबाद्वारा पार पाडली जातात. तसेच संततीच्या संगोपनाची जबाबदारीही कुटुंबाकडेच आहे. मानव प्राणी सर्वात दिर्घकाळ परावलंबी असतो. त्याच्या पालनपोषणासाठी कुटुंब हाच मुलभूत समुह असतो. स्वतःच्या अपत्याबद्दल आईवडिलांनाच आपुलकी जास्त असते. अनेक जबाबदारीमुळे कुटुंब हे स्थायी असल्याचे आढळते. विवाहसंस्थेच्या पायावर कुटुंबसंस्था आधारित आहे. विवाहसंस्थेच्या माध्यमातून पती-पत्नी हे विवाहबंध निर्माण होतात. या लैंगिक संबंधातूनच अपत्य निर्मिती होते. या अपत्यांचे प्रजनन, संगोपन व संवर्धन यासाठी कुटुंबसंस्था ही मुलभूत सामाजिक संस्था आहे. जर विवाहाच्या लैंगिक संबंधातून अपत्यप्राप्ती झाली नाही तर पती-पत्नींनी दुसऱ्याची मुले दत्तक घेऊन त्यांना आपल्या कुटुंबात सामावून घेण्याचा अधिकार समाजाने दिलेला असतो.

## ❑ कुटुंबाची व्याख्या (Definition of Family)

१. ‘‘प्रजोत्पादन आणि संततीचे संगोपन यासाठी निश्चित आणि दिर्घकालीन लैंगीक संबंधावर आधारलेला एक समूह म्हणजे कुटुंब होय.’’ – **मॅक आयव्हर आणि पेज**.

("The family is group defined by sex relationship sufficiently precise and enduring to provide for the procreation and upbringing of children." - **MackIver** and **Page**)

२. ‘‘आप्तसंबंधाच्या बंधनांनी एकत्रित आलेल्या सदस्यांचा सामाजिक समुह म्हणजे कुटुंब होय.’’ **– प्रा. बिल्स व हॉयजर.**

("The family may be briefly defined as a social grouping the members of whick are united by bonds of kinship." - **Prof. Beals** and **Hoijer**)

३. ‘‘माता पिता व त्यांची मुले मग ती सर्व एकत्र राहोत अगर न राहोत यांचा समुह म्हणजे कुटुंब होय.’’ (मानवशास्त्रावरील टिपा व प्रश्न)

("The family is a group consisting of parents and their children where they are living together or not." - **Notes and Queries on Anthropology**)

४. ‘‘विवाहावर आधारलेला सामाजिक घटक म्हणजे कुटुंब होय. ज्यात माता-पिता व त्यांची मुले यांचा समावेश होतो.’’ **– रॉबर्ट लोई**.

("The family is the social unit based on marriage it includes the Parents and their children." **- Robert Lowei**)

५. ‘‘कुटुंब हा आप्तसंबंधावर आधारलेला मुलभूत व सार्वत्रिक स्वरूपाचा समुह आहे. कुटुंबात एखादा पुरुष, त्याची पत्नी आणि त्याच्यामुळे निर्माण झालेली किंवा दत्तक घेतलेली मुले यांचा समावेश होतो.’’ **– रॉल्फ पिडींग्टन**.

("The Basic and universal kinship grouping is the family. It consists of a man his wife and the children resulting from the union or adopted into the family." - **Ralph Piddington**)

## ❑ आदिवासी कुटुंबाची वैशिष्ट्ये (Characterstics of Tribal Family)

आपण कुटुंबाच्या विविध व्याख्या पाहिल्या. त्यावरून कुटुंबाची सामान्य वैशिष्ट्ये सांगता येतात की, जी संपूर्ण मानवजातीच्या कुटुंबास लागू पडतात. ती म्हणजे सार्वत्रिकता (Universality), विवाह

बंधन (Marriage Bond), प्रजनन व अपत्य संगोपन (Reproductive), रक्तसंबंध (Blood Bond), आप्तसंबंध (Kinship Bond), सामाइक निवास (Common residence), वंशपरंपरा व गणना पद्धती (Mode of reckoning descent), आर्थिक नियोजन, मालमत्तेचा उत्तराधिकार (Inheritance of Property), कुटुंबाची सत्ता (Authority of Family), कुटुंबविषयक अभिमान, दत्तक प्रथा (Adoption), लैंगिक संबंध (Sex Relationship), लघु व मर्यादित आकार (Small & Limited Size), द्विपक्षीय स्वरुप (Bilateral), सदस्यावर नियंत्रण (Control on Members), सामाजिक नियंत्रण (Social Regulation), भावनात्मक आधार (Emotional Basis), आर्थिक आधार (Economic Basis), सदस्यांचे उत्तरदायित्व (Responsibility of the members) समाजिक संरचनेत मध्यवर्ती केंद्रीय स्थान (Nuclear Position in Social Structure).

उपरोक्त सर्व वैशिष्ट्ये जगातील सर्वच सामाजिक समुहात आढळतात. परंतु आदिवासी कुटुंब हे प्रगत अथवा आधुनिक समाजाहून अगदीच भिन्न आहे. आदिम संस्कृती, प्रथा परंपरा यामुळे आदिवासी कुटुंबांची काही खास वैशिष्ट्ये सांगता येतात ती पुढीलप्रमाणे :-

### १. आदिवासी कुटुंबात विविध रचनात्मक प्रकार (Various structural Types in Tribal Family)

आदिवासी कुटुंबात केंद्र किंवा प्राथमिक अथवा विभक्त कुटुंब (Nuclear or Primary Family) आढळून येते. तसेच एकत्र किंवा संयुक्त (Joint Family) देखील आढळून येते. तसेच पितृसत्ताक कुटुंब आणि मातृसत्ताक कुटुंब (Mother right Family) अशा दोन्ही स्वरुपाची कुटुंबेदेखील आदिवासी जमातीत आहेत. एकविवाही कुटुंब (Monogamous Family) अशा प्रकारची अनेक जमातींची कुटुंबे आहेत. तसेच बहुविवाही कुटुंब (Polygamous Family) हा प्रकार देखील आदिवासी कुटुंबात आहे. यातही बहुपत्नी प्रथात्मक कुटुंबे (Polygynous Family) व बहुपती प्रथात्मक कुटुंबे (Polyandrous Family) या दोन्ही प्रकारच्या कुटुंबाचे अस्तित्व वेगवेगळ्या आदिम जमातीत पहावयास मिळते. अगदीच क्वचित ठिकाणी समुह विवाही कुटुंब (Group Marriage Family) देखील आढळून येतात.

अशा प्रकारे आदिवासी कुटुंबाच्या रचनेतील वैशिष्ट्यपूर्णता असून आदिवासी समाज, आदिवासी जमात, प्रदेश कूल या सर्वांची या कुटुंबरचना पद्धतींना मान्यता असते. किंबहूना ती त्यांची संस्कृती.असते.

### २. घटस्फोटाची सार्वत्रिकता (Universality of Divorce)

जवळजवळ सर्वच समाजातून सर्व जमातीतून लोकांना विशिष्ट परिस्थितीत विवाह विच्छेद तथा घटस्फोट करण्याची परवानगी दिली जाते. घटस्फोट घेण्याच्या या सवलतींचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. त्यामुळे आदिम कुटुंबात विवाह हा केवळ प्रणयसुखाचे साधन म्हणून पाहणे तसेच स्त्री ही उपभोग वस्तू खरेदी करावयाची अथवा नको असेल तेव्हा सोडून द्यावयाची वस्तू अशा दृष्टीने पाहिले

जाते. विवाह करार मानल्याने तो कधीही मोडता येतो. त्यात त्यांना पाप वाटत नाही. पोटगी इ. देण्याचा प्रश्न येत नाही. ठरावीक कारणावरून अथवा क्षुल्लक कारणावरून घटस्फोट देण्याच्या या प्रथामुळे घटस्फोटांचे प्रमाण वाढले. घटस्फोट देण्याचा विधी देखील अगदी साधा असतो. सोपा असतो आणि घटस्फोटीत व्यक्तींना पुर्नविवाह करण्याची मोकळीक असते. त्यामुळे आदिवासी कुटुंबात घटस्फोट आणि पुनर्विवाह यांचे प्रमाण अधिक असते व त्यामुळे बहुपत्नीधारक कुटुंबांची संख्या वाढते. त्यामुळे घटस्फोटांची सार्वत्रिकता हे आदिवासी कुटुंबाचे ठळक वैशिष्ट्य आहे.

### ३. कुटुंबाची अस्थिरता (Instability of Family)

आदिवासी कुटुंबातील घटस्फोटाच्या सार्वत्रिकता या वैशिष्ट्यामुळेच आदिवासी कुटुंबाची अस्थिरता हे वैशिष्ट्य दिसून येते. कोणत्याही कारणास्तव आणि सहज, सोप्या पद्धतीने घटस्फोट झाल्याने कुटुंबातील पतीपत्नी यांचे नाते संपुष्टात येते. त्यामुळे कौटुंबिक जीवनावर विशेष परिणाम होतो. कुटुंबाच्या स्थिरतेला बाधा येते. कुटुंबातील सदस्यांची रचना बदलते. मुलांचे पितृत्व, मातृत्व बदलते. घटस्फोटीत स्त्री पुरुष या दोघांनाही पुनर्विवाहाची परवानगी असते व पुनर्विवाहाचे प्रमाणही जलद वा वेगाने घडते. त्यामुळे वाढते पुनर्विवाह, बहुविवाहाचे प्रकार यातूनच कुटुंबांच्या स्थिरतेला बाधा येते. कुटुंबाची रचना, मातृ-पितृ भूमिका व मुलांचे नाते या सर्वच गोष्टी दुय्यम बनतात. परिणामी कुटुंबाची अस्थिरता हे आदिवासी कुटुंबाचे वैशिष्ट्य बनते.

### ४. स्त्री-पुरुष श्रमविभाजन (Sexual Division of Labour)

कुटुंब हा एक आर्थिक घटक (Economic Unit) असल्याने कुटुंबातील सदस्यांना आर्थिक क्रिया कराव्या लागतात. सर्व आदिवासी जमातीतून पुरुष व स्त्रिया आपआपल्या परीने आर्थिक क्रियामध्ये सहभागी होतात. त्यांच्यामध्ये श्रमविभाजन केले जाते. काहीवेळा हे श्रमविभाजन रुढीगत, प्रथागत (Conventional) स्वरूपाचे असते. उदा. हॉटेनटॉट जमातीत (Hottentot) फक्त स्त्रियांनाच गाईची धार काढण्याचे काम करावे लागते. पुरुषांना नाही. याउलट बांटू जमातीत (Bantu tribe) गाईंना शिवण्याची परवानगीदेखील स्त्रियांना असत नाही. तसेच होपी जमातीत शिवणकाम, विणकाम ही कामे पुरुषांनीच करावीत, असे मानले आहे. तर नॅव्हव्हो जम ातीत ही कामे फक्त स्त्रीयांनीच करावीत, असा संकेत आहे. अशा रुढीगत अथवा प्रथागत (Conventional) श्रमविभाजनाबरोबरच आदिवासी कुटुंबात स्त्रीपुरुष श्रमविभाजन हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. स्त्रियांचा मासिक धर्म (Monthely Course), गर्भधारणा व अपत्य जनन क्रिया आणि संवर्धन (Procreation and upbringing) अशी कार्ये निसर्गतःच स्त्रियांच्या वाट्याला आली आहेत. या गोष्टींचा विचार करून स्त्रियांना कमी कष्टाची व घराच्या आसपास करता येणारी कामे दिली जातात. घराची झाडलोट करणे, स्वयंपाक करणे, पाणी भरणे, बागकाम, शिवणकाम, खाद्यसंकलन, झाडपाला गोळा करणे, भरतकाम यासारखी कामे स्त्रीयांना दिली जातात. याउलट पुरुषांचे

सामर्थ, मजबूत शरीरयष्टी व धाडस इ. गुणांमुळे कष्टाची व घराबाहेरील कामे पुरुष करतात. शिकार करणे, मासेरी करणे, जनावर पालन करणे, परक्या जमातीपासून संरक्षण अगर लुटालुटीच्या निमित्ताने लढाई करणे इ. कामे पुरुष करतात. जेव्हा स्त्रीया व पुरुष यांना मिळून एकत्र काम करावयाचे असते तेव्हा देखील श्रमविभाजन केलेले असतेच. उदा. शेतीमध्ये पुरुष जमिनीची मशागत, नांगरट, बांध बंधिस्ती, खुदाई इ. करतात. तर स्त्रीया मदतीचे काम करतात. पिकांची कापणी स्त्रिया करतात तर मळणी पुरुष करतात. हातावर घडविण्याची व साधी मडकी तयार करण्याचे काम स्त्रीया करतात तर पुरुष फिरत्या चाकावर मातीची भांडी तयार करतात. घर बांधण्याचे काम पुरुषाकडे असते तर स्त्रीया घराची देखरेख ठेवतात. थोडक्यात स्त्री-पुरुष श्रमविभागणी हे आदिवासी कुटुंबाचे वैशिष्ट्य असते.

### ५. अविवाहितांचे वियोजन (Segragation of unmarried)

अविवाहितांचे नियोजन अथवा अविवाहीतांसाठी युवागृहे (Youth Club) हे आदिवासी कुटुंबसंस्थेचे एक अतिशय महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अनेक आदिवासी जमातीत मुले मुली वयात आली म्हणजे त्यांना कुटुंबातील इतर व्यक्तीपासून अलग ठेवले जाते. कारण आदिवासी समाजात कुटुंबातील अविवाहीत मुले आणि मुलींनी आपला सर्व वेळ युवागृहात घालविला पाहिजे, अशी प्रथा आढळून येते. युवागृहात त्यांना समाजातील रुढी, प्रथा, परंपरांची माहिती दिली जाते. त्यांना जीवनोपयोगी गोष्टी शिकवल्या जातात. त्यामुळे युवागृहांचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडतो. रात्रीच्यावेळी तरुण तरुणी युवागृहात झोपतात. काही युवागृहे तरुण व तरुणी यांच्यासाठी मिळून एकत्रच असतात. काही ठिकाणी स्वतंत्र असतात. युवागृहातील वातावरणातच एकांत व स्वातंत्र्य मिळते. आनंद व प्रेमाविष्कार मिळतो. आदिवासीतील तरुण मुले, मुली यांच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण होते. अविवाहीत तरुण-तरुणी यांचा कुटुंबात कमी वेळ तर युवागृहातच अधिक वेळ जातो. कुटुंबापेक्षा युवागृहे त्यांना अधिक जिव्हाळ्याची व आवडती असतात.

### ६. स्त्री-पुरुषांचे विलगीकरण (Sexual Seperation)

अनेक आदिवासी कुटुंबातील विवाहीत स्त्री-पुरुष म्हणजे पती-पत्नी एकमेकांपासून वेगळे राहण्याची प्रथा आहे. या जमातीतून पुरुषांची मंडळे (Clubs) असतात. त्यात स्त्रियांना प्रवेश नसतो. पुरुष आपल्या पत्नीसोबत न राहता त्यांच्यासाठी असलेल्या स्वतंत्र मंडळात राहतात. अशा मंडळातच पुरुष भोजन व शयन करतात. जेवणे व झोपणे या क्रिया मंडळातच पार पडतात. स्त्रीयांसमवेत जेवण करणे त्यांना कमी पणाचे वाटते. हुपा जमातीत पुरुष केवळ जेवणासाठीच घरी येतात. आदिवासी पुरुषांना अशा पुरुष मंडळांचे सदस्यत्त्व मिळणे त्यात राहणे भुषणावह वाटत असते. अर्थात सर्वच आदिवासीत असे विवाहितांचे विलगीकरण असतेच असे नाही. पण बहुतांशी जमातीत मात्र हे स्त्री पुरुषांचे विलगीकरण आढळते. यामुळे आदिवासींच्या कौटुंबिक जीवनावर फार दुरगामी परिणाम होतात. पती-पत्नी सहजीवनात खंड पडतो. साहचर्य व सुखदुःखातील सहभाग यात दुरावा निर्माण होतो.

### ७. दत्तक घेण्याची प्रथा (Adoption)

कुटुंबात वंशपरंपरेसाठी मुलाबाळांची आवश्यकता असते. पण अपत्यप्राप्ती झाली नसेल तर आपल्या नातेवाईकांचे अपत्य दत्तक घेऊन पती-पत्नी ते आपलेच अपत्य समजून त्याचे संगोपन, संवर्धन करतात. या दत्तक पुत्रास दत्तक घेणाऱ्या माता-पित्यांचा वंश मिळतो. त्यांच्या घराण्याचा वारसा मिळतो. तसेच संपत्तीचा वारसाही दत्तक मुलास मिळतो. आदिवासी कुटुंबात ही दत्तक प्रथा सर्वत्रच आढळते. दत्तक अपत्याला औरस संततीचे सर्व अधिकार कायदेशीरपणे प्राप्त होतात. प्रगत समाजातही दत्तक प्रथा आहेच पण आदिवासी कुटुंबात ती प्रकर्षाने आढळून येते. बेटावरील आदिवासी लोक कोणतेही विशिष्ट कारण नसताना मुले दत्तक घेतात. मुलांचा जन्म होण्याआधीच मुलांना दत्तक दिले जाते वा घेतले जाते. अशीही उदाहरणे आहेत. जन्मापूर्वी मुलांचे दत्तक देणे-घेणे ठरल्याने अगदी मुलाला आपले खरे आईवडील कोण याची ओळख देखील होणे कठीण असते व काही जमातीत खरे आईवडील कोण हे दत्तक मुलाला शेवटपर्यंत माहिती करून दिले जात नाही, असेही आढळते.

अशा प्रकारे आदिवासी कुटुंबाच्या वरील काही महत्त्वाच्या वैशिष्ट्यांमुळे आदिवासी कुटुंबाचे वेगळेपण लक्षात येते.

## ३.३.४ कुल आणि कुलप्रतिकवाद : वैशिष्ट्ये आणि कार्य (Clan and Totemism : Characteristics and Function)

मानवाच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी कुटुंबसंस्था प्रयत्न करीत असते. मानवाच्या गरजा अमर्यादित असल्याने कुटुंबाच्या मदतीला अन्य संघटनांची जरूरी असते. प्रगत व अप्रगत समाजात सतत कार्यरत असणाऱ्या रक्तसंबंध किंवा आप्तसंबंध यावर आधारलेल्या संघटनांचा प्रथम विचार करावा लागतो. प्रगत व अप्रगत समाजात रक्तसंबंधाधिष्ठित समूह आढळतात. मानवाच्या जैविक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय गरजांची पूर्तता करण्यास रक्तसंबंधाधिष्ठित समूहच कटिबध्द असतात. कोणत्याही समाजात कुटुंबसंस्थेनंतर आप्तसंबंधावर 'कुल' या संघटनेचा विचार करावा लागतो.

कुटुंब व कुल यामध्ये समाविष्ठ होणाऱ्या सर्व संबंधितांचे एकमेकांशी असणारे नाते हे रक्ताचे असते. या रक्ताच्या नात्याची उभारणी एकपक्षीय किंवा द्विपक्षीय तत्वावर झालेली असते. कुटुंबातील आई व वडील या दोन्ही बाजूने ओळखल्या जाणाऱ्या सर्व नातेवाईकांचा विचार हा द्विपक्षीय तत्वावर आधारलेला आहे. याउलट आईकडून किंवा वडिलांकडून ओळखल्या जाणाऱ्या आप्तांचा विचार एकपक्षीय तत्त्वानुसारच केला जातो. द्विपक्षीय आप्तांचा समावेश कुटुंबात केला जातो, तर एकपक्षीय आप्तांचा विचार कुलामध्ये केला जातो.

मानवशास्त्रज्ञ कुलाला 'Clan' हा शब्द वापरतात. कुल हा एकपक्षीय आप्तसंबंधितांचा समूह आहे. कुलामध्ये पितृवंशाचे नातेवाईक समाविष्ट केले जातात. गोल्डनवायझर यांनी मातृवंशाधिष्ठित

नातेवाईकांच्या समूहाला 'Clan' असे नांव दिले आहे व पितृवंशाच्या नातेवाईकांच्या समूहाला 'ॠषी' असे म्हटले आहे.

## ❑ कुलाचे स्वरूप :-

स्त्री किंवा पुरुष यांच्यापैकी कोणत्यातरी एका बाजूने वंशमालिका जेव्हा पाहिली जाते, तेव्हा एकपक्षीय नातेवाईकांचा समूह स्पष्ट होतो. पितृवंशीय कुलामध्ये केवळ पित्याकडील नातेवाईकांचा म्हणजे पुरुष पूर्वज, त्यांची मुले व मुली, त्यांची नातवंडे, खापर पणतू अशा वंशमालिकेचा विचार केला जातो. मातृवंशिय कुलांत मातेकडील नातेवाईकांचाच वरीलप्रमाणे समावेश केला जातो. रॉबर्ट लुई यांनी कुल म्हणजे एकपक्षीय आप्तसंबंधावर आधारलेला समूह आहे अशी व्याख्या केली आहे.

मानवशास्त्रीय ग्रंथातसुद्धा कुलाची व्याख्या स्पष्ट करताना कुलाचे एकपक्षीय तत्त्व लक्षात घेतले आहे. ''कुल म्हणजे एकपक्षीय वंश मालिकेने निश्चित झालेल्या स्त्री-पुरुषांचा समावेश होय. ही वंशपरंपरा सत्य किंवा काल्पनिकही असू शकते. एकपक्षीय समूहाचे जे सदस्य असतात त्या प्रत्येक सदस्यांच्या मनात एकमेकांबद्दल जबाबदारीची भावना असते.''

एकपक्षीय तत्वावर आधारलेल्या आप्तसंबंधितांना वंशज म्हणतात. हे स्पष्ट करून श्री. मदन व मुजुमदार यांनी कुलाची व्याख्या केली आहे. ''कुल हा प्रथमतः वंशजांचा समूह असतो, या वंशसमूहाची उत्पत्ती कोणत्या तरी कल्पित पूर्वजापासून झालेली असते. मग हा पूर्वज मानव, प्राणी, वनस्पती किंवा निर्जीव वस्तूही असू शकते.''

## ❑ कुलाची लक्षणे/वैशिष्ट्ये :-

**१. एकपक्षीय तत्वाचा आधार :** कुलामध्ये माता किंवा पिता यापैकी एकाच्यामार्फत ओळखल्या जाणाऱ्या नातेवाईकांचाच समावेश होतो. पितृवंशिक कुलपध्दतीत मूळ पूर्वज पुरुषापासून निर्माण झालेली वंशावळ समाविष्ट असते, तर मातृवंशिक कुलपद्धतीत स्त्री पूर्वज, तिची मुले व मुली, नातवंडे, खापर नातवंडे यांचा समावेश असतो.

आसाममधील खासी, गोरा जमाती यांचा अपवाद वगळता भारतातील बहुसंख्य आदिवासींच्यात पितृवंशिक कुलपध्दती आढळते. मावणकोरमधील राजघराणे हे मातृवंशिक कुलपध्दतीचे आहे. त्यामुळे सिंहासनाचा वारसा हा मातृकुलातील व्यक्तीकडेच येतो. कुल हा बहिर्विवाही समूह असल्याने राजघराण्यातील राजाचा विवाह दुसऱ्या कुलातील स्त्रीशी झालेला असतो. त्यामुळे मातृकुलाच्या प्रथेप्रमाणे राजाची मुले ही राजपत्नीच्या कुलाचे प्रतिनिधी असतात. म्हणूनच महाराजांच्या मृत्यूनंतर राजघराण्याचा वारसा महाराजांच्या मुलाकडे न जाता महाराजांच्या बहिणीच्या मुलाकडे जातो.

**२. मूळ पूर्वजापासून उत्पत्ती :** कुलाची सुरुवात कोणत्या तरी स्त्री किंवा पुरुष पूर्वजापासून

झालेली आहे, असा विश्वास प्रत्येक कुलसदस्यांचा असतो. हा पूर्वज कोण होता, केव्हा झाला, यासंबंधी कुलसदस्यांना ज्ञान असतेच असे नाही. हा कुलपूर्वज मानवप्राणी, मानवेतर प्राणी, वनस्पती, निर्जीव वस्तूही असू शकते.

**३. जन्म हा आधार :** ज्या कुलात व्यक्तीचा जन्म झालेला असतो, त्याच कुलाचे सदस्यत्व व्यक्तीला मिळत असते. कुलाचे सदस्यत्व ऐच्छिक नसते. व्यक्तीला लाभलेले कुलाचे सदस्यत्व बदलता येत नाही. पित्याकडून किंवा मातेकडून प्राप्त झालेले कुलांचे सदस्यत्व व्यक्तीला स्वीकारावे लागते. दत्तक पित्याचे किंवा दत्तक मातेचे जे कुल असेल त्याच्या कुलाचे सदस्यत्व दत्तक जाणाऱ्या व्यक्तीला स्वीकारावे लागते.

**४. प्रत्येक कुळाचे वेगळे नांव :** प्रत्येक कुळ हा वेगळाच गट असतो. प्रत्येक कुळाचे वेगळे नांव असते. मूळ पूर्वज, मूळ पूर्वजाचे वैशिष्ट्य, कुलातील नामवंत व्यक्तींना मिळालेले किताब, कुलाचे पारंपारिक व्यवसाय, कुलाचे वसतिस्थान इ. आधारावर कुलाला नावे दिलेली असतात.

यवतमाळ जिल्ह्यातील कोलाम जमातीत देवतांच्या पुजनावरून चार कुलगट पडलेले आहेत. या चार कुलांची नावे पुढीलप्रमाणे :-

चारदेवे, पाचदेवे, सहादेवे, सातदेवे.

कोलामांच्या चार कुलांमध्ये समाविष्ठ होणाऱ्या काही कुलांची आडनावे निश्चित प्रकारची व वेगळी असतात. उदा.

**१. चारदेवे :** टेकाम, पाटोळे, मडावी, मांगुर्ले.

**२. पाचदेवे :** भिवईकर, येलके, लोणसावली.

**३. सहादेवे :** आत्राम, कसार, देवनारे, वीरकर.

**४. सातदेवे :** किनारे, जांभे, जांभूळकर, मादनी, सकराचुरे.

महाराष्ट्रातील भिल्ल, वारली, कातकरी, टाकूर, कोळी इ. जमातीत कुलाला विविध नावे आहेत. महाराष्ट्रातील वारली जमातीत दोनशे कुले आहेत. प्रत्येक कुलाला स्वतंत्र नाव आहे.

**५. बहिर्विवाहाची प्रथा :** प्रत्येक कुलाची निर्मिती वेगळ्या पूर्वजापासून झाली आहे, असे श्रध्दापूर्वक मानले जाते. एकाच कुलातील सर्व सदस्य हे एकाच पूर्वजांचे वारसदार असतात. त्यामुळे ते एकमेकांचे नातेवाईक असतात. त्यामुळे व्यक्ती वेगळ्या कुटुंबातील असूनसुद्धा जर त्या एकाच कुलातील असतील तर ते एकमेकांला भाऊ-भाऊ व भाऊ-बहिण मानत असतात. एकाच कुलात जन्म झालेल्या स्त्री-पुरुषांना एकमेकांशी विवाह करण्यास प्रतिबंध केला जातो.

यवतमाळमधील 'चारदेवे' कुलातील टेकाम, पाटोळे, मडावी, मांगुर्ले ही आडनावे असणारी कुटुंबे एकमेकांशी विवाह करत नाहीत. त्यांनी एकमेकांशी विवाह करणे हे निंद्य व निषिद्ध मानले आहे.

**६. कुलप्रतिकाची खूण :** प्रत्येक कुलाची निर्मिती कोणत्या तरी सत्य किंवा कल्पित पूर्वजापासून झालेली आहे असे विश्वासपूर्वक मानले जाते. हा पूर्वज जसा सत्य किंवा कल्पित असू शकतो. हा पूर्वज मानव, प्राणी, वनस्पती, निर्जीव वस्तू ही असू शकतो. या सजीव किंवा निर्जीव वस्तूला कुलप्रतिक किंवा देवक म्हणतात. साहजिकच प्रत्येक कुलाचे वेगळे कुलप्रतीक किंवा देयक असते. ही कुलचिन्हे वनस्पती, पशु किंवा इतर नैसर्गिक वस्तूंची असतात. त्या-त्या कुलातील लोकांचा कुलप्रतिकाकडे बघण्याचा दृष्टिकोण आदराचा असतो. कुलचिन्ह जर प्राणी असेल तर त्या प्राण्याची हत्या केली जात नाही. कुलचिन्हाची पूजा करणे, कुलचिन्हाचा अपमान करणे, कुलचिन्ह किंवा देवकाचे चित्र अंगावर गोंदून घेणे. देवक प्राणी मृत्यू पावल्यास त्या कुलातील सदस्या घरचा माणूस मृत्यू पावला असे समजून सुतक पाळतात. हा देवकप्राणी जर हिंसक असेल तर तो त्या कुलाच्या सदस्याला चावत नाही. अशी निष्ठा कुलसदस्यांची असते. कुलचिन्हात पूर्वजांचा आत्मा वसत असतो ही जाणीव असल्याने कुलचिन्ह हे कुलांचे संरक्षण करते. कुलप्रतीकांचे आदिवासींच्या जीवनात विशेष सामाजिक महत्त्व असल्याने आदिवासी कुलाचे हे एक लक्षण मानलेजाते. रॉबर्ट लुई यांच्या मते भारतातील, अमेरिका व आफ्रिका खंडातील जमातीतून देवक कमी होत आहे.

**७. समान वसतिस्थान :** समान पूर्वज व समान रक्तसंबंध असणारे कुळाचे सदस्य समान वसतिस्थानातच वास्तव्य करताना दिसतात. ''समान देवक, समान भूप्रदेश, समान पूर्वजावरील विश्वास यामुळे एकमेकांशी बद्ध झालेल्या व्यक्तींचा बहिर्विवाही समूह म्हणजे कुल होय.''

समान वसतिस्थान हे प्राचीन कुलाचे वैशिष्ट्य असले पाहिजे. कारण रक्तसंबंधाच्या नात्यांनी एकमेकांशी अतूट संबंध असलेले सर्व लोक एकाच ठिकाणी राहत असले पाहिजेत. त्यांच्यामधील सामाजिक व धार्मिक क्रियांचे स्वरूपही सामाजिक असल्याने, त्या क्रियेसाठी त्यांना एकत्रित राहणेही अपरिहार्य होते. परंतु कालांतराने कुलसदस्यांची संख्या वाढल्याने व दळणवळणाची साधने उपलब्ध झाल्याने आपआपल्या जीवनचरितार्थासाठी कुलसदस्यांनी आपले समान निवासस्थान सोडून जगाच्या सर्व भागात ते विखुरले गेले. म्हणूनच रॉबर्ट लुई यांना समान भूप्रदेश किंवा वसतिस्थान आवश्यक लक्षण वाटत नाही.

## ❑ सारांश :-

भारतातील सर्व आदिम समाजात कुलाचे अस्तित्व दिसून येते. कमार, चेंचू, बिरहोर या मागासलेल्या जमातीत कुले आहेत. अंदमान बेटावरील आदिम कादर जमातीत कुले आढळत नाहीत. आसाममधील लुशेई, कुकी जमातीत कुले म्हणजे विस्तारीत कुटुंबेच आहेत. आसामधील खासी जमातीत

मातृकुल आढळते. त्यांच्यामध्ये बहिर्विवाहाच्या नियमाचे काटेकोरपणे पालन केले जाते. कोरवा, मुंडा, खारिका, उरॉव या जमातीतील कुलामध्ये बहिर्विवाह व देवकप्रथा या वैशिष्ट्यांना अधिक महत्त्व दिले जाते. मयुरगंज भागातील खरिया जमातीत कुलसंघटन आढळत नाही.काळाच्या ओघात त्या जमातीच्या भाषेप्रमाणे कुलसंघटन नष्ट झाले असावे. कारण आजही डोंगराळ भागातील खरिया लोक स्वत:ला नाग कुलातील सानतात. त्या जमातीत सालुक (पक्षी), साल (मासा), अशोक (फूल), सारू (कोनफळ), बलिया (मासा), नाग अशी देवकप्रथा असणारी कुले आढळतात. संथाळ जमातीत वनस्पती, प्राणी व इतर अचेतन वस्तूंची नावे सलेली १०० कुले आहेत. हो जमातीत ५० कुले आहेत. वारली जमातीत २०० कुले आहेत तर भिल्लांच्यात ३६ कुले आहेत.

## ❑ कुल व कुटुंब : फरक/भेद

आदिवासी जमातीतील सामाजिक संघटनांचा विचार करता, कुटुंबानंतर कुलाचे महत्त्व दिसून येते. व्यक्तीच्या सामाजिक जीवनाला आकार देण्यात कुटुंबानंतर कुलाचा वाटा मान्य करावा लागतो. कुल व कुटुंब यातील फरक पुढीलप्रमाणे :-

**१. कुल एकपक्षीय समूह तर कुटुंब द्विपक्षीय समूह :** कुटुंब व कुल आप्त संबंधितांचे समूह आहेत. पिता व माता यांच्याकडून ओळखल्या जाणाऱ्या नातेवाईकांचा समावेश कुटुंबात होत असतो. कुटुंब हा द्विपक्षीय तत्वावर आधारलेला आप्तस्वकीयांचा समूह आहे.

कुलात आप्तस्वकीयांच्या समूहाची उभारणी एकपक्षीय तत्त्वावर झालेली असते. कुलामध्ये केवळ पित्याकडील किंवा मातेकडील नातेवाईकांचा समावेश केला जातो. मातृ कुळात पित्याकडील नातेवाईकांचा व पितृकुलात मातेकडून ओळखल्या जाणाऱ्या नातेवाईकांचा समावेश केला जात नाही.

**२. कुल व कुटुंब–समावेशक व मर्यादित समूह :** कुल व कुटुंब यामध्ये समाविष्ट होणाऱ्या आप्तसंबंधितांचा विचार केला तर कुल हे अधिक समावेशक असल्याचे दिसून येते. कुटुंबात माता–पिता या दोहोंकडून ओळखल्या जाणाऱ्या नातेवाईकांचा जरी विचार होत असला तरी दूरच्या नातेवाईकांचा समावेश कुटुंबात होत नाही. कुटुंबात माता-पिता व त्यांची मुले यांचा समावेश कुटुंबात होत असतो. कुल या अर्थाने अधिक विशाल व समावेशक आहे याचे कारण माता किंवा पिता यांच्याकडून ओळखल्या जाणाऱ्या जवळच्या व दूरच्या नातेवाईकांचा समावेश कुळात झालेला असतो. एकाच कुळाचे सदस्य जरी एकमेकांचे. दूरचे नातेवाईक ते एकमेकांपासून दूरवर विखुरलेले असले तरीसुद्धा ते एकाच कुळातील मानले जातात. म्हणूनच कुलाची समावेशकता कुटुंबाच्या तुलनेने अधिक आहे. कुलातील सर्व सदस्यांचा जन्म एकाच कल्पित किंवा सत्य पूर्वजापासून झालेला आहे ही श्रध्दा सर्वांचीच असल्याने, एकाच कुलातील सदस्य एकमेकांचे रक्तसंबंधित नातेवाईक असतात. त्यामुळेच दूर व अतिदूरच्या नातेवाईकांचा समावेश कुळात होत असतो.

**३. कुळ स्थिर व कुटुंब अस्थिर समूह :** कोणत्याही अंतर्बाह्य कारणाने कुलाच्या सदस्यत्वात बदल घडून येत नाही. ज्या कुलात जो सदस्य जन्माला आलेला आहे, त्याला आपले कुल बदलता येत नाही. कोणत्याही कुलाचे सदस्यत्व जन्माने ठरते व एकदा लाभलेले कुलसदस्यत्व कायमपणे टिकून राहते.

कुटुंब हा अस्थिर समूह आहे. कुटुंबातील सदस्यांची संख्या कोणत्या-कोणत्या कारणाने सतत बदलत असते. मातृसत्ताक कुटुंबात पुरुष विवाहानंतर आपल्या आईच्या कुटुंबाचा त्याग करून आपल्या बायकोच्या घरी रहावयास येतो. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत मुलींची लग्ने झाल्यानंतर त्या पतिगृही येतात व पतीच्या कुटुंबाचे सदस्य बनतात. त्याचबरोबर पती-पत्नींच्या घटस्फोटानेही संबंधित व्यक्तींचे, संबंधित कुटुंबाचे सदस्यत्व संपुष्टात येते. कुळाचे सदस्यत्व अपरिवर्तनीय असल्याने कुल हा स्थिर व टिकाऊ समूह असल्याचे दिसते.

**४. कुळ असार्वत्रिक व कुटुंब सार्वत्रिक :** कुटुंब हे सार्वत्रिक स्वरूपाचे आहे तर कुळाचे अस्तित्व सर्व ठिकाणी व सर्व समाजात दिसून येत नाही. अप्रगत, मागासलेल्या समाजात कुटुंब पध्दती दिसून येते.

कुळाचे अस्तित्व सार्वत्रिक नाही. सर्वच मानवी समाजात कुळाचे अस्तित्व आढळून येत नाही. अंदमान बेटावरील आदिम, केरळमधील कादर, सैबेरियातील चुकची, आफ्रिकेतील हॉटेनटॉट जमातीत कुलपद्धती नाही. अप्रगत समाजात कुलसंघटन आढळत नाही, परंतु कुटुंब संघटनेचे अस्तित्व दिसून येते. भवितव्याच्या दृष्टीने विचार करता, कुटुंबाचे उच्चाटन कोणत्याही समूहाला करणे शक्य झाले नाही. कुटुंबाची जागा इतर कोणताही समूह घेऊ शकणार नाही.

## ❑ कुलाची कार्ये -

कुळ व कुटुंब हे आप्तसंबंधावर आधारलेले सामाजिक समूह आहेत. कुळ व कुटुंब यांची उद्दिष्टे मूलभूत व समान आहेत. कुटुंबासारखेच कुलाला संस्थारूप आहे. म्हणून कुळाला काही कार्ये स्वतंत्रपणे पार पाडावी लागतात.

**१. सामाजिक कार्ये :** कुलाची उत्पत्ती एकाच पूर्वजापासून झालेली आहे, ही श्रध्दा प्रत्येक कुलसदस्याच्या मनात जबरदस्तपणे वसत असल्यामुळे कुलसदस्य हे रक्ताचे नातेवाईक आहेत, असे मानले जाते. हीच भावना कुलसदस्यातील नाते अधिक दृढ भक्कम करते. कुलसदस्य हे एकाच रक्तामासांचे मानले गेल्याने एकमेकांबद्दल त्यांना आपलेपणा व जिव्हाळा वाटत असतो. कुलामध्ये अनेक कुटुंबाचा समावेश असतो, त्यामुळे दूरवर राहत असलेल्या कुलसदस्यांची भेट केव्हाही झाली तरी ते एकमेकांना भेटीच्या वस्तू देवून आपले एकमेकांविषयीचे प्रेम व्यक्त करीत असतात. तसेच कुलसदस्य कोठेही राहणारा व अडचणीत असेल तर त्याच्या मदतीसाठी कुलसदस्य धावतात. कुलसदस्याला मदत करणे हे कर्तव्य मानतात. एकमेकांच्या संकटकाळात सहकार्य, सलोखा, प्रेम अधिक दिसून येते.

कुलपरंपरा राखण्यासाठी कुलसदस्य धडपडत असतात. व्यक्तीचे वर्तन योग्य आहे की नाही, याची शहानिशा कुलांच्या नियमनांच्या निकषावर केली जाते. व्यक्तीच्या वर्तनावर कुलाचा नैतिक दबाव असतो. आधुनिक काळात कुलाची जागा इतर मंडळीनी जरी घेतली असली तरी सुध्दा कुलाचार व कुलप्रतिष्ठा अबाधित ठेवण्याची काळजी घेतली आहे.

कुलाचे सर्वात महत्त्वाचे व मूलभूत स्वरूपाचे सामाजिक कार्य म्हणजे कुलसदस्यांचे विवाहविषयक संबंध नियंत्रित करणे होय. कुलाची उत्पत्ती एकाच पूर्वजांपासून झालेली आहे, असे मानले गेल्याने सर्व कुलसदस्य एकाच रक्तामांसाचे आहेत, अशी श्रध्दा असते. एकाच कुलातील स्त्री-पुरुष हे परस्परांचे 'भाऊ-बहिण' आहेत म्हणून त्यांच्यातील विवाह संबंध निषिध्द मानले जातात. एकाच कुलातील स्त्री-पुरुषांचे विवाह झाल्यास समाज त्याची गंभीर दखल घेत असतो. अमेरिकेतील 'क्रो' जमातीत अशा स्त्री-पुरुषांची टवाळी केली जाते. पश्चिम महाराष्ट्रातील वारली, भिल्ल, दक्षिण भारतातील तोडा, पश्चिम भारतातील कोळी, उत्तर भारतातील संमाळ, मध्य भारतातील कोरकू व गोंड या जमातीत कुल-बहिर्विवाह आढळतो.

**२. संरक्षणात्मक कार्य :** कुलसदस्यांचे रक्ताचे नाते पाहता त्यांचे एकमेकांशी संबंध, सलोखा, जिव्हाळा, सहकार्य यावर आधारलेले असतात. एकमेकांच्या संकटाचे निवारण करणे हे कुलाचे सूत्र ंसते. आजारी, अपंग, कमकुवत असणाऱ्या कुलसदस्याला मदत करणे हे कर्तव्य मानले जाते.

व्यक्तीपेक्षा कुल हे श्रेष्ठ मानले जाते. व्यक्तीचे सर्व दृष्टीने संरक्षण करण्याची जबाबदारी आपोआपच कुलावर पडत असते. व्यक्तीच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याचे कार्य कुल करीत असते. एखाद्या कुलसदस्यांवर परकीयांचा हल्ला झाल्यास सर्व कुलसदस्य कोणत्याही संकटाची पर्वा न करता मदतीला जात असतात. ''कोणत्याही कुलसदस्याची अडचण हीच आपली अडचण मानली जाते. एखाद्या सदस्यास दुसऱ्याने त्रास दिल्यास त्याचा बदला इतर कुलसदस्य घेत असतात. कुलसदस्यांस मानसिक संरक्षण मिळत असते.

**३. नियंत्रणात्मक कार्य :** कुलातील प्रत्येक व्यक्तीला संरक्षण देण्याची जबाबदारी कुळाची असते, तसेच कुलसदस्यांबरोबर सर्व दृष्टीने नियंत्रण करणे हीही जबाबदारी कुलाची असते. प्रत्येक कुलसदस्याचे वर्तन कुलाचाराला अनुरूप असले पाहिजे असा कुलाचा दंडक असल्याने व्यक्तीच्या वर्तनाला एकप्रकारे नैतिक अधिष्ठान प्राप्त झालेले असते. कुलाचार व कुलपरंपरा या मूल्यांना प्रत्येक कुलसदस्य जीवापाड जपत असतो.

जे कुलसदस्य कुलपरंपरेची 'लक्ष्मणरेषा' ओलांडतात, त्यांचाही बंदोबस्त करण्याचे काम कुलसंघटनाच करते. कोणत्याही समाजात नीतिनियम व कायदा मोडणाऱ्या बंडखोर सदस्यांना वठणीवर आणणे जरूरीचे असते. कुलपरंपरा धाब्यावर बसविणाऱ्या अपराध्यांना कुलबहिष्कृत करण्याचे जबरदस्त शासन करीत असते.

कुलसदस्यांनी एकमेकांशी कसे वर्तन व संबंध ठेवावेत याविषयी कुलदक्ष असते. रक्तसंबंधाच्या नात्यावर आधारलेल्या कुलसदस्यांचे संबंध सलोख्याचे व्हावेत म्हणून कुलसंघटना प्रयत्नशील असते. त्यांनी कोणती वैवाहिक व इतर पथ्ये पाळली पाहिजेत, यासंबंधी कुलाचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. कुलातील लोकांशी संबंध कसे असावेत, त्यांच्याबरोबर कितपत व्यवहार ठेवावेत, त्यांच्याशी मित्रत्वाची की शत्रुत्वाची भावना असावी असे कुलाचे अलिखित दंडक असतात. कुलसदस्य कुलाचारांचे पालन करतात की नाही हे पाहण्यासाठी कुलपंचायतीची स्थापना केली जाते. या कुलपंचायतीसमोर गुन्हेगारावर आरोप केले जातात. गुन्हेगाराला आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य असते. कुलपंचायत आपले न्यायदानाचे काम ताबडतोब करीत असते.

**४. शासकीय कार्य :** शासकीयदृष्ट्या कुल ही मोठी संघटना आहे. कुटुंबसंघटनेशी तुलना करता कुलसंघटना अधिक व्यापक व मजबूत असल्याचे दिसून येते. प्रत्येक कुलाची शासकीय कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी कुलाची रचना केलेली असते. प्रत्येक कुळाचा कुलप्रमुख निश्चित झालेला असतो. कुलप्रमुखाचे पद मानाचे व अधिकाराचे असते. तसेच हे पद अनुवंशिक असते. सर्व शासकीय कार्याची अंमलबजावणी करण्याचे काम कुलप्रमुखाला जातीने करावे लागते. अमेरिकेतील असटेक जमातीत जमात पंचायत वीस कुलप्रमुखांची असते. या जमात पंचायतीमार्फत न्यायदानाची, अंमलबजावणीची, शासकीय कार्ये पार पाडली जातात. प्रत्येक कुलप्रमुखाला मदतीसाठी एक सल्लागार मंडळही असते.

**५. आर्थिक कार्य :** कुलाच्या मालकीची विविध प्रकारची मालमत्ता असते. शेतजमिन, देवळे, राहावयाची घरे, अन्न पिकविण्यासाठी जमीन, कपडे, हत्यारे, उपकरणे इत्यादी मालमत्तेचा समावेश मूर्त मालमत्तेत तर मंत्र, जादूटोणा, दंतकथा, लोकगीते इत्यादीचा समावेश अमूर्त मालमत्तेत केला जातो. या मालमत्तेचे वितरण व नियंत्रण कुलाला करावे लागते. कुलाने दिलेली मालमत्ता व्यक्तीने विश्वस्तासारखीच जपावयाची असते. आशिया, अमेरिका व आफ्रिका खंडातील जमातीत कुलाला याच स्वरूपाची कार्ये पार पाडावी लागतात.

**६. धार्मिक कार्य :** कुलाला धार्मिक कार्याचे व्यवस्थापन करावे लागते. प्रत्येक कुलाचा देवदेवतांची पूजाअर्चा करणे जरूरीचे असते. प्रत्येक कुलाचा एक देवर्षी असतो. कुलाची धार्मिक कृत्ये देवर्षीच पार पाडत असतो. कुलाच्या कुलदेवतांच्या पूजाअर्चा बरोबरच देवकाविषयी धार्मिक जपणूक करण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. देवकाचा आदर वृध्दिंगत करताना देवकाविषयी पथ्ये काटेकारेपणे सदस्यांकडून पाळली जातात की नाही हे देवर्षी पाहत असतो. उदा. देवकाचे चित्र प्रत्येक सदस्याच्या घरावर असते, प्रत्येक कुलसदस्याने आदर दाखविणे, देवक जर प्राणी असेल तर त्याचे मांस त्या कुलसदस्यांनी न खाणे इ. धार्मिक कृत्ये कुलसदस्यांनी करावीत. रूआंडामधील आदिवासी म्हैस हे देवक मानत असल्याने म्हैशीविषयी त्यांची धार्मिक भावना वरीलप्रमाणे व्यक्त केली जाते.

## ❑ कुलचिन्हवाद किंवा देवक/कुलप्रतिकवाद (Totemism)

एकाच पूर्वजापासून एकाच कुलातील सर्व सदस्यांची निर्मिती झालेली आहे. या विश्वासावर कुलाची उभारणी झालेली असते. एकाच कुलातील सदस्य परस्परांचे रक्ताच्या नात्यातील भाऊबंद समजले जातात. ज्या पूर्वजापासून कुलाची उत्पत्ती झाली तो पूर्वज सत्य किंवा काल्पनिक पूर्वज मानव असतो असे नाही. पशु, पक्षी, वनस्पती किंवा इतर कोणतीही नैसर्गिक वस्तू इ. चा समावेश पूर्वज म्हणून होत असल्याचे दिसून येते. त्या सजीव किंवा निर्जीव वस्तूला देवक किंवा कुलचिन्ह असे म्हणतात. त्या सजीव किंवा निर्जीव वस्तूबाबत त्या कुलातील सदस्य विशिष्ट तऱ्हेचे आचरण करतात. कुलचिन्हाबाबत आदर व श्रध्दा त्यांच्या आचरणातून व्यक्त होतात. यालाच कुलचिन्हवाद (Totemism) असे म्हणतात.

'मानवशास्त्रावरील टीपा व प्रश्न' या अधिकृत ग्रंथात 'कुलचिन्हवाद' किंवा 'देवक' याचा अर्थ स्पष्ट केला आहे.

''कुलचिन्हवाद'' या संकल्पनेचा वापर जादू व धर्मप्रथेशी संबंधित असणारे एक सामाजिक संघटन म्हणूनच केला जातो. कुलचिन्हवादाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कुलचिन्हाच्याद्वारा विशिष्ट अशा सजीव किंवा निर्जीव वस्तूंशी आदिवासी आपल्या कुलाचा संबंध जोडतात.[१]

हरस्कोविट्झ यांचे मते वरील व्याख्येशी मिळतेजुळते आहे. ते म्हणतात. ''कोणत्याही आप्तसंबंधित मानवी समुदायाचा वनस्पती किंवा प्राणी किंवा निसर्गवस्तूंशी प्रस्थापित केलेल्या अद्‌भुत संबंधावरील विश्वास म्हणजे **'कुलचिन्हवाद'** होय.''[२]

**रॉबर्ट लुई** यांनीही कुलचिन्हाची व्याख्या करताना ''कुलाची उत्पत्ती नैसर्गिक वस्तूपासून झाली आहे या विश्वासाला महत्त्व दिले आहे. कुलाशी संबंध असणाऱ्या प्राणी, वनस्पती किंवा इतर वस्तू यांना 'कुलचिन्ह' असे म्हणतात व कुलचिन्हवाद म्हणजे सजीव किंवा निर्जीव वस्तूविषयक रिवाज होय.''[३]

रॅडक्लिफ ब्राऊन म्हणतात, ''समाजजीवनात महत्त्वपूर्ण असणाऱ्या प्राणी, वनस्पती किंवा नैसर्गिक वस्तू व समाज यांच्यामधील विशिष्ट तऱ्हेच्या संबंधावरील विश्वास व प्रथा यांचा समुच्चय म्हणजे कुलचिन्हवाद होय.''[४]

गोल्डनवायझर व्याख्या करतात, ''आदिम जमातीत अधिभौतिक बाबीशी संबंधित असणारे कुलासारखे एक सामाजिक संघटन असते. कुलचिन्हवाद म्हणजे अशी अधिभौतिक बाब की, ज्यामध्ये प्राणी, वनस्पती किंवा निसर्गातील वस्तूविषयक विशिष्टपूर्ण अभिवृत्ती दिसून येते.''[५]

## ❑ कुलप्रतिकवादाची वैशिष्ट्ये :-

भारतातील आदिवासी जमाती व जातिसंस्थांची उभारणी कुलप्रतिकवादावर झालेली दिसून येते.

आज आदिवासींच्या कुलप्रतिकवादावर विसर पडत चालला असला तरी कुलप्रतिकवादावर श्रध्दा, विश्वास कमी झाला नाही. १९७१ साली जे लॉग या आंग्ल व्यक्तीने नॉर्थ अमेरिकन इंडियन्सकडून 'कुलप्रतिक' हा शब्द उच्चारला. ऑस्ट्रेलिया, आफिक्रा, उत्तर अमेरिका, अमेरिकन इंडियन्स व भारतातील आदिम जमातीच्या कुलप्रतिकवादावर विश्वास आहे. भारतातील सर्वच आदिवासी हे वनस्पती, प्राणी, पक्षी व निसर्गातील काही वस्तू पवित्र मानतात. प्राण्यांना न मारणे, वनस्पती नष्ट न करणे असे श्रध्दायुक्त आचरण करतात. कुलप्रतिकवादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

**१. कुलचिन्हाचे अस्तित्व :** प्रत्येक कुलाला विशिष्ट असे कुलचिन्ह असते. एकाच कुलातील सर्व सदस्यांचा असा विश्वास असतो की, त्यांच्या कुलाची उत्पत्ती कोणत्या तरी सजीव किंवा निर्जीव वस्तूपासून झाली आहे. याच सजीव किंवा निर्जीव वस्तूला 'देवक' किंवा 'कुलचिन्ह' असे म्हणतात. प्राणी, पक्षी, वनस्पती, सूर्य, वारा यासारख्या मानवेतर व निसर्गशक्तींपासून कुलाची उत्पत्ती झाली आहे असे मानण्यात येते. तेच कुलाचे कुलचिन्ह असते. उदा. भारतातील ठेलकी खारिया जमातीत आठ कुलांचे अस्तित्व आहे. प्रत्येक कुलाचे स्वतंत्र कुलचिन्ह असल्याचे दिसून येते. कासव, खडक, हरीण, पक्षी, ईल मासा, वाघ, खार व फळ इत्यादी.

**२. कुलचिन्हाविषयी आदर :** ज्या सजीव किंवा निर्जीव वस्तूपासून कुलाची उत्पत्ती झाली आहे, त्या कुलप्रतीकाकडे बघण्याचा कुलसदस्यांचा दृष्टिकोण अत्यंत आदराचा व श्रध्देचा असतो. हे कुलचिन्ह प्राणी, पक्षी असेल तर त्याची हत्या करीत नाहीत. या कुलचिन्हांचे मांस खाणे निषिध्द मानले जाते. धार्मिक समारंभाच्या वेळीच कुलप्रतिकाचे मांस खाणे मंजूर असते. कुलचिन्ह असलेल्या प्राण्यांचे मांस विधियुक्त खाल्यास त्या प्राण्याशी एकरूप होता येते, अशी आदिवासींची श्रध्दा असते. कुलचिन्ह असलेल्या प्राण्याचा मृत्यू झाल्यास त्याचे दफन आदराने केले जाते व सुतकही पाळले जाते. कुलचिन्ह अंगावर गोंदून घेण्याची प्रथा असते. महाराष्ट्रातील कातकरी लाल तोंडाच्या माकडाला मारीत नाहीत. वडार लोक अंजिराचे झाड कापत नाहीत.

**३. बहिर्विवाहाची पध्दत :** एकच देवक किंवा कुलचिन्ह असलेल्या भिन्न कुलांतील सदस्यांचा पूर्वज एकच आहे. समान कुलचिन्ह असलेल्या कुलातील सदस्यांचे आंतरविवाह होऊ शकत नाही. साहजिकच भिन्न देवक किंवा कुलचिन्ह असणाऱ्या कुलांतूनच सहचारी निवडावा लागतो.

**४. कुलचिन्हाविषयी श्रध्दा :** कुलचिन्हाविषयी श्रध्दा आदिवासींच्यात दिसून येते. कुलचिन्ह प्राणी असेल तर कुलाचे संरक्षण करतो. कुलाचे सातत्य त्या प्राण्यामुळेच टिकून राहते. मुलाच्या जन्माच्यावेळी कुलचिन्हाच्या नावाचा जप श्रध्देने केला जातो. मूल जन्मल्यानंतर कुलचिन्ह असणाऱ्या प्राण्यांचे कातडे त्याच्या अंगावर घातले जाते. कुलचिन्ह प्राणी हिंस्र असला तरी कुलसदस्याचे संरक्षण करतो. जेव्हा आदिवासींच्यावर संकट कोसळते तेव्हा कुलचिन्ह सदस्यांच्या रक्षणास येत असते. या संकटाची पूर्वसूचना कुलचिन्ह त्या-त्या व्यक्तीला स्वप्नात देत असतो.

५. **कुलचिन्हाचे अनन्यसाधारण महत्त्व :** मध्य व पूर्व भारतातील उराँव, हो, घोटा नागपूरमधील मुंडा जमातीत देवक चिन्हे असलेली कुळे बहिर्विवाही कुळे आढळतात. उरॉव जमातीत ७३ कुळे, हो जमातीत ५० व मुंडा जमातीतल ३२३ कुळे आढळतात.

## ❑ सामाजिक ऐक्यभाव :–

समान कुलचिन्ह असणाऱ्या कुलसदस्यांच्या प्रथा, रीतिरीवाज, रूढी, प्रथा, जीवन तत्त्वज्ञान समान असतात. त्यामुळे सामाजिक ऐक्यभाव निर्माण होणे शक्य होते.

सर्व कुलसदस्यांत **आपलेपणाची भावना** असल्याने एकमेकांना मदत करणे, एकमेकांना भेटी देणे, संकटकाळात एकमेकांच्या हितसंबंधाचे संरक्षण करणे हे समान कुलचिन्ह असणाऱ्या कुलसदस्यांचे कर्तव्य मानले जाते.

**सामूहिक जबाबदारी**चे तत्वानेही कुलभावना तीव्रपणे असल्याचे दिसून येते. एकच कुलचिन्ह असलेले कुलसदस्य हे गोत्रज असल्याने त्यांच्याकडून होणाऱ्या चांगल्या–वाईटाचे भूषण व दूषण कुलालाच लाभत असते. ज्या कुलसदस्याने खूनासारखे दृष्कृत्य केलेले असते त्याचे दूषण त्या सदस्याला न देता त्याच्या कुलाला दिले जाते.

## ❑ धार्मिक महत्त्व :–

आदिवासी निसर्गाच्या सानिध्यात राहत असल्याने, निसर्गात होत असणाऱ्या चमत्काराचे ते साक्षीदार असतात. वादळे, भूकंप, ज्वालामुखी या नैसर्गिक संटकानी स्तिमीत होतात. म्हणून निसर्गशक्तींना संतुष्ट करण्यासाठी 'कुलप्रतिकवादाची' योजना केली असावी.

कुलचिन्हाविषयी त्यांची भावना आदरयुक्त भितीची असते. कुलचिन्ह असणाऱ्या प्राण्याचे सुतक पाळणे, त्याचे आदराने दफन करणे, त्याच्या नावांचा जप करणे, त्या प्राण्याचे कातडे वापरणे इत्यादी प्रथांवरून यांची धार्मिक भावना स्पष्ट होते. भारतातील आदिवासीप्रमाणे प्रगत समाजातही देवकाविषयी आदरयुक्त भावना दिसून येते. तुलसी, बैल, वनस्पती, नदी, अग्नी, वायू, सूर्य या निसर्गशक्ती तसेच वाघ, मांजर, माकड, नाग, गाय, बैल, हत्ती याविषयी पवित्र भावना भारतीयांच्या मनात वास करते. या प्राण्याची हत्या करणे निषिद्ध मानले जाते. संन्याशी व साधक हे वाघाचे कातडे आसनासाठी वापरतात. मांजराची जर हत्या चुकून जरी झाली तरीसुद्धा त्याचे पाप मानून घेण्याची प्रथा हिंदूंच्यात आहे. मोर हे सरस्वतीचे, गरूड विष्णूचे, उंदीर गणपतीचे वाहन मानल्याने पशु–पक्ष्यांना पवित्र मानले जाते.

## ३.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

**अ) खालील प्रश्नांची एक वाक्यात उत्तरे लिहा.**

१. एकविवाह म्हणजे काय ?

२. बहुविवाह म्हणजे काय ?

३. बहुपती विवाह म्हणजे काय ?

४. बहुपत्नी विवाह म्हणजे काय ?

५. समुह विवाह म्हणजे काय ?

६. क्रय विवाह म्हणजे काय ?

७. सेवा विवाहातील सेवेचा कालावधी किती असतो ?

८. विनिमय विवाहासाठी कोणती मुख्य अडचण असते ?

९. अपहरण विवाह म्हणजे काय ?

१०. परीक्षण विवाहात कोणाची परीक्षा / कसोटी घेतली जाते ?

**ब) गाळलेल्या जागा भरा.**

१. सहपलायन विवाहाला ........................ विवाह असेही म्हणतात.

२. परीक्षण विवाहाचा .................... हा एक नमुनेदार प्रकार भिल्ल जमातीत आढळतो.

३. कुटुंब हा घटक ................. वर आधारीत सामाजिक समुह आहे.

४. कुटुंबात अपत्यप्राप्ती झाली नसेल तर .................. पर्याय निवडला जातो.

**क) रिकाम्या जागी योग्य पर्यायी उत्तर निवडून लिहा.**

१. आदिवासी विवाह हा एक ................. आहे.

*(अ) संस्कार (ब) करार (क) दिखाव (ड) निधी*

२. बहुपती विवाहात ................. ची संख्या अधिक असते.

*(अ) पतींची (ब) पत्नींची (क) पती-पत्नींची (ड) यापैकी नाही.*

३. .................. हा विवाह प्रकार आदर्श मानला जातो.

*(अ) बहुपती (ब) बहुपत्नी (क) एक पती पत्नी (ड) समुह विवाह*

४. हठागमन विवाहालाच महाराष्ट्रात ............... असे म्हणतात.

*(अ) पैठुविवाह (ब) घरघुशी विवाह (क) संती विवाह (ड) यापैकी नाही.*

५. कोलाम जमातीत घटस्फोटाचा विधी म्हणून ................. विधी होतो.

*(अ) काडीमोड विधी (ब) दंड (क) अपहरण (ड) यापैकी नाही.*

## ३.५ सारांश (Let us sum up)

सामाजिक संस्था या सर्वच मानव समाजात आढळून येतात. प्रत्येक समाजात त्याचे स्वरूप व प्रकार भिन्न असतात. प्रगत समाजात आढळणारी न्यायसंस्था, राज्यसंस्था आदिवासीत नसली तरी आदिवासींची जमात न्यायपद्धती, ग्रामव्यवस्था मंडळ हे असतेच. त्यामुळे सर्वच समाजात सामाजिक संस्था आहेत. त्यांचे स्वरुप भिन्न असते. या प्रकरणात आपण आदिवासी समाजातील सामाजिक संस्थांचा अभ्यास केला. आदिवासींच्या विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, धर्मसंस्था या तीन सामाजिक संस्थांचा या प्रकरणात आपण काही घटकांच्या अनुषंगाने अभ्यास केला आहे. आदिवासींच्या विवाहाचे स्वरूप, जोडीदार निवडीच्या पद्धती, आधिमान्य विवाह प्रकार, कुटुंबसंस्थेच्या स्वरुपासह आदिवासी कुटुंबांची वैशिष्ट्ये आदिवासी धर्माचे स्वरुप, धर्माचरण (कर्मकांड) या काही घटकांचा अभ्यास या ठिकाणी आपण पाहिला आहे. आदिवासी समाजाच्या सर्वच सामाजिक संस्थांचे स्वरुप अगदीच वेगळे आहे. त्यामुळे आदिवासी समाज हा एक समाजशास्त्राचा अविभाज्य अभ्यासविषय असून त्यातील विवाहसंस्था, कुटुंबसंस्था आणि धर्मसंस्था यातील निवडक घटकांचा आपण समग्र अभ्यास याठिकाणी केला आहे.

## ३.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your Progress)

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. ज्या विवाह प्रकारात एकच पती व एकच पत्नी यांचा विवाह होतो त्यास एकविवाह असे म्हणतात.

२. ज्या विवाहात एक किंवा अनेक पती आणि एक किंवा अनेक पत्नी सहभागी होतात किंवा विवाहात वधु अथवा वर या जोडीदारांची संख्या अधिक असते त्यास बहुविवाह असे म्हणतात.

३. एकच पत्नी आणि अनेक पती अशा विवाहप्रकारास बहुपती विवाह असे म्हणतात.

४. एकच पती आणि अनेक पत्नी अशा विवाहप्रकारास बहुपत्नी विवाह असे म्हणतात.

५. ज्या विवाह प्रकारात पती आणि पत्नी अशा दोन्ही जोडीदारांची संख्या दोन अथवा अधीक असते त्यास समुह विवाह असे म्हणतात.

६. वधुमूल्य देऊन वधु विकतच घेण्याची पद्धती म्हणजे क्रयविवाह पद्धती होय.

७. सेवा विवाहातील सेवेचा कालावधी किमान सहा महिने ते एक वर्ष असतो तर काही ठिकाणी तो सात आठ वर्षांपर्यंतही असतो.

८. विनिमय विवाहासाठी दोन्ही कुटुंबात विवाहयोग्य वयाचा मुलगा आणि मुलगी असावी लागते हीच मुख्य अडचण असते.

९. वरास पसंत असलेली मुलगी वधुपित्याच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने पळवून नेऊन तिच्याशी विवाह करणे यास अपहरण विवाह असे म्हणतात.

१०. परीक्षण विवाहात विवाह इच्छुक वराची परीक्षा/ कसोटी घेतली जाते.

११. आते-मामे भावंडांचा विवाह, चुलत अगर मावस भावंडांचा विवाह, दीर भावजय विवाह, मेहुणा मेहुणी विवाह हे प्रमुख अधिमान्य विवाहप्रकार आहेत.

**ब) गाळलेल्या जागा भरा.**

१. सहपलायन विवाहाला राजीखुषी विवाह असेही म्हणतात.

२. परीक्षा विवाहाला गोल गधेडो हा एक नमुनेदार प्रकार भिल्ल जमातीत आढळतो.

३. कुटुंब हा घटक विवाहावर आधारित सामाजिक समुह आहे.

४. कुटुंबात अपत्यप्राप्ती झाली नसेल तर दत्तक प्रथा हा पर्याय निवडला जातो.

**क) रिकाम्या जागी योग्य पर्यायी उत्तर निवडून लिहा.**

१. आदिवासी विवाह हा एक करार आहे.

२. बहुपती विवाहात पतींची संख्या अधिक असते.

३. एक पतीपत्नी (एकविवाह) हा विवाहप्रकार आदर्श मानला जातो.

४. हठागमन विवाहालाच महाराष्ट्रात घरघुशी विवाह असे म्हणतात.

५. कोलाम जमातीत घटस्फोटाचा विधी म्हणून काडीमोड विधी होतो.

## ३.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise / Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. जोडीदार निवडीच्या पद्धतीचे (मार्गांचे) वर्णन करा.

२. अधिमान्य विवाह प्रकारांची सविस्तर चर्चा करा.

३. आदिवासी कुटुंबाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४. कुलाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

५. कुलाची कार्ये विशद करा.

६. कुलप्रतिकवादाची वैशिष्ट्ये/लक्षणे स्पष्ट करा.

**प्रश्न १ : रिकाम्या जागा भरा.**

१. कुलाची निर्मिती .............. पक्षीय तत्त्वावर झालेली असते.

२. कुटुंबाची निर्मिती ............ पक्षीय तत्त्वावर झालेली असते.

३. ............. हा एकपक्षीय आप्तसंबंधाधिष्ठित समूह होय.

४. प्रत्येक कुलाचा ............ निश्चित झालेला असतो.

५. कुलाची .............. मालमत्ता असते.

६. कुल हा ............... समूह होय.

७. ................ जमातीत २०० कुले आहेत.

**प्रश्न ३ : टीपा लिहा.**

१. क्रयविवाह

२. सेवा विवाह

३. विनिमय विवाह

४. सहपलायन विवाह

५. परीक्षण विवाह.

६. हठागमन (घरघुशी) विवाह.

७. आधिमान्य विवाह

८. आदिवासी कुटुंबाची वैशिष्ट्ये

९. कुलाचे स्वरूप

१०. कुल व कुटुंब भेद

११. कुलाचे धार्मिक कार्य.

## ३.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- विवाह आणि त्याचे बदलते स्वरुप यावर गटचर्चा करा.
- आजचे विवाहाचे स्वरुप कसे असावे याबाबत समाजातील जाणकारांच्या मुलाखती घ्या.
- नोंदणी विवाह पद्धतीचे फायदे यावर गटचर्चा करा.

## ३.९ पारिभाषिक शब्द/संज्ञा (Glossary)

१. **इनंगू :** ज्या कुटुंबांचे परस्पर सामाजिक आणि आर्थिक हितसंबंध आहेत अशा कुटुंबांच्या गटाला 'इनंगू' असे म्हणतात.

२. **सोयरिक :** तरुण तरुणी यांच्यात विवाहाने नाते जोडणे, दोन कुटुंबांचे विवाह माध्यमाने नाते जोडणे म्हणजेच सोयरिक करणे होय.

३. **दुय्यम बायको** (Secondary wife) : साधारणतः पहिली पत्नी हयात असताना प्रसंगानुरुप अथवा हौसेखातर केली जाणारी दुसरी पत्नी. जिला पत्नीचा फारसा दर्जा, स्थान प्राप्त करून दिले जात नाही. अशा स्त्रीला दुय्यम बायको असे म्हणतात.

४. **गळसरी :** सौभाग्याचे प्रतिक अर्थात मंगळसुत्र.

५. **दोरा :** सौभाग्याचे प्रतिक म्हणून विवाहीत स्त्रियांनी गळ्यात बांधलेली गळसरी.

## ३.१० अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)


१. **Mujumdar D. N.** and **Madan T. N.** : *"An Introduction to social Anthropology"*, Asia Publishing House, Bombay, 1973.

२. **Vidyarthi L. P.** : *"Tribal culture of India"*, Concept publishers, New Delhi - 1976.

३. **डॉ. विलास संगवे** : *''आदिवासींचे सामाजिक जीवन''*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२

४. **डॉ. प्रदीप आगलावे** : *''सामाजिक मानवशास्त्र''*, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८

५. **प्रा. ए. वाय. कोंडेकर, प्रा. डॉ. मंगला पाटील** : *''आदिवासींचे समाजशास्त्र''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

६. **प्रा. डॉ. गुरुनाथ नाडगोंडे :** *''भारतीय आदिवासी''*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३०.

७. **प्रा. माधव कशाळीकर व प्रा. जयवंत कांबळे :** *''आदिवासी भारत''*, प्रकाशक- अनिलकुमार मेहता, अजब पुस्तकालय, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.

❀ ❀ ❀

घटक-४

# आदिवासींचा धर्म

# (Tribal Religion)

**घटक संरचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ आदिम धर्मश्रध्दा व धर्माचरण

४.२.२ जादूचे स्वरूप आणि प्रकार

४.२.३ भगत आणि पुरोहित

४.३ सारांश

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ स्मरणार्थ संज्ञा

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हांस,

१. आदिम धर्मश्रध्दांचे व धर्माचरणाचे प्रकार स्पष्ट करता येतील.

२. जादूचे स्वरूप व प्रकार सांगता येतील.

३. भगत व पुरोहित या धर्मव्यवसायिकांचे आकलन होईल.

## ४.१ प्रस्तावना

आदिम समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी आदिम लोकांच्या धर्माचे व जादूचे स्वरूप समजावून घेणे भाग पडते. कारण आदिम लोकांवर व त्यांच्या सामाजिक जीवनाच्या अंगांवर धर्म व जादू यांचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळे आदिम धर्म व जादू यांचा अभ्यास या घटकात आपण करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे तीन विभाग पाडले असून पहिल्या विभागात आदिम धर्मश्रध्दांचे विविध प्रकार पाहू. उदा. सर्वात्मवाद, शक्तिवाद, निसर्गवाद व देवकवाद यांची सविस्तर चर्चा केलेली आहे. दुसऱ्या विभागात जादूची व्याख्या, स्वरूप व प्रकार स्पष्ट केलेले आहेत, आणि तिसऱ्या विभागात आदिम समाजातील भगत व पुरोहित या दोन धर्मव्यवसायिकांचे स्वरूप व कार्य यांचे विवेचन केलेले आहे.

### ४.२.१ आदिमांच्या धर्मश्रध्देचे व धर्मांचरणाचे प्रकार (Types of Religious beliefs and practices of Tribal People)

धर्म ही सार्वत्रिक स्वरूपाची सामाजिक संस्था आहे. प्रगत समाजाप्रमाणेच आदिम समाजातही धर्मसंस्थेचे अस्तित्व आढळून येते.

''धर्म ही श्रध्दा आणि विधी यांची एक व्यवस्था आहे.'' ("Religion is a system of beliefs and practics.")

त्यामुळे कोणत्याही धर्मांचे स्वरूप समजावून घेण्यासाठी त्या धर्मातील विविध धर्मश्रध्दांचे व धर्माचरणाचे प्रकार म्हणजेच धार्मिक वर्तनाचे प्रकार अभ्यासावे लागतात. म्हणून या घटकात तुम्ही आदिम धर्मातील धर्मश्रध्दा व धर्माचरण समजावून घेणार आहोत.

- **आदिम धर्मश्रध्दा (Tribal Religious Beliefs)**

धर्मांचा संबंध अलौकिक किंवा दिव्य शक्तिशी आहे. या दिव्यशक्तीच्या स्वरूपाबाबत वेगवेगळ्या धर्मात वेगवेगळ्या श्रध्दा किंवा विश्वास आढळतात. या विश्वासानाच धर्मश्रध्दा किंवा धार्मिक श्रध्दा असे म्हणतात. जगातील वेगवेगळ्या धर्मांत वेगवेगळ्या धर्मश्रध्दा आढळतात. आदिम समाजातही वेगवेगळ्या धर्मश्रध्दा आहेत. त्यापैकी महत्त्वपूर्ण अशा पुढील चार धर्मश्रध्दा ंहेत.

१. सर्वात्मवाद (Animism)

२. शक्तीवाद (Animitism)

३. निसर्गवाद (Naturalism)

४. देवकवाद (Totemism)

या चार धर्मश्रध्दांचे स्वरूप आपण आता क्रमाक्रमाने समजावून घेणार आहोत.

**१. सर्वात्मवाद (Animism)**

प्रसिध्द मानवशास्त्रज्ञ **एडवर्ड टायलर** यांनी सर्वात्मवादाचा सिध्दांत मांडला आहे. त्यांच्या मते, आदिम समाजात आत्म्याच्या अस्तित्वावरील विश्वास आढळतो. सृष्टीतील सर्व सजीव तसे निर्जीव वस्तूंमध्ये आत्मा (Soul) हे मूलतत्त्व आहे. अशी आदिम लोकांची गाढ श्रध्दा आहे. या श्रध्देलाच 'सर्वात्मवाद' किंवा 'आत्मवाद' असे म्हणतात. टायलर म्हणतात, प्राथमिक अवस्थेतील मानवास झोप, स्नान, मृत्यू, प्रतिध्वनी इतयदी घटनांचा अनुभव येऊ लागला. या घटनांमुळेच मानवाच्या शरीरात शरीराहून वेगळे असे एक तत्व आहे, अशी कल्पना स्फूरली. मनुष्य जेव्हा झोपतो तेव्हा त्याला झोपेत स्वप्ने पडतात. स्वप्नात तो दूरच्या स्थळी जातो, कधीही न पाहिलेल्या वस्तू व व्यक्ती पाहतो. अनोळखी तसेच ओळखीच्याव व्यक्तींशी संवाद साधतो एवढेच नव्हे तर मरण पावलेल्या व्यक्तींचेही त्याला दर्शन होते. यावरून मानवाने अशी कल्पना केली की, झोपेत असताना आपल्या शरीरातील एक मूलतत्त्व शरीर सोडून बाहेरच्या विश्वात संचार करते व जागृत अवस्था आली की, ते तत्त्व पुन्हा परत शरीरात येते. स्वप्नाप्रमाणे मृत्यू या घटनेचा वारंवार अनुभव आल्यानंतर मानवाने अशी कल्पना केली की, जोपर्यंत शरीरात मूलतत्त्व असते तोपर्यंत शरीर जिवंत राहते आणि जेव्हा हे मूलतत्त्व शरीरास कायमचे सोडून जाते, तेव्हा मात्र व्यक्ती मृत्यू पावते. अशा या मूलतत्वासच आत्मा असे म्हटले गेले. एखाद्या व्यक्तीचा आत्मा तिला कायमचा सोडून गेला की, तात्पुरता सोडून गेला हे ठरविण्यासाठी काही जमातीत एखादी व्यक्ती मरण पावली तरी तिच्या देहावर लगेच अत्यंविधी करीत नाहीत, तिचा आत्मा शरीरात परत येण्याची काही काळ वाट पाहतात. मात्र तो परत येत नाही हे काही काळाने लक्षात आल्यावर त्या देहावर अंत्यविधी करतात. स्वप्न व मृत्यूप्रमाणेच प्रतिध्वनी, प्रतिबिंब इत्यादी घटनांच्या अनुभवाने आदिमानवाची आत्म्याच्या अस्तित्वावरील श्रध्दा अधिक बळकट झाली.

मानवी शरीरास सोडून आत्मा जेव्हा जातो, तेव्हा तो शरीराप्रमाणे नष्ट न होता तो या विश्वात एक दिव्यप्राणी (spirtual being) बनून फिरत राहतो. पुढे आदिमानवाने अशीही कल्पना केली की, मानवाप्रमाणेच पशु, पक्षी, किटक, वनस्पती एवढेच नव्हेतर निर्जीव वस्तूमध्येही आत्मा असतो. आणि या सर्व सजीव-निर्जीव वस्तू नाश पावल्यानंतर त्यांच्यातील आत्मा दिव्य प्राणी बनून या विश्वात फिरत राहतो. त्यामुळे या विश्वात असंख्य आत्मे वास करीत राहतात. अशी आदिमानवाची श्रध्दा बनली. या

दिव्यप्राण्यांना भूत, प्रेत, पिशाच्च, देवदेवता म्हटले जाऊ लागले. हे दिव्यप्राणी मानवी जीवनावर चांगला तसेच वाईट प्रभाव टाकतात. त्यामुळेच मानवी जीवनात सुख-दुखे निर्माण होतात. अशीही त्यांनी कल्पना केली. एकंदरीत मानवाच्या सुखदु:खात हे दिव्य प्राणी जबाबदार असल्याने मानव त्यांची कृपा संपादन करण्यासाठी व त्यांची अवकृपा टाळण्यासाठी त्यांची पूजाअर्चा करू लागला. यातूनच वेगवेगळे धार्मिक विधी किंवा कर्मकांड उदयास आले. अशाप्रकारे आत्म्याच्या अस्तित्वावरील श्रध्देतून मानवी जीवनात धर्मांचा उदय झाला. असे मत टायलर यांनी मांडलेले आहे. त्यांच्या या मतासच 'सर्वात्मवाद' म्हणतात, आणि 'धर्म म्हणजे दिव्यप्राण्यांवरील श्रध्दा (belifs in spiritual beings) होय. अशी धर्माची व्याख्या करतात.

❑ **सर्वात्मवादाचे मूल्यमापन :-**

टायलर यांच्या सर्वात्मवादावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१. आत्म्याच्या अस्तित्वावरील श्रध्दा ही जगातील काही आदिम जमातीत आढळत नाही. त्यामुळे सर्वात्मवाद ही श्रध्दा सार्वत्रिक नाही.

२. मॅरेट यांच्या मते, अनेक जमातीत (उदा. मॅलेनेशिया बेटावरील आदिवासी, भारतातील हो आणि मुंडा या जमाती आत्म्याऐवजी माना किंवा बोंगा नावाच्या शक्तीवरील श्रध्दा आढळते.

३. टायलरच्या मते, सर्वात्मवाद धर्मांचे प्रारंभिक रूप आहे. पण रॉबर्ट लोवी यांच्या मते, धर्म व सर्वात्मवाद या दोन्ही बाबी एकसारख्या नाहीत.

४. टिकाकारांच्या मते, टायलर यांनी आदिम जमातीचे अनुभवजन्य निरीक्षण न करता केवळ आराम खुर्चीत बसून सर्वात्मवादाची मांडणी केलेली आहे. त्यामुळे त्यांचा सिद्धांत हा वास्तविक ठरत नाही. तसेच त्यांनी सर्वात्मवादाचे केलेले विवेचन हे खूपच तर्कशुध्द आहे. आदिमानव एवढा तर्कशुध्द विचार करीत नसावा.

५. दुर्खीमच्या मते, धर्म ही सामाजिक घटना असल्याने तिचा उदय समाजात शोधला पाहिजे. सर्वात्मवाद धर्माच्या उदयामागील सामाजिक घटकांकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे तो स्वीकारता येत नाही.

**२. शक्तीवाद (Animitism)**

सर्वात्मवादाप्रमाणेच आदिम समाजात आढळणारी दुसरी धर्मश्रध्दा म्हणजे 'शक्तीवाद' होय. कॉडरिंग्टन या विचारवंताने मॅलेनेशिया बेटावरील आदिवासींच्या धार्मिक श्रध्दांचा अभ्यास केलेला होता.

या अभ्यासावरून डॉ. मॅरेट या शास्त्रज्ञाने शक्तीवाद हा सिध्दांत मांडला. शक्तीवादाचे स्वरूप थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

डॉ. मॅरेट म्हणतात, या विश्वातील सर्व जड-अजड पदार्थांमध्ये एक विलक्षण अशी शक्ती आहे. ही शक्ती अनाकलनीय, अवैयक्तिक, अभौतिक, अमानवी अशा स्वरूपाची आहे. या शक्तीचे ज्ञान मानवाच्या इंद्रियाद्वारे होत नाही. त्यामुळे अतिंद्रिय स्वरूपाचे आहे. अशी ही शक्ती सर्वच व्यक्ती व वस्तूंमध्ये कमी-जास्त प्रमाणात आहे, अशी आदिवासी लोकांची श्रध्दा आहे. या श्रध्देलाच 'शक्तीवाद' असे म्हणतात. मॅलेनेशिया बेटावरील आदिवासी या शक्तीला 'माना' असे म्हणतात. तर भारतातील हो व मुंडा जमाती तिला बोंगा असे म्हणतात. म्हणून शक्तीवादास मानावाद किंवा बोंगावाद असेही म्हणतात.

शक्तीवादानुसार अलौकिक शक्तीचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

१. ही शक्ती अभौतिक स्वरूपाची आहे. त्यामुळे तिचे इंद्रियाद्वारे आकलन होऊ शकत नाही.

२. ही शक्ती व्यक्तिनिरपेक्ष आहे. म्हणजे ती विशिष्ट व्यक्ती वा वस्तूशी संबंधित नसते.

३. ही शक्ती अविनाशी आहे म्हणजे तिचा कधीच नाश होत नाही, त्यामुळे ती शाश्वत आहे.

४. सर्व जड-अजड वस्तूंमध्ये ही शक्ती असते. मात्र तिचे प्रमाण सर्व वस्तूत समान नसते तर ते कमीजास्त असते.

५. ही शक्ती प्रचंड सामर्थ्यशाली असते. ज्या व्यक्तीत किंवा वस्तूत ती प्रवेश करते, त्या व्यक्तीस व वस्तूसही प्रचंड सामर्थ्य प्राप्त होते आणि ही शक्ती जेव्हा एखाद्या व्यक्तीस किंवा वस्तूस सोडून जाते तेव्हा ती व्यक्ती वा वस्तू निष्प्रभ किंवा शक्तीहीन होते, असे मानले जाते. विद्वान, शूरवीर, निष्णात वैद्य, वेगवान घोडा, होडी, रामबाण औषध इत्यादीमध्ये या शक्तीचे प्रमाण जास्त असते. त्यामुळेच या व्यक्ती व वस्तूंना यश मिळत असते. जेव्हा ही शक्ती त्यांना सोडून जाते, तेव्हा त्या अपयशी ठरतात अशी आदिवासींची श्रध्दा असते.

अशा या अभौतिक, अनाकलनीय, व्यक्तिनिरपेक्ष, सामर्थ्यवान शक्तीच्या अस्तित्वावरील श्रध्दा आदिम लोकांत आढळते. या श्रध्देस शक्तीवाद म्हणतात.

### ❑ शक्तीवादाचे मूल्यमापन :-

शक्तीवादावर पुढीलप्रमाणे टीका केलेली आढळते.

१. अलौकिक शक्तीचे स्वरूप कसे आहे. याचे सविस्तर वर्णन शक्तीवादात आहे. पण ही शक्ती उदयास कशी आली. याचे स्पष्टीकरण शक्तीवादात नाही. ही या सिध्दांतातील सर्वात मोठी त्रुटी आहे.

२. अलौकिक शक्तीचे स्वरूप स्पष्ट करताना केलेले विवेचन हे अत्यंत बुध्दीवादी आहे. आदिवासी व्यक्ती एवढे बुध्दीवादी विवेचन करू शकत असेल हे पटत नाही.

३. दुर्खीमच्या मते, सर्वात्मवादाप्रमाणेच शक्तीवाद देखील धर्माच्या उदयास जबाबदार असणाऱ्या सामाजिक घटकांकडे दुर्लक्ष करतो. धर्मातील पवित्र-अपवित्र हा भेद शक्तीवादात आढळत नाही.

## ३. निसर्गवाद (Naturalism)

निसर्गवाद ही आदिम समाजातील तिसरी धर्मश्रध्दा आहे. जर्मन विचारवंत **मॅक्स मूल्लर** यांनी निसर्गवाद हा सिध्दांत मांडला आहे.

वेगवेगळ्या नैसर्गिक शक्तींच्या ठिकाणी दिव्य शक्ती असते. या शक्तींचा मानवी जीवनावर इष्ट-अनिष्ट प्रभाव पडतो. त्यामुळे निसर्गशक्तींना प्रसन्न ठेवण्यासाठी मानव त्यांची पूजाअर्चा करू लागला, यातून धर्म उदयास आला, असे मत मॅक्समूल्लर यांनी मांडलेले आहे. या मतासच निसर्गवाद असे म्हणतात.

निसर्गातील ऊन, वारा, पाऊस, अग्नि, वीज इत्यादी शक्तींचा तसेच सुर्योदय, सुर्यास्त, चंद्रोदय, चंद्रास्त, भकंप, महापूर, वादळे, ज्वालामुखीचा उद्रेक, अतिवृष्टी, अनावृष्टी इत्यादी घटनांचा मानवी जीवनावर चांगला-वाईट प्रभाव पडतो. हे आदिमानवाच्या लक्षात आले. जर पाऊस पडला तर धान्य, चारा, पाणी मिळते. अन्यथा उपासमार होते. भूकंप, वादळे, महापूर इत्यादी नैसर्गिक घटनांमुळे मानवाचे प्रचंड नुकसान या अनुभवाद्वारे नैसर्गिक शक्ती व नैसर्गिक घटना या आदिमानवास रहस्यमय किंवा अनाकलनीय वाटू लागल्या. त्यामुळे त्यांच्याविषयी त्यांच्या मनात भीतीयुक्त आदराची भावना निर्माण झाली. आपले जीवन हे निसर्गावरच पूर्णपणे अवलंबून आहे, अशी त्यांची धारणा झाली. त्यामुळे तो निसर्गातील विविध शक्तींची पूजाअर्चा करू लागला. महत्त्वाचे म्हणजे त्यांना प्रसन्न ठेवण्यासाठी वेगवेगळ्या विधी करू लागला. या निसर्गशक्तींनाच देवदेवता मानून (उदा. सूर्यदेवता, वायुदेवता, पर्जन्यदेवता, अग्निदेवता इत्यादी) या देवदेवतांचे ही एक वेगळे विश्व आहे. अशी कल्पना मानवाने केली. देवदेवतांनाही मानवाप्रमाणेच शरीर व भावभावना आहेत, असेही तो मानू लागला. या देवदेवता आपल्या जीवनावर प्रभाव टाकतात, त्यामुळे तो त्यांना प्रसन्न करून घेण्यासाठी त्यांची पूजा-अर्चा करू लागला. यातूनच धर्मांचा उदय झाला. अशी निसर्गवादातील मध्यवर्ती कल्पना आहे.

## ❑ निसर्गवादाचे मूल्यमापन–

निसर्गवादावर टिकाकारांनी पुढीलप्रमाणे टीका केलेली आहे.

१. निसर्गशक्तींची पूजाअर्चा करण्यातून धर्म उदयास आला असे निसर्गवाद म्हणतो. पण हे पूर्णत: खरे नाही. कारण अनेक धर्मात निसर्गशक्तींबरोबरच पशुपक्षी, वनस्पती, पूर्वज यांचीही पूजा केली जाते. निसर्गवाद या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. धर्माच्या उदयास अनेक घटक जबाबदार आहेत. निसर्गवाद मात्र एकाच घटकाकडे लक्ष देऊन इतर घटकांकडे दुर्लक्ष करतो.

२. निसर्गवादाची मांडणी करताना मॅक्समूल्लर यांनी प्रत्यक्ष पुराव्याऐवजी कल्पना व तर्क यांचाच अधिक आधार घेतलेला आहे, अशी टीका डेव्हीसनी केली आहे.

३. निसर्गातील रहस्यमय घटनांचे स्वरूप समजावून घेण्याच्या प्रक्रियेतून धर्म उदयास आला, असे मॅक्समूल्लर यांना वाटते. तथापि, निसर्गातील विविध घटना ह्या अत्यंत सरळ, क्षम्य व सामान्य स्वरूपाच्या आहेत. त्यामध्ये रहस्यमय असे काहीही नाही. रहस्यमयता ही मानवनिर्मित कल्पना आहे व ती आदिमानवास स्फुरली असेल हे न पटणारे आहे.

४. काही टिकाकारांच्या मते, निसर्गवादात आदिमानवाच्या संस्कृतीपेक्षा सभ्य समाजातील मानवाच्या संस्कृतीची छाप आढळते.

## ४. देवकवाद किंवा कुलप्रतिकवाद (Totemism)

देवकवाद ही देखील महत्त्वाची आदिम धर्मश्रध्दा आहे. एमिल डुर्खीम या समाजशास्त्रज्ञाने धर्माच्या उदयाच्या संदर्भात देवकवादाचा सिध्दांत मांडलेला आहे. ऑस्ट्रेलियातील अरूंटा जमातीतील धर्माचा अभ्यास करून त्याआधारे डुर्खीमने देववाद मांडला आहे. या देवकवादाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

आदिम जमातीत कुल हा सामाजिक समूह आढळतो. कुलामध्ये माता किंवा पिता यांच्यापैकी एकाच्या मार्फत ओळखल्या जाणाऱ्या नातेवाईकांचा समावेश होतो. एका जमातीत अनेक कुले असतात. प्रत्येक कुलाचे एक चिन्ह किंवा प्रतीक असते. या प्रतीकासच देवक म्हणतात. हे देवक एखादी सजीव तसेच निर्जीव वस्तू असते. उदा. पशु, पक्षी, वृक्ष, नदी, पर्वत, सूर्य, चंद्र इत्यादी असे मानले जाते. त्यामुळे एका कुलातील सर्व सभासद हे एकमेकांचे रक्ताचे नातेवाईक आहेत असे मानले जाते. त्यामुळे देवक वस्तू ही आपली पूर्वज आहे, या भावनेतून देवकास अत्यंत पवित्र व पूज्यनीय मानले जाते. आपले व आपल्या कुलाचे रक्षण व कल्याण व्हावे म्हणून कुलातील सर्व सभासद देवकाची पूजाअर्चा करतात. देवकाच्या नावे सणसमारंभ यात्रा-जत्रा साजरी करतात. देवकाचे चित्र अंगावर गोंदून घेतात. देवक असलेल्या वृक्षाची तोड करीत नाहीत. देवक असलेल्या पशुपक्षाची शिकार करीत नाहीत. एकच

देवक असलेले स्त्री-पुरुष एकमेकांशी विवाह करीत नाहीत. देवकाच्या संदर्भात आदिवासी लोक अशा अनेक चालीरिती पाळतात. देवकावरील ही श्रध्दा व त्याच्यासंदर्भात पाळावयाच्या चालीरिती यांनाच स्थूलमानाने देवकवाद किंवा कुलचिन्हवाद असे म्हणतात.

डुर्खीम म्हणतो की, विश्वातील कांही वस्तू या पवित्र व कांही वस्तू या लौकिक मानल्या जातात. पवित्र वस्तूंना लौकिक वस्तूपासून वेगळे ठेवले जाते. आदिवासी हे देवकास अत्यंत पवित्र मानतात. अशा पवित्र देवकाची पूजाअर्चा करण्यासाठी सर्व सभासद एकत्र येतात. देवकाच्या नावाने विविध सण, उत्सव साजरे करतात, त्यावेळी त्यांना उत्कट अशी धार्मिक अनुभूती येते. देवकाबद्दल त्यांना आदर व भीती वाटते. देवक हाच देव किंवा ईश्वर आहे असा त्यांचा विश्वास बनतो. हा जो ईश्वर आहे तो अन्य काही नसून प्रत्यक्ष कुल किंवा जमात किंवा समाज आहे. आणि या समाजापुढे व्यक्ती नम्र होतात. समाज रूपी देवास संतुष्ट ठेवण्यासाठी विविध विधी किंवा कर्मकांड करतात, यातूनच धर्मांचा उदय असे डुर्खीमचे मत आहे. या संदर्भात डुर्खीम म्हणतो की, कुल हा समूहच धार्मिक अनुभूतीचा स्रोत असून देवकावरील श्रध्दा व देवकाविषयीचे वेगवेगळे विधी हे सामूहिक जीवनाची प्रतीके आहेत. थोडक्यात, कुलाचे चिन्ह म्हणजेच देवक हे कुलाचा पूर्वज असून त्याची पूजाअर्चा करण्यातून धर्म उदयास आला असे देवकवादाचे प्रतिपादन आहे.

- **टीकात्मक मूल्यमापन-**

देवकावरही अनेकांनी टीका केलेली आहे.

१. देवकाच्या पूजाअर्चातून धर्म उदयास आला हे मत पटत नाही. कारण अनेक जमातीत धर्म व देवकवाद यांचे अस्तित्व वेगवेगळे असल्याचे आढळते. देवकास पूर्वज मानणे व देवकबहिर्विवाह ही देवकवादाची दोन वैशिष्ट्य धर्मात आढळत नाहीत.

२. मॅलिनोस्कीच्या मते, डुर्खीमने समाजाचे व्यक्तीकरण केले आहे. तसेच समूह मनाची कल्पना मांडली आहे. या दोन्ही गोष्टी मानसशास्त्रीयदृष्ट्या स्वीकारता येत नाहीत.

३. देवकवाद ही श्रध्दा सर्वच जमातीत आढळत नाही. मात्र सर्वच जमातीत धर्म आढळतो. त्यामुळे देवकवादातून धर्म उदयास आला असे म्हणता येत नाही.

४. कुलाचे सदस्य हे देवकास आपला पूर्वज मानतात. त्यामुळे देवकपूजा ही पूर्वजपूजा ठरते. याचा अर्थ असा होतो की, पूर्वजपूजेतून धर्म उदयास आला. मात्र अनेक जमातीत पूर्वजपूजा केली जात नाही. काही जमातीत पूर्वजाऐवजी पशु, पक्षी, वनस्पती यांची पूजा केली जाते. पण त्यांना पूर्वज मानले जात नाही. त्यामुळे देवकपूजेतून धर्म उदयास आला हे मत स्वीकारता येत नाही.

अशा प्रकारे आदिम जमातीत वेगवेगळ्या प्रकारच्या धर्मश्रध्दा आढळतात.

## ब) आदिम लोकांच्या धर्माचरणाचे प्रकार (Religious Practices of Tribal People)

आदिम समाजातील धर्मश्रध्दा समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही आदिम धर्माचरणाचे म्हणजेच धार्मिक वर्तनाचे प्रकार समजावून घेणार आहोत. अलौकिक किंवा दिव्य शक्तीच्या कृपेवरच आपली सुखदु:खे अवलंबून आहेत या श्रध्देतून आदिवासी लोक त्या शक्तीस संतुष्ट ठेवण्यासाठी अनेक विधी करतात. या विधीनाच धार्मिक विधी किंवा धर्माचरण (Religious Practices) असे म्हणतात. आदिम समाजात पुढील धर्माचरण प्रकार आढळतात.

### १. प्रार्थना :-

दिव्यशक्तीस अत्यंत विनम्रपणे केलेले तोंडी आवाहन किंवा आळवणी म्हणजे प्रार्थना होय. दिव्यशक्तीने मानवास मदत करावी म्हणून तिला विनंती करणे हा प्रार्थनेचा हेतू असतो. हा हेतू साध्य व्हावा म्हणून प्रार्थनेची भाषा, रचना, स्थळ, काळ, पध्दती, प्रार्थनेबरोबर करावयाचे इतर विधी इत्यादीबाबतचे निश्चित नियम केलेले असतात. प्रार्थना ही वैयक्तिक तसेच सामूहिक स्वरूपात केली जाते. साधारणपणे प्रार्थना ही खास अशा धार्मिक अधिकारी व्यक्तीकडून केले जाते. वेगवेगळ्या देवतांसाठी वेगवेगळ्या प्रार्थना केलेल्या आढळतात. सर्वच आदिवासीत प्रार्थनांना महत्व असते.

### २. यज्ञ :-

देवतांची वा दिव्य शक्तीच्या कृपा प्राप्तीसाठी दैवशक्तीला प्रतिकात्मक पध्दतीने वस्तू भेट देणे, काही वेळा वस्तूंचा नाश करणे म्हणजे 'यज्ञ' होय. यामुळे दिव्यशक्तीशी अपेक्षित संबंध त्वरित प्रस्थापित होऊन इष्टप्राप्ती होते. अशी आदिवासीची दृढ श्रध्दा असल्याने त्यांच्या धर्माचरणात यज्ञाला महत्त्वाचे स्थान आहे. यज्ञाची वेळ, जागा, यज्ञाशी संबंधित व्यक्ती व विधी म्हणावयाचे मंत्र, वापरावयाच्या वस्तू इ. विषयीचे विस्तृत नियम असतात. सामान्यपणे यज्ञामध्ये खाद्य व पेय पदार्थ, किंमती वस्तू देवतांना भेट म्हणून त्यांची यज्ञात पेटविलेल्या अग्नीत आहुती दिली जाते. कित्येकदा यज्ञामध्ये विशिष्ट पशुंचा बळी देऊन त्यांचे मास व रक्त प्रसाद म्हणून वाटतात. सर्वजमातीच्या हिताच्या दृष्टीने यज्ञात मानव बळी देण्याचा प्रघातही काही जमातीत आढळतो. आज नरबळीस कायद्याने बंदी घातलेली आहे.

### ३. वर्जन (निषेध-नियम Taboo) :-

कर्मकांडात काही गोष्टी केल्याच पाहिजेत अशी सकारात्मक बाजू जशी असते. तशी कांही गोष्टी करण्यावर बंधने घालणारी अशी नकारात्मक बाजू देखील असते तेव्हा कर्मकांडानुसार काही गोष्टी टाळणे, विशिष्ट वर्तन न करणे, यासच 'वर्जन' म्हणतात. वर्जनात निषिध्द गोष्टी मोडतात. पवित्र व्यक्ति, वस्तू, पवित्र स्थाने इत्यादीचे पावित्र्य कोणत्याही परिस्थितीत नष्ट न करणे, विशिष्ट अन्न न खाणे अशी सामान्य वर्जने असतात. तसेच ऋतुकाळी स्त्रियांनी, खास व्यवसायात कारागिरांनी, सुतकात

संबंधित व्यक्तींनी याप्रमाणे विशिष्ट प्रसंगात विशिष्ट व्यक्तींनी कोणते वर्तन करू नये याविषयी खास वर्जने आढळतात. वर्जनाचे कटाक्षाने पालन आदिवासी करतात जर वर्जन नियमांचा भंग झाला तर देवतांची अवकृपा होऊन दैवी आपत्ती ओढावतात अशी त्यांची दृढ श्रध्दा असते.

**४. विशेष वर्तन प्रकार :–**

आदिवासींच्या धर्माचरणांत काही विशेष वर्तनप्रकार आढळतात. (अ) आदिवासींच्या सर्व धार्मिक विधीत दारूला/मद्याला खास स्थान आहे. जन्मल्याबरोबर पाळण्यात टाकताना बालकाच्या तोंडात दारूचे थेंब टाकणे, मृताला शेवटी दारू पाजणे, दारूपानाचा पाहुणचार करणे, धर्मसमारंभात दारू पिणे इ. मद्यपान हे आदिमांच्या धार्मिक जीवनांचे महत्त्वाचे अंग आहे. (ब) धार्मिक विधी सामूहिक स्वरूपात साजरे करतात. प्रार्थना, यज्ञ, नाच, मिरवणुका इ. सामूहीक गोष्टी धार्मिक विधीचा खास भाग मानतात. समूह गायन वादन हे पण धार्मिक विधीचा भाग मानतात. (क) धर्माचरणात कसलाही दोष वा उणीव राहू नये, याची खास दक्षता घेतात. जर धर्माचरणात प्रमाद घडला तर दैवी शक्तीचा हमखासपणे सर्वांना त्रास होणार, अशी दृढ भावना असते. म्हणून विस्तृत नियम करून धार्मिक विधीचे काटेकोरपणे पालन करतात.

## ⁕ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ⁕

**प्रश्न : योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. धर्म ही श्रध्दा आणि ............... यांची व्यवस्था आहे.

*(अ) जादू  (ब) प्रार्थना  (क) यज्ञ  (ड) विधी.*

२. सर्वात्मवाद हा सिध्दांत ............... यांनी मांडला.

*(अ) टायलर  (ब) मॅरेट  (क) मॅक्समूल्लर  (ड) डुर्खीम.*

३. शक्तीवादास भारतातील जमातीत ............ म्हणतात.

*(अ) मानावाद  (ब) आत्मावाद  (क) बोंगावाद  (ड) देवकवाद.*

४. मॅक्समूल्लरचे नाव .............. सिध्दांताशी संबंधित आहे.

*(अ) सर्वात्मवाद  (ब) निसर्गवाद  (क) शक्तीवाद  (ड) देवकवाद.*

५. एमिल डुर्खीम यांनी ............... जमातीतील धर्माचा अभ्यास केला.

*(अ) मुंडा  (ब) हरे  (क) होपी  (ड) अरुंटा.*

## ४.२.२ जादू : स्वरूप व प्रकार

आदिम समाजातील धर्मश्रध्दा व धर्माचरण यांचे विविध प्रकार अभ्यासल्यानंतर आता तुम्ही जादूचा अर्थ, स्वरूप व प्रकार समजावून घेणार आहोत. धर्माप्रमाणेच जादू हे आदिवासींच्या जीवनाचे एक प्रभावी अंग आहे. आपली विविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आदिवासी लोक धर्माबरोबरच जादूचा वापर करतात. जादूचा वापर बिनचूकपणे केल्यास अपेक्षित उद्दिष्ट किंवा इच्छा पूर्ण होते अशी त्यांची दृढश्रध्दा असते. त्यामुळे जादूस त्यांच्या जीवनात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

### ❑ जादूचा अर्थ :-

दिव्यशक्तीवर वर्चस्व प्रस्थापित करून तिला आपल्या मनोकामना पूर्ण करण्यास भाग पाडण्यासाठी केल्या जाणाऱ्या कृतीस जादू किंवा यातुविद्या असे म्हणतात. जादूचा अर्थ समजण्यासाठी तिच्या काही व्याख्या पाहूया.

### ❑ जादूची व्याख्या :-

**१. मॅलिनोस्की :-**

''हेतुपूर्तीसाठी साधन म्हणून वापरल्या जाणाऱ्या व्यावहारिक क्रियांच्या एकत्रीकरणास जादू म्हणतात.''

**२. हॅरि जॉन्सन :-**

''ज्या कृतीचे उद्दिष्टे हे अनुभवनीय असते, पण तिची साधने मात्र अलौकिक असतात तिला जादू असे म्हणतात.''

**३. जेम्स फ्रेझर :-**

''जादू हे आभासी विज्ञानी असून ते कार्यकारणभावाच्या अटळ नियमानुसार निसर्गावर दबाव टाकते.''

**४. डॉ. एस. सी. दुबे :-**

''जादू ही एक शक्ती आहे, जिच्याद्वारे जादूगार अतिमानवी जगावर नियंत्रण मिळवून आपल्या इच्छेनुसार तिचा उपयोग विधायक किंवा विध्वंसक पध्दतीने करू शकतो.

### ❑ जादूची स्वरूपात्मक वैशिष्ट्ये

वरील विवेचनाच्या आधारे जादूची आपणास पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

## १. दबावात्मक स्वरूप :–

जादू हे दबावात्मक स्वरूपाचे कृत्य आहे. कारण जादूचा उपयोग करून दिव्य शक्तीवर वर्चस्व किंवा ताबा मिळविला जातो व त्या शक्तीवर आपले चांगले किंवा वाईट हेतू पूर्ण करण्यासाठी दबाव टाकला जातो.

## २. द्वैताधिष्ठित कृती :–

जादू ही दिव्य शक्तीच्या द्वैतावर आधारलेली कृती आहे. कारण दिव्य शक्ती ही चांगली तसेच वाईट अशा दोन्ही स्वरूपाची आहे, असे जादूत मानले जाते आणि आपले चांगले तसेच वाईट हेतू पूर्ण करण्यासाठी त्यापैकी एका शक्तीचा मदत घेतली जाते.

## ३. हेतुपूर्तीचे साधन :–

जादू हे विशिष्ट हेतू साध्य करण्याचे साधन आहे. हा हेतू चांगला किंवा वाईट असू शकतो. जादूचा वापर मानवाच्या हितासाठी तसेच अहितासाठी केला जाऊ शकतो.

## ४. प्रकट किंवा गुप्त प्रयोग :–

जादूची कृती ही प्रकटपणे (उघडपणे) तसेच गुप्तपणेही केली जाते. साधारणत: चांगल्या हेतूंच्या पूर्ततेसाठी केली जाणारी जादूही प्रकटपणे केली जाते. याउलट वाईट हेतूच्या पूर्ततेसाठी केली जाणारी जादूही गुप्तपणे केली जाते.

## ५. वैयक्तिक तसेच सामुदायिक :–

जादूची कृती ही वैयक्तिक तसेच सामुदायिक फायद्यासाठी केली जाऊ शकते. उदा. वैयक्तिक शत्रूचा नाश व्हावा म्हणूनही जादू केली जाते. पुत्र व्हावा या वैयक्तिक हेतूपूर्तीसाटी जसी जादू करतात, तसेच पाऊस पडावा व जमातीची शेती पिकावी या सामुदायिक हेतूच्या पूर्ततेसाठीही जादू करतात.

## ६. विशिष्ट क्रिया :–

जादूचा प्रयोग करताना जादूगार हा मंत्राबरोबरच काही विशिष्ट क्रिया विशिष्ट पद्धतीने करीत असतो. या क्रिया ठरवल्याप्रमाणे व बिनचूकपणे केल्याने जादू हमखासपणे यशस्वी होते, असे मानले जाते. जर क्रिया करण्यात कांही चूक झाली तरच जादू अपयशी होते, अन्यथा नाही असा विश्वास असतो.

## ७. मंत्राचा उपयोग :–

जादूचा प्रयोग करताना जादूगार हा विविध मंत्राचा उपयोग करतो. हे मंत्र जादूगार गुप्त ठेवतो. तो हे मंत्र केवळ आपल्या निष्ठावान शिष्यांनाच शिकवितो.

## ८. साधनसामुग्री :–

जादूची कृती करताना जादूगार हा विविध प्रकारची साधनसामग्री वापरत असतो. साधारणपणे, जादूची कांडी, लिंबू, नारळ, हळदकुंकू, अंडे, मीठ, बीबा, मृताची हाडे व डोक्याची कवटी, कापडी बाहुली इत्यादी साधनसामुग्रीचा वापर जादूच्या प्रयोगात केलेला दिसतो.

## ९. जादूगाराचा खास दर्जा :–

जादूगाराचा आदिम समाजात खास दर्जा असतो. लोक त्यांना मानसन्मान देतात. त्याच्याकडे भीतीयुक्त आदराने पाहतात. जादूगारास वेशभूषा, केशभूषा, खाणेपिणे, निवासस्थान, स्नानसंध्या, पूजाअर्चा इत्यादीबाबतचे कांही खास नियम पाळावे लागतात.

## ❑ जादूचे प्रकार :–

जादूची व्याख्या व वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर आता तुम्ही जादूचे वेगवेगळे प्रकार समजावून घेणार आहात. वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी जादूची वर्गीकरण वेगवेगळ्या प्रकारे केलेले आहे. त्यापैकी कांही वर्गीकरण तुम्ही या ठिकाणी अभ्यासणार आहात.

## १. मॅलिनोस्कीचे वर्गीकरण :–

मॅलिनोस्की यांनी जादूचे पांढरी जादू व काळी जादू (White and Black Magic) असे दोन प्रकार पाडलेले आहेत.

### (अ) पांढरी जादू :–

पांढऱ्या जादूस धवल किंवा श्वेत जादू असेही म्हणतात. चांगल्या किंवा विधायक किंवा कल्याणकारी हेतूंच्या पूर्ततेसाठी केल्या जाणाऱ्या जादूस पांढरी जादू असे म्हणतात. उदा. पुत्र व्हावा, धनलाभ व्हावा, प्रेयसी किंवा प्रियकर वश व्हावा, रोग किंवा आजार बरा व्हावा, पाऊस पडावा, शेती पिकावी, दु:ख व संकट टळावे इत्यादी शुभ कामासाठी केली जाणारी जादू ही पांढरी जादू ठरते.

### (ब) काळी जादू :–

काळ्या जादूस कृष्ण जादू किंवा अश्वेत जादू असेही म्हणतात. वाईट किंवा विघातक किंवा अकल्याणकारी हेतूंच्या पूर्ततेसाठी केल्या जाणाऱ्या जादूस काळी जादू म्हणतात. उदा. एखाद्यास ठार मारणे, त्रास देणे, शारीरिक इजा करणे, एखाद्याचे नुकसान करणे इत्यादी अशुभ कामासाटी केली जाणारी जादू ही काळी जादू ठरते. साधारणपणे पांढरी जादू ही उघडपणे/प्रकटपणे तर काळी जादू ही गुप्तपणे केली जात असल्याचे आढळते.

## २. डॉ. एस. सी. दुबे यांचे वर्गीकरण :-

भारतीय समाजशास्त्रज्ञ व सामाजिक मानसशास्त्रज्ञ असलेल्या डॉ. दुबे यांनी जादूचे संवर्धक, संरक्षक आणि विनाशक असे तीन प्रककार पाडलेले आहेत.

### (अ) संवर्धक जादू :-

पुत्र प्राप्ती व्हावी, धनलाभ व्हावा, पाऊस पडावा, शेती पिकावी, सुखसमृध्दी लाभावी यासाठी केली जाणारी जादू म्हणजे संवर्धक जादू होय.

### (ब) संरक्षक जादू :-

जीवितवित्ताचे संरक्षण व्हावे, दुर्भाग्यापासून/दुर्दैवापासून संरक्षण व्हावे, आजारातून मुक्तता व्हावी, प्रवास सुखकारक व्हावा, शत्रूने केलेल्या जादूचा प्रयोग विफल व्हावा इ.साठी केली जाणारी जादू म्हणजे संरक्षक जादू होय.

### (क) विनाशक जादू :-

शत्रूचा नाश करणे, त्याची मुलेबाळे व मालमत्ता यांचे नुकसान करणे, शत्रूला आजारी पाडणे वा दुखापत करणे यासाठी केली जाणारी जादू म्हणजे विनाशक जादू होय.

## ३. जेम्स फ्रेझरचे वर्गीकरण :-

जेम्स फ्रेझर यांनी जादू करण्याच्या तीन पध्दती (Methods) सांगितलेल्या आहेत. या पध्दतीच्या आधारे जादूचे तीन प्रकार पाडता येतात.

### (अ) अनुकरणात्मक जादू :-

ही जादू ''समाजातून समाजाची निर्मिती होते.'' या तत्वावर आधारलेली आहे. एखादी घटना घडावीसी वाटते तेव्हा त्या घटनेचे अनुकरण करणारी कृती केली जाते. तसे अनुकरण केल्याने ती घटना घडते असा विश्वास असतो. उदा. पाऊस पडावा म्हणून मध्य भारतातील काही जमातीत पाऊस पडत असल्याचे चित्र काढतात. ऑस्ट्रेलियातील जमातीतील लोक पाऊस पडावा म्हणून तोंडात पाणी घेऊन पिचकारीसारखे उडवितात. शत्रूला त्रास देण्यासाटी अनुकरणात्मक जादूचा प्रयोग केला जातो, त्यासाठी जादूगार शत्रूची प्रतीमा बनवितो व त्या प्रतिमेस मंत्राद्वारे इजा करतो. असे केल्याने शत्रूसही इजा होते अशी समजूत आहे.

### (ब) संपर्कात्मक जादू :-

''ही जादू एखादा संपर्क आला की तो कायमचा संपर्क असतो.'' या तत्त्वावर आधारलेली आहे.

एक वस्तू दुसऱ्या वस्तूच्या संपर्कात अल्पकाळ आल्यास, त्या दोन्हीत कायमचा संपर्क टिकून राहतो अशी समजूत या जादूत आढळते, त्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या केसावर, कपड्यावर किंवा तिने वापरलेल्या एखाद्या वस्तूवर जादूचा प्रयोग केल्यास त्याचा परिणाम त्या व्यक्तीवरही होतो असे मानले जाते.

**(क) मंत्र जादू :-**

मंत्राचा वापर करून केलेल्या जादूस मंत्र जादू म्हणतात. मंत्रांमध्ये विलक्षण शक्ती असते व त्यामुळे मंत्रोच्चार करून अपेक्षित हेतू साध्य करता येतात, असा विश्वास या प्रकाराच्या जादूत आढळतो. मंत्रोच्चार हे विशिष्ट पद्धतीनेच व अचूकपणे केले तरच फायदा होतो. त्यामध्ये काही चूक झाल्यास दैवी शक्तीचा कोप होतो, अशी समजूत असते. मंत्र-जादूचा उपयोग करणाऱ्यास मांत्रिक म्हणतात.

अशा प्रकारे जादूचे विविध प्रकार आहेत.

### ※ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ※

**प्रश्न : योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. जादू हे आभासी विज्ञान आहे .................... यांनी म्हटले आहे.
*(अ) मॅलिनोस्की (ब) फ्रेझर (क) डॉ. दुबे (ड) जॉन्सन.*

२. पांढरी व काळी जादू असे दोन प्रकार .................. यांनी पाडले आहेत.
*(अ) पार्सन्स (ब) जॉन्सन (क) मॅलिनोस्की (ड) डॉ. दुबे.*

३. समानातून समानाची निर्मिती होते या तत्त्वांवर आधारलेल्या जादूस ............ म्हणतात.
*(अ) संपर्कात्मक (ब) अनुकरणात्मक (क) मंत्र (ड) विघातक.*

४. पाऊस पडावा म्हणून केली जाणारी जादू ............ प्रकारची ठरते.
*(अ) संवर्धक (ब) संरक्षक (क) विनाशक (ड) विध्वंसक.*

## ४.२.३ भगत आणि पुरोहित

जादूची व्याख्या, स्वरूप, प्रकार इत्यादींचा अभ्यास केल्यानंतर आता आपण आदिम समाजातील भगत पुरोहित या दोन धार्मिक व्यावसायिकांचा अभ्यास करणार आहोत.

या विश्वात अलौकिक किंवा दिव्य शक्ती किंवा दिव्य प्राणी असून त्यांच्या या प्रभावामुळेच

मानवी जीवनात सुख-दु:खे निर्माण होतात अशी आदिवासी लोकांची दृढ श्रध्दा आहे. त्यामुळे आपणास सुख मिळावे व दु:ख टळावे यासाठी आदिवासी लोक दिव्यशक्तीस किंवा दिव्य प्राण्यांना संतुष्ट (प्रसन्न) करून घेण्याचा त्यांची कृपा संपादन करण्याचा व अवकृपा (कोप) टाळण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी ते दिव्यशक्तीची किंवा दिव्य प्राण्यांशी सपर्क प्रस्थापित करू इच्छितात. मात्र त्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान, कौशल्य, अभिवृत्ती व वेळ त्यांच्याकडे नसतो. त्यामुळे दिव्य प्राण्यांशी संपर्क प्रस्थापित करू शकणाऱ्या व्यक्तींची त्यांना गरज भासते. अशा या व्यक्ती दिव्य प्राणी व आदिवासी लोक यांच्यामध्ये मध्यस्थ म्हणून कार्य करतात. आदिवासी लोकांचे धार्मिक विधी यथासांगपणे पार पाडून देण्याचे कार्य करतात आणि त्याच्या मोबदल्यात लोकांकडून काही शुल्क व भेटवस्तू घेतात व त्यावर आपला चरितार्थ चालवितात. अशा या व्यक्तींनाच धर्मव्यावसायिक (Religious Practioners) असे म्हणतात. भगत आणि पुरोहित हे आदिम समाजातील प्रमुख धर्मव्यावसायिक आहेत. त्यांचे स्वरूप व कार्य आता आपण येथे समजावून घेणार आहात.

## ❒ भगत (Shaman)

आदिवासी लोकांना वेगवेगळ्या संकटापासून (भूकंप, वादळे, अतिवृष्टी, ज्वालामुखीचा उद्रेक इ.) संरक्षण हवे असते. हे संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून ते दिव्य शक्तींना किंवा प्राण्यांना संतुष्ट ठेवून किंवा त्यांच्यावर वर्चस्व ठेवून आपली उद्दिष्टे साध्य करू इच्छितात. परंतु दिव्य प्राण्यांशी संपर्क प्रस्थापित करण्यासाठी वेगवेगळे धार्मिक विधी व जादूचे प्रयोग करावे लागतात आणि ते सामान्य लोकांना जमत नाही. त्यामुळे अलौकिक विश्वाचे पुरेसे ज्ञान असलेल्या व जादूचे प्रयोग करण्यात तरबेज असलेल्या व्यक्तीची त्यांना मदत घ्यावी लागते अशा या व्यक्तीसच भगत असे म्हणतात. अशा या भगतासच वेगवेगळ्या जमातीत वेगवेगळी नावे आहेत. उदा. गोंड जमातीत त्याला 'बैगा किंवा गुणिया' म्हणतात. कोरवा व संथाल जमातीत 'ओझा' म्हणतात. थारू जमातीत 'भरारा' म्हणतात. इंग्रजी भाषेत भगताला शामन (Shaman) असे म्हणतात. महाराष्ट्रातील वारली, ठाकूर, कातकरी, भिल्ल, कोळी इत्यादी जमातीत भगत हेच नाव वापरले जाते.

भगतविषयी पुढील बाबी महत्त्वाच्या आहेत.

अ) जवळजवळ सर्वच आदिम जमातीत भगत आढळतो. एखाद्या आदिवासी खेड्यात एकापेक्षा अधिक भगत आढळतात. काही जमातीत तर प्रत्येक कुटुंबातील एखादी व्यक्ती भगताचे काम करीत असते.

ब) भगत व्यक्ती ही साधारणत: वयस्कर व वयोवृध्द असते. भगताच्या व्यवसायासाठी लागणारे ज्ञान व कौशल्ये प्राप्त करण्यासाठी दीर्घकाळ लागत असल्याने भगत हे वयस्कर असतात.

क) पुरुषाप्रमाणेच स्त्रिया देखील भगताचा व्यवसाय करताना दिसतात. मात्र अनेक आदिम समाजात स्त्रियांना धार्मिक कार्यासाठी अयोग्य मानले जात असल्याने पुरुष भगतांच्या तुलनेत स्त्री-भगतांची (भगतीणींची) संख्या फारच कमी आढळते.

ड) भगताचे नैसर्गिक भगत व प्रशिक्षित भगत असे दोन प्रकार आढळतात. जे भगत स्वयंप्रयत्नाने दिव्य शक्तीशी संबंध प्रस्थापित करण्याचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करतात, त्यांना नैसर्गिक भगत म्हणतात. याउलट जे भगत हे ज्ञान व कौशल्य अनुभवी गुरूकडून शिकून आत्मसात करतात त्यांना प्रशिक्षित भगत म्हणतात.

इ) भगत हा धार्मिक विधी व जादूचे प्रयोग करण्यामध्ये तज्ञ (expert) असतो. या गोष्टी तो अत्यंत काळजीपूर्वक व बिनचूकपणे पार पाडीत असतो. या कामात काही चूक झाल्यास दैवीशक्तीचा कोप होऊन मोठा अनर्थ होतो, असे मानले जाते. त्यामुळे भगताकडे या गोष्टी यथासांगपणे पार पाडण्याची तज्ज्ञता असावी लागते.

ई) भगतावर अनेक कडक निर्बंध असतात. त्याला वेशभूषा, केशभूषा, खाणेपिणे, लैंगिक संबंध, स्नानसंध्या इत्यादीबाबत काही कडक नियम पाळावे लागतात. तसेच त्याच्याकडे कल्पनाशक्ती, संयमीवृत्ती, भविष्यकथन क्षमता इत्यादी वैशिष्ट्ये असावी लागतात. त्याला वेगवेगळी स्वप्न पडत असतात व भास होत असतात व त्यांचा अर्थ लावण्याची क्षमताही त्याच्याकडे असावी लागते. भगताला तीन प्रकारची कार्ये पार पाडावी लागतात.

### १. भविष्य कथन करणे :-

भविष्यात घडणाऱ्या घटनांची लोकांना पूर्वसूचना देणे म्हणजेच भविष्य कथन हे भगताचे अनिवार्य कार्य मानले जाते. दिव्य प्राण्यांच्या कृपा व कृपेमुळेच मानवी जीवनात चांगल्या-वाईट घटना घडतात अशी आदिवासींची श्रध्दा असते. त्यामुळे पुढील संकटाची आगावू कल्पना आल्यास दिव्य प्राण्यांना संतुष्ट करून पुढील संकट टाळता येईल. या हेतूने आदिवासी लोक भगताची मदत घेतात. आपल्याजवळील दैवी सामर्थ्यांच्या जोरावर भगत दिव्य प्राण्यांशी संपर्क साधून त्यांची इच्छा जाणून घेतो व त्यासंदर्भातील भविष्य कथन करतो.

### २. हवामानाचे नियंत्रण करणे :-

पाऊस, वादळ, गारपीठ, कडक्याचा उन्हाळा किंवा थंडी इत्यादी हवामानविषयक घटना व कशा घडतात याचे वास्तविक ज्ञान आदिवासींना नसते. मात्र या घटनांचा त्यांच्या जीवनावर अनिष्ट प्रभाव पडत असतो. उदा. पाऊस न पडल्यास अन्नधान्य पिकत नाही व उपासमारीची पाळी येते. वादळ किंवा गारपीठ झाल्यास त्यांचे जीवन उद्ध्वस्त होते. जीवितवित्ताची मोठी हानी होते. अशा या अनिष्ट गोष्टी

दिव्यप्राण्यांमुळेच घडतात असे आदिवासी मानतात, त्यामुळे हवामानविषयक या घटना घडू नयेत म्हणून ते हवामानावर नियंत्रण ठेवू इच्छितात व त्यासाठी दिव्य प्राण्यांशी संपर्क प्रस्थापित करू इच्छितात. याकामी ते भगताची मदत घेतात. भगत हा दिव्यशक्तीशी संबंध प्रस्थापित करून हवामानविषयक घटनांवर नियंत्रण ठेवतो, या संदर्भात भगताला पाऊस पाडण्याचे काम करावे लागते. पाऊस पाडण्यासाठी भगत हा मुख्यत: अनुकरणात्मक जादूचे प्रयोग करतो.

### ३. रोगनिवारण :-

रोगनिवारण करणे हे भगताचे तिसरे कार्य आहे. भूत, प्रेत, पिशाच्च इत्यादींची बाधा झाल्याने व्यक्तीस रोग होतो, ती आजारी पडते असे आदिवासी म्हणतात. त्यामुळे रोगनिवारण्यासाठी भूतबाधा दूर करणे, रोगी व्यक्तीच्या अंगात शिरलेले भूत बाहेर काढणे गरजेचे असते. दिव्यशक्तीशी संपर्क प्रस्थापित करून भगत भूतबाधा दूर करण्याचे व व्यक्तीस रोगमुक्त करण्याचे काम करीत असतो. यासाठी भगत मंत्र घालणे, अंगारा लावणे, अंगावरून उतरून टाकणे, दैवीशक्तीने भारलेले गंडेदोरे व ताईत रोग्याच्या अंगावर घालणे इत्यादी अतार्किक उपाययोजना करीत असतो. त्याचबरोबर शरीराची मालीश करणे, दुखरा अवयव चोळणे किंवा दाबणे, दूषित रक्त पिळून शरीराबाहेर काढणे, मंदिरात किंवा मोकळ्या हवेत रोग्याला ठेवणे असे तार्किक उपायदेखील भगत राहित असतो. या तार्किक उपायाद्वारे भूतबाधा दूर होते. अशीच आदिवासीची समजूत असते.

### ❀ भगताचे स्थान :-

आपल्याकडे असलेल्या ज्ञानाचा व कौशल्याचा वापर करून भगत वरील कार्य पार पाडतो व लोकांच्या उपयोगी पडतो. त्यामुळे आदिम समजतात त्याला मानाचे स्थान, दर्जा व प्रतिष्ठा असते. लोकांवर त्याचे वर्चस्व असते. त्याला कांही सवलती व विशेषाधिकार दिलेले असतात. उदा. कर न देणे, लष्करी सेवा न करणे, देहांत शासन न देणे इत्यादी. अशा या सवलतीचा त्याने स्वार्थासाठी उपयोग करू नये अशी समाजाची अपेक्षा सते. तथापि, आपले स्थान व विशेषाधिकारी यांच्या आधारे कांही भगतांनी जमातीची राजकीय सत्ता हस्तगत केलेली आढळते.

## ❐ पुरोहित (Prist)

भगताप्रमाणेच पुरोहित देखील आदिम जमातीतील धर्म व्यावसायिक आहे. जमातीतील लोकांचे धार्मिक विधी पार पाडून त्यावर तो आपली उपजिविका चालवितो, तथापि, पुरोहिताची भूमिका भगताच्या भूमिकेपेक्षा भिन्न असते. भगत हा जादूच्या आधारे दिव्यशक्तीवर वर्चस्व मिळवून तिला अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भाग पाडतो. पुरोहित मात्र दिव्यशक्तीला शरण जाऊन तिला प्रसन्न करून घेऊन तिच्या अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विनवित असतो. त्यासाठी पुरोहित लोकांच्या

वतीने देवदेवतांची पूजा-अर्चा करणे, प्रार्थना करणे, भजन-किर्तन करणे, होमहवन करणे, इत्यादी धार्मिक विधी पार पाडीत असतो. हे विधी यथासांगपणे पार पाडण्याचे ज्ञान व कौशल्य पुरोहिताकडे असते. याशिवाय वेगवेगळे धार्मिक स्तर, उत्सव, यात्रा, जत्रा इत्यादींचे संचालन करण्याचे कामही पुरोहित पार पाडीत असतो. व्यक्तीच्या आयुष्यातील कांही महत्त्वाच्या प्रसंगी उदा. जन्म, विवाह, मृत्यू इ. करावयाचे विधी व संस्कारदेखील पुरोहित पार पाडतो. पुरोहिताची ही कार्ये अत्यंत पवित्र मानली जातात. त्यामुळे त्याला जमातीत मानाचे स्थान असते. लोक त्याच्याकडे आदराने पाहत असतात. पुरोहित हे एक पद (Office) मानले जाते व या पदाच्या ठिकाणी अलौकिक शक्ती असते व त्या पदावर बसणाऱ्या व्यक्तीस ही शक्ती प्राप्त असते असे मानले जाते. भगताप्रमाणेच पुरोहितासही खाणेपिणे, पोशाख, याबाबतचे कडक नियम पाळावे लागतात. पुरोहित पदाचे कार्ये पार पाडण्याचे प्रशिक्षण व्यक्तीला घ्यावे लागते. पुरुषाप्रमाणेच स्त्रियाही पुरोहित होऊ शकतात. मात्र आदिवासी स्त्रिया या कामाकडे फारशा वळत नसल्याने पुरुष पुरोहितापेक्षा स्त्री पुरोहितांची संख्या अल्प असते.

### ※ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ※

❒ **प्रश्न : योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. भगत आणि ............ हे आदिम समाजातील धर्मव्यावसायिक आहेत.
*(अ) मांत्रिक (ब) देवर्षी (क) धर्मगुरू (ड) पुरोहित.*

२. ............. हा जादूच्या क्रिया करून दिव्यशक्तीवर वर्चस्व मिळवित असतो.
*(अ) धर्मगुरू (ब) भगत (क) देवर्षी (ड) मांत्रिक.*

३. संथाल जमातीत भगताला .................... म्हणतात.
*(अ) ओझ (ब) भरारा (क) बैगा (ड) गुणिया.*

४. दिव्यशक्तीला प्रसन्न करण्यासाठी आदिवासी लोक ............ ची मदत घेतात.
*(अ) भगत (ब) पुरोहित (क) जमात प्रमुख (ड) जादूगार.*

## ४.३ सारांश

या चौथ्या घटकात तुम्ही आदिम समाजातील धर्म व जादू यांचा अभ्यास केलेला आहे. यादृष्टीने सर्वप्रथम तुम्ही आदिम समाजातील सर्वात्मवाद, शक्तीवाद, निसर्गवाद आणि देवकवाद या धर्मश्रध्दांचे स्वरूप व त्यांचे टिकात्मक मूल्यमापन समजावून घेतलेले आहे. त्याचबरोबर आदिमांचे धर्माचरणाचे प्रार्थना, यज्ञ, वर्जन हे प्रकार अभ्यासलेले आहे. त्यानंतर जादूची व्याख्या व स्वरूपात्मक वैशिष्ट्ये

समजावून घेतली आहेत. तसेच मॅलिनोस्की, डॉ. दुबे व जेम्स फ्रेझर यांनी जादूचे पाडलेले प्रकार अभ्यासलेले आहेत. शेवटी आदिम समाजातील भगत व पुरोहित या दोन धर्मव्यावसायिकांचे स्वरूप व कार्ये अभ्यासलेली आहेत.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❐ **प्रश्न १ : स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न : १ ची उत्तरे.**

१. (ड) विधी.

२. (अ) टायलर.

३. (क) बोंगावाद.

४. (ब) निसर्गवाद.

५. (ड) अरुंटा.

❐ **प्रश्न २ : स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न : २ ची उत्तरे.**

१. (ब) फ्रेझर.

२. (क) मॅलिनोस्की

३. (ब) अनुकरणात्मक.

४. (अ) संवर्धक.

❐ **प्रश्न ३ : स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न : ३ ची उत्तरे.**

१. (ड) पुरोहित.

२. (क) भगत.

३. (अ) ओझा.

४. (ब) पुरोहित.

## ४.५ स्मरणार्थ संज्ञा

❐ **धर्म :** श्रध्दा आणि विधी यांची व्याख्या.

❐ **सर्वात्मवाद :** सर्व वस्तूंमध्ये आत्मा हे तत्व असते अशी श्रध्दा.

- **शक्तीवाद :** सर्व जड-अजड वस्तूंमध्ये दिव्य शक्ती असते अशी श्रध्दा.
- **निसर्गवाद :** निसर्गशक्तींच्या ठिकाणी दिव्यशक्ती असते अशी श्रध्दा.
- **देवक :** कुल या समूहाचे चिन्ह किंवा प्रतीक.
- **देवकवाद :** देवक हा कुलातील सर्व सदस्यांचा मूळ पूर्वज आहे. या श्रध्देतून उदयास आलेल्या चालीरिती.
- **जादू :** दिव्यशक्तीवर वर्चस्व प्रस्थापित करून तिला अपेक्षित उद्दिष्ट साध्य करावयास लावण्यासाठी केली जाणारे कृती.
- **पांढरी जादू :** कल्याणकारी कामासाठी केली जाणारी जादू.
- **काळी जादू :** अकल्याणकारी कामासाठी केली जाणारी जादू.
- **जादूगार :** जादूचे प्रयोग करणारी शक्ती.
- **धर्मव्यावसायिक :** धार्मिक कार्ये पार पाडून त्यावर उपजिविका चालणारी व्यक्ती.
- **भगत :** दिव्यशक्तीला वश करून घेण्यासाठी जादूची क्रिया करणारा आदिम समाजातील धर्मव्यावसायिक.
- **पुरोहित :** दिव्यशक्तीला प्रसन्न करून घेण्यासाठी पूजा-अर्चा करणारा आदिम समाजातील धर्मव्यावसायिक.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

- **प्रश्न १ : टीपा लिहा.**

    १. सर्वात्मवाद.

    २. शक्तीवाद.

    ३. निसर्गवाद.

    ४. देवकवाद.

    ५. धर्माचरणाचे प्रकार.

    ६. जादूचे प्रकार.

    ७. भगत.

    ८. पुरोहित.

❑ **प्रश्न २ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. आदिम समाजातील धर्मश्रध्दांचे प्रकार विशद करा?

२. जादूची व्याख्या देवून तिची वैशिष्ट्ये स्पष्ट करा?

३. जादूची विविध वर्गीकरण विशद करा?

४. भगत आणि पुरोहित यांच्या कार्याची चर्चा करा?

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **डॉ. विलास संगवे :** *''आदिवासींचे सामाजिक जीवन.''*

२. **डॉ. गुरुनाथ नाडगोंडे :** *''आदिवासी भारत''*, प्रकाशक-अनिलकुमार मेहता, अजब पुस्तकालय, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.

३. **प्रा. चंद्रकांत खंडागळे** (२०१५) **:** *''सामाजिक मानवशास्त्र''*, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

४. **Mujumdar and Madan** (1961) : *"Introduction to social Anthropology"*, Asia Publishing House, Bombay.


❀ ❀ ❀

घटक–१

# आदिवासींची अर्थव्यवस्था

(Tribal Economy)

**घटक संरचना**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ अभ्यास विषयाची मांडणी

१.२.१ आदिवासीं अर्थव्यवस्था : व्याख्या आणि अर्थ

१.२.२ आदिवासीं अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

१.२.३ आदिवासीं आर्थिक क्रियांचे प्रकार

१.२.४ आदिवासीं अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक संज्ञा

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठीचे प्रश्न/गृहपाठ

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाच्या अध्ङ्नात आपल्याला,

- आदिवासीं अर्थव्यवस्थेची व्याख्या देऊन अर्थ स्पष्ट करता येईल.
- आदिवासीं अर्थव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करता येईल.
- आदिवासीं आर्थिक क्रियांचा अभ्यास करता येईल.
- आदिवासींच्या बदलत्या आर्थिक क्रियांचे स्वरूप विशद करता येईल.

## १.१ प्रस्तावना (Introduction)

भारतीय समाज असा आपण जेव्हा उल्लेख करतो तेव्हा यामध्ये अनेक धर्म, अनेक पंथ, अनेक वंश, अनेक जाती, अनेक रितीरीवाज भाषा, अनेक लहान-मोठे समुदाय, अनेक संस्कृत्या, अशा नानाविविध स्वरूपात विभागलेला दिसून येतो. जगामध्ये फक्त भारत देशातच इतक्या स्वरूपाची विभिन्नता दिसून येते. भारतीय समाजाचे सूक्ष्मपणे अवलोकन केले असता यामध्ये प्रामुख्याने आदिम किंवा आदिवासी समाज, ग्रामीण समाज, नागरी समाज असे समाजशास्त्रीय दृष्ट्या तीन विभागात विभागलेला दिसून येतो.

मानवाला आपल्या जीवन निर्वाहासाठी अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा भागविणे आवश्यक आहे. तसेच कोणत्याही जीवाला आपला जीव जगविणे कर्मप्राप्त आहे.

उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीच्या चौकटीतच मानवाला आपल्या अमर्यादित गरजा यांचा ताळमेळ बसवण्यासाठी त्याला अविरत परिश्रम करावे लागते, हे सत्य नाकारता येत नाही. मानवाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी आवश्यक वस्तूंचे संकलन, उत्पादन, वितरण व उपयोग आदी स्वरूपाच्या क्रिया सतत चालूच असतात त्यांना आर्थिक क्रिया असे म्हणतात.

## १.२ अभ्यास विषयाची मांडणी (Presentation of Subject - Matter)

या घटकाची विभागणी चार भागात केलेली आहे. पहिल्या विभागामध्ये आदिवासींच्या अर्थव्यवस्थेच्या व्याख्या दिल्या आहेत. आणि अर्थ स्पष्ट करण्यात आलेला आहे. दुसऱ्या भागात आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. तिसऱ्या भागात आदिवासींच्या आर्थिक क्रियांचा अभ्यास केलेला आहे. आणि चौथ्या भागात आदिवासींच्या बदलांचा आर्थिक स्वरूपाच्या अभ्यासाचे थोडक्यात विवेचन केले आहे.

### १.२.१ आदिवासींची अर्थव्यवस्था : व्याख्या आणि अर्थ (Tribal Economy : Destinations and Meaning)

आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी आपण प्रथम अर्थव्यवस्थेच्या व्याख्या पाहू.

**१. मदन आणि मुजुदार :-**

‘‘मानवाच्या रोजच्या जीवनातील अत्यावश्यक गरजांचे कमीत कमी श्रमात निराकरण करण्यासाठी क्रमबद्धरित्या संघटित केलेली व्यवस्था म्हणजे आर्थिक व्यवस्था किंवा आर्थिक संघटन होय.’’

**२. रुथ बुनझेल :–**

''मानवाच्या भौतिक अस्तित्वासाठी (म्हणजे मानव जीवंत राहण्यासाठी) मानवाच्या एकूण वर्तनाचे संघटन म्हणजे अर्थव्यवस्था होय.''

**३. वेबस्टर शब्दकोश :–**

''अर्थव्यवस्था म्हणजे संपत्तीचे उत्पादन, वितरण आणि उपभोग यांचे नियमन करणारी व्यवस्था होय.''

४. ''कुटुंबे, व्यवसाय आणि शासन यांच्या उत्पन्न, खर्च, बचत आणि गुंतवणूक यांचे व्यवस्थापन म्हणजे अर्थव्यवस्था होय.''

## ❑ आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचा अर्थ (Tribal Economy : Meaning)

वरील व्याख्यांचे काळजीपूर्वक अध्ङ्गन केल्यानंतर आपणास आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचा अर्थ खालील मुद्द्यांच्या आधारे सांगता येलि.

१. दैनंदिन जीवनातील आवश्यक गरजांचे अल्पश्रमात निराकरण करण्यासाठी विशिष्ठ स्वरूपाची व्यवस्था होय.

२. मानव जीवंत राहण्यासाठी केलेल्या वर्तनाचे संघटन होय.

३. विशिष्ट कालखंडात एखाद्या अर्थव्यवस्थेच्या रहिवाशांनी केलेले एकूण राष्ट्रीय उत्पादन, वितरण आणि उपभोग इत्यादी आर्थिक व्यवहार होत.

४. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात होणाऱ्या आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन होय.

## १.२.१.१ स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न (Check your Progress)

**❑ मोकळ्या जागा भरा.**

१. मानवाच्या भौतिक अस्तित्वासाठी मानवाच्या एकूण ............... संघटन म्हणजे अर्थव्यवस्था होय.

*(अ) वर्तनाचे* *(ब) व्यवसायाचे*

*(क) बचतीचे* *(ड) कालखंडाचे.*

२. एखादी अर्थव्यवस्था म्हणजे संपत्तीचे उत्पादन, वितरण आणि .............. यांचे नियमन करणारी व्यवस्था होय.

*(अ) अस्तित्व* *(ब) उपभोग* *(क) धर्म* *(ड) वर्तन.*

३. कुटुंबे, व्यवसाय आणि .................... यांच्या उत्पन्न, खर्च, बचत आणि गुंतवणूक यांचे व्यवस्थापन म्हणजे अर्थव्यवस्था होय.

*(अ) उपभोग* *(ब) वितरण* *(क) शासन* *(ड) लोकशिक्षण.*

४. कमीत कमी श्रमात निराकरण करण्यासाठी ................ संघटित केलेली व्यवस्था म्हणजे आर्थिक व्यवस्था होय.

*(अ) अनियोजनबद्ध* *(ब) मनमानेल तशी*

*(क) मानवाने* *(ड) क्रमबद्धरित्या.*

## १.२.२ आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये (Characteristics of Tribal Economy)

आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची व्याख्या समजून घेतल्यानंतर आता आपण आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची महत्त्वाची वैशिष्ट्ये अभ्यासणार आहोत.

आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे :-

### १. निर्वाहप्रधानता :-

निर्वाहप्रधानता हे आदिवासी अर्थव्यवस्थेचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आदिवासींचे जीवन हे कष्टमय व संघर्षमय असते. आदिवासींचे संपूर्ण आयुष्य निसर्गाशी सामना करण्यातच जाते. निसर्गातच वास्तव्य करीत असल्यामुळे साहजिकच निसर्गात उपलब्ध असणाऱ्या साधनांचा शोध घेवून ती साधने मिळविण्यातच आदिवासींचा संपूर्ण वेळ जात असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह कसातरी भागविला जातो. तेव्हा त्यांच्या आर्थिक क्रियेचे उद्दिष्ट उदरनिर्वाहासाठी आवश्यक असणाऱ्या गरजा पूर्ण करणे हे असते. यालाच निर्वाहप्रधानता असे म्हणतात.

### २. तांत्रिक साधनसामग्रीचा अभाव :-

अत्यंत साधी अर्थव्यवस्था असलेला आदिवासी समाज निसर्गातील शक्तींचा उपयोग करून घेण्यासाठी स्वतःच्या कष्टावर जास्तीत जास्त भर देण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी ते तांत्रिक साधनसामग्रीचा

अवलंब करीत नाहीत. अत्यंत साध्या आयुधांचा, हत्यारांचा ते वापर करून आपला उदरनिर्वाह करतात. उदा. शिकार व म ासेरी या आर्थिक क्रिया करताना कोणत्याही तांत्रिक साधन सामग्रीचा वापर ते करीत नाहीत. म्हणून त्यांच्या अर्थव्यवस्थेध्ये तांत्रिक साधनसामग्रीचा अभाव दिसून येत असल्यामुळे त्यांची अर्थव्यवस्था अत्यंत साधी असते.

## ३. तुटपुंजे उत्पादन :-

निसर्गाच्या सान्निध्यातच आदिवासी समाजाचे वास्तव्य असल्यामुळे आजूबाजूच्या साधनसंपत्तीचा उपयोग करून घेण्यासाठी त्यांच्याजवळ तांत्रिक साधनांचा अभाव असल्यामुळे आदिवासींच्या आर्थिक क्रिया या साध्या स्वरूपाच्या आहेत. आदिवासींचे शेती करण्याची पद्धत ही स्थलांतरीत शेती पद्धत म्हणजे 'झू' शेती पद्धत असल्यामुळे त्यातून मिळणारे उत्पादन अत्यंत अपुरे असते. तसेच निसर्गाच्या सान्निध्यात, इतस्ततः फिरून फळे, कंदमुळे गोळा करून देखील त्यांच्या हाती उदरनिर्वाहापुरतेच उत्पादन मिळते. त्यांची मासेरी, आर्थिक क्रिया ही मागासपद्धतीची असल्यामुळे त्यातूनही जेते उत्पादन मिळते. त्यांच्यात शिलकी उत्पादन करण्याची क्षमता नव्हती.

**सारांश** : आदिवासींच्यात तांत्रिक साधनांचा अभाव असल्यामुळे त्यांच्या आर्थिक क्रिया तुटपुंज्या व अपुऱ्या दिसतात म्हणून त्यांना आयुष्यभर दारिद्र्यात जीवन जगावे लागते.

## ४. विनिमय साधनांचा अभाव :-

आदिवासींच्या अर्थव्यवस्थेध्ये विनिमय साधनांचा (पैशाचा) अभाव हे आदिवासी अर्थव्यवस्थेचे अत्यंत महत्त्वाचे ठळक लक्षण आहे. केवळ जीवनावश्यक वस्तुंच्या उत्पादनांवरच आपले लक्ष ठेवल्यामुळे आदिवासी उपभोग्य वस्तुंचेच उत्पादन करतात. त्यांच्यातील उत्पादक वस्तूंची निर्मिती अत्यंत नगण्य असल्यामुळे वस्तुंचा संचय करणे किंवा त्यांचा विनिमय करणे त्यांना शक्य होत नाही. कारण त्या वस्तू नाशवंत असतात. उदा. फळे, मासे, मांस इत्यादी तसेच उत्पादीत वस्तूंची देवाण-घेवाण कमी होत असल्याने त्यांच्यामध्ये पैसा, बँक, पतपेढ्या यांचा वापर होत नाही कारण त्यांना रुपये, पैशांचा हिशेब समजत नव्हता. म्हणून प्रगत समाजाप्रमाणे पैसा हे विनियमयाचे साधन नसल्यामुळे कवड्या, मणी, मीठ, जनावरे, धान्य या वस्तुंच्या बदल्यात देवाण-घेवाण केली जाते.

## ५. नफा व बाजारपेठा यांचा अभाव :-

जीवनावश्यक गरजांची पूर्तता करताना आदिवासींची प्रचंड दमछाक होते. कारण विविध आर्थिक क्रियांतून अत्यंत तुटपुंजे उत्पादन त्यांना मिळते. त्यामुळे शिलकी उत्पादन व नफा यांचा प्रश्नच त्यांच्यात निर्माण होत नाही. तसेच प्रसंगानुसार जत्रा, उत्सव यामध्ये वस्तुंची देवाण-घेवाण केली जाते. म्हणून आदिवासी समाजात बाजारपेठा, स्पर्धा, मक्तेदारी आढळून येत नाही.

## ६. सामूदायिक आर्थिक जीवन :-

आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत आर्थिक प्रश्नांची सोडवणूक व्यक्तिगत पातळीवर करता येत नसल्यामुळे ते सामुहिकरित्या प्रयत्न करतात. म्हणजे व्यवहारामध्ये स्वतःला जास्ती फायदा मिळविण्याच्याऐवजी एकमेकांना मदत करणे व त्यामध्ये सर्वांना सहभागी करून घेण्याची वृत्ती जास्त आढळून येते. विशेषतः कंदमुळे गोळा करणे, मासेरी, शिकार, शेती या आर्थिक क्रियेत एकमेकांना सहकार्य करणे व वस्तूंची वाटणी देखिल सहकारितेच्या तत्त्वावर एकमेकांना केली जाते. म्हणून सामुदायिक आर्थिक जीवन हे आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वपूर्ण एक लक्षण समजले जाते.

## ७. श्रमविभाजनातील विशिष्टीकरणाचा अभाव :-

आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत कार्यांचे विशिष्टीकरण आढळून येत नाही. कारण त्यांच्या आर्थिक जीवनात व्यक्तींचे वय, लिंग, शक्ती इत्यादी शारिरीक बाबींवर आधारलेले श्रमविभाजन आढळून येते. पुरुषांकडे अधिक श्रमाची म्हणजेच शिकार, मासेरी इत्यादी कामे दिली जातात तर मासिक पाळी, गरोदरपणा, बाळंतपणामुळे घरकाम तसेच फळे गोळा करणे, जळण गोळा करणे इत्यादी कमी श्रमाची कामे सोपविली जातात. तसेच आदिवासींची अर्थव्यवस्था तंत्रविद्यात्मक साधनांच्या अभावी अत्यंत साधी आहे. तशात त्यांची मर्यादित लोकसंख्या, मर्यादित आर्थिक गरजा व निसर्गाधीन समाज असल्यामुळे त्यांच्या जीवनात विशेषीकरणाला वाव नाही. म्हणून त्यांच्या जीवनात विशिष्टीकरण दिसून येत नाही.

## ८. धर्म व जादूटोणा यांचा प्रभाव :-

निसर्गावर अवलंबून असलेला आदिवासी समाज अनियमितता, अज्ञान, धर्माचा प्रभाव, अंधश्रद्धा यामुळेच अलौकिक दैवशक्तीला महत्त्वाचे स्थान दिले जाते. निसर्गातील घडामोडीमागची कारणमीमांसा त्यांना ज्ञात नसते. शिकार, मासेरीला जाण्यापूर्वी धार्मिक विधी केले जातात. प्राण्यांचे बळी दिले जातात. जादूचा आधार घेतला जातो आणि निषेध नियमांचे पालन केले जाते. तसेच आर्थिक क्रियांत यश प्राप्त न होणे हे देखील अलौकिक दैवीशक्तीच्या कृपेवर अवलंबून आहे, अशी त्यांची गाढ श्रद्धा असते. शेतीच्या विविध प्रक्रियांध्ये म्हणजे मशागत, लावणी, पेरणी, कापणी, मळणी इत्यादी कोणत्याही क्रियांच्या अगोदर शरीराचे मनाचे पावित्र्य कायम राखणे, जादूटोणा करणे, धार्मिक संस्कार करणे, देवदेवतांची पूजा-अर्चा करणे, प्राण्यांचे बळी देणे इत्यादी विधी करण्यास कधीही विसरत नाहीत. अशा रितीने आर्थिक क्रियांध्ये धर्म व जादूटोणा यांचा प्रभाव दिसून येतो.

## ९. स्थिर आणि समान अर्थव्यवस्था :-

आदिवासी समाज हा वेगवेगळ्या जमातींमध्ये विभागला गेला असून जंगल, डोंगराळ दऱ्याखोऱ्या अशा दुर्ग भागात त्यांचे वास्तव्य असते. प्रगत समाजापासून आदिवासी समाजाचे आर्थिक जीवन दूर

असून कित्येक शतके त्यांच्या आर्थिक जीवनात कोणतेच बदल झालेले नाहीत. त्यांच्यामध्ये बाजारपेठ, स्पर्धा, मक्तेदारी यांचे अस्तित्व नसल्यामुळे त्यांच्या आर्थिक जीवनात स्थिरता दिसून येते व समानता आढळते. यामुळेच आदिवासींच्या जीवनामध्ये परिवर्तन झालेले आपणास दिसून येत नाही.

### १.२.२.२ स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न

❒ **मोकळ्या जागा भरा.**

१. ..................... हे आदिवासी अर्थव्यवस्थेचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.
*(अ) साठा करणे (ब) एकत्र रहाणे (क) विनासहकार (ड) निर्वाहप्रधानता.*

२. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेध्ये ..................... साधन सामग्रीचा अभाव दिसून येतो.
*(अ) विसंघटीत (ब) संघटीत (क) तांत्रिक (ड) मांत्रिक.*

३. आदिवासी समाजात बाजारपेठा, स्पर्धा आणि .................. आढळून येत नाही.
*(अ) नियोजन (ब) मक्तेदारी (क) समन्वय (ड) सहकार.*

४. .................. आर्थिक जीवन हे आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वपूर्ण लक्षण समजले जाते.
*(अ) सामुदायिक (ब) विभक्त (क) वैयक्तिक (ड) अविभक्त.*

५. आदिवासींच्या आर्थिक क्रियांध्ये धर्म व ................. यांचा प्रभाव दिसून येतो.
*(अ) भाषा (ब) वंश (क) चालीरीती (ड) जादूटोणा.*

## १.२.३ आदिवासींच्या आर्थिक क्रियांचे प्रकार

आदिवासींच्या अर्थव्यवस्थेध्ये असे स्पष्ट होते की, आदिवासींची अर्थव्यवस्था ही अत्यंत साध्या पद्धतीची होती. आपल्या कमीत कमी गरजा भागविण्यासाठीच त्यांची अविरत धडपड चालू असते. अन्न, वस्त्र या त्यांच्या प्रमुख गरजा असल्यामुळे त्यांना आपल्या रक्ताचे पाणी करावे लागत होते. आदिवासींच्या आर्थिक क्रिया या एकाच प्रकारच्या नव्हत्या. तर त्या अनेक प्रकारच्या होत्या. मुलतः आदिवासींचे भौतिक पर्यावरण तो ज्या भागात राहतो तेथील जमीन, पाणी, पशु, पक्षी, वनस्पती, हवामान इत्यादी व अवगत तांत्रिक ज्ञान या गोष्टींवर आर्थिक क्रियांचे प्रकार अवलंबून असतात. तसेच या गोष्टीत सातत्याने बदल होत असल्यामुळे आदिवासींच्या आर्थिक क्रियांच्या प्रकारांची संख्या नेहमी वाढत आहे असे दिसून येते.

आदिवासी समाज हा एकाच आर्थिक क्रियावर न जगता एकाच वेळी अधिक आर्थिक क्रियांवर आपली उपजिविका करीत होता. त्याच दृष्टीने त्यांच्या आर्थिक क्रियांचे प्रकार प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ फोर्ड व हस्कॉविट्झ यांनी खालीलप्रमाणे केलेले आहेत.

**(अ) अन्नसंपादन :** १. अन्नसंकलन/खाद्यसंकलन.
२. शिकार.
३. मासेमारी.

**(ब) अन्नउत्पादन :** १. पशुपालन.
२. शेती/कृषी.

**(क) इतर व्यवसाय :** १. हस्तव्यवसाय.
२. मोलमजूरी.

वरील आर्थिक क्रियांच्या प्रकारांची आपण सविस्तर माहिती करून घेणार आहोत.

## १. अन्नसंकलन/खाद्यसंकलन :-

अन्नसंकलन ही प्राथमिक स्वरुपाची आर्थिक क्रिया असल्याने भोवतालच्या निसर्गात सहज उपलब्ध होतील अशा वनस्पती व प्राणी यांचे संकलन करून त्यावर आपली उपजिविका करणे यास अन्नसंकलन म्हणतात. यामध्ये पाने, फुले, फळे, कंदमुळे आणि मध, डिंक, मुंग्या, कृमी-किटक इत्यादी गोळा करून आपली उपजिविका करीत होते. यामध्ये कोणत्याही प्रकारची कला, तंत्र किंवा उपकरणे वापरली जात नव्हती. परंतु अलिकडच्या काळात खाद्यसंकलनाची पद्धत ही सर्वत्र आढळून येते. खाद्यसंकलनाच्या पद्धतीतूनच मानवास अनुभव, ज्ञान मिळत गेले व यामध्ये प्रगती करून पशुपालन, शेती इत्यादी अन्न उत्पादनाच्या मार्गांचा विकास साधला.

खाद्यसंकलनासाठी जंगलामध्ये विविध ठिकाणी हे लोक विखुरलेले दिसून येतात. कंदमुळे, फळे, मध गोळा करणे तसेच आदिम लोक हे जंगलात गटागटाने अन्न संकलन करण्यासाठी बाहेर पडत असतात. त्यांना अनेक संकटांनाही तोंड द्यावे लागते. उदा. भारतातील अंदमान बेटावरील आदिवासी दक्षिणेतील कादर पलियन, पनियन, येनाडी, कुरुंब, चेंचू तर मध्यप्रदेशातील बैगा, ओरिसातील जुआँग, महाराष्ट्रातील ठाकूर, भिल्ल या जमातींमध्ये खाद्य संकलन केले जाते.

## २. शिकार :-

अन्न संकलनाची क्रिया घडत असतानाच शिकार ही आर्थिक क्रियादेखिल नैसर्गिक पर्यावरणातून अन्न गोळा करणारी आदिमांची आर्थिक क्रिया आहे. आदिम स्त्रीया प्रामुख्याने भाजीपाला व फळे गोळा

करण्याचे काम करतात. तर पुरुष मात्र संघटीतपणे बाहेर जावून हत्ती, गवा, रानडुक्कर वगैरे मोठ्या प्राण्यांची शिकार सामुहिकरित्या करतात. तर वैयक्तिक स्वरुपामध्ये ससा, हरिण इत्यादी लहान प्राण्यांची शिकार करतात. तसेच शिकारीसाठी अनुकुचीदार दगड, विळा, चाकू, काठ्या, कोयता, कुऱ्हाड, भाला, बरची, धनुष्यबाण इत्यादी विविध हत्यारे व तंत्राचा वापर करतात. या खेरिज घोडा, उंट, कुत्रा या प्राण्यांचाही वापर केला जातो. उदा. म्हैसूरमधील कुर्ग लोक हत्तीची शिकार याच तंत्राने करतात. कुर्ग लोक हत्ती या जनावराची शिकार करण्यात विशेष पटाईत आहेत. हत्तीची शिकार झाल्यानंतर कुर्ग लोकांच्या उदरनिर्वाहाचे चिंता कित्येक दिवस मिटते. पक्ष्यांची शिकार करण्यासाठी सापळे, जाळी, धनुष्यबाण इत्यादींचा वापर करतात. शिकारीला जाण्यापूर्वी आदिवासी लोक देव-देवतांची धनुष्यबाणांची पूजा करतात. तंत्रमंत्र जादूटोणा यांचे आर्थिक क्रियेसाठी साहाय्य घेतले जाते. भारतीय कमार जातीचे लोक होकुरा नावाचा विधी करतात. अशा प्रकारे आदिवासी लोक शिकार करतात.

## ३. मासेमारी :-

मासेमारी ही शिकारीच्या बरोबरीने दुय्यम स्वरुपाची केली जाणारी एक आर्थिक क्रिया आहे. जवळजवळ सर्वच आदिवासी लोक मासेरी करीत असतात. मासेरी करण्यासाठी आदिवासी लोक जाळी, गळ, भाले, धनुष्यबाण, टोकदार काठी वगैरे हत्यारांचा वापर करतात. मासेरी ही सामुहिक व वैयक्तिकरित्या केली जाते. नदीच्या वरच्या भागात जावून काही आदिवासी मोठोठ्याने आवाज करतात. त्यामुळे मासे भयभीत होवून खाली जातात व खाली लावलेल्या जाळ्यात सापडतात. तसेच लहान बोटी, लाकडी तराफे, नावा, लाकडी ओंडके वगैरेंचा वापर ते मासेरीसाठी करीत होते.

दक्षिण आफ्रिकेतील जमाती पाण्यात विषारी व गुंगी येणाऱ्या वनस्पती टाकून मासेरी करतात. ऑस्ट्रेलियातील जमाती गळ लावून मासेरी करतात. तसेच मध्यप्रदेशातील गोंड लोक तर पावसाळा संपत आल्यावर वाहत्या नाल्याला ते बंधारा घालतात व देवदेवतांची पूजा-अर्चा करून योग्य दिवस निवडून लोक संघटीतपणे मच्छीमारी करतात. सामुहिकरित्या केलेल्या मासेरीची वाटणी सामुहिक तत्त्वाचा वापर करूनच केली जाते.

त्याचबरोबर कंदमुळे, फळे गोळा करणे, शिकार मासेमारी यावर उपजिविका करणारी आदिवासींची संख्या खूपच कमी आहे. एखाद्या ठिकाणची कंदमुळे फळे संपल्यानंतर आदिवासी अन्नासाठी स्थलांतरीत होतात. म्हणून आदिवासींच्या जिवनाला स्थैर्य प्राप्त करून देणाऱ्या आर्थिक क्रिया म्हणजे पशुपालन आणि शेती होय.

## ४. पशुपालन :-

निसर्गाध्ये उपलब्ध असणाऱ्या वस्तुंवर उपजिविका करणारा आदिवासी समाज हा कालांतराने इतर प्राण्यांचा उपयोग त्याला समजू लागल्याने पशुपालन या आर्थिक क्रियेकडे आदिवासी लोक वळाले.

मानवाने अनेक पशुंना माणसाळून त्यांना पाळण्याचे प्रयत्न केले, परंतु त्यांना हजारो वर्षाच्या प्रयत्नाने थोडेच पशु (प्राणी) पाळता आले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने गाय, बैल, घोडा, कुत्रा, म्हैस, रेडा, शेळ्या-मेंढ्या, डुक्कर, गाढव, उंट हे पशु होत. तसेच शिकारीसाठी करावे लागणारे कष्ट, प्राण्याची दुर्मिळता, प्राण्यापासून मिळणाऱ्या दूध, मांस, हाडे, कातडी, केस वगैरे घटकामुळे पशुपालनाचे महत्त्व आदिवासींना समजले. त्याचबरोबर कोंबड्या, बदके, कबुतरे व मोर यांचाही उपयोग खाद्यान्नासाठी करू लागले.

उदा. भारतातील निलगिरी पर्वतावरील तोडा जमात म्हैशीच्या पालनासाठी प्रसिद्ध आहे. म्हैशीच्या दूधापासून विविध पदार्थांची निर्मिती करून आपला उदरनिर्वाह करतात. पश्चिम आशियातील किरगीझ, कझाक, तार्तर, अल्लाई हे लोक शेळ्या-मेंढ्या पाळतात. दक्षिण आफ्रिकेतील हिरेरो, हॉटेन हॉट या जमाती गायीबैलावर आपला उदरनिर्वाह करतात. उत्तर आशियातील चूकची, कोर्याक या जमाती रेनडियर पाळतात. त्याच्यावरच ते आपली उपजिवीका करतात. म्हणजे पशुपालन हे उपजिवीकेचे साधन झाल्याने मानवी जीवनाला कलाटणी मिळाली. म्हणून आज प्रगत समाजातसुद्धा पशुपालन एक पुरक व्यवसाय म्हणून मानला जातो.

## ५. शेती :-

शेती हा आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा व्यवसाय समजला जातो. त्यांची अर्थव्यवस्थी ही स्थीर स्वरुपाची असते. त्यामध्ये बदल दिसून येत नाहीत. कित्येक हजारो वर्षांपासून शेती केली जात आहे. केळी व इतर फळे माणसाला शेतीच्या अगोदरच माहित होती. भारतीय शेती करणाऱ्या जमातीत उराँव, मुंडा, भिल्ल, संथाल, बैगा, मजहर, खारवार, कोरवा, गोंड व आसाममधील बऱ्याच जमाती आहेत. वगैरेंचा उल्लेख करता येईल. तसेच गहू, सातू, ज्वारी, बाजरी या धान्याची लागवड आशिया, अमेरिका, युरोपातील अंजिर, खजूर, ऑलिव्ह, पीच वगैरेंकडे प्रथम लागवड विविध खंडातील आदिवासींनीच केलेली आहे. यामध्ये आदिवासींचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. यामुळे आज शेतीला विकसीत रुप प्राप्त झालेले दिसत आहे.

## ❑ स्थानांतरित शेती (Shifting Cultivation) :-

एकाच जमिनीची मशागत सातत्त्याने न करता एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जावून तेथे शेती केली जाते. शेतीचे स्वरूप नेहमी बदलत जात असल्याने प्रत्येक वेळेला लागवडीसाठी नवीन जमीन घेतली जात होती. याच प्रकाराला स्थलांतरित शेती असे म्हणतात. अशा स्वरूपाच्या शेती पद्धतीस झू शेती, मरहन शेती, बेवडा शेती, डिप्पा शेती, एरका शेती अशी अनेक नावे आहेत.

आदिवासी लोक जमीन नांगरण्यासाठी तयार नसतात कारण जमिनीत नांगराचा फाळ घुसविणे म्हणजे आपल्या धरती मातेच्या पोटात शस्त्र खुपसणे असे त्यांना वाटते. त्यातून खतांचा वापर त्यांना

माहित नसल्याने त्यांची जमीन ही नापीक होती व त्यातून उत्पन्न कमी मिळत होते. म्हणूनच ते शेतीचे स्थान बदलतात व दुसरीकडे स्थलांतरीत होवून याच पद्धतीने शेती करतात.

भारतामध्ये प्रामुख्याने आदिवासी समाजातून शेतीची बदलती तुकडे पद्धती मोठ्या प्रमाणात केली जाते. उदा. नागा लोक या शेतीपद्धतीला 'झू' शेती असे म्हणतात. तर माडिया आणि बैगा लोक 'पेंडा' म्हणतात. यालाच 'बैगा-बेवार' शेती पद्धती असेही म्हणतात. महाराष्ट्रात सिरोंचा मेळघाट येथे अप्रगत शेती केली जात आहे. तसेच राजस्थानातील बरेचसे आदिवासी स्थीर पद्धतीने शेती करणारे आहेत. उदा. मेर्थाळ, भिल्ल, मिना जमाती वगैरे. आदिवासी लोक शेतीसाठी फावडे, कुदळ, नांगर ही औजारे वापरीत. नांगर ओढण्यासाठी सुरुवातीला माणसांचा वापर केला जात होता. कालांतराने जनावरांचा वापर होवू लागला. आज आदिवासी लोक नांगराचा वापर करताना दिसत आहेत.

## ६. हस्त व्यवसाय :-

पारंपारिक पद्धतीने हस्तव्यवसाय किंवा हस्तकला कौशल्यासाठी अनेक जमाती प्रसिद्ध आहेत. ही कला आदिवासींनी जतन करून ठेवली आहे. त्यामध्ये कोरवा जमाती लोखंडाच्या वस्तू तयार करतात. तर इरूला जमाती बांबूच्या वस्तूपासून चटया तयार करतात. खासी लोक जनावरांच्या कातडीपासून रॅकेटस्ना वापरण्यात येणारे तणावे तयार करतात. थारू लोक फर्निचर, घरगुती भांडी, टोपल्या, वाद्ये, आयुधे, दोर, चटया वगैरे वस्तू तयार करतात. तसेच तोडा लोक दूध व दूधाचे पदार्थ बनवितात. बोंदो लोक कापड विणण्यात वाकबगार आहेत. नागा लोक कापसापासून विणकाम करतात. रंग व कलाकुसरी करतात. त्याचप्रमाणे उत्तर भारतातील परधान जमाती संगीत वाद्य तयार करतात व कोल्हापूर जिल्ह्यातील वडगाव, तळसंदे भागात राहणारे ङ्गगोपाळ लोक ऊसाच्या गहाण्या (गुऱ्हाळ) जवळ ङ्गकाहिलीङ्घ स्वच्छ करण्याचे काम करतात. बाद झालेल्या रसापासून ते 'गूळ' तयार करतात. त्यासाठी ते प्रसिद्ध आहेत. अशा प्रकारे विविध हस्तव्यवसाय काही आदिवासी करतात.

## ७. मोलमजूरी :-

इतर व्यवसायामध्ये प्रामुख्याने मोलमजुरी ही आर्थिक क्रिया महत्त्वाची समजली जाते. या आर्थिक क्रियेध्ये प्रामुख्याने आसाममध्ये संथाल, गोंड, कोंड या जमाती चहा, कॉफीच्या मळ्यात मजुरीचे काम करतात. तसेच ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश या भागात अभ्रक, मँगनीज, लोखंड, कोळसा वगैरेंच्या खाणीत हे संथाल आदिवासी मजूर म्हणून काम करतात. अशा मोलमजूरीचा हातभार उदरनिर्वाहासाठी लागतो. परंतु अज्ञानामुळे काही आदिवासींना नाणी, नोटा, बाजारभाव यांचा हिशेब न आल्यामुळे त्यांना फसवले जाते. तसेच आधुनिक काळात मात्र आदिवासी आपला भाग सोडून शहरात आल्यामुळे त्यांचे प्रगत समाजाशी असलेले संबंध वाढले आहेत.

### १.२.३.३ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

❒ **खालील पैकी कोणती विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१. महाराष्ट्रातील ठाकूर, भिल्ल या जमातींमध्ये खाद्यसंकलन केले जात नाही.

२. नैसर्गिक पर्यावरणातून अन्न गोळा करणारी शिकार ही आदिवासींची आर्थिक क्रिया आहे.

३. भारतातील कमार जातीचे लोक होकुरा नावाचा विधी करतात.

४. दक्षिण आफ्रिकेतील जमाती पाण्यात विषारी व गुंगी आणणाऱ्या वनस्पती टाकीत नाहीत.

५. भारतातील निलगीरी पर्वतावरील तोडा जमाती म्हैशीच्या पालनासाठी प्रसिद्ध आहेत.

## १.२.४ आदिवासी अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप :-

काळानुसार समाजाचे स्वरूप बदलते. समाजातील सभासदांच्या संस्थांच्या गरजा बदलतात. समाजाचे असे परिवर्तनीय स्वरूप पाहता समाजातील धर्मसंस्था, कुटुंबसंस्था, अर्थसंस्था, शिक्षणसंस्था या सामाजिक संस्थात काळानुसार, गरजेनुसार, कार्यात्मक व रचनेतील बदल निर्माण होतात. तसेच सामाजिक परिवर्तनाबरोबरच स्थिरतेचा विचार होतो. स्थित्यात्मक व गत्यात्मक बाजू आणि त्यांचा समन्वय साधून समाज जीवन आकाराला येते व प्रवाहित होते. या मुद्द्यानुसार प्रत्येक सामाजिक संस्था, त्या समाजजीवनाच्या आधारभूत संस्था तर आहेतच पण त्यांचे महत्त्व लक्षात घेता काळानुसार अर्थसंस्थेत काही कार्यात्मक व रचनात्मक बदल होतात.

आदिम समाजाचा विचार करता देशाचे हे आद्य रहिवासी खाद्यसंकलनापासून ते अन्नोत्पादन अवस्थेपर्यंत मार्गक्रम करताना दिसून येतात. आदिवासी समाजात, सामाजिक उत्क्रांतिवादाचा सिद्धांत अभ्यासल्यानंतर अर्थसंस्थेच्या काही अवस्थांचा क्रमवारीने विचार करावा लागतो.

१. निसर्गात उपलब्ध असलेल्या खाद्यपदार्थांचे संकलन करणे हे आपण अगोदरच खाद्यसंकलन या मुद्द्यातून पाहिले आहे. परंतु आजही पहिल्या आदिम आर्थिक क्रियेत काही आदिम समाज गुंतलेला आहे. उदा. मलवदन, मलपंतरम्, ओंगू समाज, कुरुम्बा वगैरे.

२. शिकार व मासेरी या अर्थव्यवस्थेच्या दुसऱ्या अवस्थेध्ये अनेक जमाती शिकार व मासेरी ही आर्थिक क्रिया खाद्यसंकलनाशी पूरक म्हणून करतात.

३. पशुंची, प्राण्यांची शिकार करण्यापेक्षा त्यांचे पालन करून त्यांच्या गुणांचा व त्यांच्याकडून मिळणाऱ्या वस्तुंचा पदार्थांचा वापर करून मानवी जीवन सुलभ करता येईल, हे माणसाला

कळल्यावर 'पशुपालन' ही क्रिया सुरू झाली. प्राण्यांपासून मिळणारे दूध, त्याचे पदार्थ, प्राण्यापासून मिळणारे केस, लोकर, कातडी, दात वगैरेंमुळे पशुपालन ही आर्थिक क्रिया मानवप्राण्याला उपयोगी ठरली आहे.

४. पूर्वी आदिवासी 'दाही' स्थानांतरित पद्धतीची शेती करीत होते. यालाच मागासलेली शेती म्हणत. पण आज मात्र शेतजमीन नांगरणे, खतांचा वापर करणे, नवीन बि-बियाणांचा वापर करणे यासारख्या गोष्टी आदिवासींना माहित झाल्यावर स्थानांतरित शेती पासून ते स्थीर शेती करण्याचे तंत्र आदिवासी शिकू लागले.

स्थिर पद्धतीची शेती हा आदिवासी जमातींच्या अन्य विकासास पोषक गोष्ट ठरली आहे. परंतु असे असले तरी आजच्या आधुनिक शेतीची सुरुवात स्थानांतरीत शेतीपासून झाली आहे. स्थानांतरीत शेती ही अनेक प्रकारे नुकसानीची होती. कारण शेतीसाठी जंगले पेटवून दिल्यामुळे जंगलातील औषधी वनस्पतींचा ऱ्हास झाला. तसेच जंगल संपत्तीची राख झाल्यामुळे जमिनीची धूप वाढते व पावसाचे प्रमाण कमी होते. पर्यावरणाचा तोल बिघडला जातो. त्यामुळे शेतीतून उत्पन्न कमी प्रमाणात मिळते. वर्षभर ते उत्पन्न त्यांना पूरत नसल्यामुळे बऱ्याच समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे -

शासनाने शेतीबाबत प्रशिक्षण, अवजारे, प्रगत तंत्रज्ञान त्यांना पुरविले असल्याने आदिवासी लोक स्थिर शेतीकडे वळलेले दिसतात. तसेच प्रशिक्षीत आदिवासींनाच याबाबत पुढाकार घेण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. स्थानांतरित शेतीमुळे जंगलसंपत्तीचा नाश होतो व त्यातून उत्पन्न अपुरे मिळते म्हणून आदिवासींना स्थिर पद्धतीचे तंत्र शिकवण्यात आले. तसेच नव-नवीन बी-बियाणे, खतांचे महत्त्व त्यांना सांगून शासकीय योजनांचा लाभ घेवून स्थीर पद्धतीची शेती आदिवासी लोक करीत आहेत. यामध्ये प्रामुख्याने रेंगमा, नागा, भिल्ल, गोंड, मुंडा, संथाळ, खासी, वारली वगैरे जमाती या पद्धतीने शेती करतात.

५. शेती व्यवसायावर हस्तव्यवसाय या आर्थिक क्रियेध्ये काही आदिवासी त्यांच्या सभोवतालच्या प्रदेशात मिळणारा कच्चा माल यापासून वस्तू तयार करणे, यासारख्या गृहोद्योगात गुंतले आहेत. तसेच मोलमजूरीसाठी मजूर म्हणून मोठ्या गावातून, मोठ्या शहरातून अर्थप्राप्ती करू लागला. चहाकॉफीच्या मळ्यात, खाणकामात पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, तामिळनाडू या राज्यातील अनेक आदिवासी काम करताना दिसतात.

अर्थसंस्थेचा विकासाच्या अवस्थांचा विचार केल्यास खाद्यसंकलनानंतर अन्नोत्पादन पर्यंतच्या प्रगतीमध्ये अनेक आदिवासी जमाती कार्यरत आहेत. बऱ्याच आदिवासी जमाती दोन किंवा तीन आर्थिक क्रियेचा मेळ घालून आपले जीवन सुकर करतात. वर्तीन काळातील त्यांच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप जाणून घेताना काही आदिम जमातींची उदाहरणे आपल्याला इथे देता येतील -

हिमाचल प्रदेशातील गदी व गुज्जर किंवा निलगीरी पर्वताच्या पायथ्याखाली राहणारी तोडा जमात, पशुपालनाबरोबरच शेती ही करतात. आर्थिक क्रियापण बदलत्या अर्थव्यवस्थेचा संबंध. विवाहाचा प्रकार कुटुंबसंस्थेच्या निकटचा आहे. दक्षिण भारतातील बहुपतीक विवाह व कुटुंबसंस्थेतील बदल हा तोडा जमातीत घडून आला आहे. बहुपतीक कुटुंबाकडून एकपतीक कुटुंबाकडे तोडा जमातीने प्रवास केलेला दिसतो.

तसेच तोडा जमाती पशुपालन दुग्धव्यवसायाशी संबंधीत आहे. त्याच्या जोडीला शेतीचा व्यवसायही आहे. पण तेथील 'डेअरी' ही संस्था फक्त आर्थिक चौकटीतील नाही तर धर्मसंस्थेशी जवळीक साधणारी आहे. परंतु अलिकडे आदिम जमाती राष्ट्रीय सामाजिक जीवनात प्रवेश करताना विपणन व्यवस्थेचे महत्त्व जाणून घेऊ लागली आहे. आपल्या विकास प्रक्रियेत पैसा किंवा धन हे साधन किती महत्त्वाचे आहे हे त्यांच्या लक्षात येऊ लागले आहे. विपणन व्यवस्थेत खरेदी-विक्री संघ, सहकारी संस्थांची स्थापना महत्त्वाची ठरते. आदिम जमातींनी आपल्या उत्पादित वस्तुंची विक्री करणे हे त्यांच्या फायद्याचे झाले असल्याने सहकारी संस्थांची स्थापना व त्याद्वारे 'ना नफा ना तोटा' या तत्वावर आर्थिक व्यवहार सांभाळले. तर आदिम कलाकारांच्या, कारागिरांच्या उत्पादित वस्तू असोत, शेतीमाल, शेतमालातून बनविलेल्या वस्तू असोत. मध्यस्थ दलालांचे उच्चाटन या कारणांनी हुशार, होतकरु कारागिर आदिवासींच्या कामांचा, कष्टाचा योग्य प्रमाणात मोबदला मिळेना ही जाणीव आदिवासींना होऊ लागली. म्हणून अर्थसंस्थेतील भल्या-बुऱ्या गोष्टी समजून घेऊन सहकारी संस्थांकडून आपल्या श्रमाचा योग्य मोबदला त्यांना मिळू लागला आहे, ही त्यांच्या कष्टाच्या प्रक्रियेतील महत्त्वाची नोंद घेणे जरुरीचे आहे.

उदाहरणार्थ हस्तव्यवसाय म्हटले की, त्यात आदिवासी कारागिरांकडून उत्पादित वस्तू तयार होतात. त्यामध्ये तामिळनाडूधील 'इरुला' बांबूकाम करतात. बांबूपासून हे आदिवासी लोक गृहोपयोगी व कलात्मक वस्तू तयार करतात. कोटा या जमातीचे लोक चटया तयार करतात. गारो, खासी, जैतिया या पर्वतरांजीमध्ये खासी जमात शाली तयार करणे, साड्या विणने ही आर्थिक क्रिया हातमागावर करतात. लोकरीच्या वस्तू तयार करणे, यात कुशल कारागीर आहेत. या वस्तूंना परदेशातही चांगली मागणी आहे. विपणन व्यवस्थेवर सध्या आदिवासींनी ताबा मिळविला पाहिजे. काही ठिकाणी प्रत्येक राज्याने ङ्गहस्तकला प्रदर्शनङ्ग महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर येथे भरवितात. तसेच आदिवासींच्या कलाकृतींचे प्रदर्शन मोठ्या शहरात भरवितात. त्यामुळे आदिवासींच्या कलाकृतींना बाजारात चांगली किंमत मिळते.

वेठबिगारी पद्धतीचे उच्चाटन पश्चिम महाराष्ट्रात बऱ्याच प्रमाणावर झालेले आहे. 'सालगडी' ही माणुसकी नष्ट करणारी प्रथा आज कालबाह्य ठरली आहे व सहकारी संस्थामार्फत आदिवासींच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविला आहे. पालघर, डहाणू तालुक्यात सालगडी मुक्त केल्याचे उदाहरणे सापडतात.

महाराष्ट्रातील 'वारली पेंटिग्ज' तर देशाबाहेर केव्हाच जाऊन पोहोचली आहे. एक कला म्हणून

वारली आदिवासी नुसतेच प्रशिक्षित नाहीत तर समृद्ध देखिल आहेत, असे म्हणावे लागेल. मुंबई, पुणे, कोल्हापूर येथे अधून-मधून वारली रंगचित्रांचे प्रदर्शन भरविली जातात. त्यांची कलाकृती जगभर प्रसिद्ध आहे. वारली हे पूर्वी शिकार, मागासलेली शेती करणारे आदिवासी पण राष्ट्रीय प्रवाहात सामिल झाल्यामुळे त्यांची कला जगप्रसिद्ध झाली आहे.

उद्योग धंद्यातील कामगार वर्ग यामध्ये कोळसा तयार करणे, या व्यवसायात कातकरी (काथोडी) यामध्ये कुशल आहेत. परंतु कोळसा या घटकांचे महत्व कमी झाल्यामुळे कोळसा वापरणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. इतर उर्जाशक्तीच्या प्रकारांचा उपयोग, जंगलसंपत्तीचा नाश, यामुळे कोळसा तयार करण्यावर बंधने आली. त्यामुळे कातकरी समाज जवळच्या शहरात रेल्वेचे रूळ तयार करणे, रूळ बसविणे, शहरातील बांधकाम व्यवसायातील मजुरी करणे, रेल्वे स्टेशनवर हमाली या आर्थिक क्रिया करताना दिसतात. मुख्य व्यवसाय शेती असेल तर जोड व्यवसाय म्हणून मजुरी करणे कामगार म्हणून काम करणे, शहरात जाऊन काम करणे आदिवासींनी पसंत केले आहे.

आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप याचा विचार करताना तर आर्थिक पुनर्वसनाबरोबरच सामाजिक, भावनिक, मानसिक, पुनर्वसन लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. देशाच्या विकासाचा कार्यक्रम राबविताना आपल्याला धरणे बांधणे, विकास कार्यक्रमात तांत्रिक ज्ञानावरील एखादा प्रकल्प उभा करणे त्यासाठी आदिवासींची जमीन खरेदी करून त्यांना पर्यायी व्यवस्था करणे महत्वाचे ठरते. जमिनी दिल्यामुळे साहजिकच त्यांना मजुरी करूनच आपला संसार उभा करावा लागतो. शिक्षण नाही, तांत्रिक कौशल्य काही म्हणून मिळेल ती मजुरी स्वीकारावी लागतात.

अभिसंस्करण/संस्कृतीकरण (Acculturation) ही अशी एक सामाजिक प्रक्रिया आहे की ज्यात विविध सांस्कृतिक पार्श्वभूी असलेले गट परस्परांच्या संपर्कात आल्यानंतर एकमेकांच्या सांस्कृतिक अनुबंधातील काही भाग किंवा संपूर्ण सांस्कृतिक अनुबंध स्विकारतात. एका गटाच्या संस्कृतीचे दुसऱ्या गटात होणारे संक्रमण हे सुद्धा अभिसंस्करण वा संस्कृतीकरण होय. तसेच या प्रक्रियेत आपण महाराष्ट्रातील ठाकूर आदिवासींचे उदाहरण घेऊया. या समाजातील लोक ठाणे, वसई, विरार, कल्याण येथे रेल्वेस्टेशनवरील हमाली करतात. तसेच ऑर्केस्ट्रामध्ये काम करतात. छोटी-छोटी दुकाने सांभाळतात व जंगलातील मेणापासून पाकिटे, द्रोण ही तयार करून विकतात. इशान्येकडील आदिवासी सुंदर स्वर्ग , त्यातील सात भगिनी या विषयी पर्यटनाविषयीच्या जाहिराती नेहमी वाचायला मिळतात. पण त्यामध्ये पर्यटक तेथील आदिवासींना त्यांच्या कलाकृतींना चांगलीच दाद देतात. पर्यटक तेथील आदिवासींना त्यांच्या कलाकृतींना चांगलीच दाद देतात. पर्यटन हा व्यवसाय आदिम हस्तव्यवसायाला पूरक ठरतो. विपणन व्यवस्था ही वेगळ्या स्वरूपात लक्षात घेता आदिवासींच्या कलेचा मोबदला त्यांच्या स्वतःच्या हातात पडू शकतो, हे वर्तानकालीन सत्य त्यांच्या आर्थिक प्रगतीला पोषक आहे.

आदिवासींची आर्थिक प्रगती साधण्यासाठी शासनाने विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये

प्रामुख्याने टेलिफोन बुथ चालविणे, टायपिंग, संगणक विषयक तांत्रिक प्रशिक्षण देणे, बागबगीचा प्रशिक्षण, लहान-मोठे व्यावसायिक शिक्षण-अभ्यासक्रम, प्रथमोपचाराचे प्रशिक्षण देणे वगैरे. तसेच आदिवासींनी शिक्षण घेतल्यास त्यांच्यासाठी म्हणजे अनुसूचित जमातींसाठी खास पदे, शिक्षण, वैद्यकीय सेवा, सरकारी, निमसरकारी क्षेत्रातील सेवेची पदे राखून ठेवली आहेत. शिक्षण, तंत्रशिक्षण, कलाकुसर यात प्राविण्य असणाऱ्या आदिवासींसाठी अशी क्षेत्रे राखीव आहेत. त्यांचा आदिवासींना फायदा घ्यावा, हेच त्यांच्या आर्थिक उन्नतीचे कारण ठरेल व अर्थप्राप्तीचे मार्ग स्विकारून स्वावलंबी होण्याचा त्यांना मार्ग सापडेल.

### १.२.४.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

❒ **खालीलपैकी कोणती विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१. काळानुसार अर्थसंस्थेत काही कार्यात्मक व रचनात्मक बदल होतात.

२. पशुपालन ही आर्थिक क्रिया मानव प्राण्याला उपयोगी ठरली नाही.

३. पूर्वी आदिवासी 'दाही' स्थानांतरीत पद्धतीची शेती करीत होते.

४. तोडा ही जमात पशुपालनाबरोबरच शेती ही आर्थिक क्रियासुद्धा करीत होती.

५. सहकारी संस्थांची स्थापना व त्याद्वारे 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर आर्थिक व्यवहार होत नव्हते.

## १.३ सारांश :-

मानवी समाजाची मूलभूत गरज जीव जगविणे ही आहे. कोणत्याही समाजात अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठी आवश्यक अशा वस्तूंचे संकलन, निर्मिती, विभाजन, विनिमय, उपभोग इ. स्वरूपाच्या आर्थिक क्रिया चालूच असतात. या आर्थिक क्रियांच्या बाबतीतील मानवी श्रम व परस्परांचे संघटन व नियंत्रण करण्यासाठी प्रत्येक समाजात व्यवस्था निर्माण होते तिलाच आपण आर्थिक व्यवस्था म्हणतो.

मदन व मजुदार म्हणतात, ''मानवाच्या रोजच्या जीवनातील अत्यावश्यक गरजांचे कमीत कमी श्रमात निराकरण करण्यासाठी क्रमबद्धरित्या संघटित केलेली व्यवस्था म्हणजे आर्थिक व्यवस्था होय.''

रुथ बुनअेल म्हणतात, ''मानवाच्या भौतिक अस्तित्वासाठी मानवाच्या एकूण वर्तनाचे संघटन म्हणजे आर्थिक व्यवस्था होय.''

थोडक्यात आर्थिक व्यवस्था म्हणजे -

१. दैनंदिन जीवनातील आवश्यक गरजांचे अल्पश्रमात निराकरण करण्यासाठी विशिष्ठ स्वरूपाची केलेली व्यवस्था होय.

२. मानवाने जीवंत राहण्यासाठी केलेल्या वर्तनाचे संघटन होय.

३. विशिष्ट कालखंडात एखाद्या अर्थव्यवस्थेच्या रहिवाशांनी केलेले एकूण राष्ट्रीय उत्पादन, वितरण आणि उपभोग इत्यादी आर्थिक व्यवहार होय.

४. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात होणाऱ्या आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन होय.

## ❑ आदिवासी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये :-

**१. निर्वाहप्रधानता** : आदिवासी अर्थव्यवस्था निर्वाहप्रधान आहे. आदिवासींचे जीवन अत्यंत कष्टमय व संघर्षय आहे. उत्पादनाची साधने व तंत्रे परंपरागत असल्यामुळे केवळ उदरनिर्वाह होईल इतकेच उत्पन्न आदिवासींना मिळते. ज्या अर्थव्यवस्थेतून केवळ उदरनिर्वाह होतो तिला निर्वाहप्रधान अर्थव्यवस्था म्हणतात.

**२. तांत्रिक साधनसामग्रीचा अभाव** : आदिवासी आर्थिक क्रियेत परंपरागत साधनांचा वापर करतात. नवीन तंत्रज्ञानाच्या अभावामुळे, अज्ञानामुळे, गरीबीमुळे व धर्माच्या प्रभावाने आदिवासींच्यात तांत्रिक साधनांचा अभाव दिसून येतो.

**३. तुटपुंजे उत्पादन** : तांत्रिक साधनांच्या अभावामुळे आदिवासींना त्यांच्या आर्थिक क्रियेतून अगदीच कमी उत्पन्न मिळते.

**४. विनिमय साधनांचा अभाव** : आदिवासी अर्थव्यवस्थेत पैशाचा अभाव दिसून येतो. केवळ उदरनिर्वाहापुरते उत्पन्न मिळत असल्यामुळे त्याच्या विक्रीचा प्रश्न येत नाही. तसेच आदिवासींचे उत्पन्न नाशवंत स्वरूपाचे असल्यामुळे पैशाचा अभाव आदिवासी अर्थव्यवस्थेत दिसून येतो.

**५. नफा व बाजारपेठांचा अभाव** : कमी उत्पन्नामुळे आदिवासी अर्थव्यवस्थेत नफा व बाजारपेठांचा अभाव दिसून येतो.

**६. सामुदायिक आर्थिक जीवन** : आदिवासी अर्थव्यवस्था सामुदायिक स्वरूपाची आहे. कोणतीही आर्थिक क्रिया (उदा. खाद्यसंकलन, शिकार-मासेरी, पशुपालन, शेती) सामुदायिक केली जाते. शिकार करताना एखाद्याला शिकार सापडली तर ती संपूर्ण लोकांच्यामध्ये विभागून घेतली जाते.

७. **श्रमविभाजनातील विशिष्ठीकरणाचा अभाव** : आदिवासीमध्ये श्रमविभाजन केवळ लिंग, वय व शक्ती यावर आधारित आहे. पुरुषाकडे जास्त कष्टाची व जोखमीची तर स्त्रियांकडे हलकी व कमी कष्टाची कामे सोपवलेली असतात.

८. **धर्म व जादूटोणा यांचा प्रभाव** : आदिवासींचे आर्थिक जीवन पुर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गातील घडामोडीचे ज्ञान नसल्यामुळे अज्ञानामुळे धर्माचा व जादुटोण्याचा प्रभाव आदिवासी अर्थव्यवस्थेवर दिसून येतो.

९. **स्थिर आणि समान अर्थव्यवस्था** : आदिवासी अर्थव्यवस्था स्थिर दिसून येते. आधुनिक तंत्रज्ञान व साधनांच्या अभावामुळे त्यांची अर्थव्यवस्था स्थिर आहे. बाजारपेठा, स्पर्धा, मक्तेदारी यांच्या अभावामुळे त्यांची अर्थव्यवस्था स्थीर व समान आहे.

## ❑ आदिवासी आर्थिक क्रियांचे प्रकार :-

**(अ) अन्नसंपादन :** १. अन्नसंकलन/खाद्यसंकलन.
२. शिकार.
३. मासेमारी.

**(ब) अन्नउत्पादन :** १. पशुपालन.
२. शेती/कृषी.

**(क) इतर व्यवसाय :** १. हस्तव्यवसाय.
२. मोलमजूरी.

१. **खाद्यसंकलन** : निसर्गात जंगलातून जसेच्या तसे खाण्यायोग्य वस्तुंचे संकलन करणे म्हणजे खाद्यसंकलन होय. निसर्गात जसेच्या तसे खाण्यायोग्य वस्तुंचे प्रमाण पूर्वी मुबलक होते. उदा. फळे, फुले, पाने, कंदमुळे, मध, डिंक, मुंग्या, किटक इ.) चे कोणतीही प्रक्रिया न करता सेवन केले जात होते.

२. **शिकार** : खाद्यसंकलनासाठी स्त्रिया घराबाहेर पडत तर शिकारीसाठी पुरुष घराबाहेर पडत होते. ससा, हरण, रानडुक्कर, हत्ती, गवा इत्यादीची शिकार केली जात होती. शिकारीसाठी अनुकुचीदार दगड, विळा, काठ्या, कोयता, भाला, बरची, धनुष्यबाण इत्यादी प्राथमिक साधनांचा वापर केला जात असे.

३. **मासेरी** : बहुतांशी आदिवासी मासेरी करत होते. मासेरीसाठी जाळी, गळ, भाले,

धनुष्यबाण, काठी इत्यादी साधनांचा वापर करत होते. लहान बोटी, तराफे, नावा, लाकडी ओंडके इत्यादीचा सध्या मासेरीसाठी वापर केला जात होता.

४. **पशुपालन** : प्राण्यांचे अनेक उपयोग लक्षात आल्यावर अनेक आदिवासी जमाती पशुपालन करू लागल्या. गाय, बैल, घोडा, गाढव, कुत्रा, म्हैस, शेळी-मेंढी, उंट, रेनडिअर इत्यादी पशुंचे अनेक आदिवासी पालन करतात. उदा. भारतात निलगिरी पर्वतावरिल तोडा जमात म्हैस पालनासाठी प्रसिद्ध आहे.

५. **शेती** : सध्या शेती हा आदिवासींचा महत्त्वाचा व्यवसाय आहे. हजारो वर्षापासून शेती केली जाते. पण ती शेती स्थानांतरीत शेती म्हणून ओळखली जाते. एकाच जमिनीची मशागत सातत्त्याने न करता एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊन शेती केली जाते. तिला स्थानांतरीत शेती म्हणतात. जमीन नांगरणेसाठी धरतीमातेचे पोट फाडणे असे आदिवासींना वाटते. त्यात खताचा वापर, नवीन बी-बियाणांचा वापर त्यांना माहित नाही. त्यामुळे जमीन लवकर नापीक होते. पर्यायाने जमिनीच्या दुसऱ्या भागावर शेती केली जाते. नागा लोक या शेतीला 'झु' शेती म्हणतात तर माडीया व बैगा लोक 'मेंडा' म्हणतात.

६. **हस्तव्यवसाय** : हस्तकला कौशल्यासाठी अनेक जमाती खूप वर्षापासून प्रसिद्ध आहेत. इरुला जमात बांबूपासून चटया तयार करतात. खासी लोक जनावरांच्या कातड्यापासून वस्तू बनवतात. थारू लोक फर्निचर, भांडी, टोपल्या, वाद्ये, दोर, चटया तयार करतात.

७. **मोलमजुरी** : आधुनिक समाजाच्या संपर्कात आलेल्या आदिवासी जमाती मोलमजुरी करतात. आसाममधील संथाल गोंड कोंड इत्यादी जमाती चहाच्या मळ्यात काम करतात.

## ❑ आदिवासी अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप :-

बदलत्या काळानुसार समाजाचे स्वरूप बदलते. आदिवासी समाजाचे सुद्धा बदलत्या काळानुसार स्वरुप बदलत आहे. त्याचप्रमाणे आदिवासी अर्थव्यवस्थेचे स्वरुप बदलले आहे. पूर्वी स्थानांतरित शेती करणारे आदिवासी आज स्थीर शेती करू लागले आहेत. जमीन नांगरणे, सुधारित बी-बियाणांचा वापर करणे, सुधारित तंत्रज्ञान व अवजारांचा देखील काही आदिवासी उपयोग करत आहेत. काही आदिवासी व्यापारी दृष्टीकोनातून आपला परंपरागत व्यवसाय चालवत आहेत. तोडा जमातीचे लोक 'डेअरी' व्यवसायाकडे वळले आहेत. इरुला जमातीचे लोक चटया तयार करून शहरात विकण्यासाठी आणतात. महाराष्ट्रातील 'वारली पेंटिग्ज' देशाबाहेर विक्रीला जात आहे. अशा प्रकारे आदिवासी अर्थव्यवस्थेचे महत्त्व बदलले आहे.

आदिवासींची अर्थव्यवस्था या अध्ययनात आपण अर्थव्यवस्थेची व्याख्या देवून अर्थ सांगितलेला

आहे. विविध वैशिष्ट्यांचाही आपण अभ्यास या घटकात केलेला आहे. तसेच आदिवासींच्या आर्थिक क्रियांच्या प्रकारांचे ही आपण सविस्तर चर्चा केलेली आहे. परंतु आदिवासींच्या अर्थव्यवस्थेच्या स्वरूपामध्ये बराच बदल झालेला आहे, हे आपण पाहिले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने खाद्यसंकलन, शिकार, मासेरी, पशुपालन, शेती, हस्तव्यवसाय, मोलमजुरी यामध्ये काळानुसार, गरजेनुसार कार्यात्मक व रचनेतील बदल होताना दिसून येत आहेत. या सामाजिक परिवर्तनाबरोबरच स्थीरतेचा विचार होवून स्थित्यंतर व गत्यात्मक बाजू आणि त्यांचा समन्वय साधून समाज जीवन आकाराला येते व प्रवाहित होते.

## १.४ पारिभाषिक संज्ञा :-

- **खाद्यसंकलन** : निसर्गातील जसेच्या तसे खाण्यायोग्य वस्तुंचे संकलन करून त्यावर उपजिविका करण्याची आर्थिक क्रिया.
- **स्थानांतरीत शेती** : एकाच ठिकाणच्या जमिनीचे मशागत सातत्त्याने न करता लागवडीसाठी नवनवीन जमीन सातत्त्याने घेतली जाते या प्रकाराला स्थानांतरीत शेती पद्धत म्हणतात.
- **संस्कृतीकरण/अभिसंस्करण** : संस्कृतीकरण ही अशी एक सामाजिक प्रक्रिया आहे की ज्यात विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेले गट परस्परांच्या संपर्कात आल्यानंतर एकमेकांच्या सांस्कृतिक अनुबंधातील काही भाग स्वीकारतात त्यात संस्कृतीकरण/अभिसंस्करण म्हणतात.
- **सालगडी** : सहा महिन्यापेक्षा जास्त किंवा वर्षभर एखाद्या शेतकऱ्याकडे शेतातील कामासाठी ठेवलेली व्यक्ती होय.
- **जादू** : अलौकीक विश्वावर नियंत्रण ठेवू शकणारी व आपल्या मनाप्रमाणे कार्यसिद्धी होण्यास उपयुक्त ठरणारी विशेष शक्ती.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **मोकळ्या जागा भरा.**

१. वर्तनाचे.

२. उपभोग.

३. शासन.

४. क्रमबद्धरित्या.

- **मोकळ्या जागा भरा.**

१. निर्वाहप्रधानता.

२. तांत्रिक.

३. मक्तेदारी.

४. सामुदायिक.

५. जादूटोणा.

- **चूक की बरोबर.**

१. चूक.

२. बरोबर.

३. बरोबर.

४. चूक.

५. बरोबर.

- **चूक की बरोबर.**

१. बरोबर.

२. चूक.

३. बरोबर.

४. बरोबर.

५. चूक.

## १.६ सरावासाठीचे प्रश्न/गृहपाठ

१. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची व्याख्या देऊन अर्थ स्पष्ट करा.

२. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची व्याख्या वैशिष्ट्ये विशद करा.

३. आदिवासींच्या आर्थिक क्रियांचे प्रकार सांगा.

४. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/ संदर्भ ग्रंथ


- **डॉ. विलास संगवे** : सामाजिक मानवशास्त्र.
  आदिवासींचे सामाजिक जीवन.
- **डॉ. गोविंद गारे** : आदिवासींचे शिक्षण.
  भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती.
- **प्रा. गुरुनाथ नाडगोंडे** : भारतीय आदिवासी.
- **प्रा. ए. वाय कोंडेकर,**
  **प्रा. डॉ. श्रीमती मंगला पाटील** : आदिवासींचे समाजशास्त्र.
- आदिवासी संशोधन पत्रिका : सन १९९८ ते २००१
- हाकारा : सन १९९० ते २००१.


❐❐❐

घटक–२

# आदिवासी समस्या

**घटक संरचना** (Unit Structure)

२.१ उद्दीष्ट्ये

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ आदिवासींचे दारिद्र्य व कर्जबाजारीपणा

२.३.२ जमीन हस्तांतरण व शेतीजमिनीविषयी प्रश्न

२.३.३ आदिवासी लोकांची पिळवणूक आणि निरक्षरता

२.४ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

२.५ पारिभाषिक शब्द (शब्दार्थ)

२.६ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सारांश

२.८ सरावासाठी स्वाध्याय

२.९ क्षेत्रीय कार्य

२.१० अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.१ उद्दीष्ट्ये

- आदिवासी समाजाच्या अभ्यासाबरोबर त्यांच्या संपूर्ण समस्या जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
- अनेक समस्यांनी त्रस्त असणारा हा 'जंगलचा राजा' अत्यंत गरीबीत जीवन का जगत आहे ते समजावून घेणे.

- जमिनदार, सावकार, बागायतदार, कंत्राटदार यांच्याशी संपर्क आल्याने त्याचा कर्जबाजारीपणा का वाढत आहे, त्याची कारणे जाणून घेणे.
- जमिनी हस्तांतरणाबाबत आदिवासींना का अडचणी येतात याचा अभ्यास करणे.
- जमिनीविषयक प्रश्न, कायदे, नियम, अटी इ. बाबत त्यांच्या समस्या जाणून घेणे आवश्यक आहे.
- आदिम लोकांच्यात निरक्षरता का आहे ते तपासणे.
- याचबरोबर आदिवासी लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची पिळवणूक का होत आहे ते अभ्यासणे.
- आदिवासींच्या समस्या व त्यावरील शासकीय विविध योजना, कल्याणकारी कार्यक्रम, सुधारणा, कार्यक्रम कोणकोणते आहेत ते जाणून घेणे.

वरील उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवूनच आदिवासी समस्या यांचा यथासांग परिपूर्ण अभ्यास करणे हाच आपला मूळ हेतू आहे.

## २.२ प्रास्ताविक

जगातील सर्व राष्ट्रातील आदिवासींच्या समस्यांबरोबर भारतीय समाजातील सर्व आदिवासीत समस्या निर्माण झाल्या आहेत. प्रत्येक राष्ट्रातील आदिवासींच्या समस्या भिन्न भिन्न स्वरुपाच्या असतात. आदिमांचे अनारोग्य, गरीबी, बेकारी, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, व्यसनाधिनता, गलिच्छवस्था, कुपोषण, जुगार, चरस, मटका, गांजा यांच्या आहारी जाणे, दारिद्रय, अज्ञान, निरक्षरता, धार्मिक कर्मकांडाचे अवडंबर, आर्थिक पिळवणूक, वेश्याव्यवसाय, कर्जबाजारीवृत्ती, जमिनहस्तांतरण व शेतजमिनीविषयक प्रश्न, त्यांचे शोषण इ. समस्यांनी त्रस्त असणारा आदिवासी भारतीय लोकसंख्येत यांचे प्रमाण फक्त नऊ टक्केपर्यंत आहे. या भारतीय समाजात आदिवासींना विसरून चालणार नाही. त्यांना भारताच्या राष्ट्रीय प्रवाहात सामावून घ्यावयाचे असेल तर त्यांच्या असंख्य समस्यांचे आकलन करून घेऊन अभ्यासून त्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. विविध समस्यांवर लक्ष केंद्रीत करून त्या समस्यांचा उहापोह करून विविध उपाङ्गोजना कोणत्या त्याची अंमलबजावणी का आवश्यक आहे, हे पाहणे आवश्यक आहे. आदिवासींचा प्रगत समाजाशी संपर्क आल्याने निर्भेळ व मुक्तपणे जीवन जगणाऱ्या आदिवासी जीवनात सुधारणेचे वारे वाहू लागले आहे. त्यांची अवस्था 'न घरका, ना घाटका', 'इकडे आड, तिकडे विहीर' अशी द्विधा मनस्थिती निर्माण झाली आहे. त्यांची सामाजिक व मानसिक अवस्था असंतुलीत होऊन आदिवासींचे प्रश्न गंभीर होऊ लागले आहेत.

आदिवासींच्या समस्यांचे मूळ त्यांच्या दारिद्र्यात आहे. दिवसभर कष्ट करून पोटभर अन्न मिळत नाही. त्यामुळे अनारोग्य, उपासमार, कुपोषण, चोरी, दरोडे या वाममार्गांचा अवलंब करतात. स्थानांतरित शेतीमुळे जंगलाचा नाश, उत्पन्न कमी, जंगलविषयक कायदे त्यामुळे जमिनीचा लागवडींचा प्रश्न, पैसा विनिमयामुळे आधुनिक अर्थव्यवस्थेने त्यांच्या जीवनात प्रवेश केला. त्यामुळे आर्थिक समस्यांत भर पडून प्रगत समाजाशी म्हणजे कंत्राटदार, व्यापारी, सावकार, बागायतदार, जमिनदार इत्यादींकडून फसवणूक, पिळवणूक वाढली. त्यामुळे कर्जबाजारीपणा, वेठबिगारी, औद्योगिक शोषण, अज्ञान निरक्षरतेचा फायदा प्रगतांनी घेतला. आर्थिक विकासापेक्षा त्यांच्यात आर्थिक शोषण वाढले. काही आदिवासींनी दुसऱ्या धर्माचा स्विकार केल्याने सामाजिक व सांस्कृतिक एकजीनसीपणा नष्ट झाला. प्रौढ विवाहाची पद्धत बंद पडल्याने बालविवाह (हिंदूंच्या संपर्काने) प्रथा सुरु झाली. हुंडापद्धतीने कर्जबाजारीपणा, अकाली मातृत्व, बालमृत्यूचे वाढते प्रमाण, युवागृहांचे पतन, वेश्याविषयक समस्या, भाषा विषयक समस्या निर्माण झाली. कुपोषण, स्वच्छतेविषयीचे अज्ञान, आरोग्य सुविधा मिळण्याविषयी अडचणी, दुर्ग भूभाग, दिवाबत्ती, दळणवळण, रस्ते यांचा अभाव, प्राथमिक आरोग्य केंद्र, शैक्षणिक सुविधा, वैद्यकीय सुखसोई इत्यादीचा प्रचार व प्रसार पुरेसा होत नाही. त्यामुळे अनेक अडचणींना व समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागत आहे.

## २.३ विषय विवेचन

भारतीय संविधानातील ३४१ आणि ३४२ कलमानुसार राष्ट्रपतीच्या आदेशाने अनुसूचित जमातीची यादी तयार करण्यात येते. १९६१ च्या खानेसुरीनुसार आदिवासी लोकसंख्या ३ कोटी होती. १९७१ च्या खानेसुरीनुसार आदिवासींची लोकसंख्या ३,८०,१५,१६३ इतकी होती व त्यांचे एकूण भारतीय लोकसंख्येत प्रमाण ६.९३% इतके होते. सन १९८१ च्या जनगणनेनुसार भारतात ५,१६,२८,६३८ इतकी आदिवासींची संख्या होती. १९९१ च्या जनगणना अहवालानुसार भारतातील आदिवासींची लोकसंख्या ६ कोटी ७७ लाख इतकी होती. एकूण लोकसंख्येत त्यांचे प्रमाण ८% इतके होते. २००१ च्या जनगणनानुसार एकूण भारतीय लोकसंख्येत आदिवासींचे प्रमाण ९% पर्यंत आहे. १९५६ च्या यादीनुसार एकूण आदिवासींची संख्या ४१४ इतकी आहे. सर ग्रियसन यांनी इ.स. १८९० मध्ये केलेल्या भाषिक पाहणीनुसार ५४४ बोलीभाषा व १७९ भाषा भारतातील आदिवासीत व बिगर आदिवासीत आढळतात. यावरून असे लक्षात येते की, अनेक जाती, उपजाती, भाषा, वंश, लिपी, प्रथा, परंपरा, व्यवसाय, खाण-पान, आचार-विचार, पोषाख पद्धती, रितीरिवाज, धर्म, जादूटोणा, अंधश्रद्धा इ. विविधता ही आदिवासींच्यात पाहण्यास मिळते. प्रत्येक आदिवासींना विविध भौतिक व सांस्कृतिक वातावरण लाभल्याने प्रत्येक जमातींचा प्रश्न वेगवेगळा आहे. म्हणून शास्त्रशुद्ध अभ्यास केल्याशिवाय त्या त्या जमातीच्या समस्यांच समजू शकत नाहीत म्हणून भारतातील आदिवासींचे प्रश्न दोन प्रकारचे आहेत. एक म्हणजे त्यांच्या पारंपारिक जीवन पद्धतीमधून निर्माण झालेला प्रश्न तर दुसरा म्हणजे आदिमांचा प्रगत समाजाशी (ग्रामीणशहरी) संपर्क आल्याने निर्माण झालेला दुसरा प्रश्न (समस्या). या घटकात आपण आदिम

जमातींचे दारिद्रय, कर्जबाजारीपणा, जमीन हस्तांतरण, शेतजमिनीविषयक प्रश्न, जमातींचे शोषण, निरक्षरता इ. समस्यांचा अभ्यास करणार आहोत.

## २.३.१ आदिवासींचे दारिद्रय व कर्जबाजारीपणा

संपूर्ण भारतीय समाजात आदिवासींसमोर अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शिक्षणविषयक, दारिद्रय, कर्जबाजारीपणा, छळवणूक, अज्ञान, निरक्षरता, कुपोषण, बालकुपोषण, अनारोग्य. काही ठिकाणी आदिवासींचे घटते प्रमाण. शेतीचे मागासलेले तंत्र. पुरेशी शेतजमीन नसणे, लागवडीचा प्रश्न, खते बियाणे, पाणीपुरवठा प्रश्न, जोडव्यवसायाची कमतरता, जंगलतोड, जंगली प्राण्यांची शिकार, पर्यावरणाचा असमतोल असे अनेक प्रश्न आदिवासींच्यात निर्माण झालेले आहेत. या कारणामुळे आदिवासींमध्ये गरीबी व कर्जबाजारीवृत्ती असे प्रश्न निर्माण झाले आहेत.

शेतीव्यवसायाचा विचार केल्यास पडिक जमिन, बदलती शेती, पाणीपुरवठा अभाव, शासनाचे जंगलविषयक व जमिनीविषयक कायदे निसर्गावर अवलंबून असणारी शेती व मिळणारे उत्पन्न अत्यंत अल्प असते. त्यातून जीवनविषयक गरजा पूर्ण करू शकत नाही. उपासमार दिवस काढावे लागतात. बिगर शेतीच्या धंद्यातील आदिम स्त्री पुरुषांचे व ग्रामीण समाजातील आदिम व्यक्तींचे उत्पन्न व सर्वसामान्य वर्गातील व्यक्तीपेक्षा कमी आहे. फक्त काही ठिकाणीच उत्पन्न हे अधिक थोडेसे आहे याचे कारं अनुसुचित जमातीचा जंगल, उद्योगधंदे, बांधकाम, व्यवसाय यात जास्त प्रमाणात सहभाग. या भारतीय समाजात अत्यंत गरीब लोक हे आदिम लोक आहेत. १९९९-२००० च्या नियोजन आयोगाच्या अहवालानुसार ग्रामीण व नागरी समाजातील अनुसूचित जमातींचे दारिद्रयरेषेखालील आदिमांचे प्रमाण ४६% व ३५% आहे. तर सर्वसामान्य लोकांचे दारिद्रयरेषेखालील जगणाऱ्यांचे प्रमाण २०% व २४% एवढे आहे. आदिवासी लोकांतील गरिबीचे प्रमाण हे बिगर आदिवासी, अनुसुचित जाती विमुक्त जातीपेक्षा जास्त आहे. हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश व बिहार राज्यात ५०% आदिवासी आत्यंतिक दारिद्र्यात जगत आहेत. बिगर आदिवासी व आदिवासी आत्यंतिग गरीबी व आर्थिक असुरक्षितता यामुळे काही जमाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अन्नटंचाई, कुपोषण व अनारोग्य यामुळे आदिमांना अत्यंत हलाखीचे जीवन जगावे लागत आहे. यातून यांचे अस्तित्व नष्ट होते की काय ही भिती निर्माण झाली आहे. अंदमानी, शोपेन्स, जारॉंव (अंदमान-निकोबार) बेटे. तसेच बोंदो (ओरीसा), चोलानेकॅन्स (केरळ), अभुजमॅरिज् (छत्तीसगड), बिरहोर (झारखंड) या जमाती नष्ट होण्याची भिती निर्माण झाली आहे. जे समुदाय पूर्वीच्या काळी स्वावलंबी, पर्यावरणमुक्त संतुलन राखले होते. त्याच आदिवासींना अलिकडे गरीबी निर्मूलन कार्यक्रमावर अवलंबून राहावे लागत आहे. अनेक दशके ओरिसा सारख्या राज्यात केंद्र व राज्य सरकारने भूकबळी होऊ नये म्हणून गरीबी निर्मूलन कार्यक्रम व आदिम विकास निधी अमलात आणूनसुद्धा बिगर आदिवासींच्या क्षेत्रात त्यांच्या हितसंबंधात राखून ठेवल्याने आदिमांना कायमस्वरूपी गरिबी व कर्जबाजारी वृत्तीत जीवन जगावे लागले. त्यामुळे दारिद्रयात भरच

पडली. अमरावती जिल्ह्यात १९९३ मध्ये ७००० आदिम मुले कुपोषणामुळे बळी ठरली. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात २००३ मध्ये ९०० अर्भके दोन महिन्यात मृत्युमुखी पडली. आदिवासींच्या समस्येचे मूळ त्यांच्या दारिद्र्यात व उपासमारीत आहे. बेरोजगारीमुळे धंदा नाही, पैसा नाही. उत्पादनक्षमता नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ घेता येत नाही. पुरेसे अन्न, शुद्धपाणीपुरवठा होत नसल्याने ते केव्हाही रोगाला बळी पडतात. त्यातच संस्कृती, परंपरा, श्रद्धा अंधश्रद्धाचे जबरदस्त पगडा त्यामुळे त्यांचा विकास न होता आणखीच ते दारिद्र्याच्या खाईत ओढले जात आहेत. म्हणून त्यांना रोजगार कसा प्राप्त होईल, क्रयशक्ती कशी वाढेल, शासनाचा विकास योजनांचा फायदा घेण्यास ते कसे समर्थ बनतील, अत्यावश्यक मानवी मूलभूत गरजा सहजपणे, सोप्या पद्धतीने कशा उपलब्ध होतील याचा विचार प्राधान्याने झाला तरच आदिवासींचे प्रश्न सुटल्यासारखे दिसतील. परंतु ते पुन्हा पुन्हा उद्‌भवण्याचा धोका त्यात आहे.

पावसाच्या हंगामात भुकेच्या काळात कर्जबाजारी होण्याचे प्रमाण आदिवासींत मोठे आहे. आदिवासींच्या दारिद्र्याचा फायदा सावकार, दुकानदार, कंत्राटदार, मुकादम बरोबर उचलतात. आदिवासींना कर्ज देऊन बांधून घेण्यात येते. खडी फोडायला, वीज भट्टीवर रस्त्याच्या कामाला, बांधकामावर, शेतीवर, मळ्यात कामास जुंपले जाते. आठ नऊ महिने घराबाहेर जगायला जाणारे आदिवासी मृत्यूच्याच दाढेत असतात. वाढत्या महागाईचा फटका आदिवासींना बसतो. आदिवासींना त्यांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीपासून दूर करावयाचे त्यांच्या जमिनी ताब्यात घ्यावयाच्या व त्यांना वेठबिगाराचे जिणे जगण्यास भाग पाडावयाचे, रोजगारासाठी वणवण फिरायला लावावयाचे, स्थलांतरित मजुरांचे जिणे त्यांच्या माथी मारावयाचे, त्यांच्या श्रमाची मातीमोल किंमत द्यावयाची हे गेली कित्येक वर्षे चालू आहे, याचाच परिणाम दारिद्र्यात आणि कर्जबाजारीपणा वाढण्यात होतो.

भारतातील आदिवासी समाज हा समाजातील सर्वात अधिक वंचित विभाग आहे. मोठोठे प्रकल्प, उद्योग, धरणे, उर्जेचे स्रोत आदिम क्षेत्रात निर्माण झाले असले तरी त्याचा फायदा त्यांना मिळत नाही. ५०% आदिम कुटुंबे, वीज व शुद्ध पिण्याचे पाणी, इतर सोईंपासून वंचित आहेत. २७% आदिम कुटुंबे घरे, छपरे व जनावरावरील छपरे यापासून वंचित आहेत. १९% आदिम कुटुंबे उघड्या जमिनीवर झाडांच्या पानांनी, गवताचे आच्छादन व अंथरून करून झोपतात. हा दारिद्र्याचा परिपाक आहे. २५% आदिवासीचे पुनर्वसन करण्यात यश प्राप्त झाले आहे. जमीन व इतर साधने नष्ट झाल्यामुळे आदिवासींना जी नुकसानभरपाई मिळते ती मात्र विस्थापितांना नाममात्र आहे. समस्याग्रस्त आदिवासींना सरासरी एक एकर जमिनीमागे रु. २५००/- मिळतात. पण जे भटके आहेत त्यांच्या नावावर जमीन व घर नाही. कागदपत्रात त्यांच्या नावे कोणताच उल्लेख नाही. अशांना नुकसानभरपाईपासून मुकावे लागते. विस्थापित कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्याचे मान्य केले असले तरी बऱ्याच नोकऱ्या कावेबाज, धूर्त, बिगर आदिवासींच्या पदरात पडलेल्या आहेत. गरीब आदिम स्त्रिया व मुलांना कमी वेतनावर काम करावे लागत आहे. आदिवासींना विस्थापनाचे गरीबी आणि वेठबिगारी हे परिणाम भोगावे लागतात. आदिवासींना

मिळालेल्या जमिनीचे क्षेत्र लहान आहे. पिके पावसावर अवलंबून असल्याने मिळणारे उत्पन्न अपुरे मिळते. त्यांना कंदमुळावर निर्वाह करावा लागतो.

या काळात उपासमार, अर्धउपासमार या समस्येस सामोरे जावे लागते. उदरनिर्वाहासाठी कर्ज काढावे लागते. आदिवासी उपायोजनेुळे त्यांचे दारिद्रय व बेकारी हे प्रश्न सुटलेले नाहीत. पंचवार्षिक योजनांवर कोट्यावधी रुपये खर्च होऊनही हा प्रश्न सुटलेला नाही. ४० ते ५०% आदिवासी भूमिहीन मजूर आहेत.

शासनाचे जंगलविषयक धोरणामुळे या जंगलसंपत्तीचा आदिमांना लाभ घेता येत नाही. भारतात जंगल विपुल असल्याने जंगलात कारखाने, उद्योगधंदे आणखीन उभारून (सहकारी तत्त्वावर) आदिवासींना काम मिळेल. रोजगार व नोकरीची संधी उपलब्ध करून दिल्याने आर्थिक प्रश्न सुटण्यास हातभार लागेल. स्थानिक आदिवासींना प्रशिक्षण देऊन त्यांच्यावर, श्रमदानातून जंगलवाढ व रोजगार उपलब्ध करून द्यावा. आदिवासी अद्याप अशिक्षित अज्ञानी, असंघटित व अजागृत आहेत. त्याचा फायदा, सवलती बिगर आदिवासी घेत आहेत. त्यामुळे आदिमांच्या नवजागृती निर्माण होण्यासाठी शिक्षण, नोकरी व उद्योगधंदे, प्रत्यक्षात सवलती प्राप्त होत आहेत. पण कोणाच्या पदरात काय पडते यासाठी काळच हा प्रश्न सोडवेल.

वरील दारिद्रय व कर्जबाजारीपणा या आदिम समस्यांचा अभ्यास केल्यानंतर केंद्र व राज्यसरकारमार्फत विविध शासकीय कायदे, योजना, धोरण, सुधारणा आदिवासी कल्याण कार्यक्रम राबविले तरच त्याचे दारिद्रय, कर्जबाजारीपणा नष्ट होण्यास मदत होईल.

## २.३.२ जमीन हस्तांतरण व शेतजमीन विषयक प्रश्न

स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासींची होणारी पिळवणूक थांबविण्इयासाठी Bombay Tendancy and Agricultural lands Act 1948 (बॉम्बे टेजन्सी अँड अॅग्रिकल्चरल लँडस अॅक्ट १९४८) मुंबई प्रांत कूळ आणि शेतीविषयक कायदा या कायद्यान्वये आदिवासींना सावकाराच्या ताब्यात गेलेल्या जमिनी परत मिळवून देण्यासाठी वरील कायद्यात बदल करून १९७५ मध्ये Maharashtra Restration of lands to sheduled tribes act 1975 महाराष्ट्र राज्य आदिवासी जमातींचा जमीन पुर्नस्थापना कायदा संत करण्यात आला. यास जमीन पुर्नस्थापना कायदा असे म्हणतो. १९४८ च्या पारित झालेल्या कायद्यात आमुलाग्र बदल करण्यात आला. या बदलानुसार १/४/१९५७ रोजी कूळ म्हणून जमीन कसणाऱ्यांना विशिष्ट अटींनुसार मालक म्हणून जाहीर करण्यात आले. पण या कायद्यान्वये नंदुरबार तालुक्यात २८ प्रकरणे आदिवासींची जमिनी बळकावल्याची समितीच्या निदर्शनास आले आणि म्हणून आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन कूळकायद्याकाली बिगर आदिवासींनी बळकावलेल्या जमिनी त्यांना परत करण्यासाठी कायदेशीर तरतूदी कराव्यात, असे समितीने सुचविले.

स्वातंत्र्यानंतर बिगर आदिवासी गट आर्थिकदृष्ट्या व राजकीयदृष्ट्या प्रबळ होत आहेत. मूळच्या आदिवासींच्या हक्काच्या जमिनी जाऊन ते गरीब व भूमिहीन शेतमजूर होत आहेत. मोठ्या प्रमाणावर अन्याय व अयोग्य पद्धतीने घडलेल्या व्यवहारामुळे आदिवासी जमीन बिगर आदिवासींकडे हस्तांतरित झाली आहे. आदिवासी भूमिहीन बनले आहेत. हा अन्याय दूर करणे या कायद्यापाठीमागील उद्देश आहे. १९७० मध्ये महाराष्ट्र राज्यसरकारने कर्जुक्तीचा कायदा पास केला. सावकारांनी कर्ज देणे कायद्याने अवैध ठरविले. यातूनच सावकारांनी गहाण ठेवून घेतलेल्या वस्तू आदिवासींना (कर्जदारांना) परत कराव्या लागल्या. मुंबई प्रांत कूळ आणि शेतीविषयक कायदा याच्या अंमलबजावणीमुळे ज्याच्या जमिनीचे हस्तांतरण झाले आहे, अशा आदिवासींना जमिनी परत करावी यासाठी अर्ज करता येईल. पण तो जमीन स्वतः कसणार आहे, अशी हमी अर्जदारांनी द्यावयास हवी. पण अर्ज कायदा अंमलात आणल्यापासून तीन वर्षाच्या आत करावयाचा आहे. पण याची माहिती, ज्ञान आदिवासींना माहित नसल्याने ३ वर्षांचा कालखंड ओलांडून गेला आहे. कायद्याविरुद्ध वारंवार स्थगिती दिली आहे. पण आदिवासींनाच हा कायदा कळला नाही. पोहोचला नाही. कलेक्टरनीसुद्धा आपल्या अधिपत्याखाली प्रकरणे निकालात काढल्याचे दिसत नाही. यामुळेच आदिवासींवरील अन्याय दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ३०/८/१९७४ या दिवशी व विधान परिषदेने ३/९/१९७४ रोजी विधेयक मंजूर करून महसूल मंत्री श्री. ह. गो. वर्तक यांनी कायदे मंडळात तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी खास अधिकारी नेतील, असे सांगितले. यातूनच १/११/१९७५ पासून 'महाराष्ट्र राज्य आदिवासी जमातींच्या जमिनीची पुर्नस्थापना कायदा' या नावाने अंमलात आला. यातील काही तरतूदी पुढीलप्रमाणे.

१. जमिनीचे हस्तांतरण करणाऱ्या आदिवासी मालकाची आणि या हस्तांतरात बिगर आदिवासीला मिळालेल्या जमिनीची अदलाबदल रद्द करण्यात यावी. मात्र अदलाबदल वेळी जमीन सुधारणेवर झालेला खर्च निश्चित करून, खर्च करणाऱ्या मालकास ती रक्कम परत करावी.

२. या हस्तांतरणामुळे आदिवासींना जमीन परत मिळाली. पण आदिवासीने जमीन महसुलाच्या ४० पट किंवा बिगर आदिवासी मालकाने जमीन विकत घेतेवेळी दिलेली किंमत यापैकी जी कमी असेल ती रक्कम अधिक बिगर आदिवासी मालकाने जमिनीवर केलेल्या सुधारणांची जिल्हाधिकाऱ्याने ठरविलेली किंमत, बिगर आदिवासी मालकाला दिली पाहिजे.

बिगर आदिवासीला दिलेली हस्तांतरे पुढील प्रकारे येतात.

अ) कोर्टाच्या हुकुमानुसार किंवा विक्रीखाली झालेली हस्तांतरे.

ब) विक्री देणगी, अदलाबदल, गहाण किंवा खंडाने व इतर तोंडी व्यवहाराने झालेली हस्तांतरे.

क) आदिवासींकडून शेतसाऱ्याची किंवा शेतसाऱ्याप्रमाणे गणली जाणारी इतर बाकी वसुल करण्यासाठी तसेच महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट १९६० नुसार किंवा इतर

कायद्यानुसार झालेली हस्तांतरे मात्र यातून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम (३६) बी नुसार झालेल्या हस्तांतरित जमिनी वगळण्यात आल्या आहेत.

ड) हस्तांतरित (आदिवासींची) झालेली जमीन कब्जा दिल्यापासूनच्या दोन वर्षाच्या काळात त्याने अर्ज केल्यास त्याला परत मिळू शकेल, अशी तरतूद जमीन महसूल कायद्यात होती. म्हणजेच कब्जा दिल्यानंतर दोन वर्षानंतर अशी हस्तांतरित जमीन परत मिळण्याचा आदिवासींचा अधिकार गमावला जाई. पण गमावलेल्या जमिनी देखील जिल्हाधिकाऱ्यांना आपण होऊन कधीही तसेच कायदा जारी झाल्यापासून तीन वर्षाच्या आत अशा आदिवासीने अर्ज केल्यास परत मिळवता येतील.

इ) हस्तांतरीत केलेली जमिनीचा कब्जा घेण्यास तयार नसेल तर बिगर आदिवासीला राज्य सरकार किंमत देऊन ती जमीन जमिनीपासून ५ किलोंटर अंतरावर राहणाऱ्या व जमिनीची किंमत व त्यावरील सुधारणांची किंमत भरण्यास तयार असलेल्या दुसऱ्या आदिवासीला जमिनीचा कब्जा देण्याची तरतूद ३०/१९७७ या कायद्यान्वये महाराष्ट्र सरकारने दुरुस्ती कायदा केला.

फ) जमिनीचे हस्तांतरण बिगर आदिवासीकडे ६/७/१९७४ पूर्वी झाले असल्यास त्याची जमिनी सरकारने सार्वजनिक कार्यासाठी ताब्यात घेतली असल्यास अर्धी जमीन बिगर आदिवासीला मिळेल. पण ही जमीन तो स्वतः कसणार असेल व जमीन सुधारणेवर झालेला खर्च बिगर आदिवासीला देण्यास तयार असेल तर ती जमीन आदिवासीला मिळू शकेल.

भारतातील सर्व राज्यांनी आदिमांना जमिनी देणे, हस्तांतरण करणे हा कायदा मंजूर केला आहे. पण तरीसुद्धा अल्पप्रमाणात जमिनी आदिमांकडे आहेत. जमिनीचे तुकडे पडले आहेत. चढउतार, जंगल, पर्वत, डोंगर, पाणीपुरवठा अभाव या अनेक नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाऊनदेखिल लागवडीखाली जमीन आणता येत नाही व आणली तर पुरेसे उत्पादन मिळत नाही. राज्यात आदिम जमातीपैकी ७५% आदिम लोक या देशात जमीनधारक असून ते लहान व सीमांत शेतकरी आहेत. ९०% आदिवासी देशात भूमिहीन आहेत. उत्पादन काये कोणतीच नाहीत व नोकरीही नाही. १८३८ च्या सेमिंग्टनच्या अहवालानुसार ९५% जमिनी आदिवासींच्या मालकीच्या होत्या. पण आता ३०% ही जमिनी आदिवासींकडे राहिलेल्या नाहीत. (डहाणू, शहापूर, वाडा, भिवंडी, मुरबाड या तालुक्यातील) आदिवासी उपाययोजनेवर १९८० ते १९९६ पर्यंत ३१३७ कोटी रक्कम खर्च होऊनही दारिद्र्य, बेकारी व आरोग्य प्रश्न सुटलेले नाहीत. ठाणे जिल्ह्यात ५०% आदिवासी भूमिहीन आहेत. तसेच ९० ते ९५% कातकऱ्यांना जमिनी नाहीत. ५० हजार कातकरी वीटभट्ट्या, वाळू काढणे, मिठागर राखणे हे काम दिवाळीपासून ते मे अखेर करतात. रोज भटकंती, घरदार नाही, मुला-बाळांना शिक्षण नाही, अल्पमजूरी यामुळे हा समाज अर्धगुलामीत जीवन जगत आहेत.

स्वातंत्र्याच्या ५० वर्षांच्या काळात सरकार गरीब आदिवासी वनजमिनीचा प्रश्न सोडवू शकलेला नाही. ही मोठी शोकांतिका ठरली आहे. जमीन, जल आणि जंगल ही प्राकृतिक संपत्तीची साधने वनकायदा, पर्यावरण, धरणे, प्रकल्प, खाणी, पर्यटनस्थळे, सेंच्युरी, अभयारण्ये इ. च्या नावाखाली आदिवासींकडू काढून घेण्याचे प्रयोग गेली ५० वर्षे या देशात चालले आहेत. त्यातून वनात व वनाच्या आश्रयाने राहणारा आदिवासी संपूर्ण उद्ध्वस्त होत आहे. राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय कंपन्या आता आपले जाळे टाकत आहेत. एकीकडे शासन आदिवासीला स्वशासन द्यायला तयार झाले आहे. कारण शासन जे स्वशासन देत आहे त्या जमिनीवर, पाण्यावर, वनांवर दुसऱ्या कोणाचा तरी हक्क राहणार आहे. मग रिकामे राज्य घेऊन आदिवाी काय करणार ? म्हणून आदिवासींनी प्रथम आपले गाव, जंगले, जमीन, कुरणे देता कामा नये. यासाठी एकजूट, एकसंघ, सज्ञान, शिक्षित, संघटित आदिवासी राहीला तरच !

## २.३.३ आदिवासी लोकांची पिळवणूक आणि निरक्षरता

### अ) निरक्षरता (Illitracy)

आदिवासींच्या दयनीय अवस्थेत भर टाकणारे म्हणजे त्याचे अज्ञान/निरक्षरता आहे. त्यांच्या अज्ञानाचा फायदा अनेक हितसंबंधी घेत आहेत. त्यांना मिळणाऱ्या सुखसोई, सवलती, सुविधा, फायदा यापासून ते वंचित राहात आहेत. म्हणून सरकारने त्यांच्या कल्याण कार्यक्रमांत शिक्षणाला महत्त्व व अग्रक्रम दिलेला आहे. तसे पाहिले तर देशातील साक्षरतेचे प्रमाण २९.९७% (१९८०) आज महाराष्ट्र राज्यात ७० लक्ष निरक्षर आहेत. वर्गीकृत जमातीत हे प्रमाण ८.५४ % आहे. महाराष्ट्रात आदिवासी समाजात १९५१ साली २% देखील साक्षरता नव्हती. आज ती ३६% झालेली आहे. स्त्रीयांधील साक्षरतेचे प्रमाण २४% एवढे आहे. सर्वसामान्य जनतेत आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण ५०% हून कमी आहे. गेल्या ५० वर्षात साक्षरतेची पातळी उंचावत आहे. आदिमांना शिक्षण, घर, उत्पन्न, जमीन नसल्याने ते प्रगती करू शकत नाहीत. दारिद्र्यामुळे शिक्षण नाही आणि शिक्षण नाही म्हणून दारिद्र्य घालविता येत नाही, अशी अवस्था त्यांची झालेली आहे. गेल्या ५० वर्षातील आदिम जमातीविषयीची शासनाची शैक्षणिक आणि आर्थिक धोरणे पंचवार्षिक नियोजनावर आधारित आहेत. सध्याच्या आदिवासी नियोजनाचा मुख्य भर शेतीवर, त्यांच्या विकासावर आहे. पण मोलमजुरी, भूमिहीनांसाठी नियोजन अपरिहार्य आहे.

कोणत्याही मागासलेल्या समाजाची सुधारणा व्हावयाची असेल तर शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. शिक्षणामुळेच दृष्टी, व्यापकता, विशालता प्राप्त होते. सभोवतालच्या जगाचे, समाजाचे ज्ञान होते. समाजात स्पर्धा आणि महत्त्वाकांक्षा निर्माण होऊन समाजाच्या प्रगतीला गती मिळते. एखाद्या समाजात साक्षरतेचे प्रमाण किती आहे, यावरून त्या भागातील, समाजातील, शैक्षणिक प्रगती व सामान्यज्ञान कोणत्या पातळीवर आहे, याची कल्पना येते.

महाराष्ट्र राज्यात १९६० नंतर आदिवासींच्या शैक्षणिक विकासाला अधिक गती मिळाली. १९८६ च्या शैक्षणिक धोरणानुसार आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले. १९९१ च्या जनगणनेनुसार आदिवासी जमातीतील पुरुषांच्या साक्षरतेचे प्रमाण ४९.०८% होते. तर स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण २४.०३% होते.

आदिवासी हा समाज जंगलात, दऱ्याखोऱ्यात, डोंगरकपारीत, राहणारा, शिकार आणि कंदमुळे खाऊन जीवन जगणारा, नैसर्गिक आपत्तींना घाबरून त्यांची पूजा करणारा, प्रश्नांची उकल झाली नाही. अंध विश्वासाला माहेरघर करणारा, जादूटोणा, मंत्रतंत्र, कर्मकांड, जपतप इ. ने उपचार करणारा, दारिद्र्य अज्ञान यांनी ग्रासलेला, आधुनिक प्रगतीचा संपर्क नसलेला, दोनवेळा जेते भाताची पेज, कंदमुळे, रानातील फळे, नदीतील खेकडे, मासे यावर गुजराण करणारा, शिक्षणापेक्षा 'जंगलचे राजे' म्हणून घेण्यात धन्यता वाटणारा आमचा आदिवासी आहे, याचे कारण त्यांच्यामध्ये असणारी निरक्षरता.

## ❑ आदिवासी जमाती व त्यांच्यासाठी सोईसुविधा :-

शासनाच्या शिक्षणविषयक विविध योजना आदिवासीत राबविल्या जात आहेत. उदा. खडूफळा, अंगणवाडी, अनौपचारिक शिक्षण, शालेय पोषण, आहार, आश्रमशाळा, वसतिगृहे, शालेय मोफत पाठ्यपुस्तके, शैक्षणिक इतर सवलती, शिष्यवृत्ती, सोईसुविधांचा लाभ आदिवासींना मिळत आहे. पण विज्ञान व तंत्रज्ञान शाखेकडे बोटांवर मोजण्याएवढीच मुले जातात. पण मेडिकल, इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये राखीव जागा भरल्या जात नाहीत. परिणामी खऱ्या आदिवासींच्या जागी खोटे आदिवासी प्रवेश मिळवू लागले आहेत. डी.एड., बी.एड. यासारखे व तांत्रिक शिक्षणाकडे आदिवासींचा कल दिसत नाही, याचे कारण आदिवासी मुलांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळत नाही. तसेच मुलांना आत्मविश्वास नसतो. फक्त शिकावयाचे म्हणून शिकतात. यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याकडे न होता निरक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. यासाठी विविध संस्थांनी व शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न करून शिक्षणाकडे कल वाढविला पाहिजे.

आदिम कल्याण कार्यक्रमाद्वारे आदिवासीत रेडिओ, दूरदर्शन, पुस्तके, छोटी चित्रे, पुस्तिका इ. माध्यमांचा वापर करून सामाजिक व नैसर्गिक पर्यावरणविषयी माहिती दिली जाते. प्राथमिक शाळा स्थापन करून शिक्षण सक्तीचे केले आहे. आत्मविश्वास येण्यासाठी स्पर्धात्मक परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केली आहेत. आश्रमशाळेतून शेती, वीणकाम, शेतीपुरक उद्योग, फळबागा, फूलबागा, वनीकरण, कुटीरोद्योग, हस्तव्यवसाय, भाजीपाला, औषधी वनस्पती, पशुविकास, तंत्रविकास इ. शिक्षण दिले जात आहे. काही राज्यात औद्योगिक शाळा स्थापन केल्या आहेत. त्यातून विणकाम, शिवणकाम, विद्युतअभियांत्रिकी, शिंपीकाम, लोहारकाम इ. शाखांचे शिक्षण दिले जात आहे. या सुविधांचा लाभ अजूनही घेत नसल्याने साक्षरता दर वाढत नाही. आदिवासीत पुरुषांच्या पेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. शिक्षण, अर्थव्यवस्था व समाज हे तिन्हीही घटक परस्परांशी संबंधित आहेत. आदिवासींची प्रगती,

विकास, सामाजिक सुधारणा, आर्थिक विकास यासाठी शिक्षण हा घटक महत्त्वाचा आहे. आदिम विकास कार्यक्रमात पौढांकडून सहकार्य व सहभाग होण्यासाठी प्रौढशिक्षण ही आवश्यक आहे व असा प्रयोग आदिवासीत चालू आहे.

शैक्षणिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निश्चित शैक्षणिक धोरण, शिक्षकांची नियुक्ती, प्रशिक्षक शिक्षक, शिक्षणाचे माध्यम (मातृभाषा) क्रमिक पुस्तके, आर्थिक सहाय्य, शालेय इमारती, सर्वसोईनी युक्त शाळा यासाठी सर्वसामान्य धोरण आखणे जरुरीचे आहे. यासाठी सरकार आदिम कल्याण विभाग शिक्षण विभागाचे एक केंद्र म्हणून आदिम शिक्षण हे धोरण निश्चित ठरू शकते.

## ❑ आदिवासी स्त्रियांचे साक्षरता प्रमाण :-

१९९१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातीमधील साक्षरता प्रमाण जरी वाढले असले तरी सर्वसाधारण लोकसंख्येच्या साक्षरता प्रमाणाशी तुलना करता खूपच कमी आहे. स्त्रियांचे वाढणारे निरक्षरतेचे प्रमाण ही गंभीर समस्या बनली आहे. याचे कारण-

१) आदिम समाजातील अत्यंत दारिद्र्य

२) बालविवाहाची प्रथा त्यामुळे लग्नानंतर जबाबदारी लवकर पडते.

३) लहान मुलांनी आईवडिलांबरोबर कामावर जाणे.

४) घरातील भावंडांचा सांभाळ करणे.

५) मुलींसाठी आदिम समाजात स्वतंत्र वसतीगृहे नसणे.

६) शिक्षणाच्या सोईसवलती यांची उपलब्धता नसणे.

७) जंगल दऱ्याखोऱ्यात गावात जवळपास शिक्षणाची व्यवस्था नसणे.

यामुळेच स्त्रियांच्यात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

## ❑ आदिम समाजात साक्षरतेच्या मंदगतीची कारणे :-

### १. विसंगती अभ्यासक्रम :-

भारतीय समाजातील सर्वसाधारण विद्यार्थ्यांकरिता असलेला अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला आहे. ही शैक्षणिक अभ्यासक्रमातील विसंगती असून या आदिवासींकरिता गरजा आणि सांस्कृतिक मुल्यांचा विचार केलेला दिसत नाही. हा अभ्यासक्रम योग्य नाही. प्राथमिक स्तरावर तो गैरलागू स्वरूपाचा आहे.

## २. पालकांचे दारिद्र्य :-

भारतातील आदिवासी गरीबीत व दारिद्र्यात जीवन जगत असून उपजिवीकेकरिता कुटुंबातील आर्थिक क्रियेत मुलांचा वापर करून घेतात लहान भावंडांना सांभाळण्यासाठी मोठ्या मुलांना घरातच थांबावे लागते. अतिदुर्ग भागात जंगलात, पाळणाघरे व बालवाडी नसल्याने आदिवासी मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते.

## ३. शैक्षणिक सुविधांचा अभाव :-

आदिवासी दुर्ग भागात शैक्षणिक संस्था पुरेशा सुविधांच्या अभावाने कार्यरत आहेत. इमारती सुयोग्य नाहीत, असतील तर प्रशिक्षित शिक्षक नाही. त्या शिक्षकास आदिवासीविषयी आस्था नाही. पुस्तकपेढी नाही, शैक्षणिक साहित्य नाही. शिष्यवृत्त्या पासून काही आदिवासी वंचित आहेत.

## ४. विद्यार्थ्यांची व शिक्षकांची गैरहजेरी :-

आदिवासी क्षेत्रात प्रशिक्षित आस्थापूर्ण शिक्षकांची गैरहजेरी हा आदिवासी शिक्षणावर विपरीत परिणाम करणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. नैसर्गिक आपत्ती संकटे यामुळे कधी मुले गैरहजर तर कधी शिक्षक गैरहजर राहतात. आदिवासी शाळेत नोकरी करावी किंवा असावी, अशी इच्छा शिक्षकांची नसते. त्यामुळे शैक्षणिक विकासकामात गती मिळत नाही. त्यामुळे मुलेही शाळेत उपस्थित राहात नाहीत.

## ५. शिक्षणाचे माध्यम :-

आदिवासींच्या त्यांच्या बोलीभाषेत, प्रादेशिक भाषेत शिक्षणाचे माध्यम नसल्याने मुलांना अभ्यासक्रम, धडे कळत नाहीत. भिन्न भाषा, धडे, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम यामुळे मुले गोंधळतात. त्यामुळे शाळेकडे पाठ फिरवण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे शाळा बंद ही पडतात. तेव्हा त्यांच्या मातृभाषेतून, संस्कृतीतून शिक्षण मिळणे हा त्यांचा हक्क आहे.

## ६. शैक्षणिक धोरणातील त्रुटी :-

आदिवासींसाठी स्पष्टरित्या व स्वतंत्र धोरण सर्वत्र सारखे नाही. आदिवासी शाळा काही ठिकाणी शिक्षण विभागाच्या तर काही समाजकल्याण विभागाच्यामार्फत चालविल्या जातात. यामुळे शैक्षणिक प्रगतीवर त्याचा विपरीत परिणाम झालेला आहे. शाळेतील प्रवेश, नोंदणी याचा दर प्राथमिक, माध्यमिक स्तरावर चांगला असली तरी उच्चशिक्षणात दर घसरलेला दिसून येतो. आकडेवारीची तपासणी अतिरंजित असते. सुख सुविधा, अभ्यासक्रम, शालेय साहित्य, इमारती, शिक्षक यांची कमतरता असल्याने शाळेतील गळतीचे प्रमाण अधिक आहे.

## ७. उच्चशिक्षण व गळतीचे प्रमाण :-

उच्चशिक्षणात बिगर आदिवासींचे प्रमाण अधिक आहे. आदिवासींने प्रवेश घेतला तरी त्यांचे गळतीचे प्रमाण अधिक आहे. शहरी विद्यार्थ्यांसमोर आदिवासी मुले मागे पडतात. त्यांना उच्चशिक्षण सोडून द्यावे लागते किंवा तसे सांगितले जाते. अभ्यासक्रम, शैक्षणिक सुविधा अनेक अडचणीमुळे त्यांना दुर्मिळ संधीपासून वंचित राहावे लागते. तसेच आदिवासी मुलांना भेदभावाची वागणूक दिली जाते.

## ८. शासकीय धोरण आणि मार्गदर्शनाचा अभाव :-

राखीव (आरक्षण) जागेच्या शासकीय धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रातील, उद्योगधंदे, बँकाच्या सेवा यामध्ये ठरवून दिलेल्या कोट्याप्रमाणे आदिम तरुणांना स्पर्धेत कमी ठरल्यामुळे उच्चपदांवर नोकऱ्या मिळू शकत नाहीत. सार्वजनिक क्षेत्रातील बरेचसे उद्योगधंदे आदिम क्षेत्रात स्थापन केलेले आहेत. जमीन सरकारने काढून घेतल्यामुळे जीवननिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अकुशल कामात व कनिष्ठ पदावर काम करतात. आदिवासी मुलांसाठी पुरेसे मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे स्पर्धेच्या युगात मागे पडतात. त्यामुळे शिक्षणाकडे त्यांची वाटचाल राहात नाही.

वरील शिक्षणात मंदगतीची कारणे पाहिल्यानंतर आदिवासी समाजात शिक्षणाची गती वाढविणे, सुधारणा घडविणे, शिफारशी करणे आवश्यक आहे. त्यासाठी अंगणवाडी, बालसंगोपनगृहे, आश्रमशाळा, वसतिगृहे, शाळा, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा या सर्व ठिकाणी सुविधायुक्त शैक्षणिक संस्था उभारणे. निःशुल्क शिक्षण, विद्यावेतन, शिष्यवृत्त्या अटीत शिथिलता, परदेशी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या सवलती देणे. तांत्रिक व वैद्यकीय शिक्षणासाठी आदिवासी मुलांचा विचार तसेच लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी निःशुल्क प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र याही सवलती दिल्या जातात. यामुळे आदिवासीत साक्षरता दर वाढून खऱ्या अर्थाने शैक्षणिक विकास साध्य होईल.

## ब) आदिवासी लोकांची पिळवणूक (Exploitation of Tribal People)

आदिवासींचे दारिद्र्य, बेकारी, गरीबी, अज्ञान, निरक्षरता, मितभाषी, जगाचे अज्ञान, तांत्रिक सुविधांचा अभाव, अलिप्तता, अंधश्रद्धा भोळ्या समजूती, कर्मकांड या सर्व बाबींमुळे त्यांच्या भोळ्या स्वभावाचा फायदा घेऊन सर्व क्षेत्रात त्यांची पिळवणूक होत आहे. आदिवासींची पिळवणूक खालीलप्रमाणे होत आहे.

## १. जंगलविषयक कायदे :-

भारत सरकारने १९५२ मध्ये जंगलविषयक कायदे आमलात आणून जंगलातील उत्पादने गोळा करणे, शिकार, कुऱ्हाडशेती यावर बंधने आणली. त्यामुळे जीवननिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. पैसा

विनिमय अर्थव्यवस्थेुळे आदिम अज्ञानाचा फायदा व्यापारी, सावकार, दलाल, जमीनदार, कंत्राटदार यांनी उठविला. केवळ भाकरीचा प्रश्न सोडविण्यासाठी आदिवासींना आपल्या संपूर्ण जीवनाची किंमत मोजावी लागत आहे. व्यापारी लोकांना आदिवासी म्हणजे आपली राखीव कुरणे वाटतात. आदिवासींना पाहिजे तसे राबवून घेतात व बोटाच्या इशाऱ्यावर नाचवितात. जिवंतपणी त्यांना मरणयातना भोगाव्या लागत आहेत. ही पिळवणूक नसून आदिवासी जीवनावर आक्रमण आहे. कंत्राटदार जंगलकाम, कोळसाखाणी, खाणकाम, झाडे तोडणे, गवत कापणे ही कामे आदिवासींकडून अत्यंत कमी वेतनावर करून घेतात. त्याचा खरा फायदा कंत्राटदारांचा होतो. ते श्रीमंत बनतात. आदिवासी गरीबीतच जीवन जगतो.

## २. कर्जबाजारीपणा व वेठबिगारी पद्धत :–

पैशासाठी फायद्यांसाठी आदिवासींच्या स्वतंत्र जीवनावर आक्रमण केले आहे. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा सावकार, जमिनदार, कंत्राटदार, व्यापारी, दलाल यांनी घेतला आहे. त्यांच्या भोळ्या स्वभावाचा, असहाय्यतेचा फायदा बिगर आदिवासींनी उठविला. आदिवासींना गुलाम म्हणून जगावे लागते. पिढ्यानपिढ्या विनामोबदला जमिनदारांच्या घरची, शेताची कामे करीत त्यांना सर्वस्व गमवावे लागते. बायका मुले, बहिणी, घरदार, जमीन, गुरेढोरे यांवर त्यांचे नियंत्रण राहात नाही. कर्जफेडीसाठी सावकार या सर्व बाबींचा लिलाव करतो. आदिम स्त्रिया व मुलींना वेश्या व्यवसायास प्रवृत्त केले जाते. गुप्तरोगांची लागण होते. जमिनदार सावकार निर्लज्जपणे याचा फायदा घेतात. त्यांना कर्जबाजारीपणात ठेवणे व्यापाऱ्यांना धन्यता वाटते. वेठबिगारीचा कायदा करूनही प्रश्न सुटलेला नाही. आदिवासी समाज नेहमीच उपेक्षीत राहिला आहे. वेठबिगारीची प्रथा काही ठिकाणी चालू आहे. आंध्रप्रदेशात आदिवासींना 'गोती', 'वेट्टी', बिहारमध्ये 'कमला', गुजरातमध्ये 'डुंबला', 'हलपती', 'हाळी' तर महाराष्ट्रात आदिवासी या पद्धतीला 'वेठबिगार' म्हणतात.

आदिवासींच्यात जागृती निर्माण झाल्यावर बंडखोरीला प्रगत समाजातील विशिष्ट हितसंबंधी समुहाकडून विरोध होत आहे. १९८४ मध्ये धुळे जिल्ह्यातील शहारे तालुक्यातील ससरे व शेल्टी या गावात आदिवासींचे अग्निकांड घडून आले. शेल्टी प्रकरणातून असे दिसून येते की, आदिवासी हे गुलाम व वेठबिगार म्हणूनच उपलब्ध व्हावेत, ही प्रगत समाजाची इच्छा आहे. आदिवासींनी संघटीत होऊ नये. मजुरी मागू नये म्हणून वरिष्ठ वर्गीय आदिवासींना वेठीस धरतात. हत्याकांड घडवून आणतात. ही भिती आदिवासींना वाटते. श्रमिकांनी कष्ट करावेत व वरिष्ठांनी त्याची फळे विनासायास खावीत अशा समाजव्यवस्थेुळेच मानवतेला काळीमा फासणारे शेल्टीमधील हत्याकांड प्रकरण दिसून येते. म्हणून सामाजिक व आर्थिक समता जर प्रस्थापित करावयाची असेल तर समाजमन हे परिवर्तनास अनुकूल असले पाहिजे.

## ३. प्रगतांच्या संपर्काुळे निर्माण झालेले प्रश्न :–

ख्रिश्चन धर्माच्या विळख्यात आदिम समाज अडकल्याने त्यांच्यातील सामाजिक, सांस्कृतिक

एकजिनसीपणा नष्ट झालेला आहे. हिंदूंच्या संपर्काने तर त्यांच्या सांस्कृतिक जीवनात बदल होत आहे. दळणवळणाच्या माध्यमाने शहरी व नागरी समाजातील लोक आदिमांच्या जवळ जाऊन पोहोचल्याने काही जमातीत परिवर्तने घडून आली. काहींच्यात आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे धाडस निर्माण झाले तर काहींचे पारंपारिक जीवन बदलले. शहरी संस्कृतीचे आक्रमण त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रावर झाले आहे. कंत्राटदारांनी त्यांची वसतीस्थाने, घरे उद्ध्वस्त केली तर जमिनदारांनी त्यांच्या जमिनी हडप केल्या. जंगलचे राजे आता कर्जबाजारी बनले आहेत. वारली, माडिया गोंड, संथाळ, थोरिया, अहोा, चकमा, भिल्ल या जमातीचे हाल होत आहे. त्यांच्या सांस्कृतिक व पारंपारिक ज्ञानाचा विनाश होत आहे. कला, संस्कृती, ज्ञान, वैद्यकशास्त्र (आयुर्वेद), वनस्पतीचे गुणविशेष, वापर, माहिती, प्राणीजीवनाविषयी आदिमांना असणारी माहिती हा सर्व कित्येक वर्षांचा ज्ञानभांडार लोप (नष्ट) होण्याची भिती निर्माण झाली आहे. प्रगत समाजाच्या राक्षसी व स्वार्थी प्रवृत्तीने आदीम हतबल होत आहेत. भारतातील आदीम जमातीभोवती प्रगत संस्कृतीचा वेढा वाढल्याने त्याची सर्व क्षेत्रात पिछेहाट होऊन ते पारतंत्र्यात दिवस कंठीत आहेत.

## ४. आदिवासींच्यातील मानसिक ताणतणाव :–

शासन दरबारातील लालफितीचा कारभार, अकार्यक्षम प्रशासन व्यवस्था, हितसंबंधाचा भ्रष्टाचार, अपुरे अर्थबळ, विस्थापितांना दिलेली जमीन पडिक असणे, मूळ जागेचा वापर औद्योगिक कारणासाठी न होता इतर कारणासाठी होणे, शिक्षकांचा व शैक्षणिक साधनांचा अपुरेपणा, पिण्यायोग्य पाणीपुरवठा नसणे, आरोग्यविषयक गैरसोय, शासकीय कर्मचारी, जमिनदार, कंत्राटदार इ. कडून अपमानास्पद वागणूक, आदिवासींच्या आशा, आकांक्षा, भावनांचा विचार न होणे, दादागिरी, गुंडगिरी, अरेरावी, उपेक्षा, पिळवणूक, विस्थापितांना जागा देताना आदिवासींच्या पसंतीचा विचार न करणे या वरील सर्व कारणांुळे आदिवासींचे मानसिक संतुलन ढासळत असून त्यांच्यात ताणतणाव निर्माण होत आहे. जागेची मिळेल ती रक्कम घेवून घरदार सोडत आहेत. आदिवासींचे कल्याण व विकास कार्य खऱ्या अर्थाने पुरे न झाल्याने आदिवासींमध्ये नैराश्य निर्माण होऊन त्यांच्यात मानसिक ताणतणाव वाढत आहे.

## ५. आदिवासींचे पुनर्वसन–असंतोष :–

आदिवासींचा भूप्रदेश उद्योगधंदे उभारणी, धरण बांधणी, औद्योगिक उभारणी यासाठी हवा असतो. या सर्व उभारणीमध्ये जमिनी किती जाणार, जागा किती जाणार याचा हिशोब करून त्यांना राहणेसाठी जागा व घरे, शेतीसाठी, उत्पादनासाठी, जमिनी देणे हे काम सरकारचे आहे. प्रथम पुनर्वसन नंतर धरण असे होत नाही. त्यामुळे बळजबरीने जमिनीवर कब्जा केला जातो. त्याचे दुर्बल्य, अज्ञान, असंघटितपणाचा फायदा इतर बिगर आदिवासी घेतात. त्यामुळे त्यांच्यात नैराश्य–असंतोष वाढत आहे. आदिवासींना पुनर्वसतिकरण वाटण्याऐवजी उद्ध्वस्तीकरण वाटत आहे. परंपरात कला, संस्कृती, पिढ्यानपिढ्या

निवासस्थान, परिसर, पर्यावरण, भूाता, जमिनी हे सर्व सोडून नवीन जागेत विस्थापित व्हावे लागते. पण तेथे कोणत्याच सुविधा नसणे, गैरसोयी, उत्पादनासाठी काहीही नसणे, यामुळे पिळवणुक होऊन एकप्रकारचा असंतोष, ताणतणाव निर्माण होऊन त्यांचे भावनिक विश्वच हरवले आहे. उदा. धुळे जिल्ह्यातील सरदार सरोवरात बुडणाऱ्या मनीवेली गावातील आदिवासी. आदिवासींना मूळच्या वसतीस्थानावर, पर्यावरण, संस्कृती, जंगल, देवदेवता, मंदिरे, प्राणी या आदिम एकजीव झालेले असतात. पण जेव्हा विस्थापन होते तेव्हा प्रगत समाज, संस्कृती, भाषा, रितीरिवाज, खानपान, पोशाखपद्धती, धर्म, करमणूक इ. संपर्क आल्याने त्यांना बऱ्या वाईट गोष्टींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे ताणतणाव असंतोष वाढत आहे. जागतिक कमिशनच्या अहवालानुसार विकास प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या लोकांत ४० ते ५०% लोक आदिवासी आहेत.

डहाणू-उंबरगावचा वारली, खानदेशातील भिल्ल, चंद्रपूर बस्तरचा माडिया, दंडकारण्यातील गोंड, सिंहभू-संथाळ मधील संथाळी, भोरीया, नागा, अहो इ. आदिवासी देशोधडीला लागले आहेत. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश येथील प्रकल्पाने १,७०,००० हेक्टर वरील जंगल उद्ध्वस्त होणार आहे. त्यामुळे ७५ हजार आदिमांचे भवितव्य अंधारलेले आहे. जंगलीप्राणी, वनस्पती, जंगले, दुर्मिळ झाडे यावर फार मोठे संकट येणार आहे. मुण्डा, उराँव, संथाळ हे आदिवासी आसाम, दार्जिलिंग येथे चहाच्या मळ्यात कामासाठी गेले. बरेच आदिवासी विस्थापित झालेत. मूळचा समुदाय, संस्कृतीपासून दुरावा निर्माण झाला. अपुरे वेतन यामुळे त्यांची पिळवणूक वाढली. कर्जबाजारीपणातूनच काही आदिवासी आपल्याच जमिनीत मजूर, वेठबिगार म्हणून काम करु लागले. उदरनिर्वाहासाठी काहीजण उद्योगधंद्यात आलेत आणि इथेही त्यांची पिळवणूक सुरु झाली.

सेवाभावी संस्था, सेवाभावी कार्यकर्ते, सामाजिक मानवशास्त्रज्ञ यांनी स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या विविध समस्यांकडे लक्ष देऊन त्यांचे हक्क, संरक्षण, कल्याण, जमीन जंगलेविषयक हक्क इ. चा आदर करण्यासाठी राज्यघटनेने अनेक सोई व तरतूदी करून दिल्या. आदिवासी कल्याणाची फलश्रुती त्यांच्यावर पैसा किती खर्च केला यावर अवलंबून न ठेवता आदिवासीतील गुणवत्तात्मक वाढ यावरच फलश्रुती ठरवावी. यासाठीच विस्थापितांचे पुनर्वसन करताना त्यांची परिस्थिती व त्यांची संस्कृती यांचे संपूर्ण आकलन करून विकास कार्याचे नियोजन करावे.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्न

❑ **खालील प्रश्नांची एका ओळीत उत्तरे लिहा.**

१. आदिवासींच्या दारिद्र्याचे मूळ कोणत्या एका बाबीत आहे.

------------------------------------------------------------------

२. अनुसूचित जमातींची यादी कोणत्या कलमाद्वारे करण्यात येते.

-----------------------------------------------------------------

३. १९७१ च्या खाणेसुरीनुसार आदिवासींची लोकसंख्या किती होती?

-----------------------------------------------------------------

४. २००१ च्या जनगणनेनुसार एकूण भारतीय लोकसंख्येत आदिवासींचे प्रमाण किती टक्केपर्यंत आहे.

-----------------------------------------------------------------

५. १९५६ च्या यादीनुसार एकूण आदिवासींची संख्या किती आहे?

-----------------------------------------------------------------

६. प्रत्येक जमातींचा प्रश्न वेगवेगळा का आहे?

-----------------------------------------------------------------

७. भारतीय आदिवासींचे प्रश्न किती प्रकारचे आणि कोणते आहेत?

-----------------------------------------------------------------

८. १९९९-२००० च्या नियोजन आयोगाच्या अहवालानुसार ग्रामीण व नागरी समाजातील अनुसूचित जमातींचे दारिद्र्यरेषेखालील आदिमांचे प्रमाण किती टक्के आहे?

-----------------------------------------------------------------

९. अमरावती जिल्ह्यात १९९३ मध्ये किती आदिम मुले कुपोषणामुळे बळी ठरली?

-----------------------------------------------------------------

१०. विस्थापित आदिवासींना कोणते परिणाम भोगावे लागतात?

-----------------------------------------------------------------

११. महाराष्ट्र राज्याने १९७५ मध्ये आदिवासींसाठी कोणता कायदा पास केला?

-----------------------------------------------------------------

१२. १९३८ च्या सेमिंग्टनच्या अहवालानुसार किती टक्के जमिनी आदिवासींकडे होत्या?

-----------------------------------------------------------------

१३. कोणत्याही मागासलेल्या समाजाची सुधारणा व्हावयाची असेल तर कशाचा प्रसार झाला पाहिजे?

-----------------------------------------------------------------

१४. १९८६ च्या शैक्षणिक धोरणानुसार कोणते काम हाती घेण्यात आले?

-----------------------------------------------------------------

१५. आदिम समाजात साक्षरतेच्या मंदगतीचे कारणे कोणती?

-----------------------------------------------------------------

१६. भारत सरकारने जंगलविषयक कायदे केंव्हा आमलात आणले?

-----------------------------------------------------------------

## २.५ पारिभाषिक शब्द (शब्दार्थ)

- **अनुसूचित जमाती :** आदिवासी
- **आदिवासी समाज :** गिलीन व गिलीन यांच्यामते ङ्गएका विशिष्ट भुप्रदेशात राहणाऱ्या, समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात.
- **कुल :** एकपक्षीय वंशपरंपरेच्या आधारावर उभारणी झालेल्या स्त्रीपुरुषांचा समूह म्हणजे कुल होय.
- **कुलप्रतीक (कुलचिन्ह) :** प्रत्येक कुलाची उत्पत्ती कोणत्या तरी सत्य किंवा कल्पित पूर्वजापासून झालेली असते. पूर्वज कसा सत्य किंवा कल्पित असू शकतो त्याप्रमाणे हा पूर्वज मानव, मानवसदृश्य प्राणी, प्राणी, वनस्पती अगर निर्जीव वस्तूही असू शकतो. हा सजीव अगर निर्जीव वस्तूला कुलप्रतीक अगर 'देवक' म्हणतात.
- **निरक्षर :** लिहीता वाचता न येणारा, अज्ञानी.
- **कर्मकांड :** रितीरिवाज, पद्धती, जपतप.
- **अवडंबर :** एखाद्या गोष्टीचे प्रमाणापेक्षाही नको तेवढे स्तो माजविणे.
- **जमीन हस्तांतरण :** कायद्याच्या आधारे एका व्यक्तिकडून दुसऱ्या व्यक्तीकडे रितसर (नियमानुसार) जमीन सुपूर्द करणे.

- **वेठबिगारी :** कर्जबाजारी आदिवासीला गुलाम म्हणून जमिनदारांच्या घरची व शेतीची कामे विनामोबदला कामे करणे (सर्वस्व गमावणे).
- **युवागृहे :** आदिवासी समाजात तरुण मुला-मुलींसाठी गावाच्या बाहेर स्वतंत्र घरे, सांस्कृतिक शैक्षणिक केंद्र (रंगबंग, शयनगृहे) एकत्र राहणेचे ठिकाण.
- **कुपोषण :** लहान मुलासाठी सकस, प्रोटीन्सयुक्त, पोषक आहाराविना राहणे.
- **अनारोग्य :** आरोग्य चांगले नसणे.
- **उपासमार :** पुरेशा अन्न, पाण्यावाचून उपाशी राहणे.
- **वंचितता :** वीज, शुद्धपाणी, सुखसोई, आरोग्य, पुरेसे अन्नधान्य इ. पासून दूर राहाणे, बाजूला पडणे.
- **विस्थापन :** आदिवासींना कामधंदा देऊन रोजगार उपलब्ध करून त्यांच्यासाठी त्यांना इतरत्र हलवून म्हणजे स्थलांतरीत करून नव्या वसाहती उभ्या करणे (पुनर्वसतिकरण).
- **भूमिहीन :** जमीन नसणारा.
- **उदरनिर्वाह करणे :** पोट भरण्यासाठी, जगण्यासाठी कोणत्याही स्वरूपाची मजूरी, कामधंदा करणे.
- **बिगर आदिवासी :** मूळचा आदिवासी नसलेला.
- **जमीनधारक :** जमीन असलेला, जमिनदार, जमिनीचा मालक.
- **कुऱ्हाडशेती :** जंगले तोडून ती जाळून त्या राखेत बी, बियाणे टाकून शेती करणे.

## २.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. आदिवासींच्या समस्यांचे मूळ त्यांच्या दारिद्र्यात आहे.

२. भारतीय संविधनातील ३४१ आणि ३४२ कलमानुसार राष्ट्रपतींच्या आदेशाने अनुसूचित जमातींची यादी तयार करण्यात येते.

३. १९७१ च्या खानेसुरीनुसार आदिवासींची लोकसंख्या ३,८०,१५,१६३ इतकी होती.

४. २००१ च्या जनगणनानुसार एकूण भारतीय लोकसंख्येत आदिवासींचे प्रमाण ९% पर्यंत आहे.

५. १९५६ च्या यादीनुसार एकूण आदिवासींची संख्या ४१४ इतकी आहे.

६. प्रत्येक आदिवासींना विविध भौतिक व सांस्कृतिक वातावरण लाभल्याने प्रत्येक जमातीचा प्रश्न वेगवेगळा आहे.

७. भारतातील आदिवासींचे प्रश्न दोन प्रकारचे आहेत ते म्हणजे,

अ) एक म्हणजे त्यांच्या पारंपारिक जीवन पद्धतीमधून निर्माण झालेला प्रश्न.

ब) तर दुसरा म्हणजे आदिमांचा प्रगत समाजांशी (ग्रामीण शहरी) संपर्क आल्याने निर्माण झालेला प्रश्न. (समस्या)

८. १९९९-२००० च्या नियोजन आयोगाच्या अहवालानुसार ग्रामीण व नागरी समाजातील अनुसूचित जमातींचे दारिद्र्य रेषेखालील आदिमांचे प्रमाण ४६% व ३५ % आहे.

९. अमरावती जिल्ह्यात १९९३ मध्ये ७००० आदिम मुले कुपोषणामुळे बळी ठरली.

१०. आदिवासींच्या विस्थापनाचे गरीबी आणि वेठबिगारी हे परिणाम भोगावे लागतात.

११. महाराष्ट्र राज्याने १९७५ मध्ये आदिवासींसाठी जमीन पुर्नस्थापना कायदा संत केला.

१२. १९३८ च्या सेमिंग्टनच्या अहवालानुसार ९५% जमिनी आदिवासींच्या मालकीच्या होत्या पण आता ३०% ही जमिनी आदिवासींकडे राहिलेल्या नाहीत.

१३. कोणत्याही मागासलेल्या समाजाची सुधारणा व्हावयाची असेल तर शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे.

१४. १९८६ च्या शैक्षणिक धोरणानुसार आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आलेत.

१५. आदिम समाजात साक्षरतेच्या मंदगतीचे कारणे खालीलप्रमाणे -

१) विसंगत अभ्यासक्रम.

२) पालकांचे दारिद्र्य.

३) शैक्षणिक सुविधांचा अभाव.

४) विद्यार्थ्यांची व शिक्षकांची गैरहजेरी.

५) शिक्षणाचे माध्यम.

६) शैक्षणिक धोरणातील त्रुटी.

७) उच्चशिक्षण व गळतीचे प्रमाण.

८) शासकीय धोरण आणि मार्गदर्शनाचा अभाव.

१६. भारत सरकारने १९५२ मध्ये जंगलविषयक कायदे आमलात आणलेत.

## २.७ सारांश

आदिम जमातींच्या जीवनातील समस्यांचे स्वरूप किती जटिल आहे हे दिसून येते. दुर्ग निवासस्थान, पारंपारिक श्रद्धा, अज्ञान, प्रगतांशी संपर्क यामुळेच त्यांच्यात विविध समस्या निर्माण झालेल्या आहेत. आदिवासींनी धर्म व जादूवर मात केली, परंतु त्यांच्या जीवनात अशांती व वादळे (अस्थिरतेचे) निर्माण झाली ती प्रगतांच्या संपर्काने. भारतात अनेक राज्यकर्ते होऊन गेलेत पण आदिमांच्या कल्याणाकडे दुर्लक्षच केले, उपेक्षा केली, अत्यंत दारिद्र्य, दुर्दैवी जीवनातून त्यांची खऱ्या अर्थाने कोणी सुटका केली नाही. आदिवासींच्या प्रथा, परंपरा, प्रगत समाजालाही आदर्शभूत ठराव्यात, अशी सामूहीक, स्वावलंबी जीवनपद्धती, संगीत, नृत्य, नक्षीकाम, कोरीव काम, विणकाम, हातमागाचे कापड इ. कला जीवंत ठेवण्याचे प्रयत्न कोणी केले नाहीत. राज्यकर्त्यांनी उपाय शोधण्याऐवजी अपायच जादा केले आहेत. प्रगतांची शिक्षणपद्धती अनुरूप नसता ही शिक्षणपद्धती आग्रही धरल्याने त्यांच्यावर अन्याय होऊन अंधश्रद्धा तर नष्ट झाल्या नाहीत पण स्वसंस्कृती, परंपरा, जीवनपद्धती याप्रती अप्रिती व अनादर भावना निर्माण झाली. म्हणून ठक्करबाप्पा आदिवासींच्या समस्या, दारिद्र्य, दुर्गता, अज्ञान, अनारोग्य, सदोष शासन, नेतृत्वाचा अभाव सविस्तर विशद करून म्हटले आहे की, ''कितीतरी शतके दुर्लक्षीत झालेल्या भारतातील आदिमांच्या समस्यांकडे त्वरित लक्ष दिले पाहिजे. भारतातील इतर नागरिकांच्या पातळीवर आदिमांना आणण्यासाठी आदिमांची सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात वेगाने प्रगती व्हावी म्हणून परिणाम कारक उपाययोजना केल्या पाहिजेत म्हणून वन्य भागात व इतर भागात राहणाऱ्या आदिमांच्या विकासाकडे लक्ष देण्याची गरज आहे.''

आदिवासींच्या उपेक्षेचे, कष्टाचे, दारिद्र्याचे दिवस आता संपविले पाहिजेत. विश्वबंधुत्वाचा महामंत्र जपणाऱ्या प्रगत समाजाने करुणेपोटी लक्ष पुरविले पाहिजे. आजच्या युगात अंधारात राहणाऱ्या व काळवंडून गेलेल्या आदिम जीवनाबद्दल आस्था न वाटणे हा एक नैतिक गुन्हा आहे. व्यक्तिने आपला समाज सोडून दुसरा समाज कोणत्या परिस्थितीत, अवस्थेत जीवन जगतो हे जर माहिती नसेल तर ती व्यक्ती पुरेशी सुशिक्षित आहे, असे म्हणता येत नाही. म्हणूनच आदिमांच्या समस्या मानवी दृष्टिकोनातून समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे.

विविध विचारवंतानी आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी सामिलीकरण, अलगता व एकीकरण हे तीन सिद्धांत मांडलेत पण डॉ. हटन यांनी सुवर्णध्य सुचविला, शासकीय सोयी, सवलती, विज्ञानाची,

तंत्रज्ञानाची प्रगती, शैक्षणिक विकास, आरोग्यविषयक सुविधा यामुळे आदिवासींना त्यांच्या समस्या सोडविता येतील. प्रबोधन होऊन अनिष्ट चालीरिती, प्रथा, परंपरा, विचार सोडून देतील. चांगल्या गुणांचे संस्कृतीचे संवर्धन होईल. खऱ्या अर्थाने राष्ट्रीय प्रवाहात सामील होऊन राष्ट्रीय एकात्मतेस हातभार लावतील. पंडित जवाहरलाल नेहरुंना हाच विचार अधिक व्यवहार्य, मानवी व राष्ट्रीय वाटला. १९५७ साली त्यांनी आदिवासी कल्याणासाठी पंचशील तत्त्वांचा पुरस्कार केला. ही तत्वे म्हणजे –

१) आदिवासींचा विकास करताना त्यांच्या परंपरागत कला, संस्कृती व जीवनपद्धतीनुसार करावा. त्यांच्यावर काही लादू नये.

२) आदिवासींच्या भू व जंगलविषयक अधिकाराचा कायदा करावा.

३) शक्यतो त्यांच्या जमातीतूनच त्यांच्या विकासासाठी, प्रशासकीय तांत्रीक शिक्षण देऊन नेतृत्व निर्माण करावे.

४) त्यांच्या सामाजिक, सांस्कृतीक संस्थांच्या साहाय्यानेच विकास योजनांची कार्यवाही करावी.

५) आदिवासींच्या कल्याण योजनांचे मूल्यमापन आकडेवारीवरून न ठरविता त्यांच्या गुणवत्तेवरून ठरविले जावे.

आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी विविध स्वरूपाचे कायदे, सुधारणा योजना, कल्याण कार्यक्रम राज्य व केंद्र सरकारमार्फत राबविले जात आहेत. यामध्ये कुळकायदा, कमाल जमीनधारणा कायदा, आदिवासी आर्थिक स्थिती सुधारणा कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, जमिनदारी व तालुकादारी नष्ट करणारे कायदे, वनगाव आणि वनसंरक्षक कायदा तसेच पिण्याच्या पाण्याच्या विहीरी व कुपनलिका, वाहतुकीसाठी जोडरस्ते, दळणवळण, शाळांच्या इमारती, पूर्वप्राथमिक शाळा, आश्रमशाळा, शिष्यवृत्ती योजना, सहकारी तत्त्वावर आदिवासी जंगलात कारखाने व उद्योगधंदे उभारणी, नवसंजिवन योजना, शालेय पोषण आहार (खिचडी योजना), धान्यकोष योजना, गरोदर व बालकांना सकस व प्रथिनेयुक्त आहार, अंगणवाडी योजना, आदिवासी महिला व बालकल्याण कार्यक्रम (योजना), एकात्मिक बालविकास योजना, आरोग्य तपासणी व लसीकरण, प्राथमिक आरोग्य केंद्र, वैद्यकीय सुखसोई सुविधा, पाळणाघरे, एकच गावठाण योजना, आदिवासी सांस्कृतिक केंद्र, आरोग्य उपकेंद्र, सेवाभावी संस्था उभारणी, आदिवासी विकास महामंडळ, शेती व शेतीपुरक उद्योग, रोजगार हमी कार्यक्रम, रोग व साथीचे रोग याबाबत जागृती करणे, अंधश्रद्धा, कमकांड याविरुद्ध सेवाभावी संस्थेकडून जागृती, प्रबोधन, आरोग्यज्ञान, आरोग्य सेवा, आरोग्य सैनिक वरील सर्व कायदे, कार्यक्रम, योजना, कल्याणकारी धडक कार्यक्रम शासनामार्फत चालू आहेत. वरील सर्व बाबींचे कटाक्षाने पालन होते की नाही याची काळजी घेतली तरी आदिवासींचे दारिद्रय, कर्जबाजारीपणा, शेतजमिनीविषयक प्रश्न, निरक्षरता, आदिवासींची पिळवणूक, जमिनी हस्तातरणाचे प्रश्न इ. समस्या नष्ट होण्यास मदत होईल.

## २.८ सरावासाठी स्वाध्याय

१. आदिवासींचे दारिद्र्य व कर्जबाजारीपणा स्पष्ट करा.

२. आदिवासी समाजातील जमीन हस्तांतरण व शेतजमिनीविषयी प्रश्न यांची सविस्तर चर्चा.करा.

३. आदिवासी समाजातील निरक्षरतेच्या प्रश्नाची कारणे (साक्षरतेच्या मंदगतीची) विशद करा.

४. कोणकोणत्या क्षेत्रातून आदिवासींची पिळवणूक होते, याचे स्पष्टीकरण द्या.

## २.९ क्षेत्रीय कार्य

१. आदिवासींच्या समस्येचा अभ्यास करून त्याबाबत दैनिक पेपरमधून त्याविषयी लेखन करा.

२. आपल्या नजिकच्या आदिवासी समाजास भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घ्या आणि त्यावर लेखन प्रसिद्ध करा.

३. सहभागी निरीक्षणाच्या सहाय्याने आदिवासी समाजात वास्तव करून त्यांच्या संपूर्ण कलासंस्कृती, राहणीमानाचा अभ्यास करा.

## २.१० अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **Dr. D. N. Mujumdar** and **T. N. Madan** : Social Anthropology.

२. **R. N. Sharma** and **R. K. Sharma** : Social Anthropology and Indian Tribes.

३. **K. S. Padhy** and **P. C. Satapathy** : Tribal India.

४. **Dr. P. S. Khanna** : Climpses of the Indian Tribal Life.

५. **य. श्री. मेहेंदळे** : मानवशास्त्रज्ञ.

६. **डॉ. गोविंद गारे** : महाराष्ट्रातील आदिवासी जमाती.

७. **डॉ. विलास संगवे** : आदिवासींचे सामाजिक जीवन.

८. **डॉ. भीमराव पिंगळे** : वनवासी व उपेक्षीत जग.

९. **डॉ. गोविंद गारे** : आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ.

१०. **ए. वाय. कोंडेकर** : भारतीय आदिवासी समाज.

११. **गुरुनाथ नाडगोंडे** : भारतीय आदिवासी.

१२. **प्रा. ए. वाय. कोंडेकर,**
**डॉ. सौ. मंगला पाटील,**
**प्रा. पी. व्ही. चांदोरकर** : सामाजिक मानवशास्त्र.

१३. **प्रा. एन. आर. राजपूत** : सामाजिक मानवशास्त्र

१४. **प्रा. ए. वाय. कोंडेकर,**
**प्रा. डॉ. मंगला पाटील** : आदिवासींचे समाजशास्त्र.

घटक–३

# आदिवासी विकास

## घटक संरचना


३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ विषय विवेचन

३.३.१ आदिवासी विकास दृष्टिकोण : अलगीकरण, सामिलीकरण, एकीकरण

३.३.२ आदिवासी विकास धोरण : जमीन, शिक्षण आणि आरोग्य

३.३.३ आदिवासी विकासाचे अडथळे

३.४ सारांश

३.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

३.६ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी प्रश्न

३.८ क्षेत्रीय कार्य

३.९ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ३.१ उद्दिष्टे

आदिवासी विकास या अभ्यास घटकाची पुढील तीन उद्दिष्ट्ये आहेत.

१. अलगीकरण, सामिलीकरण आणि एकीकरण या आदिवासी विकास दृष्टिकोणांचा अभ्यास करणे.

२. शेती, शिक्षण आणि आरोग्य याबाबतचे आदिवासी विकासाचे धोरण समजावून घेणे.

३. आदिवासी विकासाचे अडथळे लक्षात घेणे.

वरील तिन्ही उद्दिष्टांनुसार सदरच्या लेखन घटकामध्ये संकलित माहिती स्पष्टीकरणात्मक आणि विश्लेषणात्मक पध्दतीने विशद करण्यात आली आहे.

## ३.२ प्रस्तावना

आदिवासी लोक हे भारतातील मूल निवासी वा रहिवाशी आहेत. डोंगर दऱ्याखोऱ्यांमध्ये त्यांचा अधिवास पहायला मिळतो. आदिवासी हा अशा पर्वत, डोंगरदऱ्याखोऱ्यांमध्ये का स्थिरावला आहे, याचा शोध घेणे गरजेचे आहे. भारतातील अनेक परकीय आक्रमणांसमोर या साधे जीवन जगणाऱ्या आदिवासी लोकांचा निभाव लागू न शकल्यामुळे स्वयं अस्तित्वासाठी अशा दुर्गम प्रदेशांचा आदिवासींना आश्रय घ्यावा लागला आहे. भारतामध्ये आदिवासींची लोकसंख्या इतर राज्यांच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ८.२ कोटी इतकी आहे. प्रगत समाजापासून अलिप्त राहिलेल्या या आदिवासी लोकांचा विकास साधण्याचा प्रयत्न शासकीय आणि अशासकीय स्तरावर सातत्याने होत आलेला आहे. असे असले तरी त्यांच्या वेगळ्या जीवनपध्दतीमुळे बाह्य समाज अविनाशी अनुकूलन साधता न आल्यामुळे त्यांचा विकास साधण्यामध्ये खूप अडचणी आलेल्या दिसून येतात. काही आदिवासी जमातींमध्ये बाह्य समाजजीवन पध्दतीशी अनुकूलन साधण्याच्या प्रयत्नातून काही नवे प्रश्नही निर्माण झाले आहेत. आदिवासींना त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक परंपरांच्या प्रभावांमुळे बाह्य समाजाच्या संस्कृतीशी समायोजन साधता आलेले नाही. परिणामी, बाह्य समाज संपर्कातून परिवर्तन होण्याऐवजी त्यांच्यामध्ये ताणतणाव आणि उदासीनता आलेली दिसून येते.

आदिवासी समाजाचा विकास ब्रिटिश आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असला तरी त्याच्यातील बदलाची सुरुवात त्या आधीच्या कालखंडापासून झालेली आहे. अगदी १६-१७ व्या शतकाच्या कालखंडामध्ये भारतामध्ये धाडसी प्रवाशांनी केलेला प्रवेश व व्यापारी, धर्म प्रसारक यांच्या संपर्कामुळे आदिवासींच्या जीवनामध्ये थोड्याफार प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. हा बदल कधी चांगला तर कधी वाईट अशा दोन्ही प्रकारे झालेला आहे. आदिवासींच्या संपर्कात आलेल्या काही बाह्य घटकांचा हेतू आदिवासींच्या शोषणाचा अधिक तर त्यांच्या विकासाचा काही प्रमाणात राहिलेला आहे. परिणामी, ब्रिटीशपूर्व कालखंडामध्ये आदिवासींचा विकास झपाट्याने होऊ शकला नाही. ब्रिटीश सत्ताच्या कालखंडामध्ये ब्रिटिशांनी आपला भांडवली हेतू साध्य करण्यासाठी आदिवासींना काही विकासाची प्रलोभने दाखवून त्यांच्या साधनसंपत्तीचा फायदाच उठविला आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्येही भारतीय समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याच्या नावाखाली आदिवासींच्या जमीन, जंगल आणि त्यांची उत्पादने या त्यांच्या जीवन जगण्याच्या स्रोतांचेच मोठ्या प्रमाणावर उध्वस्तीकरण केले आहे. सध्या जागतिकीकरणाच्या नव्या संकल्पनेच्या आणि प्रक्रियेच्या नावाखाली आदिवासींच्या भौगोलिक क्षेत्रातील खनिज संपत्तीच्या लोभापाई त्यांचे जीवनच उद्ध्वस्त करून टाकण्याचा प्रयत्न सुरू असेलला दिसून येतो.

या सगळ्या गोष्टींचा विचार करता त्यांचा विकास हे ध्येय समोर ठेवून शासकीय आणि अशासकीय स्तरावर प्रयत्न केले जाऊ लागले आहेत.

## ३.३ विषय विवेचन

आदिवासींचा विकास ही त्यांच्या मूलभूत आवश्यक गरजा (अन्न, वस्त्र आणि निवारा) त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणारी एक प्रक्रिया आहे. आदिवासींचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक तसेच भावनिक विकास निर्देश करणारी ती प्रक्रिया आहे. आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच आरोग्यविषयक प्रश्नांची सोडवणूक करणारी व त्यांना नि:संकोचपणे, निर्भिडपणे, स्वच्छंदी जीवन जगण्याचे अधिकार व स्वातंत्र्य बहाल करणारी विकास ही प्रक्रिया आहे. तथापि, प्रचंड भांडवली विकासाच्या महत्त्वाकांक्षेपोटी आदिवासींच्या स्वायत्ततेवर व स्वतंत्र जीवन पध्दतीवर घाला घालणे याला विकास म्हणावा काय? केवळ भौतिक विकासाच्या प्रचंड भिंती व तटबंदी निर्माण करून त्याचे मानसिक व भावनिक अंध:पतन करणे याला विकास म्हणावा काय? या प्रश्नांचा विचार केला पाहिजे. विकास म्हणजे आदिवासींना स्वतंत्रपणे स्वायत्त, संपन्न, सुरक्षित, स्वच्छंदी जीवन जगण्याचे अधिकार प्राप्त करून देणे होय. डोंगर, पर्वत, दऱ्याखोऱ्यांमध्ये अलिप्तपणे जीवन जगणाऱ्या आदिवासींना केवळ भौतिक भांडवली विकासाच्या नावाखाली भरडत रहावे लागणे याला विकास म्हणता येणार नाही. आदिवासींना त्यांच्यातील अंगभूत गुणांचा विकास साधून कौशल्यपूर्ण बनविणे गरजेचे आहे. त्यांच्याजवळ असणाऱ्या भौतिक वा भौगोलिक संसाधनांचा नियोजनबध्द विकास करण्याची गरज आहे. आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनपध्दतीला धक्का न लावता त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. आदिवासींचा विकास या प्रयोजनामध्ये आदिवासी विकासाचा दृष्टिकोण धोरण आणि त्यामध्ये येणाऱ्या अडचणी यांचा आपल्याला ऊहापोह करावयाचा आहे की, ज्यामुळे त्यांच्या विकासाची स्पष्ट कल्पना येऊ शकते.

### ३.३.१ आदिवासी विकास दृष्टिकोण : अलगीकरण, सामिलीकरण, एकीकरण (Tribal Development Approaches : Isolation, Assimilation, Integration)

आदिवासी प्रगत समाजापासून दूर अलिप्त असे जीवन जगतात. त्यामुळे आदिवासींना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेचा विचार करता ते अत्यंत साधे जीवन जगतात. त्यांची अर्थव्यवस्था ही साधी व निर्वाहप्रधान अशा स्वरूपाची आहे. पैसा वा चलन पध्दतीचा अभाव असल्यामुळे तेथे वस्तुविनिमय पध्दती आहे. जंगलातील अन्नपदार्थ जमा करणे, शिकार, मासेमारी, पशुपालन व स्थानपर्तीत शेती करणे, शिवाय लहानमोठे कुटीरोद्योग करणे अशा स्वरूपाची त्यांची अर्थव्यवस्था असल्यामुळे त्यांना अन्न, वस्त्र,निवारा या मूलभूत

आवश्यकताही त्यांना नीटपणे पूर्ण करता येत नाहीत. परिणामी, त्यांच्यात कुपोषण, दारिद्र्य व कर्जबाजारीपणा या समस्या अधिक पहावयास मिळतात. आदिवासी लोक हे भोळेभाबडे साधे जीवन जगणारे, अंधश्रध्दा, जादूटोणा यावर विश्वास ठेवणारे अशिक्षित असे आहेत. या साधेभोळे जीवन जगणाऱ्या निरक्षर आदिवासींचा गैरफायदा त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रगत लोकांनी उठविला. प्रगतांचा आदिवासी समाजातील प्रवेश त्यांच्यात अनेक प्रश्न व समस्या निर्माण करणारा ठरला. प्रगतांच्या संपर्काने आदिवासींच्या रूढी-परंपरा, धर्मश्रध्दा, आचारपध्दती, नीतीमूल्ये, अर्थव्यवस्था यामध्ये मोठा बदल होऊन त्यांचे पारंपारिक जीवन नष्ट होण्यास मदत झाली. सावकार, ठेकेदार, कंत्राटदार, प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून त्यांची मोठ्या प्रमाणात लुबाडणूक करण्यात आली. आदिवासींचे जमीन, जंगल, जंगलातील उत्पादने यावरील मालकी हक्क नष्ट होऊ लागले. प्रगतांकडून आदिवासींना आर्थिक प्रलोभने दाखवून त्यांची जमीन हडप करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे ते भूमीहीन व अल्पभूधारक बनले. स्वत:चे पोट भरण्यासाठी त्यांना त्यांच्याच जमिनीमध्ये शेतमजूर, सालगडी म्हणून काम करण्यापलीकडे पर्याय उरला नाही. सावकार, ठेकेदार, कंत्राटदार तसेच प्रशासकीय अधिकारी यांनी आदिवासींच्या संपत्तीची वा मालमत्तेची लूट केली; पण त्याशिवाय आदिवासी स्त्रियांचे लैंगिक शोषणही केले. परिणामी, आदिवासी समाजात दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता, कुपोषण, भूमीहिनता, गुप्तरोग, कुष्ठरोग यासारख्या अनेक सामाजिक, आर्थिक तसेच आरोग्यविषयक समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या.

अनेक समस्यांच्या विळख्यात सापडलेल्या आदिवासीचे जीवन नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. आधुनिक समाजाच्या प्रभावशाली माऱ्याने आदिवासीचे अस्तित्व टिकणे शक्य नाही. ख्रिश्चन, हिंदू, मुस्लिम धर्माच्या अनुकरणाने आणि प्रगतांच्या संपर्काने त्यांच्या जीवनात निर्माण झालेल्या अनेक समस्यांमुळे निराशेच्या गर्तेत सापडलेल्या आदिवासींच्या जीवनाकांक्षाच नष्ट होत आहे. अशा परिस्थितीत उध्वस्त होत असलेले आदिवासींचे जीवन परत उभे करण्यासाठी त्यांच्या समस्यांवर ठोस उपाय करणे आवश्यक आहे. भारतातील आदिवासी समाजाचे प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात, मानवशास्त्रज्ञांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. तथापि, आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अभ्यासकांनी खालील तीन मार्ग स्पष्ट केले आहेत.

## १. अलगीकरण किंवा पृथकता (Isolation)

इतर समाजाच्या संपर्काने आदिवासी समाजात निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांचा विकास साधण्यासाठी अलिप्ततावादी दृष्टिकोणाचा पुरस्कार करण्यात आला. आदिवासी समाजाला इतर समाजांपासून अलिप्त ठेवल्यानेच त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनपध्दतीचे वेगळेपण टिकून राहणार आहे. आदिवासी समाजाला इतर समाजापासून अलिप्त ठेवण्याचा विचार **हटन** (Hutton) यांनी मांडला. आदिवासी समाजाला इतर समाजापासून दूर ठेवून त्यांच्या जीवन पध्दतीचे वेगळेपण टिकवून ठेवता येईल असे त्यांचे मत होते. ब्रिटिश सनदी नोकर आणि सरकारी अधिकारी यांनी याच मताचा पुरस्कार केला आहे. इतर समाजाच्या संपर्काने आदिवासी त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक चालीरिती, परंपरा आणि

एकूणच त्यांच्या जीवनपध्दतीचे अनुकरण करतील. परिणामी, आदिवासी समाजामध्ये अनेक अनिष्ठ रूढी, परंपरांचा शिरकाव होवून त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल, असे अलिप्ततावाद्यांना वाटते. आदिवासी कल्याणासाठी झटणारे सामाजिक कार्यकर्ते तसेच राष्ट्रीय मुत्सद्दी हे आदिवासींच्या जीवनामध्ये हस्तक्षेप करणारे आहेत असे त्यांचे मत आहे. सुरुवातीस, १९३१ मध्ये जनगणना आयुक्त असलेल्या **डॉ. व्हेरियर एल्विन** यांना या अलिप्ततावादी विचारांचा पुरस्कार केला. **गोंड आदिवासी** समाजाचा अभ्यास करताना त्यांना असे आढळून आले की, बाह्य प्रगत समाजाच्या संपर्काने गोंड आदिवासींच्या पारंपारिक जीवनावर अनिष्ट परिणाम झाला आहे. सावकार, जमिनदार, व्यापारी, कंत्राटदार, शासकीय अधिकारी तसेच जंगलसंबंधी सरकारचे नवीन कायदे यामुळे गोंडांच्या जीवनात वैफल्य वा नैराश्य आले आहे. १९४२ झाली व्हेरियर एल्विन यांनी "Loss of Nerve" या आपल्या ग्रंथामध्ये गोंड आदिवासी जीवनातील वैफल्याचे वर्णन केले आहे. आदिवासींच्या जीवनातील समस्या टाळून त्यांना मुक्त स्वच्छंदी जीवन जगता यावे यासाठी त्यांना प्रगतांपासून अलिप्त किंवा पृथक ठेवले पाहिजे. सर्व प्रकारचा संपर्क बंद करून वन्यजातीय संस्कृतीचे जतन केले पाहिजे. यासाठी त्यांनी "National Park" ही योजना मांडली. अलिप्ततावादी दृष्टिकोणामुळे आदिवासी लोकांना आपल्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात परस्परांच्या सान्निध्यात राहता येईल. शिवाय त्यांच्या पारंपारिक कला, भाषा, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, रंगकाम, कोरीवकाम, मुक्त स्वच्छंदी वृत्ती, धैर्य, साहस, स्वावलंबन, प्रतिकारशक्ती इत्यादी परिस्थितीजन्य निर्मित गुणवैशिष्ट्यांचे जतन व संवर्धन करता येईल. थोडक्यात, डॉ. व्हेरियर एल्विन यांनी आदिवासी समाजाच्या विकासासाठी अलिप्ततावादी विचाराचा पुढील काही कारणांसाठी पुरस्कार केलेला दिसून येतो.

१. प्रगत समाजाच्या संपर्कात आदिवासींच्या जीवनात निर्माण झालेल्या समस्यांतून त्यांची सुटका करणे की, ज्यामुळे त्यांना आपल्या पूर्ववत सामाजिक जीवनाचा आनंद घेता येईल.

२. आदिवासींच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन करणे.

३. आदिवासींच्या पारंपारिक कला (उदा. नृत्य, गायन, वाद्य, रंगकाम, चित्रकला, घडीवकाम, विनकाम, भाषा, साहित्य, वाक्प्रचार, म्हणी, दागदागिने इत्यादी) यांचे वेगळेपण जतन करणे.

४. आदिवासी समाजाच्या सामाजिक संस्था, संघटनांची (उदा. कुल संघटना, युवा संघटना, मंडळे, कुटुंब संस्था, विवाह संस्था, न्याय संस्था, धर्मसंस्था इत्यादी) सरंचनात्मक बैठक सुरक्षित ठेवणे.

५. आदिवासी लोकांमधील धैर्य, साहस, प्रामाणिकपणा, सहकार्य, सहिष्णुता, नितीमूल्यांवरील निष्ठा, कष्टाळू वृत्ती, त्यागाची भावना इत्यादी सामाजिक संघटनात्मक गुणवैशिष्ट्यांचे जतन करणे.

अशाप्रकारे आदिवासी समाजाच्या जीवनपध्दतीचे वेगळे, स्वतंत्र अस्तित्व अलिप्ततावादी धोरणाद्वारे शक्य आहे. ज्यामुळे आदिवासी लोकांना कोणत्याही बाह्य समाजाच्या प्रभावाखाली न राहता नैसर्गिक जीवन पध्दतीचा आनंद घेता येणे शक्य होणार आहे. प्रगतांच्या स्वार्थ हेतूमुळे आदिवासी समाजाचे कल्याण बाजूला पडून आदिवासींना अनेक चिंताग्रस्त समस्यांनी ग्रासले आहे. आदिवासींना मुक्त असे नैसर्गिक सामाजिक जीवन जगता यावे यासाठी अलिप्तवादी धोरण स्वीकारणे हितकारक आहे.

अलिप्ततावादी दृष्टिकोणातून आदिवासी समाजाचा विकास साधता येईल. या डॉ. एल्विन यांच्या विचारावर अनेक अभ्यासकांनी कडाडून टीका केली आहे. **आदिवासी लोकांना प्राणी संग्रहालयामध्ये ठेवायचे काय ?** असा प्रश्न त्यातून विचारण्यात येवू लागला. **ठक्कर बाप्पा** यांनी तर या अलिप्ततावादी विचाराला कडाडून विरोध केला. त्यांच्यामते, राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणाऱ्या धोकादायक सिध्दांतात अलिप्ततावादी मताचा अंतर्भाव केला पाहिजे. पृथकतेत फुटीरवादी प्रवृत्ती असते. पृथकता सर्वार्थाने हानीकारक होय. कारण यातून समस्यांचे निराकरण होण्याऐवजी समस्या वाढू लागतील म्हणून पृथकतेचा विचार आदिवासी समाजाच्या विकासासाठी हानीकारक आहे. **डॉ. एल्विन** हे ख्रिश्चन धर्मप्रसारक होते. आदिवासींना अलिप्त ठेवण्यामागील त्यांचा हेतू ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे हा असला पाहिजे असे काहीसे वाटते. **नबेंदू दत्त** आणि **मुजुमदार** यांच्या मते, अलिप्ततावाद्यांचे धोरण हे भारतीय सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीशी विसंगत आहे. तसे पाहता आदिवासी समाजांचा प्रगत समाजाशी असलेला संबंध हा कित्येक शतकांचा आहे. त्यामुळे अलिप्ततावादी धोरणातून आदिवासी आणि प्रगत समाजामधील संबंध तोडले जातील. तसे पाहता कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या-त्या समाजाच्या संस्कृतीच्या समिलनातून झालेले आहे. संस्कृतीकरण हे समाजाच्या विकासाचे लक्षण आहे. सांस्कृतिक देवाण-घेवाणीतूनच समाजविकासाच्या नव्या वाटा सापडत असतात. म्हणून आदिवासी समाजातील अनेक प्रश्नांच्या निराकरणासाठी आणि विकासासाठी अलिप्ततावादी विचार धोकादायक आहे. सध्या बदलत्या परिस्थितीमध्ये आदिवासींना वेगळे ठेवणे म्हणजे त्यांना विकासाच्या प्रक्रियेपासून दूर ठेवण्यासारखे होईल. अन्य समाजातील नव्या गोष्टींचा स्विकार करून आपल्या समाजातील प्रश्नांची सोडवणूक करता येणे त्यांना शक्य आहे. आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी बाह्य समाजाच्या संपर्कात आणणे हितावह आहे. परस्परांच्या आदानप्रदानातून नव्या विचारांचा जन्म होत असतो की, ज्यामुळे त्या-त्या समाजाला स्वत:चा विकास साधता येतो. तथापि, आदिवासी समाजाला इतर समाजापासून जाणीवपूर्वक दूर ठेवल्याने आदिवासी समाज विलोपाच्या मार्गाला लागेल अशी भिती व्यक्त केली जात आहे.

## २. सामिलीकरण (Assimilation)

अलिप्ततावादी विचाराच्या अगदी विरुध्द असा हा सामिलीकरणाचा दृष्टिकोण आहे. आदिवासी समाजाला प्रगत समाजापासून अलिप्त ठेवल्याने त्यांचा विकास शक्य नाही असे या सामिलीकरण

दृष्टिकोणाचा पुरस्कार करणाऱ्या अभ्यासकांना वाटते. आदिवासी समाजातील प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी सामीकरण किंवा सामिलीकरण दृष्टिकोणाचा पुरस्कार **डॉ. जी. एस. घुर्ये** यांनी केला. **डॉ. घुर्ये** आणि **ठक्कर बाप्पा** यांनी सामिलीकरणाच्या किंवा समरूपतावादाचा सिध्दांत मांडला आहे. त्यांच्या मते, आदिवासी समाजातील समस्यांचे निराकरण या सामिलीकरणातून होणार आहे. त्यामुळे आदिवासी समाजाचे प्रगत समाजाशी नियोजनपूर्वक एकरूपीकरण करण्याचा मार्ग त्यांना योग्य वाटतो. **डॉ. घुर्ये** यांनी आदिवासी लोकांना **'मागासलेले हिंदू'** असे म्हटले आहे. मागासलेल्या हिंदूचे प्रगत हिंदू समाजाशी सामिलीकरण झाले पाहिजे असे त्यांचे मत आहे. कित्येक शतकांपासून आदिवासी समाजाचा हिंदू समाजाशी संपर्क दिसून येतो. अनेक आदिवासी जमातींनी हिंदूंच्या देवदेवता, सणसमारंभ, धार्मिक श्रध्दा व आचरण पध्दतीचे अनुसरण केले आहे. आदिवासींनी केवळ हिंदूंच्या धार्मिक जीवनपध्दतीचाच अवलंब केला आहे. असे नाही तर त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवन पध्दतीचाही अंगिकार केला आहे. अशाप्रकारे आदिवासी इतर समाजाशी समरस झाले. तर त्यांच्या समाजाचे वेगळे प्रश्न राहणार नाहीत. (Complete assimilation of the aboriginal tribes to the neighbouring, non-tribal culture.)

आदिवासी समाजाचे वेगळे अस्तित्व न ठेवता त्या समाजाच्या अवतीभोवती असणाऱ्या प्रगत समाजाशी त्यांचे विलिनीकरण जाणीवपूर्वक घडवून आणण्याचा हा सामिलीकरणाचा विचार आहे. आदिवासी समाजाचे प्रश्न त्यांची अंतर्गत संस्कृती आणि जीवनपध्दतीच्या आधारे न सोडविता त्यांचे इतर समाजाशी एकरूपता निर्माण करून सोडविण्याचा विचार या सामिलीकरणामध्ये दिसून येतो. आदिवासी समाजाचा ग्रामीण आणि नागरी समाजाच्या विकास प्रक्रियेशी समन्वय साधल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाही. यासाठी आदिवासी समाजाला अलिप्त न ठेवता इतर समाजामध्ये सामील करून घेणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाला इतर समाजांमध्ये सामील करून घेतले तर त्यांच्या वेगळ्या समस्या निर्माण होणार नाहीत आणि सरकारला त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी वेगळी व्यवस्था करावी लागणार नाही. भारतातील भिल्ल, वारली, कातकरी, गोंड, संथाल, नागा, खासी, गारो, कोरकू या सारख्या अनेक आदिम जमातींनी प्रगत समाजाच्या सांस्कृतिक जीवन पध्दतींचा अंगीकार केला आहे. म्हणजेच त्यांचे इतर समाजाशी सामीकरण घडून आले आहे. अशा प्रकारे आदिवासी समाजाचे अलगीकरण न ठेवता त्यांचे सामिलीकरणाच्या आधारे विविध प्रश्न सोडविले जावून त्यांचा सर्वांगीण विकास शक्य आहे.

सात्मीकरणाच्या धोरणावर अनेक अभ्यासकांनी टीका करून काही प्रश्न उपस्थित केले आहेत ते असे- प्रगत भारतीय समाजामध्ये अनेक भाषा बोलणारे समुदाय शेकडो वर्षे परस्परांच्या सान्निध्यात असूनही त्यांच्यात सात्मीकरण झाले आहे काय? भारतामध्ये अनेक जातीय समुदाय परस्परांच्या सान्निध्यात येऊनही त्यांच्यामध्ये सात्मीकरणाची प्रक्रिया खऱ्या अथाने झाली आहे काय? आणि महत्त्वाचे म्हणजे वेगळी सांस्कृतिक अस्मिता, स्वायत्तता असणारा कोणताही समुदाय अन्य समुदायामध्ये सामील होईल काय? म्हणून सात्मीकरणाची प्रक्रिया सोपी नाही. कोणताही समाज आपली भाषा,

संस्कृती, जीवनपध्दती यांचा सहजासहजी त्याग करणार नाही. कित्येक आदिवासी जमाती परस्परांच्या अगदी सान्निध्यात असूनही त्यांनी दुसऱ्या जमातीच्या केणत्याच सांस्कृतिक घटकांचा स्वीकार केलेला नाही. आदिवासी आपल्या सांस्कृतिक जीवन परंपरांना अगदी पालीसारखे घट्ट चिकटून राहतात. त्यामुळे त्यांचे अन्य समाजाशी सामिलीकरण कसे शक्य आहे. प्रत्येक समाजालाच आपल्या सांस्कृतिक जीवन पध्दतींचा अभिमान असल्यामुळे आदिवासी समाजाचे सामिलीकरण होणे शक्य नाही. उलट सामालिकरणाची प्रक्रिया जाणीवपूर्वक कार्यान्वित केल्यास त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतील. भारतातील नागा, मीझो, संभाल यासारख्या अनेक जमातींनी आपापली सांस्कृतिक अस्मिता जपण्यासाठी मोठे संघर्ष वा उठाव केले आहेत ते डोळ्याआड करता येणार नाही. भारताचे पहिले पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सात्मीकरणाच्या धोरणाबाबत म्हटले आहे की, सात्मीकरणामुळे आदिवासी कला, साहित्य लोप पावल्याशिवाय राहणार नाही. म्हणजेच सामिलीकरणातून आदिवासी समाजाचे प्रश्न न सुटता त्यांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे यात शंका नाही.

## ३. एकीकरण (Integration)

आदिवासी समाजाचा विकास साधण्यासाठी त्यांच्या समोरील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अलिप्ततावादी आणि सामिकरणात्मक दृष्टिकोणांचे अपयश निश्चित झाल्यानंतर एकीकरणात्मक धोरण उपयोगाचे ठरेल काय? याचा आढावा घेणे आवश्यक ठरते. अलिप्ततावादी दृष्टिकोणातून आदिवासी समाजाच्या संस्कृतीचे जतन होईल, पण ते राष्ट्रीय विकास प्रवाहापासून दूर फेकले जातील. याउलट सामिलीकरणाच्या धोरणामुळे आदिवासी समाजाचे सामाजिक-सांस्कृतिक वेगळेपण लुप्त होईल. एवढेच नव्हे तर आदिवासी समाजाचे अस्तित्व उरणार नाही. **डॉ. हटन** यांनी एकीकरणात्मक दृष्टिकोणाचा पुरस्कार करून एक सुवर्णमध्य काढला आहे. एकीकरणात्मक दृष्टिकोणानुसार भारतीय समाजाशी आदिवासींचे अभिन्नत्व सांधताना आदिवासी समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनपध्दतीला धक्का न लावता त्यांच्या जीवनपद्धतीचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न अभिप्रेत आहे. आदिवासी समाजाच्या रूढी परंपरा, श्रध्दा, आचार-विचार, नितीमूल्ये, कला-कौशल्य आणि एकूणच जीवनपध्दतीचे वेगळेपण कायम ठेवून त्यंना राष्ट्रीय जीवन प्रवाहामध्ये अंतर्भूत करणारा हा विचार आहे. आदिवासी समाजाचे प्रगत समाजाशी एकीकरण साधताना त्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक ठरते. त्यामध्ये आदिवासी समाजाला आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच आरोग्यविषयक विकासाच्या सेवासंधीची उपलब्धता करून देणे महत्त्वाचे असते. अशाप्रकारच्या सेवासंधींच्या उपलब्धतेमुळे त्यांच्या विविध समस्यांचे निराकरण होऊन त्यांच्या वेगळ्या सामाजिक जीवनाचे अस्तित्व टिकून राहण्यास मदत होणार आहे.

**कै. पंडित जवाहरलाल नेहरू** यांना हा एकीकरणात्मक विचार अधिक व्यवहार्य आणि राष्ट्रीय वाटला. म्हणून त्यांनी या विचाराचा पुरस्कार केला. अमेरिकासारख्या देशात विभिन्न वांशिक व

सांस्कृतिक समुदाय असतानाही राष्ट्रीय उभारणी भक्कम पायावर करता आली. जगातील एक प्रगत राष्ट्र म्हणून त्याने लौकिक प्राप्त केला. रशियामध्ये देखील अनेक भाषा बोलणारे, विभिन्न सांस्कृतिक परंपरा असलेले मानव समूह असतानाही ते एक बलवान राष्ट्र होऊ शकले. मग भारतासारख्या देशात हे का होऊ नये? असा प्रश्न निर्माण करून त्यांनी एकात्मतावादाचा पुरस्कार केला. कै. जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले आहे की, ''सामिलीकरणाची प्रक्रिया घातक आहे. जगाच्या काही भागात पाश्चात्य सभ्यतेने आदिवासी समाजाच्या परंपरांना मूठमाती दिली आहे. भारताच्या संदर्भात आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनाचे वेगळे अस्तित्व टिकून राहण्यासाठी सात्मीकरण ही प्रक्रिया योग्य ठरणार नाही. त्यासाठी आदिवासींचे वैशिष्ट्यपूर्ण जीवन श्रेयस्कर मानून राष्ट्रीय प्रवाहात क्रीयाशील घटक म्हणून त्यांनी सहभागी व्हावे. यासाठी सर्व प्रकारची मदत देण्याचे आपले उत्तरदायित्व आपण मान्य केले पाहिजे.'' याबाबत त्यांनी पुढील पाच तत्वे सांगितली आहेत.

१. आदिवासी समाजाचा विकास त्यांच्या जीवनपध्दतीप्रमाणे करणे, त्यांच्या कला व संस्कृतीला प्रोत्साहन देणे.

२. आदिवासींची जमीन आणि जंगलविषयक अधिकारांचा आदर करणे.

३. आदिवासी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्यातील नेतृत्व निर्माण करणे आणि त्याद्वारे आदिवासींच्या विकास साधणे.

४. त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक संस्थांच्या माध्यमातून विकास साध्य करणे.

५. आदिवासी कल्याणात्मक योजनांचे मूल्यांकन करताना परिमाणाएवेजी परिणात्मक घटक लक्षात घेणे.

अशाप्रकारे आदिवासी समाज जीवनाचे वेगळेपण सुरक्षित ठेवून त्यांना राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात अंतर्भूत करणयसाठी विविध विकास योजना कार्यान्वित करण्यावर भर देणे महत्त्वाचे आहे. भारत सरकारने एकीकरणात्मक दृष्टिकोण समोर ठेवून आदिवासी समाजाचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला आहे. भारतातील वेगवेगळ्या जातीसमुदायांचे सामाजिक-सांस्कृतिक वेगळेपण कायम ठेवून अखंड भारतीय समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे.

एकीकरणात्मक धोरणावर अनेक अभ्यासकांनी टीका केली आहे. त्यांनी भारत सरकार आदिवासी कल्याणासाठी अवलंबीत असलेल्या एकात्मतावादी विचाराचे खंडन केले आहे. भारतामध्ये अनेक जाती, धर्म, पंथ, आचार-विचारांचे लोक परस्परांच्या सान्निध्यात असूनही त्यांच्यात सात्मीकरण झाले काय? हे जर शक्य झाले नाही तर आदिवासी जमातीच्या एकीकरणाचा प्रयोग कितपत संयुक्तीक ठरेल? असा टीकाकारांनी प्रश्न उपस्थित केला आहे. आदिवासी समाजाचा अनेक योजनांच्याद्वारे विकास साधताना

त्यांचे सांस्कृतिक घटक वेगळे कसे राहतील? हा मोठा प्रश्न आहे. उलट विकास योजनांच्या नावाखाली आदिवासी समाज प्रगत समाजामध्ये मोठ्या संख्येने विलीन होवू लागला आहे. हे नाकारता येणार नाही. म्हणून एकीकरणात्मक धोरण आदिवासी विकासाचे मुख्य परिमाण ठरणार नाही. तथापि, एकीकरणात्मक विचारातून आदिवासी विकासाचे लक्ष गाठण्याचा प्रयत्न सरकार करत आहे.

प्रत्येक समुदायांनी आपल्या सामाजिक सांस्कृतिक जीवन परंपरांचे संरक्षण व संवर्धन करून अखंड राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहामध्ये सहभागी होण्यासाठी पुढे आले पाहिजे. त्यासाठी भारत सरकार वेगवेगळ्या विकासात्मक योजना राबवत आहे. आदिवासींना शैक्षणिक, औद्योगिक यांत्रिक-तांत्रिक, आर्थिक, व्यावसायिक अशा विविध स्तरांवर विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जावू लागला आहे. घटनात्मक संरक्षणाद्वारे त्यांचे अधिकार आणि हक्क सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. आरक्षणाचे धोरण आखून त्यांना वेगवेगळ्या क्षेत्रातील विकासाच्या संधी दिल्या जाऊ लागल्या आहेत. कायद्याच्या चौकटीमध्ये त्यांना अनेक अधिकार व सेवासंधी दिल्या आहेत.

थोडक्यात, आदिवासी समाजातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी अलिप्ततावाद, सामिलीकरणवाद आणि एकीकरणवाद या तीन दृष्टिकोणांचा काही समाजशास्त्रज्ञांनी उपाय सुचविला आहे. अलिप्ततावादी दृष्टिकोणाचा पुरस्कार करणाऱ्यांच्या मते, आदिवासींना प्रगतांपासून अलग ठेवल्यामुळे त्यांच्या जीवनामध्ये कोणत्याच समस्या उद्‌भवणार नाहीत. उलट त्यांचे वेगळे असे सांस्कृतिक जीवन सुरक्षित राहिल. सामिलीकरण दृष्टिकोणाचा पुरस्कार करणाऱ्यांच्यामते, आदिवासींना प्रगतांपासून अलिप्त ठेवल्याने त्याचा विकास होणार नाही. उलट अलग राहिल्याने त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. म्हणून आदिवासींना प्रगत समाजामध्ये सामिल करून त्यांना विकासाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. तथापि, या दोन्ही दृष्टिकोणांचा अनेक अभ्यासकांनी तीव्र निषेध केला आहे. त्यांच्या मते, आदिवासींच्या वेगळ्या जीवन पध्दतीचे संरक्षण करून त्यांना विकासाच्या सर्व संधी उपलब्ध करून देण्यासाठी एकीकरणात्मक दृष्टिकोण अत्यंत महत्त्वाचा आहे.

## ३.३.२ आदिवासी विकास धोरण : जमीन, शिक्षण आणि आरोग्य (Tribal Development Policies : Land, Education and Health)

स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये आदिवासी समाजाचा फारसा विकास झाला नाही. त्यास अनेक कारणे जबाबदार आहेत. त्या काळात आदिवासी समाजाचा बाह्य प्रगत समाजाशी संपर्क फारशा प्रमाणात आलेला नव्हता. ते डोंगर, पर्वत दऱ्याखोऱ्यांमध्ये अलिप्त असे आपले जीवन जगत होते. डोंगर, पर्वत, दऱ्याखोऱ्या आणि झाडाझुडपांनी व्याप्त असा त्यांचा भौगोलिक प्रदेश असल्यामुळे कोणत्याच प्रकारची दळणवळण सुविधा नव्हती. रस्ते, वाहने, रेडिओ, वृत्तपत्रे या संपर्क माध्यमांची सोय नसल्यामुळे त्यांना बाह्य समाजाशी संपर्क ठेवता आला नाही. परिणामी, आहे त्या परिस्थितीत कष्टमय आणि संघर्षमय

जीवन जगण्यापलीकडे त्यांना कोणताच पर्याय नव्हता. नंतरच्या काही काळामध्ये धर्मप्रचारकांनी आदिवासी समाजामध्ये आपापल्या धर्मांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा प्रयत्न केला. हिंदू धर्म आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांशी संपर्क आलेल्या काही आदिवासींनी हिंदू आणि ख्रिश्चन धर्मांचा स्विकार केला आहे. तथापि, आदिवासी लोकांना स्वत:च्या मूळ धर्माच्या सांस्कृतिक परंपरांचा त्याग करून इतर धर्मांच्या सांस्कृतिक मूल्यांशी समन्वय साधता आलेला नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनामध्ये वैफल्य वा नैराश्य निर्माण झाले. साहजिकच केवळ धर्मांतराने आदिवासी समाजाचा विकास होतो असे म्हणणे मूर्खपणाचे ठरेल. कारण कोणत्याही धर्माच्या तात्विक मूल्यांशी एकनिष्ठ राहून स्वत:चे पोट भरता येईल असे वाटत नाही. त्यामुळे धर्मांतराने सांस्कृतिक संघर्षात अडकून पडलेल्या आदिवासींच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले.

आदिवासी लोकांचा धर्म प्रचारकांप्रमाणेच प्रगत समाजातील व्यापारी, दलाल, ठेकेदार, कंत्राटदार, सावकार तसेच प्रशासकीय अधिकारी यांच्याशी या ना त्या कारणांनी संपर्क प्रस्थापित झाला. या प्रगतांच्या संपर्काने आदिवासींचे प्रश्न न सुटता त्यांना अनेक गंभीर प्रश्नांना सामोरे जावे लागले. प्रगतांनी आपला स्वार्थ हेतू साध्य करण्यासाठी आदिवासींचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले. आदिवासींच्या अज्ञानीपणाचा व भोळेभाबडेपणाचा प्रगतांनी गैरफायदा घेऊन त्यांच्या जमीनी, जंगल व जंगल उत्पादने इत्यादी साधनसंपत्ती लाटण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आदिवासींना गरीबी, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, वेठबिगारी, भूमिहीनता, गुप्तरोग, अनारोग्य यासारख्या अनेक सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

ब्रिटिश कालखंडामध्ये ब्रिटिशांनी आदिवासींसाठी शाळा, दवाखाने व इतर आर्थिक मदत अशा सेवाभावी वृत्तीचा अभास निर्माण केला. आदिवासींना आपलेसे करून घेऊन विकासाच्या नावाखाली त्यांच्या क्षेत्रातील साधनसंपत्तींची लूट करण्याचा प्रयत्न केला. आदिवासींच्या भौगोलिक क्षेत्रातील जमीन, जंगल, खनीज यांचे कायदेशीरपणे सरकारीकरण करण्याचा प्रयत्न केला. इंग्लंडमधील करपध्दती किंवा महसूलपध्दती लागू करून आदिवासींचे शोषण करणारा जमीनदार, सावकार या मध्यस्थ वर्गांची निर्मिती केली. इंग्लंडमधील औद्योगिक विकास साधण्यासाठी आदिवासी क्षेत्रातील जंगल खनिज संपत्तीचे उध्वस्तीकरण केले. परिणामी, आदिवासींना भूमीहीन, बेघर होऊन स्थलांतरित जीवन जगावे लागले. आदिवासींचा त्यांच्या भौगोलिक क्षेत्रावरील मालकी हक्क नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे आदिवासींच्या जीवनामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय तसेच आरोग्यविषयक अनेक समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या. आदिवासींना या सर्व प्रश्नांमधून बाहेर काढून त्यांचा नियोजनबध्द विकास करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये करण्यात आला. त्यांच्यासाठी अनेक विकासात्मक योजना राबविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आदिवासी समाजाच्या विकासावर अधिक भर देण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून सामाजिक कल्याण कार्यक्रम राबविण्यात आले. सामाजिक कल्याण प्रशासन ही लोकप्रशासनाची

आधुनिक शाखा आहे. सामाजिक कल्याण प्रशासन म्हणजे नेमके काय? यासंबंधी समाज कल्याण प्रशासनाचे भारतीय अभ्यासक **बी. जगन्नाथ** म्हणतात, ''सामाजिक प्रशासनाचा संबंध जनतेच्या कल्याणाशी आहे. तसेच निरनिराळ्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याचे कार्य सामाजिक कल्याण प्रशासन करते.'' **जॉन किडने** म्हणतात, ''सामाजिक कल्याण प्रशासन हे सामाजिक निती किंवा धोरणाला समाज सेवेत परिवर्तीत करण्याची प्रक्रिया आहे. हे प्रशासन सामाजिक धोरणाचे मूल्यमापन व सामाजिक परिवर्तनाचे प्रयोग करीत असते.'' सामाजिक कल्याण प्रशासनाचा संबंध सामाजिक परिवर्तन, सामाजिक सुधारणा आणि समाजसेवा यांच्याशी आहे. लोकप्रशासनही लोकांना शिक्षण देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, शेती उत्पादन वाढविण्यासाठी साहाय्य करणे, दारिद्र्य निर्मूलन करणे इत्यादी समाज उन्नतीची कार्ये करते. या वेगवेगळ्या लोकोपयोगी विकास योजनांद्वारे आदिवासी समाजाचा विकास साधण्याचा वेळोवेळी प्रयत्न करण्यात आला आहे. त्यादृष्टीने या अभ्यास घटकामध्ये आदिवासी विकास धोरणाचा भाग म्हणून त्यांच्या जमीन, शिक्षण आणि आरोग्य विकास धोरणांचा अभ्यास खालीलप्रमाणे करणार आहोत.

## (I) आदिवासी शेती विकासाचे धोरण :-

आदिवासींच्या संपर्कात आलेल्या बिगर आदिवासी लोकांनी आदिवासींचे अज्ञान, निरक्षरता याचा फायदा घेऊन त्यांच्या जमिनी आपल्या पदरात पाडून घेतल्या. त्यामुळे अनेक आदिवासी लोकांवर भूमिहीन आणि अल्पभूधारक होण्याची पाळी आली. बिगर आदिवासी लोकांकडे हस्तांतरीत झालेल्या आपल्याच जमिनीमध्ये शेतमजूर, सालगडी, वेठबिगार म्हणून त्यांना काम करावे लागत आहे. ब्रिटिश आणि ब्रिटिशोत्तर कालखंडामध्ये सावकार, जमीनदार इत्यादी बिगर आदिवासी लोकांनी आदिवासी मालक असलेल्या जमिनी विक्री, बक्षिसपत्र, दानपत्र, कब्जागहाण वगैरे प्रकारांनी मिळविल्या. आदिवासींकडील जमिनींचे हस्तांतरण झाल्यामुळे त्यांच्या जीवनात मोठी अस्थिरता व संघर्ष निर्माण झाले. आदिवासींच्या जीवनामध्ये निर्माण झालेल्या संघर्षात्मक परिस्थितीची जाणीव अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय पुढारी यांना झाली. त्यांनी जमिनीच्या हस्तांतरणासंदर्भात आदिवासी लोकांना एकत्र करून चळवळी छेडण्याचा प्रयत्न केला. आदिवासींचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. शेती हाच त्यांचा जगण्याचा मुख्य स्रोत आहे. आदिवासींकडील जमिनीचे हस्तांतरण होणे म्हणजे त्यांचे अस्तित्वच नष्ट करण्यासारखे आहे. जमीन, जंगल आणि जंगलातील उत्पादने हे त्यांच्या जगण्याचे मुख्य स्रोत सुरक्षित राहण्यानेच त्यांचे अस्तित्व टिकून राहणार आहे. त्यासाठी सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय पुढारी यांच्या पुढाकाराने आदिवासींच्या चळवळी निर्माण झालेल्या दिसून येतात.

### १. महाराष्ट्रातील जमीन विकासाचे धोरण :-

महाराष्ट्रामध्ये आदिवासींकडून हस्तांतरित झालेल्या जमिनीचा प्रश्न सोडविण्यासाठी व आर्थिक शोषण थांबविण्यासाठी महाराष्ट्र सरकारचे त्यावेळचे महसूलमंत्री **श्री. ह. गो. वर्तक** यांच्या अध्यक्षतेखाली

एक समिती नेमली. त्या समितीने कुळ कायदा किंवा अन्य गैरमार्गांनी आदिवासी लोकांच्या जमिनींचे बिगर आदिवासी लोकांकडे झालेले हस्तांतरण रद्द करून त्या जमिनी परत मूळमालक असलेल्या आदिवासींना मिळाव्यात यासाठी खास कायदा करावा अशी शिफारस केली. या शिफारशींप्रमाणे आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरणाची प्रक्रिया रोखण्यासाठी आणि त्यांच्या बेकायदेशीर हस्तांतरीत जमिनी त्यांना परत मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र सरकारने ६ जुलै, १९७४ रोजी अध्यादेश जारी केला. या आदेशानुसार आदिवासी जमातीच्या हस्तांतरणासाठी शासनाची पूर्व अनुमती बंधनकारक ठरविण्यात आली. त्याचप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेता झालेले हस्तांतरीत जमीन मूळ आदिवासी मालकाला परत मिळवून देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. या अध्यादेशाचे पुढे 'महाराष्ट्र लॅण्ड रेव्हिन्यू कोड ॲण्ड टेनन्सी लॉज ॲक्ट, १९७४' कायदा क्रमांक ३५/७४ असे रूपांतर झाले.

आदिवासींच्या हस्तांतरीत जमिनी त्यांना परत मिळवून देण्यासाठी पुढे दुसरा कायदा करण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेवून केलेली विक्री, अदलाबदल, देणगी, लिलावात घेतलेली जमीन, आदिवासींना मिळवून देण्यासंबंधीचे कायदेशीर विधेयक विधानसभा व विधान परिषद यांनी सप्टेंबर, १९७४ मध्ये एकमताने मंजूर केले. या विधेयकाला राष्ट्रपतींची परवानगी मिळण्यास नऊ महिन्याचा कालावधी जावा लागला. त्यानंतर हा कायदा १ नोव्हेंबर १९७५ रोजी अंमलात आल्याचे जाहीर झाले. या कायद्याच्या विरुध्द आक्षेप घेतले जाऊ नयेत म्हणून तो घटनेच्या नवव्या अनुसूचित समाविष्ट करण्यात आला. तरीही बिगर आदिवासींनी या कायद्याविरुध्द आक्षेप घेणारे दावे मुंबई उच्च न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात दाखल केले. सुमारे ८ वर्षांनंतर म्हणजे डिसेंबर १९८४ मध्ये हा कायदा कायदेशीर असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.

### ❀ या कायद्याच्या तरतूदी अशा :-

आदिवासींच्या मालकीच्या जमिनींची हस्तांतरणाने मालकी बिगर आदिवासकडे आली असेल किंवा आदिवासी मालकाला अदलाबदलीनिमित्त मिळालेल्या जमिनीची किंमत त्याने दिलेल्या जमिनीच्या किंमतीपेक्षा कमी असेल आणि ही जमीन ६ जुलै, १९७४ रोजी किंवा त्यापूर्वी बिगर शेतकी कामासाठी वापरत नसेल तर त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कायद्यातील किंवा कोर्टाच्या हुकूमातील तरतुदीकडे दुर्लक्ष करून जिल्हाधिकारी आपण होवून कधीही किंवा जमिनीचे हस्तांतर करणाऱ्या आदिवासी मालकाने या कायद्याची अंमलबजावणी झाल्यापासून ३ वर्षांच्या आत केलेल्या अर्जान्वये आणि योग्य चौकशीनंतर पुढील प्रकारचे आदेश देऊ शकेल.

१. जमिनीचे हस्तांतरण करणाऱ्या आदिवासी मालकाची आणि ह्या हस्तांतरात बिगर आदिवासीला मिळालेली जमिनीची अदलाबदल रद्द करण्यात यावी. मात्र ही अदलाबदल करताना जमीन सुधारणेवर झालेला खर्च त्या कायद्यात दिलेल्या तरतुदीप्रमाणे निश्चित करण्यात यावा व तो सुधारित जमीन मिळालेल्या मालकाने सुधारणेसाठी खर्च केलेल्या मालकाला द्यावा (कलम ४-ब).

अशा हस्तांतरात आदिवासीने १ एप्रिल १९५७ (जमीन कसेल त्याची मालकी करणारा दिवस) पासून ६ जुलै १९७४ पर्यंत (आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतराला प्रतिबंध करणाऱ्या तरतुदी अंमलात आल्याचा दिवस) बिगर आदिवासीला पुढील प्रकारे दिलेली हस्तांतरे येतात.

अ) विक्री, देणगी, अदलाबदल, गहाण आणि खंडाने व इतर तोंडी व्यवहाराने झालेली हस्तांतरे येतात.

ब) कोर्टाच्या हुकूमान्वये किंवा डिक्रीखाली झालेली हस्तांतरे.

क) आदिवासींकडून शेतसाऱ्याची किंवा शेतसाऱ्याप्रमाणे गणली जाणारी इतर बाकी वसूल करण्यासाठी तसेच महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीत ॲक्ट, १९६० या अन्वये किंवा इतर कायद्यान्वये झालेली हस्तांतरे. मात्र यातून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम-३६ (३) या अन्वये झालेल्या हस्तांतरीत जमिनी वगळण्यात आल्या आहेत.

२. बिगर आदिवासींच्या अदलाबदलीने आदिवासींकडे हस्तांतरीत झालेल्या जमिनींचा कब्जा आदिवासी जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीविना बिगर आदिवासीकडे दिला किंवा कब्जेदार नजीकच्या वारस नसताना मरण पावला तर कब्जा दिल्यापासून दोन वर्षांच्या काळात कब्जा दिलेल्या आदिवासीला किंवा त्यांच्या वारसाला ती जमीन आपल्या ताब्यात द्यावी असा अर्ज करता येईल. त्यावर जमीन महसूल व इतर देणी ठरवून जिल्हाधिकारी नेमून देण्यात आलेल्या तरतुदीनुसार निर्णय घेऊ शकेल.

३. जमिनीसंबंधी १९७४ च्या पहिल्या कायद्यातील तरतुदीनुसार हस्तांतरीत झालेल्या आदिवासींच्या जमिनीचा ताबा बिगर आदीवासीकडे असेल आणि त्या जमिनींचा उपयोग शेती व्यतिरिक्त कामासाठी केला जात असेल तर जिल्हाधिकाऱ्यांना आपण होऊन कधीही कायदा लागू झाल्यानंतर ३ वर्षांच्या आत आदिवासींने अर्ज केल्यास अशा जमिनीचा ताबा त्याला देता येईल.

४. या तरतुदींनंतरही कायद्यात काही उणिवा राहिलेल्या होत्या. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक खास दुरुस्ती कायदा (३०/१९७७) केला. या कायद्यातील दुरुस्तीनुसार आदिवासी जमीन मालकाने किंवा त्याच्या वारसाने जमीन करण्यात असमर्थता व्यक्त केली किंवा तिची खरेदी किंमत द्यावयास तो असमर्थ असेल तर अशा जिल्हाधिकाऱ्यांची पूर्व परवानगी न घेता हस्तांतरीत झालेल्या जमिनीचा कब्जा राज्य सरकारकडे जाईल. अशा जमिनीची किंमत व त्या जमीन सुधारणाची किंमत सरकार त्या बिगर आदिवासीला देईल. अशा सरकारने ताब्यात घेतलेली जमीन असलेल्या गावात राहणाऱ्या किंवा त्या जमिनीपासून ५ किलोमीटर अंतरावर राहणाऱ्या जमिनीची किंमत व त्या जमीन सुधारणेसाठी झालेल्या खर्चाची किंमत भरण्यास तयार असलेल्या दुसऱ्या आदिवासी व्यक्तीला देण्यात येईल.

जमिनीचे हस्तांतरण ६ जुलै १९७४ पूर्वी झाले असल्यास आणि ज्या बिगर आदिवासीकडे जमीन

हस्तांतरीत झाली आहे, त्याची जमीन सार्वजनिक कार्यासाठी सरकारने ताब्यात घेतली असल्यास, हस्तांतरीत जमिनींपैकी फक्त अर्धी जमीन बिगर आदिवासीला परत केली जाईल.

हस्तांतरित जमीन परत मिळण्यास पात्र असलेल्या आदिवासीने ती जमीन तो स्वत: कसणार आहे आणि जिल्हाधिकाऱ्याने जमीन सुधारणेवर झालेला खर्च म्हणून निश्चित केलेली रक्कम बिगर आदिवासी मालकाला द्यावयास तयार आहे अशी हमी दिल्यासच त्याला मिळू शकेल. मात्र कायदेशीर अज्ञानाच्या बाबतीत अशी हमी त्याच्या पालकाला देता येईल. इतर कायदेशीर अपात्रता असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत त्याची हमी त्याच्या अधिकृत एजंटाला देता येईल.

## २. भारतातील अन्य राज्यांमधील आदिवासी जमीन विकासाचे धोरण :-

महाराष्ट्र शासनाप्रमाणेच भारतातील इतर राज्यांमध्येही आदिवासींच्या जमीन विषय विकास धोरणांची अंमलबजावणी करण्यात आली. घटनेतील अनुच्छेद ४६ च्या तरतुदीप्रमाणे आदिवासींच्या जमीन हस्तांतरणावर निर्बंध घालण्यासाटी आणि हस्तांतरीत झालेल्या त्यांच्या जमिनीचा कब्जा पुन्हा आदिवासींना देण्यासाठी भारतातील वेगवेगळ्या राज्यांमधून १९५६ पासूनच कायदे करण्यात आले. आंध्र प्रदेश राज्यामध्ये 'आंध्र प्रदेश (शेड्युल्ड एरिया) लॅन्ड ट्रान्स्फर रेग्युलेशन, १९५९' करण्यात आला. श्रीकाकुलम, विशाखापट्टणम आणि पश्चिम गोदावरी जिल्ह्यातून हा कायदा लागू करण्यात आला. मध्य प्रदेशमध्ये 'मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता १९५९ चे कलम १६५ (६)' नुसार आदिवासी जमीन मालकाला आपल्या जमिनीवरील हक्काचे जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय हस्तांतरण करता येणार नाही. असा प्रतिबंध लावण्यात आला. पश्चिम बंगालमध्ये 'पश्चिम बंगाल जमीन सुधारणा कायदा १९६५, प्रकरण दोन मधील कलम १४(सी)' नुसार आदिवासी जमीन मालकाला जमीन हस्तांतरणाबाबत काही नियम पाळणे बंधनकारक आहे. ओरिसा राज्यामध्ये अनुसूचित क्षेत्रामध्ये सक्षम महसूल अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय स्थावर मिळकतीचे हस्तांतरण रेग्युलेशन दोन १९५६ नुसार अवैध ठरविले आहे. बिहारमध्ये पाच वर्षे मुदतीच्या गहाणाने होणाऱ्या आदिवासी जमिनीच्या हस्तांतरणास छोटा नागपूर कुळवहिवाट कायदा १९०८ चे कलम ४६ नुसार परवानगी दिलेली होती. १९०९ मध्ये अनुसूचित क्षेत्रासाठी रेग्युलेशन मंजूर करण्यात आला व त्यानुसार आदिवासी जमीन हस्तांतरणाबाबतच्या तरतुदी कडक करण्यात आल्या. आसाम राज्यामध्ये आदिवासीच्या जमीन हस्तांतरणाचे रक्षण करण्यासाठी १८८६ च्या रेग्युलेशनमध्ये १९६४ ला सुधारणा करण्यात आली. अनुसूची सहाच्या तरतुदीप्रमाणे बिगर आदिवासीच्या जमीन संपादण्यावर बंधन घालणारे कायदे स्वयंशासित जिल्ह्याच्या जिल्हा कौन्सिलांनी केले आहेत. हिमाचल प्रदेशामध्ये हिमाचल प्रदेश ट्रान्स्फर ऑफ लॅण्ड (रेग्युलेशन) ॲक्ट १९६९ प्रमाणे आदिवासीने बिगर आदिवासीस जमीन हस्तांतरण करण्यावर बंधने घालण्यात आली आहेत. मेघालय राज्यामध्ये 'मेघालय ट्रान्स्फर ऑफ लॅण्ड (रेग्युलेशन) ॲक्ट १९७१' नुसार जमीन हस्तांतर करणाऱ्याने सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक मानले आहे. त्रिपुरा राज्यामध्ये आदिवासींच्या जमीन संरक्षणाबाबत

त्रिपुरा जमीन सुधारणा कायदा १९६० करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशमध्येही आदिवासींच्या जमीन हस्तांतरणावर १९६० च्या कायदा क्रमांक ४ ने निर्बंध घातले आहेत.

## ३. ब्रिटिश राजवटीतील आदिवासी जमीन विकासाचे धोरण :-

ब्रिटिश कालखंडामध्ये ब्रिटिशांच्या जमीनविषयक कायद्यामुळे आदिवासी जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली. ही हस्तांतरे थांबविण्यासाठी काही आदिवासी जमीनींनी बंड केले. आदिवासींचा असंतोष आणि बंड रोखण्यासाठी ब्रिटिशांनी पुन्हा आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरणास प्रतिबंध करणारे कायदे केले. उदा. एजन्सी टॅक्स इंटरेस्ट ॲन्ड लॅण्ड ट्रान्सफर ॲक्ट, १९१७, छोटा नागपूर टेनन्सी ॲक्ट १९०८, आसाम रेग्युलेशन पाच १८७३ आणि रेग्युलेशन एफ १८८६ इत्यादी. परंतु ब्रिटिश सरकारच्या या कायद्यांनी आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण थांबले नाही. त्यासाठी पुढे मग भारतातील वेगवेगळ्या राज्यांनी आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी त्यांच्या जमिनीचे संरक्षण करणारे कायदे केले.

## ४. आदिवासी जमीन विकासातील पंचवार्षिक योजनांचे योगदान :-

आदिवासी लोकांचे जमिनीवरील कायदेशीर मालकी हक्क निश्चित करून केवळ भागणार नाही. तर त्यांच्या जमिनीचा आधुनिक विकास साधला गेला पाहिजे, तरच त्यांचे आर्थिक प्रश्न सुटू शकतील. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी निश्चित शासकीय ध्येयधोरणाच्या अंमलबजावणीवर भर देण्यात आला. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच वन्य जमातींच्या ज्वलंत प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. जंगल संपत्तीचे नुकसान टाळण्यासाठी त्यांच्या स्थानपरिवर्तीत शेतीपध्दतीवर बंदी करण्यात आली. चौथ्या व पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये आदिवासींच्या विशेष क्षेत्रांचा विकास करण्यासाठी उपविकास खंड आरंभ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजने अंतर्गत Tribal Development Agency (TDA) बरोबरच Hill Area Development Agency (HADA) योजनाही राबविण्यात आली. आंध्र प्रदेशातील श्राकांकूलम, बिहारमधील सिंहभूम, दांतेवाडा, मध्यप्रदेशातील बस्तर अशा जवळजवळ आठ ठिकाणी अधिक लोकसंख्या असलेल्या भागात ही योजना सुरू करण्यात आली. पहाडी प्रक्षेत्र विकास योजना (Hill Development Agency) ही योजना उत्तर प्रदेशातील गढवाल व मणिपूर या केंद्रशासित राज्यात सुरू करण्यात आली.

आदिवासींच्या स्थीर शेती विकासावर विशेष भर देण्यात आला. जंगलपट्ट्यातील डोंगर उतारावरील अधिकाधिक जमिनी मोठ्या प्रमाणावर लागवडीखाली आणण्यासाठी त्यांचे सपाटीकरण व बांधबंदिस्ती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शेतीला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करता यावा यासाटी लहान-मोठे जलाशये, तलाव, विहिरी, पाटबंधारे, कालवे, नालाबंदी यासारख्या अनेक योजना राबविण्यात आल्या. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाच्या योजनांतून आदिवासींना विद्युत मोटारपंप, ऑईल इंजिन व

पाईप लाईन यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले. अन्नधान्यांच्या उत्पादनासाठी पारंपारिक पीकांच्या जातींबरोबरच संकरित अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जातींची लागवड करण्यासाठी मार्गदर्शन व अर्थसाहाय्य करण्यात आले. तेलबिया, तंतू वनस्पती, फल वनस्पती, औषधी वनस्पती, जंगल वनस्पतींची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यासाठी आदिवासींना प्रोत्साहन देण्यात आले आहे. जमिनीतून अधिकाधिक उत्पादन घेण्यासाटी शेती संशोधन, तंत्रज्ञान, रासायनिक खते, बी-बियाणे, लागवडीच्या नव्या पध्दती इत्यादींचा उपयोग करण्यावर भर देण्यात आला. आदिवासी कृषी उत्पादीत मालाला योग्य भाव व बाजारपेठ मिळावी यासाठी शासन वेळोवेळी प्रयत्न करीत आहे. सहकारी खरेदी-विक्री संघ, बाजार समिती यांच्या प्रयत्नातून आदिवासींच्या उत्पादीत मालाला योग्य भाव दिला जावू लागला आहे.

### ५. आदिवासी जमीन विकासाचे राष्ट्रीय धोरण :-

आदिवासींच्या क्षेत्रात नापीक व पडिक असलेल्या जमिनी नांगरटीखाली आणल्या जात आहेत. जमिनीच्या कमाल मर्यादेपेक्षा ज्यांच्याकडे अधिक जमीन आहे अशांची वाढीव जमीन सरकार ताब्यात घेऊन भूमिहीन, अल्पभूधारक यांना भूदान व ग्रामदान या योजनेंतर्गत वाटप करत आहे. भारत सरकारच्या कृषी धोरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या जमीन विकासाच्या योजना आदिवासींसाठी राबविण्यात येत आहेत. भारताने १९९१ चे नवीन आर्थिक धोरण (जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण) स्वीकारल्यानंतर भारतीय संसदेत डिसेंबर १९९२ मध्ये जाहीर केलेले '१९९२ चे कृषी धोरण' आणि २८ जुलै २००० चे तत्कालीन कृषिमंत्री नितीशकुमार यांनी जाहीर केलेले नवीन वा वर्तमान राष्ट्रीय कृषी धोरण-२००० स्वीकारण्यात आले. या नव्या आर्थिक कृषी धोरणांतर्गत आदिवासी समाजाच्या जमिनीचा विकास करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. आदिवासींच्या जीवनातील सर्व प्रश्नांची सोडवणूक करून त्यांना सर्व बाजूंनी विकासाच्या प्रक्रियेमध्ये आणण्यासाठी आदिवासींचे जमीन विकास धोरण महत्त्वाचे ठरले आहे.

## (II) आदिवासी शैक्षणिक विकास धोरण :-

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी सरकारने निश्चित असे शैक्षणिक धोरण ठरविले आहे. आदिवासी हे प्रगत समाजापासून दूर अशा दुर्गम प्रदेशामध्ये वास्तव्य करत असल्यामुळे त्यांच्यामध्ये औपचारिक शिक्षणाचा फारसा प्रसार झालेला नाही. वसाहतवादाच्या काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रयत्नातून ईशान्य भारतातील नागा, भिझो, संथाल इत्यादी काही मोजक्याच जमातींमधून औपचारिक पाश्चात्य शिक्षणाला प्रारंभ झाला. तथापि, भारताच्या अन्य भौगोलिक प्रदेशांमध्ये वास्तव्य करणाऱ्या बहुसंख्य जमाती शिक्षणापासून वंचित राहिल्या. आदिवासी जमातींना तत्कालीन परिस्थितीमध्ये औपचारिक शिक्षण मिळाले नसले तरी त्या-त्या जमाती अनौपचारिक शिक्षण पध्दतीमुळे प्रतिकूल परिस्थितीमध्येही संघर्षमय जीवन जगत होत्या. अनौपचारिक शिक्षणातून आदिवासींच्या

कलात्मक क्षमतांचा विकास झालेला होता. शिकार, माझेमारी, पशुपालन, शेती, हस्तव्यवसायासंबंधीचे शिक्षण त्यांना त्यांच्या जमातींमधून अगदी सहज प्राप्त झालेले होते.

आदिवासी समाजाचा प्रगत समाजाशी संपर्क प्रस्थापित झाल्यानंतर त्यांच्या परंपरागत अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व कमी होत गेले. त्यामुळे त्यांच्या समाजातील उत्पादनाच्या आणि जीवन जगण्याच्या प्रारंभिक व्यवस्था कोलमडल्या. पुढे समाज बदलाच्या प्रक्रियेमध्ये नवीन औपचारिक शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले. परंतु विज्ञान, तंत्रज्ञानावर आधारित असे भौतिक शिक्षण दुर्गम प्रदेशांमध्ये वास्तव्य करणाऱ्या आदिवासींना मिळू शकले नाही. अशा परिस्थितीमध्ये ब्रिटिश आणि ब्रिटिशोत्तर कालखंडामध्ये औपचारिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर भर देण्यात आला. ब्रिटिश कालखंडामध्ये ईस्ट इंडिया कंपनीने कारकुनी शिक्षणाला सन १८१३ मध्ये सुरुवात केली. पुढे १९ जुलै, १८५४ **वुडच्या** खलीत्यानुसार उपयुक्त आणि व्यवहारोपयोगी शिक्षण देण्यास सुरुवात झाली. त्याला 'शिक्षणाची महान सनद' म्हटले जाते. १८८२ मध्ये **'विल्यम इंटर कमिशन'**ने भारतातील प्रत्येक प्रांताचे निरीक्षण करून खालच्या वर्गांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न केला. वसाहतवादाच्या काळात पाश्चात्य भौतिक शिक्षणाला प्रारंभ झाला असला तरी आदिवासी समाजापर्यंत पोहोचायला त्याला खूप वेळ लागला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आदिवासी शिक्षणाच्या विकासावर विशेष भर देण्यात आला. जनगणना २००१ च्या भारताच्या एकूण ७५.२६ टक्के साक्षरतेची आदिवासींच्या ४७.१० टक्के साक्षरतेशी तुलना करता आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. आदिवासींमधील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी भारत सरकारने विविध शैक्षणिक ध्येयधोरणांची व विकासकार्यक्रमांची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्याचा प्रयत्न केला आहे.

## (अ) भारतीय राज्यघटनेतील तरतूद :–

भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे आणि जनतेला दिलेल्या मूलभूत अधिकारात शिक्षणविषयक अनेक तरतूदी केल्या आहेत. घटनेचे कलम ४५ नुसार १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची सरकारने व्यवस्था केली आहे. घटनेचे कलम ४६ नुसार समाजातील दुर्बल व मागासलेल्या जमातींना निरनिराळ्या सवलती देवून त्यांना सुशिक्षित करण्याचा प्रयत्न करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध सुरक्षित राहतील व त्यांचे कोणत्याच प्रकारचे शोषण होणार नाही याची काळजी घेण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारे घटनात्मक अधिकाराच्या आधारे आदिवासींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला जाऊ लागला आहे.

## (ब) पंचवार्षिक योजना :–

पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रथम पंचवार्षिक योजनेत ४००० शाळा सुरू करून शिक्षणावर ५.१० कोटी रुपये

खर्च करण्यात आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतून शिक्षणावर ७.८४ कोटी रुपये खर्च करून ३१८७ शाळा व वसतिगृहे सुरू करण्यात आली. तिसऱ्या योजनेमध्ये १३.५१ कोटी रुपये खर्च करण्यात आले. ४८९ बहुउद्देशीय विकास खंडातून शिक्षणाचा प्रसार, वसतिगृहे, शिष्यवृत्ती इत्यादी कार्यक्रम राबविण्यात आले. वार्षिक योजना १९६८-६९ ह्या आर्थिक वर्षात शिक्षणावर ९.३२ कोटी रुपये खर्च करण्यात आले. चौथ्या योजनेमध्ये (Tribal Development Agency-TDA) योजनेच्या आधारे आदिवासींच्या शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे. अशा प्रकारे प्रत्येक पंचवाषिक योजनेअंतर्गत आदिवासींच्या शिक्षण प्रसारासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## (क) आदिवासींच्या शैक्षणिक विकासाच्या योजना :-

भारत सरकारने आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी विविध प्रकारच्या विकास योजनांच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. घटनेचे कलम ४५ आणि ४६ नुसार आदिवासींना शैक्षणिक सेवासंधींची उपलब्धता करून देण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासींना शिक्षण अगदी सहजपणे घेता यावे यासाठी त्यांच्या प्रदेशांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. शैक्षणिक प्रसार, प्रोत्साहन आणि अर्थसाहाय्याच्या आधारे त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. अशा शैक्षणिक विकास योजनांमध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव होतो.

### १. शैक्षणिक सवलती :-

आदिवासी जमातींच्या मुलांना शैक्षणिक सवलती देऊन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामध्ये मोफत व सक्तीचे शिक्षण, विद्यावेतन, शिष्यवृत्त्या, पुस्तके व स्टेशनरी यांचा पुरवठा गरजू आदिवासींच्या मुला-मुलींना केला जातो. प्राथमिक, माध्यमिक, उच्च-माध्यमिक तसेच उच्च शिक्षण घेण्यासाठी मुलांना शैक्षणिक फी सवलत देण्यात आली आहे. आदिवासी मुलांच्या सोयी लक्षात घेऊन त्यांच्या प्रदेशामध्ये शैक्षणिक संस्थांबरोबरच त्यांनी शिक्षण घ्यावे यासाठी विशेष सवलती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

### २. शिष्यवृत्ती योजना :-

आदिवासी जमातीतील गरजू विद्यार्थ्यांना 'मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तींची योजना' बहुतेक भारतातील सर्व राज्यांमध्ये राबविली जात आहे. या योजनेतून गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके, स्टेशनरी, पोषाख, दुपारचे जेवण इत्यादी गोष्टी पुरविल्या जातात. मॅट्रिकनंतर आदिवासींच्या मुलांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी 'शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना' भारत सरकारने सुरू केला आहे. या योजनेअंतर्गत शिक्षण क्रमांची वर्गवारी करून वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या व बहिष्कार (अनिवासी) विद्यार्थ्यांकरीता दरमहा (१० महिने) विद्यावेतनाची सोय करण्यात आली आहे. आदिवासी मुलांना पदव्युत्तर शिक्षण परदेशात जाऊन

घेता यावे यासाठी 'परदेशातील अभ्यासक्रमासाठीची शिष्यवृत्ती' ही योजना सुरू करण्यात आली आहे. या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन स्थापत्यशास्त्र, तंत्रविद्या, वैधकशास्त्र, शेती व विज्ञाने हे अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिवाय विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढीला लावण्याचाही प्रयत्न करण्यात आला आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या अभ्यासक्रमांतर्गत गुणवत्ता सिध्द करणाऱ्या आदिवासी मुलांना 'गुणवत्ता शिष्यवृत्ती' भारत सरकार देते. गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या मान्य वसतिगृहात्मक शालेत शिक्षणासाठी जाता येते. भारत सरकारच्या मंत्रालयाने केलेल्या योजनेनुसार एकूण शिष्यवृत्त्यांच्या १०% शिष्यवृत्त्या मागास जाती व जमातीच्या मुलांसाठी राखीव असतात. यामध्ये ७.५ टक्के मागासलेल्या जातींना तर २.५ टक्के वर्गीकृत जमातींना दिल्या जातात. अशाप्रकारे वेगवेगळ्या स्तरांवर शिष्यवृत्ती योजना आदिवासींच्या विद्यार्थ्यांना सुरु करून त्यांचा शैक्षणिक विकास करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## ३. आश्रमशाळा :-

डोंगर, दऱ्याखोऱ्यात व झाडाझुडपांच्या दुर्गम अशा प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या आदिवासी जमातींच्या मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी आश्रमशाळांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दुर्गम व डोंगराळ प्रदेशात वास्तव्य असलेल्या आदिवासींच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने १९७२-७३ पासून 'शासकीय आश्रमशाळा समूह योजना' राबविण्यात येत आहे. या शाळात आदिवासी विद्यार्थ्यांच्या इयत्ता १० वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी काही सेवाभावी संस्था कार्य करत आहेत. अशा स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यासाठी अर्थसाहाय्य दिले जाते. १९५३-५४ पासून स्वेच्छा-संस्थांच्या आश्रमशाळांना अनुदान देण्याची योजना राबविण्यात येत आहे. आदिवासी हुशार व होतकरू विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण त्यांच्यापासून दूर असलेल्या चांगल्या शिक्षणसंस्थांमधून व्हावे त्यासाठी शासकीय वसतिगृहांची सोय करण्यात आली आहे. अशा वसतिगृहांमध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. शिवाय त्यांना निवास, भोजन आणि इतर शैक्षणिक साहित्य मोफत पुरविण्यात येते. अशा प्रकारे आदिवासी मुलांना आश्रमशाळा आणि वसतिगृहांची सोय उपलब्ध करून दिली जाते. परिणामी त्यांना शैक्षणिक विकास साधता येईल याकडे लक्ष पुरविण्यात आले आहे.

## ४. शैक्षणिक शासकीय अर्थसाहाय्य योजना :-

आदिवासी मुलांना मोफत शिक्षण मिळावे यासाठी शासन सतत प्रयत्न करत आहे. काही आदिवासी मुलांना उत्पन्न मर्यादेमुळे भारत सरकार शिष्यवृत्तीसारख्या योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराने मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची शिक्षण संस्थेस प्रतिपूर्ती करण्यात येते. उच्च

व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वसाधारण शिक्षणक्रमापेक्षा जास्त खर्च येतो. त्यामुळे बरेच विद्यार्थी खर्चिक व्यावसायिक शिक्षणक्रम निवडत नाहीत किंवा आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने मध्येच सोडून देतात. याकरिता आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या इतर आर्थिक सवलतीशिवाय व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणाऱ्या जादा खर्चाची तोंडमिळवणी करता यावी यासाठी त्यांना निर्वाहभत्ता देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सध्या तांत्रिक शिक्षण घेणाऱ्यांना नोकरी व स्वयंरोजगारास मोठा वाव आहे. यासाठी आदिवासी मुलांनीही या तांत्रिक शिक्षणाकडे वळावे यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना सुरू करण्यात आली आहे. अशा प्रकारे आदिवासी मुलांना सर्वसाधारण शिक्षणाबरोबरच तांत्रिक, व्यावसायिक व औद्योगिक शिक्षण घेऊन नोकरी किंवा स्वयंरोजगार करता यावा यासाठी शासनाकडून अर्थसहाय्य केले जाते.

## ५. स्पर्धा परीक्षापूर्व मार्गदर्शन :-

महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी करता यावी यासाठी त्या-त्या परीक्षांचा अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षांचे स्वरूप व त्यासाठी आवश्यक पात्रता इत्यादीबाबत प्रशिक्षणाद्वारे माहिती दिली जाते. या योजने अंतर्गत मोफत निवास व भोजन पुरविण्यात येते व प्रशिक्षणाचा खर्च शासनाकडून करण्यात येते. असे प्रशिक्षण महाराष्ट्रातील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था द्वारा पूर्ण दिले जाते. केंद्रिय लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धात्मक परीक्षांसाठी आदिवासी जमातींच्या विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करून घेण्यासाठी अलाहबाद, जयपूर, मद्रास, पटियाला, शिलाँग, दिल्ली येथे प्रशिक्षण मार्गदर्शन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. प्रादेशिक स्तरावरसुध्दा अनेक राज्यांनी अशी केंद्रे उघडली आहेत. विद्यार्थ्यांना मुलाखत आणि परीक्षेसंबंधी माहिती देण्यासाठी दिल्ली, कानपूर, जबलपूर, मद्रास, नागपूर इत्यादी ठिकाणी केंद्रे सुरू केली आहेत. त्याचबरोबर विद्यापीठांमधून अशी केंद्रे स्थापन केली आहेत.

केंद्रिय आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारा घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांबरोबरच पोलीस आणि लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण योजनाही आदिवासी तरुणांसाठी राबविण्यात येते. सैन्यदल, राज्यातील पोलीस दल, राखीव पोलीस दल, औद्योगिक सुरक्षा दल व इतर संरक्षण दले इत्यादींमध्ये अनुसूचित जमातींच्या उमेदवारांचा मोठा प्रमाणावर अनुशेष आहे. आदिवासी तरुण काटक, साहसी व शारीरिकदृष्ट्या सक्षम असल्यामुळे त्यांना अशा संरक्षण दलांमध्ये सेवेच्या मोठ्या संधी आहेत. या सर्व प्रकारच्या संधींचा त्यांना लाभ घेता यावा यासाठी त्यांना भरतीपूर्व प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्रात अकोला, नाशिक, नंदूरबार, धामणी, किनवट, गडचिरोली, देवरी, जव्हार, आंबेगाव

अशा ९ ठिकाणी ही केंद्रे कार्यरत आहेत. अशाप्रकारे आदिवासी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षापूर्व मार्गदर्शन केंद्रांद्वारे योग्य प्रशिक्षण देवून केंद्र आणि राज्य शासनातील विविध अधिकारांच्या पदांवरील सेवा संधींची उपलब्धता करून दिली जाते.

### ६. शैक्षणिक संस्थांमधील आरक्षणे :-

अनुसूचित जमातींच्या मुलांना तांत्रिक शिक्षण संस्थांमधून घटनात्मक तरतूदीप्रमाणे काही आरक्षणे निश्चित करण्यात आली आहेत. मागासलेल्या वर्गांसाठी नेमलेल्या आयोगाने तर ७०% आरक्षण मागासलेल्या जातीतील उत्तम विद्यार्थ्यांकरिता ठेवण्यात यावे अशी शिफारस केली होती. तथापि, यासंदर्भात प्रत्येक राज्य सरकारांचा दृष्टिकोण वेगळा आहे. २८ सप्टेंबर, १९६३ रोजी एक परिपत्रक काढून शिक्षण मंत्रालयाने राज्यसरकारे आणि केंद्रशासित प्रदेश त्याचप्रमाणे विश्वविद्यालये यांना खालील सूचना केल्या आहेत.

अ) तांत्रिक शिक्षण संस्थांमध्ये २०% जागा वर्गीकृत जाती व जमातींच्यासाठी राखीव ठेवाव्यात. यापैकी १५% जागा वर्गीकृत जातीसाठी तर ५% जागा वर्गीकृत जमातींसाठी ठेवाव्यात. या विशिष्ट जातीतून अगर जमातीतून विद्यार्थी मिळू शकले नाहीत तर या जागांची वर्गीकृत जाती व जमाती यांच्यामध्ये अदलाबदल करावी.

ब) ज्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी टक्केवारीची अट असते, अशा संस्थांमध्ये वर्गीकृत जमातीच्या उमेदवारांना ५% कमी मार्कांची सवलत असावी. मात्र पास होण्यासाठी आवश्यक तेवढे किमान मार्ग असणे गरजेचे आहे.

क) ज्या संस्थांमध्ये वयाची अट असते त्या ठिकाणी आदिवासी विद्यार्थ्यांना तीन वर्षे किमान वयापेक्षा अधिक वय असले तरी, प्रवेश मिळण्याची सवलत द्यावी.

ड) प्रत्येक तांत्रिक शिक्षण संस्थेमध्ये किमान मार्गाची अट घातलेली असावी. परंतु वर्गीकृत जाती व जमातींच्या विद्यार्थ्यांना किमान मार्क मिळाले की प्रवेश मिळावा. अशा प्रकारे अनुसूचित जाती-जमातींच्या मुलांना तांत्रिक शिक्षण संस्थांमधून शिक्षण घेण्यासाठी आवश्यक तेवढी गुणवत्तेमध्ये सवलत देण्यात आली आहे.

## (ड) आदिवासींची भाषा, संस्कृती आणि शिक्षण :-

१९६१ च्या जनगणनापत्रिकेमध्ये भारतीय संघराज्यांमधील १६५२ भाषांची नोंद आहे. १६५२ मातृभाषांपैकी केवळ ४७ भाषाच शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकारल्या गेल्या आहेत. तर उच्च शिक्षणाकरिता १६ प्रमुख भाषांना शिक्षणाचे माध्यम म्हणून मान्यता मिळाली आहे. बहुतेक भाषिक

अल्पसंख्यांकांना बहुधा प्रांतीय, राष्ट्रीय (हिंदी) वा आंतरराष्ट्रीय (इंग्रजी) भाषांमधून शिकवले जाते. आजचे औपचारिक शिक्षण हे हिंदी वा इंग्रजी भाषा माध्यमांद्वारे देण्यावर विशेष भर दिला जावू लागला आहे. तर बरीच राज्ये प्रांतीय भाषा शिकण्याची सक्ती करत आहेत. या पार्श्वभूमीच्या आधारे संविधानातील सातव्या सुधारणेसाठी अधिनियम १९५६ अन्वये ३५० चा अ कलम स्वीकारले गेले. ते म्हणजे प्रत्येक राज्य आणि राज्यातील सर्व स्थानिक अधिकाऱ्यांचे हे कर्तव्य आहे की, प्राथमिक स्तरावर भाषिक अल्पसंख्यांकांच्या मुलांना शिक्षण देताना मातृभाषेत ते मिळावे. यासाठी पुरेशा सोयी देण्यात याव्यात आणि कलम ३५० चा ब हा राष्ट्राध्यक्षांना विशेष अधिकाऱ्याची नेमणूक करण्याचा अधिकार प्रदान करतो. हा अधिकारी ज्या भाषिक अल्पसंख्यांकासाठी असेल व तो त्यांना देण्यात आलेल्या सर्व सुरक्षिततेसंबंधी चौकशी करेल. अशा प्रकारे आदिवासींच्या मुलांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देण्याची सक्ती करण्यात आली आहे. मातृभाषेतून शिक्षण दिल्याने त्यांच्या संस्कृतीचे सहज आकलन होण्यास मदत होते. म्हणून प्राथमिक स्तरावर आदिवासी मुलांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देवून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आदिवासी मुलांना त्यांच्या भाषेतून त्यांचीया अवतीभोवती असणाऱ्या व घडणाऱ्या घटनांची प्रत्यक्षात माहिती करून देण्यावर भर दिला जातो. आदिवासींच्या प्रथा, परंपरा, रूढी, विश्वास, मूल्ये तसेच अवतीभोवतीचे डोंगर, पर्वत, झाडे, नद्यानाले, वनस्पती, प्राणी-पक्षी इत्यादी बाह्य नैसर्गिक गोष्टींची माहिती त्यांच्या मातृभाषेतून आदिवासी मुलांना दिली तर त्या मुलांमध्ये शिक्षणाची आवड व गोडी निर्माण होते. म्हणजेच आदिवासींना त्यांच्या मूर्त व अमूर्त संस्कृतीचे धडे त्यांच्या मातृभाषेतून देऊन त्यांचा शैक्षणिक विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## (इ) आदिवासी शिक्षकांची नेमणूक :-

१९६१ च्या ढेबर आयोगाने आदिवासी भागातील शिक्षकांच्या गुणवत्तेवर विशेष भर दिला होता. आदिवासी लोकांच्या दृष्टीने शिक्षक हे मित्र आणि मार्गदर्शक असतात. आदिवासी भागातील शिक्षकांना आदिवासी जीवन आणि आदिवासी संस्कृतीबद्दल उत्तम माहिती असणे आवश्यक आहे आणि त्यांना आदिवासींची बोलीभाषा आली पाहिजे असे आयोगाचे मत होते. आदिवासी समाजातील तरुणांना शिक्षक नेमल्याने शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील सामाजिक-सांस्कृतिक दरी कमी होईल. परिणाम आदिवासी मुलांना प्राथमिक स्तरावर शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये आणून त्यांचा शैक्षणिक विकास साधण्याचाच तो एक प्रयत्न म्हणावा लागेल. आदिवासी मुलांच्या सामाजिक-सांस्कृतिक साहाय्य अशी आदिवासी शिक्षकांच्या नेमणूका करून आदिवासी मुलांना त्यांच्या मातृभाषेत अभ्यासविषयाची ओळख करून देण्यावर भर देण्यात आला. अर्थातच अशा प्रकारे आदिवासी लोकांचा शैक्षणिक विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### (ई) शैक्षणिक धोरण आणि आयोग :-

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय समाजाचा शैक्षणिक विकास करण्यावर विशेष भर देण्यात आला. अनेक विधायक, शैक्षणिक ध्येयधोरणाची आखणी व अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामध्ये ४ नोव्हेंबर, १९४८ साली राधाकृष्णन आयोग, २३ सप्टेंबर १९५२ साली मुदलियार आयोग, १९६४ चा डॉ. कोठारी आयोग नेमण्यात आले व त्या आयोगांनी केलेल्या शिफारशी अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पुढे १९६८ चे १९९२ चे शैक्षणिक धोरण आणि सॅम पिट्रोडा यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय ज्ञान आयोगाने जानेवारी २००७ साली पंतप्रधानांना सादर केलेल्या शिक्षणासंबंधीच्या काही शिफारशी यांच्या अंमलबजावणीवर भर देण्यात आला. अशा प्रकारे विविध शैक्षणिक आयोग आणि धोरण राबवून आदिवासी समाजासकट संपूर्ण भारतीय समाजाचा शैक्षणिक विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

थोडक्यात, आदिवासी समाजाचा शैक्षणिक विकास करण्यासाठी राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा अंतर्भाव होतो. त्यामध्ये प्रामुख्याने घटनात्मक तरतुदी, पंचवार्षिक योजना, आदिवासींचे शिक्षणविषयक धोरण, आदिवासींची भाषा, संस्कृती आणि शिक्षण, आदिवासी शिक्षकांची भूमिका तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि आयोग इत्यादीचा आदिवासींच्या शैक्षणिक विकासात सिंहाचा वाटा आहे.

## (III) आदिवासी आरोग्य विकास धोरण :-
## (Tribal Health Development Policies) :-

भारतातील आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्येने गंभीर स्वरूप धारण केलेले दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या परंपरागत धार्मिक श्रध्दा व विश्वास, आदिवासी समाजातील अपुरी वैद्यकीय मदत हे होय. आदिवासीमध्ये स्वच्छतेचा आणि मुबलक सफर आहार यांचा अभाव आहे. अनेक आदिवासी कुटुंबे पावसाळ्यामध्ये झाडाचा पाला, कंदमुळे, रानभाज्या, आंबील किंवा **घाटा** खाऊन दिवस काढतात. शेतीतून वर्षभरासाठी पुरेल इतके अन्नधान्यांचे उत्पादन त्यांना घेता येत नाही. अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे पुरेसे अन्न त्यांना मिळत नाही. अपुऱ्या आहारातून योग्य जीवनसत्त्वे न मिळाल्यामुळे पोटाचे, त्वचेचे, डोळ्याचे अनेक विकास त्यांना जडतात. ताड, मोह व तांदळापासून बनविलेल्या दारूचा वापर आदिवासी मोठ्या प्रमाणावर करतात. या दारूपासून त्यांना 'ब' व 'क' ही जीवनसत्त्वे मिळतात. परंतु सध्या अशा दारूवर शासनाने कायदेशीर बंदी घातल्यामुळे ते देशी व विदेशी दारूचे सेवन करतात. या दारूच्या अतिसेवनाने आदिवासींच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम झाले आहेत. आदिवासी क्षेत्रातील शुध्द आणि मुबलक पाण्याच्या अभावामुळे कावीळ, नारू, कॉलरा यासारखे भयंकर रोग आदिवासी लोकांना होतात. आदिवासी लोक अंगावरील कपडे आणि शारीरिक स्वच्छतेबाबत खूप उदासीन आहे. रोज अंघोळ करून स्वच्छ कपड्यांचा वापर करणे ते टाळतात. प्रगतांच्या संपर्काने अर्धनग्न पेहराव करणारे आदिवासी अंगभर वस्त्र वापरू लागले. परंतु पुरेशा कपड्यांच्या अभावामुळे

कपड्यांची स्वच्छता राखली जात नसल्यामुळे त्यांना त्वचेचे विकार जडले आहेत. आदिवासी समाजातील अनिष्ट प्रथांमुळेही त्यांच्यात आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. देवी, गोवर, कावीळ यासारखे रोग मांत्रिकांच्या मंत्रोपचाराने बरे होतात, अशी चुकीची समजूत त्यांच्यात रूढ आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आदिवासींच्या दुर्गम क्षेत्रांमध्ये वैद्यकीय सेवांचा मोठा वाणवा आहे. वैद्यकीय अधिकारी सेवाभावी दृष्टिकोणातून दुर्गम प्रदेशातील आदिवासींना आरोग्यविषयक सेवा देण्यास तयार नाहीत. त्यामुळेही त्यांच्यामध्ये अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आदिवासींच्या आरोग्य सुधारणेवर भर देण्यात आला. राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील आरोग्यविषयक कार्यक्रमातून आदिवासींना आरोग्य सुरक्षेच्या दृष्टिकोणातून सेवा दिल्या जाऊ लागल्या आहेत. कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही त्या राष्ट्रातील लोकांच्या निकोप आरोग्यावर अवलंबून असते. व्यक्ती आणि समाज निकोप व सुदृढ असेल तरच राष्ट्राचा सर्वांगीण विकास शक्य आहे. हा उदात्त विचार डोळ्यासमोर ठेवून भारतातील सर्व क्षेत्रातील लोकांना योग्य आरोग्याच्या सुविधा शासकीय स्तरावर आणि अशासकीय स्तरावरही पुरविण्याचा प्रयत्न केला जाऊ लागला आहे. अशा प्रयत्नातून वेगवेगळ्या गंभीर रोगांचे प्रमाण कमी करून सर्वांना निरोगी आरोग्य बहाल करून देण्याचा प्रयत्न केला जाऊ लागला आहे.

## (अ) आरोग्यासंबंधी घटनात्मक तरतूद :–

भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वात व विविध कलमात सार्वजनिक आरोग्याचा उल्लेख करण्यात आला आहे. भारतातील सर्वच नागरिकांचे आरोग्य सुधारावे यासाठी लोकांना पौष्टिक अन्नपुरवठा करणे, नागरिकांचे स्वास्थ्य सुधारणेसाठी दारू व अन्य प्रकारच्या मादक पेयांवर बंदी घालणे. कलम ४७ मध्ये भारतीय जनतेचे जीवनमान उंचावणे, त्यांचे सुपोषण साधावे व एकूणच सार्वजनिक आरोग्य सुधारणे यावर भर देण्यात आला आहे. या आरोग्य विषयक घटनात्मक मार्गदर्शक तत्वानुसार आदिवासींच्या आरोग्य सुधारणेवर विशेष भर दिला जात आहे.

## (ब) पंचवार्षिक योजना :–

पंचवार्षिक योजने अंतर्गत बहुतेक राज्यांमधून आदिवासींना वैद्यकीय मदत देण्याचे व त्यांच्या विभागातील सार्वजनिक स्वास्थ्य सुधारणेचे प्रयत्न केले जात आहेत. आदिवासी विभागामध्ये पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न असतो. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच आदिवासी विभागात पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचप्रमाणे आदिवासी विभागामध्ये औषधालये व दवाखाने यांच्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. फिरती स्वास्थ्य संरक्षक पथके आदिवासी लोकांना वैद्यकीय मदत व मोफत औषधे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करतात. आदिवासी विभागांमध्ये ग्रामीण आरोग्य केंद्रांची सुरुवात करून आदिवासींच्या वेगवेगळ्या रोगांवर उपचार व घ्यावयाच्या

काळजीसंदर्भात मार्गदर्शन करण्यावर भर दिला जात आहे. लहान-मोठे दवाखाने, औषधांची उपलब्धता, गंभीर रोगासंबंधी जनजागृती व प्रबोधन त्याचबरोबर परिचारिका व वैद्यकीय अधिकारी यांची उपलब्धता करून आदिवासींचे आरोग्य सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## (क) आरोग्य विकास कार्यक्रम :-

शासनाच्या आदिवासी विकास योजनेतून अनेक आरोग्य सेवा आदिवासींच्यासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, फिरती आरोग्य पथके, कुटीर रुग्णालयांच्या सुविधात वाढ, आदिवासी विद्यार्थ्यांना शुश्रुषा, क्ष-किरण व प्रयोगशाळा यांचे खास प्रशिक्षण देणे, खरूज, हागवण ह्या रोगांचे निर्मूलन करणे, ग्रामीण फिरत्या दवाखान्यांची स्थापना करणे, आश्रमशाळांमधील मुलांच्या आरोग्याची तपासणी करणे, हिवताप निर्मूलन इत्यादी आरोग्यविषयक कार्य सुरू करण्यात आले आहेत. याशिवाय जे आदिवासी बिगर आदिवासी समाजात विखुरलेले आहेत, त्यांनाही आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जातो. माता-बालसंगोपन आणि कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविण्यावर भर दिला जातो. तसेच हिवताप निर्मूलन, हत्तीरोग, कुष्ठरोग, क्षयरोग, कर्करोग निर्मूलनावर भर देण्यात येतो.

## (ड) कुपोषणामुळे उद्‌भवणाऱ्या रोगांचे नियंत्रण :-

आदिवासी समाजामध्ये कुपोषणामुळे अनेक रोग उद्‌भवतात. ५ वर्षांच्या आतील लहान मुलांना खोकला, ताप, दमा, जंत, कावीळ, मुरडूस, खरूज यासारखे रोग होतात. स्त्री व पुरुषांना हिवताप, रक्तक्षय, हगवण, न्युमोनिआ, क्षय, पाठीच्या कण्याची दुखणी, उलट्या, जुलाब, पोटाचे विकार यासारखे अनेक आजार जडतात. या आजारांवर तत्काळ उपाय झाले नाहीत तर अनेकांना प्राण गमवावे लागतात. लहान मुलांमध्ये हे प्रमाण अधिक आहे. भारतातील अनेक जमातींमध्ये आणि महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा विभागातील अनेक जमातींमध्ये कुपोषणामुळे अनेक रोगांना निर्माण झालेल्या आदिवासींना सामना करावा लागत आहे. या कुपोषणामुळे निर्माण झालेल्या अनेक आजारांचे नियंत्रण करण्यासाठी भारत सरकारने कुपोषण समस्या सोडविण्यासाठी शासकीय योजना सुरू केल्या आहेत. 'आप्लाईड न्युट्रिशन प्रोग्रॅम' अंतर्गत भारत सरकारने युनिसेफ, डब्ल्यू. एच. ओ. व एफ.ए.ओ. यांच्या सहकार्याने गरोदर स्त्रिया, स्तनपान देणाऱ्या स्त्रिया व लहान मुले यांच्या आहाराचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. 'मिड-डे-मिल' १९६२-६३ पासून सुरू झालेल्या या योजनेद्वारे प्राथमिक शाळेतील मुलांना मधल्या वेळेत दूध, सुकडी, चिक्की यासारखा पूरक आहार दिला जातो. १९६२ मध्ये गळ्याचे विकार थांबविण्यासाठी ग्वायटर रोगप्रतिबंधक योजना सुरू करण्यात आली. त्याद्‌वारे आयोडिनयुक्त मीठ पुरविण्यात येते. स्पेशल न्युट्रिशन प्रोग्रॅम द्‌वारा आठ महिने ते तीन वर्षापर्यंतच्या मुलांच्या आहाराकडे विशेष लक्ष दिले जाते.

## (इ) बाल मृत्यू आणि माता मृत्यू नियंत्रण कार्यक्रम :-

काही आदिवासी समाजामध्ये कुपोषणाच्या समस्येमुळे बाल-माता मृत्यूंचे प्रमाण अधिक पहायला मिळते. महाराष्ट्रातील अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, बुलढाणा, नागपूर इत्यादी जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाजांमध्ये ही समस्या विशेषत्वाने पहायला मिळते. बाल-माता मृत्यूदर कमी करण्यासाठी विशेष स्वरूपाच्या आरोग्य योजना सुरू करण्यात आल्या आहेत.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत (ITDP) नाशिक, ठाणे, नंदूरबार, अमरावती, गडचिरोली व नांदेड या जिल्ह्यांमध्ये बाल मृत्यू कमी करण्यासाठी अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. या योजनांमध्ये मानद वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका करणे, बालरोग तज्ज्ञांची नेमणूक करणे, मातृत्व अनुदान योजना, प्राथमिक आरोग्य केंद्रांना नवीन वाहणे पुरविणे, प्राथमिक केंद्रांचे अनुदान वाढविणे, आरोग्य केंद्रातील उपकरणे वाढविणे, दाई बैठक योजना, बालकांसाठी अतिदक्षता विभाग (ICU) सुरू करणे इत्यादी योजनांचा समावेश होतो. अशा प्रकारे आदिवासी समाजातील अनेक आरोग्य सेवा योजनांच्याद्वारे बालमृत्यू व मातामृत्यू कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या वेगवेगळ्या योजनांबरोबरच महाराष्ट्रामध्ये नवसंजीवन योजना इ.स. १९९५-९६ मध्ये सुरू झाली. ज्या आदिवासी भागामध्ये गॅस्ट्रो, कॉलरा, कावीळ यांचे प्रमाण अधिक आहे, जेथे पावसाळ्यामध्ये दळणवळणाची गैरसोय आहे, ज्या भागात सार्वजनिक वितरण व्यवस्था अस्तित्वात नाही, जेथे बालमृत्यूचे प्रमाण अधिक आहे, अशा ठिकाणी ही नवसंजिवनी योजना सुरू केली जाते. या योजनेतून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका करणे, ग्रामीण आरोग्यसेवा संस्थांना पुरेशी औषधे व साधनसामग्री पुरविणे, ग्रामीण आरोग्यकेंद्रे, आरोग्य केंद्रांची वाहने यांची काळजी घेणे, पाण्याची तपासणी करणे, बालवाडीतील मुलांची आरोग्य तपासणी वेळोवेळी करणे, जास्त संवेदनशील भागात बालरोगतज्ज्ञांची नेमणूक करणे, विशेष कृती योजना व लसीकरण कार्यक्रम हाती घेणे इत्यादी वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात.

## (ई) आदिवासी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी कार्यक्रम :-

शालेय आरोग्य कार्यक्रमांतगृत शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वेळोवेळी केली जाते. अशी आरोग्य तपासणी करून मुलांमध्ये क्षय, कुष्ठरोग यासारख्या रोगांचा प्रादुर्भाव आहे काय, हे पाहिले जाते. कान, नाक, घसा, दात, त्वचा या संबंधात तपासणी करून त्यांच्यातील दोष शोधून काढून त्यावर औषधोपचार केले जातात. आदिवासी मुलांमध्ये रोगांचा फैलाव होऊ नये यासाठी पूर्ण प्रतिबंधात्मक लस टोचणी कार्यक्रम राबविला जातो. वैद्यकीय अधिकारी किंवा डॉक्टर्स शालेय भेटीतच मुलांमधील लहान आजारांवर उपचार करतात. मुलांमध्ये आजार अधिक वा गंभीर असेल तर त्यांना प्राथमिक आरोग्य पथके किंवा ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचारासाठी पाठविले जाते. अशा तऱ्हेने आदिवासी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांचे आरोग्य चांगले राखण्याचा प्रयत्न केला जातो.

## (ए) आरोग्यविषयक जाणीव-जागृती कार्यक्रम :-

आदिवासी मुख्य आदिवासी ग्रामीण आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे याद्वारा आदिवासी क्षेत्रांमध्ये आरोग्यविषयक जाणीव-जागृती कार्यक्रम राबविला जातो. चर्चासत्रे, शिबीरे, जाहिराती, रेडिओ, टि.व्ही. या प्रसार माध्यमांद्वारे आरोग्यविषयक माहिती, घ्यावयाची काळजी, करावयाचे उपचार यासंबंधी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष माहिती पुरविली जाते. आदिवासींच्या विशिष्ट प्रदेशात नेमक्या कोणत्या कारणांनी विशिष्ट रोगांचा प्रादुर्भाव होतो याची माहिती-आदिवासी लोकांना दिली जाते. वेगवेगळ्या आदिवासी समाजांचे वेगवेगळे सामाजिक-सांस्कृतिक जीवन अनेक रोगांचे कारण कसे ठरते. यासंबंधी आदिवासींना तज्ज्ञ डॉक्टर्स माहिती देतात. आदिवासींच्या आहारामध्ये कोणकोणते अन्नघटक असले पाहिजेत, यासंबंधी त्यांना माहिती देऊन त्या अन्नघटकांच्या उपलब्धतेसंबंधी शासकीय स्तरावर प्रयत्न केले जातात. आदिवासी समाजामध्ये रोगांचे वाढते प्रमाण असण्याचे कारण म्हणजे अस्वच्छता होय. त्यासाठी आदिवासींना व्यक्तीगत, कौटुंबिक व ग्रामस्वच्छता ठेवण्याबाबत प्रबोधन करण्यावर भर दिला जात आहे. आदिवासींनी रोज अंघोळ करणे, धुतलेली स्वच्छ कपडे वापरणे, हातापायांची नखं काढणे, घरातील गायी-म्हैशींचा व शेळ्या-मेंढ्यांचा गोठा घराबाहेर स्वतंत्र ठिकाणी बांधणे, घरामध्ये कुठेही न थुंकणे, घरातील भांडी स्वच्छ करणे, घरातील पिण्याच्या भांड्यात हात न बुडवता पाणी घेण्यासाठी स्वतंत्र पेला वा वगराळे याचा वापर करणे, घरासभोवती स्वच्छता राखणे, विहिरी, तलाव, झरे या जलस्रोतांशेजारी स्वच्छता ठेवणे, गटारी, अंगण, रस्ते तसेच सार्वजनिक ठिकाणी केरकचरा होऊ न देणे इत्यादीसंबंधी स्वच्छता राखल्यास रोगराईचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. सध्या देश स्तरावर 'ग्रामस्वच्छता अभियान' हा उपक्रम राबविला जात आहे. परिणामी प्रदूषणाचे प्रमाण कमी होऊन रोगराईला आळा बसणे शक्य आहे.

अलिकडे आदिवासी उपयोजनेखाली कुटीर रुग्णालये कार्य करीत आहेत. त्यांच्यामार्फत आदिवासी लोकांना रोगोत्तर सेवेचा लाभ मिळतो. आदिवासी समाजात गुप्तरोग, एड्स, क्षयरोग ही आरोग्यविषयक समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. या रोगांना नियंत्रित करण्यासाठी प्रतिबंधात्मक व रोगोत्तर सेवा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. आदिवासी समाजात बहुसंख्य आजार किंवा रोग हे तेथील कुपोषणामुळे निर्माण होतात. त्यासाठी आदिवासींना जीवनसत्वयुक्त असा पौष्टिक आहार व औषधी गोळ्या यांचे वाटप करण्यात येत आहे.

## (ऐ) आदिवासी आरोग्य विकासासाठी सेवाभावी वृत्तीची गरज :-

आदिवासी आणि बिगर आदिवासी यांच्यातील तफावत दूर करून आदिवासींना विकासाच्या समान पातळीवर आणण्यासाठी आरोग्याच्या समानपातळीवर सेवा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. डोंगर, दऱ्याखोऱ्यात प्रगतांपासून दूर दुर्गम अशा प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या या आदिवासी लोकांच्या विकासासाठी आदिवासी उपाययोजनांसारख्या खास योजना राबविल्या जात आहेत. या सर्व योजनांचा फायदा

आदिवासींना व्हावा यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. आदिवासींना तत्काल आरोग्य सेवा मिळावी यासाठी त्यांच्या प्रदेशातील रस्ते व दळणवळणाच्या सोयी पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाल्या पाहिजेत. शासकीय रुग्णालयांबरोबरच स्वयसेवी संस्थांनी आदिवासींना आरोग्यविषयक सेवासुविधा पुरविण्यासाठी पुढे आले पाहिजे. बिगर सेवाभावी आदिवासींनी शासन चालवित असलेल्या आरोग्यविषयक सुधारणा कार्यक्रमाला उत्स्फूर्त सहभागी झाले पाहिजे. आदिवासी भागात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांनी आदिवासींना आरोग्य शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. त्यांना वैयक्तिक व सामाजिक स्वच्छतेबरोबरच प्राथमिक आरोग्याविषयी मार्गदर्शन केले पाहिजे. आदिवासी भागातील अगदी शेवटच्या रुग्णाला आरोग्यसेवेचा लाभ पुरविण्यासाठी स्वयंसेवकांनी पुढे आले पाहिजे. तरच आदिवासी समाजातील आरोग्यविकास साधता येणार आहे. आदिवासी समाजामध्ये शासनामार्फत चालविल्या जात असलेल्या आरोग्य शिक्षण, कुटुंब नियोजन, कुटुंब कल्याण या धोरणांच्या अंमलबजावणीवर विशेष भर देवून त्यांच्यातील आरोग्यविषयक प्रश्न दूर होवून त्यांचा आरोग्य विकास शक्य आहे.

थोडक्यात, आदिवासी हे प्रगत समाजापासून अलिप्त असे स्वतंत्र जीवन जगत असल्यामुळे त्यांना आधुनिक अशा आरोग्याच्या सेवासुविधांचा म्हणावा त्याप्रमाणात लाभ मिळत नाही. असे असले तरी आदिवासींमधील आरोग्यविषयक समस्या लक्षात घेऊन केंद्र आणि राज्य सरकारमार्फत अनेक आधुनिक उपचार पध्दतींचा वापर करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

## ३.३.३ आदिवासी विकासाचे अडथळे (Obstacles to the Tribal Development)

आदिवासी समाजाचा विकास अनेक पातळ्यांवर केला जात असला तरी आदिवासींच्या विकासाबाबत काही मतभेद आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासकीय तसेच निमशासकीय पातळीवर राबविल्या गेलेल्या सर्व विकास योजनांचा लाभ आदिवासीपर्यंत पोहोचलेला दिसून येत नाही. आदिवासींच्या डोंगर, पर्वत, दऱ्याखोऱ्यांचा दुर्गम असा भौगोलिक प्रदेश तसेच आदिवासींची नव्या बदलांना न स्वीकारण्याची मानसिकता हे खरं तर आदिवासी विकासातील अडसर आहेत. आदिवासींमध्ये वैचारिक बदल घडवून आणल्याशिवाय नव्या भौतिक गोष्टींचा ते सहजासहजी स्विकार करणार नाहीत. आदिमांच्या मूळ भौगोलिक व सामाजिक स्थापित व्यवस्था मोडून काढण्याने त्यांच्या भावना दुखावल्या जातात. त्यामुळे शेकडो वर्षांच्या प्रस्थापित भौतिक व सामाजिक जीवनाच्या चौकशी भेदून आदिवासी बाहेर पडण्यास तयार नाही. आदिवासींच्या सामाजिक जीवन पध्दतीवरील निष्ठा अतिव आहेत. त्यापलिकडे जावून नव्या सामाजिक जीवन पध्दतीचा स्वीकार त्यांना अमान्य आहे. त्यांना आपल्या सामाजिक-सांस्कृतिक जीवन परंपरा कायम ठेवून कोणत्याही बाह्य संपर्काशिवाय विकास साधायचा आहे. पण त्यासाठी खूप वेळ लागेल. आदिवासी समाजाचा विकास साधण्यामध्ये नेमक्या कोणत्या अडचणी आहेत, यासंबंधी पुढीलप्रमाणे आपल्याला माहिती घेता येईल.

## १. अज्ञान आणि निरक्षरता :-

आदिवासी समाज हा प्रगतांपासून दूर अलिप्त असा आहे. त्यामुळे बाह्य बदलाचे ज्ञान त्यांना नाही. आपापल्या समाजाच्या जीवन पध्दतीमध्ये आहे त्यात समाधान मानून जीवन जगणे त्यांना सोयीचे वाटते. त्यांच्या जीवन पध्दतीचा इतका प्रभाव पडला आहे की, ते त्या पलिकडे जाऊन कोणत्याच गोष्टींचा स्वीकार करावयास तयार नाहीत. शिवाय त्यांना सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक बदलांसंबंधी कोणतीच कल्पना नाही. आपल्या भौगोलिक प्रदेशामध्ये दैनंदिन गरजांच्या विवंचना दूर करण्यातच त्यांचा सारा वेळ निघून जातो. आपल्या सभोवती काम चालले आहे, त्याकडे लक्ष द्यावयास त्यांना फुरसतच मिळत नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातील कोणत्याही समाजातील १४ वर्षाखालील मुलगा शिक्षणापासून वंचित राहणार नाही, यासाठी संविधानात्मक तरतूद आणि शिक्षणप्रसार योजनांचा पाठपुरावा करण्यावर भर दिला जात आहे. तथापि, कित्येक आदिवासी पाड्यांपर्यंत शिक्षणाच्या सेवासंधी जाऊन पोहोचलेल्या नाहीत. शिक्षण हे परिवर्तनाचे मूळ आहे असे म्हणत असलो तरी अनेक आदिवासी जमातीतील मुले शिक्षणाकडे पाठ फिरवून स्वत:चा उदरनिर्वाह भागविण्यासाठी रानावनातून, जंगलखोऱ्यातून भटकत आहेत हे नाकारता येत नाही. आदिवासींचे आर्थिक स्वावलंबन जो पर्यंत होणार नाही तोपर्यंत आदिवासी समाजात अज्ञान व निरक्षरता कायम राहिल. परिणामी, त्यांचा विकास हा एक दूरचा प्रवास ठरेल असे वाटते.

## २. अंधश्रध्दा आणि रूढी-परंपरांचा प्रभाव :-

आदिवासी प्रतिकूल नैसर्गिक पर्यावरणामध्ये आपले अस्तित्व टिकवून संघर्षमय असे जीवन जगत आहे. अशा परिस्थितीत उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक संकटाशी आदिवासींना सामोरे जाता येत नाही. असे की, वादळ, अतिवृष्टी, भूकंप, रोगराई, टोळधाड इत्यादींनी त्यांचे संपूर्ण जीवन उद्‌ध्वस्त होते. अशा घटनांचे नेमके कारण त्यांना शोधून काढता न आल्यामुळे त्यांचा अलौकिक शक्ती व जादूटोणा यावर मोठा विश्वास आहे. परिणामी, प्रत्येक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक क्रियांमध्ये धार्मिक श्रध्दा आणि इतर सामाजिक रूढी, परंपरांचा प्रभाव पहायला मिळतो. सध्या शासकीय आणि अशासकीय स्तरावर ज्या वेगवेगळ्या विकास योजना आदिवासी समाजामध्ये राबविण्याचा प्रयत्न सुरू आहे, त्याला आदिवासींच्या अंधश्रध्दा आणि रूढी-परंपरांचा मोठा अडसर ठरत आहे. सातपुडा परिसरातील दुर्गम भागात शासकीय स्तरावर अनेक आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न होत आहे, परंतु शारीरिक आजार औषधांनी बरा होत नाही, तर भगताच्या मंत्र-तंत्राने, धागे-दोरे व तावीज यांनी बरा होतो असा त्यांच्यात अंधविश्वास आहे. काही आदिवासी जमाती नवीन यंत्राच्या साहाय्याने शेतीची नांगरणी करणे व नदीवर बांध बांधणे, धार्मिकदृष्ट्या अयोग्य समजतात. बहुसंख्य आदिवासी जमाती नवीन, विकास योजनांचा स्वीकार न करता आपल्या जमातींच्या धार्मिक रूढी, परंपरा, जादू टोणा यामध्ये व्यस्त राहून आपल्या उत्पन्नातील बराचसा हिंसा त्यावर खर्च करतात. आदिवासींवर अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, देवदेवता,

जादूटोणा, भुताटकी यांचा पगडा असल्यामुळे ते नवीन विविध विकास योजनांना विरोध करताना दिसतात.

## ३. आदिवासींचे विकास धोरण आणि व्यक्तीवादी दृष्टिकोण :-

आदिवासी समाजामध्ये विविध विकास योजना राबविल्या जात आहेत. आदिवासींच्या शेती विकासासाठी विविध प्रकारच्या सोयी सवलती पुरविल्या जात आहेत. त्यांच्या जमीनीचे सपाटीकरण, विद्युत मोटरपंप, शेती औजारे, किटक नाशके, नवीन सुधारित संकरित बी-बियाणे, खते त्याचबरोबर कुक्कुटपालन, डुकरपालन, दुग्धव्यवसाय इत्यादी योजनांचा लाभ काही आदिवासी लोकांना मिळालेला आहे. याशिवाय वेगवेगळ्या विकास महामंडळांच्याद्वारा अर्थसाहाय्य केले जात आहे. काही आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सेवासुविधांचा लाभ मिळालेला आहे. आदिवासींच्या आरक्षण धोरणांमुळे राजकीय व आर्थिक लाभ प्राप्त झाले आहेत. हे सर्व लाभ आदिवासींना मिळत असले तरी काही ठराविक आदिवासी लोकांनाच त्याचा फायदा झाला आहे. बहुसंख्य आदिवासी या योजनांच्या लाभापासून वंचित राहिलेले आहेत. ज्या आदिवासी लोकांना या योजनांचा लाभ झाला आहे, त्यांच्यात आत्मनिर्भरता आली आहे. असे आदिवासी लोकांमध्ये स्वयंकेंद्रित वृत्ती वाढीस लागली आहे. त्यामुळे आदिवासी खेड्यातील लोकांमधील एकमेकांना मदत करण्याची सामूहीक भावना कमी झाली आहे. स्वयंकेंद्रित आदिवासी स्वत:च्याच विकासासाठी या योजनांचा धूर्तपणे उपयोग करून घेत आहे. अशा काही धूर्त आदिवासींचा विकास म्हणजे संपूर्ण आदिवासी समाजाचा विकास नव्हे. अर्थातच आदिवासी समाजातील आत्मकेंद्रितवृत्ती आणि सामूहीक भावनांचा अभाव हे आदिवासी विकासातील एक अडसर आहे.

## ४. आदिवासी विकासाचे अनिश्चित धोरण :-

आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास करत असताना आदिवासी समाजाचा सर्वेक्षणात्मक अभ्यास होणे गरजेचे आहे. आदिवासींमध्ये कोणत्या समस्या आहेत आणि कोणत्या जमातीचे लोक त्या समस्येचे बळी ठरले आहेत. यासंबंधी शास्त्रीय पध्दतीने अभ्यास होणे आवश्यक आहे. आदिवासींसाठी विकास योजना आहे म्हणून ती योजना सर्वांना सारख्या प्रमाणात लागू करणे म्हणजे त्या योजनेचे ते अपयश म्हणावे लागेल. आदिवासींच्या विकासासाठी जे जंगलविषयक, जमीन सुधारणाविषयक विविध फायदे लागू करण्यात आले त्यातून आदिवासी समाजाचा विकास होण्याऐवजी त्यांच्यात अनेक समस्या निर्माण झाल्या. जंगल संरक्षणाच्या कायद्याने शिकार, लाकूडफाटा गोळा करणे, मध, डिंक, वनस्पतीची पाने, औषधी वनस्पती गोळा करणे या त्यांच्या आर्थिक उत्पादन पध्दतीवर निर्बंध आले. १९४८ चा कुळवहिवाटीचा व अन्य कायद्याने आदिवासींना जमिनी न मिळता आदिवासींच्याच जमिनी जमिनदार, सावकार या बिगर आदिवासींनाच मिळाल्या. आदिवासींच्या क्षेत्रात सरकारी विकास प्रकल्पासाठी संपादित केलेल्या आदिवासींच्या भूक्षेत्रावर उभ्या असलेल्या औद्योगिक प्रकल्पाचा लाभ आदिवासींना न मिळता

तो बिगर आदिवासींना मिळाला आहे. कोळसा, लोखंड, मॅग्निज खाणी उद्योगाने बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश व महाराष्ट्र इत्यादी राज्यांमधील आदिवासींना उद्योगधंद्यांमध्ये सामावून घेण्याऐवजी त्यांच्यावर स्थलांतर करण्याची वेळ आली आहे. अशा प्रकारचे आदिवासींच्या जीवनपध्दतीला धक्का न लावता विकास प्रकल्पांची आखणी व अंमलबजावणी करण्याविषयीचे आदिवासी विकासाचे अनिश्चित धोरण आदिवासी विकासाला मारक ठरले आहे.

## ५. विकास धोरणांची असमर्थ अंमलबजावणी :-

ज्या आदिवासी लोकांच्या विकासासाठी विकास धोरणांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जात आहे त्या आदिवासींचे अपेक्षित सहकार्य वा प्रतिसाद मिळत नाही. विकास योजना राबवत असताना आदिवासींना विश्वासात घेतले जात नाही. त्यामुळे आदिवासी त्या विकास योजनांचा फायदा घेण्यापेक्षा त्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतो. जसे की, जमीन सुधारणा, शिक्षण प्रसार, आरोग्य सुधारणा, कुटुंबनियोजन आणि कुटुंबकल्याण कार्यक्रम इत्यादी योजनांचा आपल्यावर दुष्परिणाम होईल असे त्यांना वाटते, त्यामुळे विकास योजना निश्चितपणाने राबविता येत नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे विकास योजनांची अंमलबजावणी करणारे प्रशासकीय अधिकारी व सेवक वर्ग यांच्यामध्ये आदिवासींच्या दुर्गम प्रदेशात जाऊन त्यांचा सहानुभूतीपूर्वक विकास साधण्याची मानसिकता नसते. आदिवासींच्या दु:खमय वेदनांशी समरस होऊन त्यांचा उदात्त भावनेतून विकास साधण्याची अधिकाऱ्यांची ईच्छाशक्ती असेल तर त्यांचा विकास शक्य आहे. तथापि, आदिवासी विकास धोरण निष्क्रीय ठरते. थोडक्यात, म्हणजे आदिवासींना विश्वासात घेऊन त्यांच्या जीवनपध्दतीशी एकरूप होवून त्याग भावनेतून प्रशासकीय अधिकारी कार्य हाती घेतील तरच त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो अन्यथा नाही.

## ६. आदिवासी जीवन उद्ध्वस्त करणारे विकास प्रकल्प :-

आदिवासींचा विकास हे ध्येय साध्य करताना त्यांच्या जीवनपध्दतीवर अनिष्ट परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी एकीकरणात्मक धोरणाचा पुरस्कार करून ज्याप्रमाणे अमेरिका व रशिया या राष्ट्रांनी वेगवेगळ्या समुदायांच्या सांस्कृतिक मूल्य परंपरा धक्का न लावता ज्या पध्दतींनी त्या समुदायांचा विकास करण्याचा प्रयत्न केला त्याच पध्दतीने आपल्याही देशातील बहुसंख्य आदिवासींचे वेगळे सांस्कृतिक मूल्य अबाधित ठेवून त्यांचा विकास करणेचा प्रयत्न करण्यावर भर दिला. तथापि, आदिवासी विकासाच्या अतिमहत्त्वाकांक्षेमुळे त्यांचे भौगोलिक व सामाजिक जीवन उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न सुरू आहे. विकासाचा ठेका घेणारे ठेकेदार आदिवासींचे जंगल, जंगल जमिनीचे संपादन करून विकास प्रकल्प उभे करू पहात आहेत. नर्मदा विकास प्रकल्पामुळे एकूण ३९,१३४ हेक्टर जमीन पाण्याखाली जाण्याचा आणि १४८ खेड्यांमधील तीन लाख लोक विस्थापित होण्याचा धोका निर्माण झाला. या तीन लाखांमधील ४७ टक्के जनता आदिवासी असल्यामुळे त्यांच्या विस्थापनाचा प्रश्न गंभीर आहे. कारखाने आणि खाणी उद्योगांमुळे

बिहार, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, आंध्र प्रदेशातील आदिवासींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. जेव्हा असे विकास प्रकल्प आदिवासींचे जीवन उध्वस्त करतात, तेव्हा विकास नेमका कुणाचा? हा प्रश्न आदिवासींसमोर उभा राहतो व त्यामुळे आदिवासी अशा विकास प्रकल्पांना प्रचंड विरोध करतात. म्हणजेच आदिवासींचा विकास साधण्याऐवजी त्यांच्या जीवनावरच घाला घालून बिगर आदिवासींचा विकास करण्याचा जेव्हा प्रयत्न केला जातो, तेव्हा अशा विकास प्रक्रियांना आदिवासी मोठ्या प्रमाणात विरोध करतात.

## ७. आदिवासी विकासासाठी मर्यादित अर्थसाहाय्य :–

राष्ट्राच्या एकूण विकास धोरणांच्या तुलनेत आदिवासी विकासासाठी मर्यादित अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले जाते. आदिवासी समाजाचा विकास करण्यासाठी रस्ते, पुल, शाळा, दवाखाने, उद्योग, जलाशये, सरकारी वा खाजगी प्रशासकीय संस्थांच्या इमारती इत्यादी पायाभूत सुविधा पुरविणे आवश्यक आहे. मूळातच आदिवासींचा प्रदेश पर्वत, डोंगर, दऱ्याखोऱ्यांचा आहे. अशा दुर्गम प्रदेशाला प्रगत समाजाशी दळणवळणाच्या माध्यमांनी जोडण्यासाठी प्रचंड आर्थिक तरतूद आवश्यक आहे. केवळ पायाभूत सेवांची उपलब्धता करून भागणार नाही, तर आदिवासींना वैयक्तिक अर्थसाहाय्य तसेच कर्जपुरवठा करण्यासाठी मुबलक अर्थसाहाय्य करणे अत्यावश्यक आहे. परंतु आदिवासींच्या या पायाभूत भौतिक आवश्यकता व त्यांच्या मूलभूत गरजा लक्षात कोण होतो! राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील आर्थिक विकास धोरणांमध्ये आदिवासी विकासावर मर्यादित आर्थिक तरतूद केली जाते. परिणामी, मुबलक अर्थसाहाय्य केले जात नसल्यामुळे आदिवासींचा विकास रखडलेला दिसून येतो.

## ८. आदिवासींची शोषक, बिगर आदिवासींवरील निष्ठा :–

आदिवासी समाजामध्ये सावकार, जमीनदार, ठेकेदार, व्यापारी इत्यादींचा मोठा प्रभाव वा बळ असलेले दिसून येते. या लोकांच्याकडूनच आदिवासींच्या उपजिविकेचा प्रश्न सोडविला जातो. जंगलातील सरपण, डिंक, मध, औषधी झाडपाला, वेगवेगळ्या वनस्पतींच्या बीया, खैराच्या झाडाची व पळसाच्या झाडाची पाने इत्यादींची विक्री करून व्यापाऱ्यांकडून पैसे मिळतात, जमीनदारांच्या शेतीमध्ये शारीरिक कष्टांची कामे केल्यामुळे मजुरीचे पैसे मिळतात. जंगलामध्ये झाडे तोडण्यासाठी जंगल ठेकेदारांकून पैसे मिळतात. लग्न, आजारपण, धार्मिक कार्यासाठी सावकारांकडून कर्ज मिळते, एवढेच नाही तर पूर्व-महाराष्ट्र, पश्चिम-आंध्र प्रदेश, दक्षिण-मध्य प्रदेशच्या सीमा भागांमध्ये कार्यरत असणाऱ्या नक्षलीय कारवायांमध्ये सहभागी होण्यासाठी आर्थिक मदत मिळते. या शोषक बिगर आदिवासी लोकांकडून आदिवासींचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत असले तरी त्यांच्या पोटापाणयचा प्रश्न ते सोडवितात. परिणामी, वेगवेगळ्या विकास योजनांविषयी अनभिज्ञ असलेले आदिवासी अशा शोषक वर्गांवर अवलंबून असल्यामुळे ते विकास प्रक्रियेपासून दूर राहिलेले आहेत.

## ९. निरपेक्ष लोकसेवकांचा अभाव :-

प्रगत समाजांपासून अलिप्त अशा दुर्गम प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या आदिवासी समाजामध्ये अनेक समस्यांनी गंभीर स्वरूप धोरण केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनामध्ये दु:ख-दैन्य निर्माण झाले आहे. आदिवासींना अशा दु:खमय जीवनातून बाहेर काढण्यासाठी केवळ शासकीय विकास ध्येय-धोरणेच उपयोगाची ठरणार नाहीत तर निरपेक्ष लोकसेवकांचीही मोठी गरज आहे. आदिवासींचे जीवन प्रत्यक्ष अनुभवून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकीय पुढारी यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे श्रीमती ताराबाई मोडक यांनी १९४५ साली ठाणे जिल्ह्यातील बोर्डी या ठिकाणी आदिवासींच्या शैक्षणिक व सामाजिक विकासाचे कार्य केले. श्रीमती अनुताई वाघ यांनी कोसबाड येथे आदिवासी बालकल्याणाचे कार्य केले. श्रीमती गोदावरी परूळेकर यांनी महाराष्ट्रातील ठाणे व नाशिक जिल्ह्यातील वारली जमातीतील शेतमजूरांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केला. डॉ. प्रकाश बाबा आमटे यांनी गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड जवळील हेमलकसा येथे 'लोक बिरादरी प्रकल्प' सुरू करून माडिया तसेच इतर जमातीतील लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न केला. डॉ. मणिभाई देसाई यानी गुजरातमध्ये 'वासंदा' या गावात 'भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान' स्थापन करून वृक्ष संपदांचे संरक्षण केले. चंडीप्रसाद भट, विजयदर्शन व सुंदरलाल बहुगुणा यांनी उत्तर प्रदेशातील गढवालमधील मंडळ खेड्यामध्ये चिपको आदोलन सुरू करून आदिवासींच्या वनऔषधी वनस्पतीचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला. मेधा पाटकर यांनी नर्मदा खोऱ्यातील सरदार सरोवर प्रकल्पाने विस्थापित झालेल्या आदिवासींच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केला. अशा प्रकारे त्याग भावनेतून आदिवासी हितार्थ कार्य करणाऱ्या सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांचा वाणवा हा आदिवासी विकासातील एक अडसर म्हणावा लागेल. सध्याचे सामाजिक व राजकीय कार्यकर्ते हे आदिवासी विकासापेक्षा स्वहिताचा अधिक विचार करतात. ते आदिवासींसाठी एखाद्या विकास प्रकल्प सुरू करून त्यातून स्वत:चा स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. आदिवासी विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या आर्थिक, शैक्षणिक तसेच आरोग्यविषयक विकास प्रकल्पांच्या योग्य कार्यकारीसाठी अशा सेवाभावी कार्यकर्त्यांनी हिरीरिने पुढे आले पाहिजे.

## १०. आदिवासी शिक्षण आणि प्रशिक्षणाची असमर्थता :-

आदिवासी समाजाच्या विकासाचे मुख्य कारण हे शिक्षण आहे. शिक्षणाशिवाय विकास अशक्य आहे. शैक्षणिक राष्ट्रीय धोरण, शैक्षणिक आयोग आणि जिल्हा परिषदांमार्फत राज्यशासनाचा शैक्षणिक कार्यक्रम याद्वारा आदिवासी क्षेत्रांमध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण तसेच कृषी, औद्योगिक व वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा आदिवासींपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि, या सर्व शैक्षणिक सेवासुविधा आदिवासींपर्यंत जेवढ्या कार्यक्षमपणे पोहोचायला पाहिजेत तेवढ्या पोहोचत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे आदिवासींचे दुर्गम प्रदेशातील वास्तव्य होय. आदिवासींना अशा दुर्गम प्रदेशांतून शिक्षण विकासाच्या प्रक्रियेमध्ये आणण्यासाठी सक्षम व्यवस्था दिसून येत नाही. ज्या आदिवासींशी संपर्क

प्रस्थापित करणे शक्य झाले आहे असेच केवळ शिक्षण प्रक्रियेमध्ये येऊ शकले आहेत. परंतु अद्याप जे शैक्षणिक विकास प्रकल्पांपासून अलिप्त राहिलेले आहेत त्यांचा शैक्षणिक विकास साधता आलेला नाही. याशिवाय आदिवासींमधील कलागुणांचा विकास साधण्यासाठी व त्यांना विशिष्ट कार्याचे शिक्षण देण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था सुरू करण्यात आल्या आहेत. या प्रशिक्षण संस्थांमधून आदिवासींना शेती, पशुपालन, कुक्कुटपालन, डुक्करपालन, चित्रकला, विणकाम, कोरीवकाम इत्यादीसंबंधी शिक्षण देण्यावर भर दिला जाऊ लागला आहे. तथापि, या राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती आदिवासींना व्यवस्थित मिळू शकत नाही. मुळातच स्वत:च्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी रानावनातून, दऱ्याखोऱ्यातून भटकणारा आदिवासी या विकास योजनांविषयी अनभिज्ञ आहे. काही सेवाभावी संस्थांनी अशा प्रकारच्या संस्था सुरू करून आदिवासींचा शैक्षणिक विकास करण्याचा प्रयत्न चालविला असला तरी त्याला योग्य असा प्रतिसाद आदिवासी समाजातून मिळत नाही. म्हणून आदिवासींमध्ये प्रत्यक्षात संपर्क प्रस्थापित करून जनजागृती व प्रबोधनाच्या जोरावर असे उपक्रम यशस्वी होऊ शकतात. पण असे जनजागृतीचे कार्य जेवढ्या ताकदीने होणे अपेक्षित आहे, तेवढ्या ताकदीने झालेले नाही. त्यामुळे नुसत्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांच्या मोठाल्या इमारती उभ्या करणे म्हणजे आदिवासींचा शैक्षणिक विकास नव्हे. अर्थातच आदिवासी समाजातील शिक्षण वप्रशिक्षणाची असमर्थतता हा आदिवासी विकासातील अडथळा आहे.

थोडक्यात, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जात असला तरी त्यामध्ये अनेक अडथळे निर्माण झाले आहेत.

## ३.४ सारांश

आदिवासी समाज प्रगत समाजापासून अलिप्त राहिल्याने आणि प्रगतांशी त्यांचा संपर्क प्रस्थापित झाल्यामुळे आदिवासींच्या जीवनामध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या. या विविध समस्यांपासून आदिवासींचा विकास करण्यासाठी काही ठोस उपाय निश्चित करण्यात आले. त्यामध्ये शासकीय आणि अशासकीय स्तरावर विविध प्रकारचे विकासात्मक कार्यक्रम हाती घेण्यात आले. सदरच्या घटक अभ्यासामध्ये आदिवासी विकासाच्या संदर्भात आदिवासी विकास दृष्टिकोण आणि धोरण तसेच अडथळे यांची सविस्तर माहिती विशद करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आदिवासी विकास दृष्टिकोण स्पष्ट करताना अलगीकरण, सामिलीकरण आणि एकीकरण या दृष्टिकोणांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. डॉ. व्हेरियर एल्विन यांनी अलगीकरणाचा पुरस्कार करून आदिवासींचा विकास साधता येईल असे स्पष्ट केले आहे. परंतु हा दृष्टिकोण डॉ. जी. एस. घुर्ये आणि ठक्कर बाप्पा या अभ्यासकांना मान्य नाही, त्यांच्या मते, आदिवासींना प्रगतांपासून अलग ठेवणे भारतीय समाजाच्या दृष्टीने व्यवहार्य ठरणार नाही, उलट असा दृष्टिकोण ठेवल्याने त्यांच्यामध्ये अनेक समस्या

निर्माण होती. डॉ. जी. एस. घुर्ये यांनी आदिवासी विकासासाठी सामिलीकरणाचा दृष्टिकोण अत्यंत उचित असल्याचे म्हटले आहे. तथापि, डॉ. हटन आणि कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या आदिवासींच्या सामिलीकरण धोरणाला कडाडून विरोध केला आहे. त्यांच्या मते, सामिलीकरणाने आदिवासींचे अस्तित्वच नष्ट करण्यासारखे आहे. त्यासाठी त्यांनी एकीकरणात्मक दृष्टिकोणाचा पुरस्कार केला आहे. ज्यामुळे आदिवासींचे स्वतंत्र सामाजिक मूल्य अबाधित राहून त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देता येतील.

आदिवासी विकासाचे धोरण स्पष्ट करताना शेती, शिक्षण आणि आरोग्य या घटकांचा सविस्तर विचार करण्यात आलेला आहे. आदिवासी शेती विकासाचे धोरण अभ्यासत असताना अनेक संबंधित घटक विचारात घेतलेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील जमीन विकासाचे धोरण, भारतातील अन्य राज्यांमधील जमीन विकासाचे धोरण, ब्रिटिश राजवटीतील धोरण, आदिवासींच्या जमीन विकास धोरणविषयक चळवळी, पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम, आदिवासी जमीन विकासाचे राष्ट्रीय धोरण इत्यादी घटकांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. आदिवासी शैक्षणिक विकास धोरण स्पष्ट करताना अनेक मुद्दे विचारात घेतले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शिक्षण म्हणजे काय? भारतीय राज्यघटनेतील तरतुदी, पंचवार्षिक योजना, शैक्षणिक विकास योजना, आदिवासी भाषा, संस्कृती व शिक्षण, आदिवासी शिक्षकांची नेमणूक, शैक्षणिक धोरण आणि आयोग इत्यादी घटकांची चर्चा करण्यात आली आहे. आदिवासींचे आरोग्य विकासाचे धोरण स्पष्ट करताना त्यांच्या आरोग्यविषयक बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये आरोग्य म्हणजे काय? आरोग्यासंबंधी घटनात्मक तरतुदी, पंचवार्षिक योजना, आरोग्य विकास अंतर्गत कार्यक्रम, कुपोषणामुळे उद्‌भवणाऱ्या रोगांचे निमंत्रण, बाल व मातामृत्यू नियंत्रण कार्यक्रम, आदिवासी आरोग्य तपासणी कार्यक्रम, आरोग्यविषयक जाणीव जागृती आणि आदिवासी आरोग्य विकासासाठी सेवाभावीवृत्ती इत्यादी मुद्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या विकास धोरणामध्ये आदिवासी जमिनीचा मालकी हक्क त्यांना पुन्हा प्रदान करून आधुनिक पध्दतीने शेती करणे, त्यांचे आरोग्य सुधारणे व शैक्षणिक प्रसार करणे यादृष्टीने विचारविमर्श करण्यात आला आहे.

आदिवासी विकासाचे अनेक अडथळे आहेत. त्यामध्ये त्यांचे अज्ञान आणि निरक्षरता, अंधश्रध्दा व रुढी-परंपरांचा प्रभाव, आदिवासी विकास धोरणातील व्यक्तीवादी दृष्टिकोण, आदिवासी विकासाचे अनिश्चित धोरण, विकास धोरणांची असमर्थ अंमलबजावणी, आदिवासी जीवन उध्वस्त करणारे विकास प्रकल्प, विकासासाठी मर्यादित अर्थसाहाय्य, आदिवासींची शोषक बिगर आदिवासींवरील निष्ठा, निरपेक्ष लोकसेवकांचा अभाव आणि शिक्षण आणि प्रशिक्षणाची असमर्थता इत्यादी मुद्यांची चर्चा करण्यात आली आहे. आदिवासी विकास साधण्यासाठी शासकीय आणि अशासकीय स्तरावर नियोजनबद्ध कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. तथापि, सध्याचे जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाचे धोरण, आदिवासी विकासाला कितपत साहाय्यभूत ठरणार आहे याचा विचार करणे गरजेचे आहे. कारण या नव्या धोरणामध्ये तुम्ही तुमचा विकास करणे हा भावनाशून्य विचार आहे. पात्रता, गुणवत्ता असेल तरच तुमचे

भविष्य उज्ज्वल ठरणार आहे अन्यथा कालोघात आदिवासींना नष्ट करण्याच्या दिशेने विकास प्रक्रियेची वाटचाल सुरू आहे. याचा सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे.

## ३.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

### अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१. डॉ. व्हेरियर एल्विन यांनी आदिवासी विकासाच्या ........... दृष्टिकोणाचा पुरस्कार केला.

२. ........... यांनी अलिप्ततावादी दृष्टिकोणाला कडाडून विरोध केला.

३. आदिवासी विकासाच्या सामिलीकरणाचा दृष्टिकोण ............. यांनी मांडला.

४. कै.पं.जवाहरलाल नेहरू यांनी आदिवासी विकासाच्या ............ दृष्टिकोणाला विरोध दर्शविला.

५. ............. यांनी आदिवासी विकासाचा एकीकरणात्मक दृष्टिकोण अधिक व्यवहार्य व राष्ट्रीय असल्याचे म्हटले आहे.

६. आदिवासींच्या ................ चा प्रश्न सोडविण्यासाठी तत्कालीन महसूलमंत्री श्री. ह. गो. वर्तक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली.

७. आदिवासी जमीन विकासाचे धोरण म्हणून ६ जुलै, १९७४ चा ............ कायदा करण्यात आला.

८. आदिवासींच्या विशेष क्षेत्रांचा विकास करण्यासाठी ............... प्रारंभ करण्यात आला.

९. ................... च्या जमिनविषयक कायद्यामुळे आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरण वेगाने सुरू झाले.

१०. १९ जुलै, १८५४ च्या .............. ने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यात आले.

११. घटनेचे कलम .............. नुसार १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यास सुरुवात झाली.

१२. आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी १९७२-७३ पासून .......... राबविण्यात येत आहे.

१३. १९६१ च्या ............ ने आदिवासी भागातील शिक्षकांच्या गुणवत्तेवर विशेष भर दिला आहे.

१४. देशातील हत्ती रोगाचे निर्मूलन करण्यासाठी १९९७ पासून .............. पध्दती सुरू झाली.

१५. १९५५ पासून भारतामध्ये ............... रोग नियंत्रण कार्यक्रम राबविला जातो.

१६. १९५९ मध्ये ................ रोग निर्मूलन संस्थेची स्थापना केली.

१७. १९६२-६३ पासून ............... या योजनेतून प्राथमिक शाळेतून मधल्या वेळेत सकस आहार देण्यास सुरुवात झाली.

१८. ............. अंतर्गत बाल-माता मृत्यू रोखण्यासाठी विविध योजना सुरू करण्यात आल्या.

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात द्या.**

१. डॉ. व्हेरियर एल्विन यांनी 'लॉस ऑफ नर्व्ह' (Loss of Nerve) या ग्रंथात कोणत्या आदिवासींच्या जीवनातील वैफल्याचे वर्णन केले आहे.

२. डॉ. व्हेरियर एल्विन यांनी वन्यजातीय संस्कृतीचे जतन करण्यासाठी कोणती योजना मांडली.

३. नबेंदू दत्त आणि मुजूमदार यांच्या मते, आदिवासी विकासाचा कोणता दृष्टिकोण भारतीय सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीशी विसंगत असल्याचे म्हटले आहे.

४. आदिवासींना 'मागासलेले हिंदू' असे कोणी म्हटले आहे.

५. डॉ. हटन यांनी आदिवासी विकासासाठी कोणत्या दृष्टिकोणाचा पुरस्कार केला.

६. राज्य घटनेतील कोणत्या तरतुदीनुसार आदिवासींच्या जमीन हस्तांतरणावर निर्बंध घालण्यात आले.

७. श्रीमती गोदावरी परुळेकर यांनी कोणत्या जमातीतील शेतमजूरांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

८. घटनेतील कोणत्या कलमानुसार भारतीय जनतेचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न केला जातो.

९. बाबा आमटे यांनी कोणता प्रकल्प सुरू करून गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींमधील कुष्ठरोग निर्मूलनाचे कार्य केले.

१०. विदर्भ आणि मराठवाडा विभागातील आदिवासी रुग्णांचे अधिक प्रमाण कोणत्या समस्यामुळे निर्माण झाले आहे.

११. श्रीमती अनुताई वाघ यांनी कोसबाड येथे कोणते कार्य केले.

१२. संविधानाच्या कोणत्या कलमानुसार अल्पसंख्यांकांच्या मुलांना प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण देण्याची तरतूद आहे.

१३. कोणत्या वर्षापासून भारतात वेगवेगळ्या राज्यांमधून आदिवासींच्या जमीन हस्तांतरणावर निर्बंध घालण्यात आले.

१४. भारतामध्ये कोणत्या वर्षापासून राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली.

## ३.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ)**

| | |
|---|---|
| १. अलिप्ततावादी | २. ठक्कर बाप्पा. |
| ३. डॉ. जी. एस. घुर्ये | ४. सामिलीकरण. |
| ५. पं. जवाहरलाल नेहरू | ६. जमीन हस्तांतरण. |
| ७. आदिवासी जमीन पुनर्प्रस्थापन | ८. उपविकास खंड. |
| ९. ब्रिटिश | १०. वुडचा खलिता. |
| ११. ४५ | १२. शासकीय आश्रमशाळा समूह योजना. |
| १३. ढेबर कमीशन | १४. सिंगल डोस उपचार. |
| १५. कुष्ठ | १६. क्षय. |
| १७. मिड-डे-मिल | १८. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. |

**ब)**

| | |
|---|---|
| १. गोंड | २. नॅशनल पार्क (National Park) |
| ३. अलिप्ततावादी | ४. डॉ. जी. एस. घुर्ये. |
| ५. एकीकरणात्मक | ६. अनुच्छेद-४६. |
| ७. वारली | ८. ४७. |
| ९. लोक बिरादरी प्रकल्प | १०. कुपोषण. |
| ११. आदिवासी बालकल्याण | १२. कलम ३५० (अ) |
| १३. सन १९५६ | १४. १९८२-८३. |

## ३.७ सरावासाठी प्रश्न

**(अ) टीपा लिहा.**

१. अलिप्ततावादी दृष्टिकोण.

२. सामिलीकरणाचा दृष्टिकोण.

३. एकीकरणात्मक दृष्टिकोण.

४. आदिवासींच्या जमीन विकासाचे धोरण.

५. आदिवासी शिक्षण विकासाचे धोरण.

६. आदिवासी आरोग्य विकासाचे धोरण.

७. आदिवासी विकासातील अडथळे.

**(ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. आदिवासी विकासाचा दृष्टिकोण विशद करा.

२. आदिवासी जमीन विकासाचे धोरण स्पष्ट करा.

३. आदिवासी शिक्षण विकासाचे धोरण सांगा.

४. आदिवासी आरोग्य विकास धोरणावर सविस्तर चर्चा करा.

५. आदिवासी विकासातील अडथळे विशद करा.

## ३.८ क्षेत्रीय कार्य

आदिवासींचा विकास यादृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये सवेदना, सृजनता निर्माण व्हावी यासाठी केवळ क्लासमधील चार भिंतीच्या आतील उपदेशात्मक मार्गदर्शन उपयोगाचे ठरणार नाही. त्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी स्वयं आदिवासींच्या समस्या जाणून घेण्यासाठी दूर, दुर्गम प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या आदिवासींना प्रत्यक्ष भेट देण्याचे प्रयोजन करणे गरजेचे आहे. भेटीमधून मुलांना आदिवासींचा भौगोलिक प्रदेश व त्यांचे सामाजिक जीवन यासंबंधी माहिती घेणे शक्य होणार आहे. अशा भेटीतून कदाचित मुलांमध्ये आदिवासी विकासाच्या नव्या कल्पना वा विचार निर्माण होऊ शकतात.

## ३.९ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **डॉ. देवगांवकर, एस. जी.** : घटक–५ : *'आदिवासींसाठी विविध विकास योजना'*, आदिवासी विकास प्रशासन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर–२०११, पृष्ठ–७८.

२. **प्रा. लोटे, रा. ज.** : घटक–५ : *'भारतातील आदिवासींच्या प्रमुख समस्या आणि आदिवासी कल्याण कार्यक्रम'*, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर–२००९, पृष्ठ–३७.

३. **डॉ. आकरे, बी. एन.** : घटक–३ : *'सामुदायिक विकास योजनेची यंत्रणा'*, आदिवासी आणि सामुदायिक विकास योजना, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर–२००९, पृष्ठ–३७.

४. **प्रा. कुलकर्णी, पी. के.** : घटक–६ : *'दलित व आदिवासी– राज्याची धोरणे व तरतुदी'*, दलितांचे व आदिवासींचे समाजशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स–पुणे, पृष्ठ–११३.

५. **प्रा. राजपुत, एन. आर.** : घटक–१४ : *'भारतीय आदिवासींच्या समस्या व उपाययोजना'*, सामाजिक मानवशास्त्र, अंकुश पब्लिकेशन्स, नागपूर–१९९९, पृष्ठ–२०३.

६. **डॉ. कोत्तापल्ले, लक्ष्मण** : घटक–४ : *'प्रमुख सामाजिक क्षेत्रे'*, भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद–२००२, पृष्ठ–१०२.

७. **डॉ. गारे, गोविंद** : घटक–१० : *'आश्रमशाळांतील शिक्षणाला नवी दृष्टी हवी'*, आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन, पुणे–२०००, पृष्ठ–४७.

८. **डॉ. शर्मा, रामनाथ, डॉ. शर्मा, राजेंद्रकुमार** : घटक–३० : *'जनजाती कल्याण'*, मानवशास्त्र, एटलांटिक पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स–१९९६, पृष्ठ–४४८.

९. **प्रा. कुलकर्णी, पी. के.** : घटक-४ : *'सामाजिक न्याय : प्रश्न व पैलू'*, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-२०१३, पृष्ठ-१४९.

१०. **प्रा. पार्टे, सुमन, प्रा. जोशी, वि. कृ.** : घटक-११ : *'जनजाती-समस्या व कल्याण'*, सामाजिक मानवशास्त्र, पायल प्रकाशन, नागपूर-१९६८, पृष्ठ-१७७.

११. **डॉ. नंदपुरे, ईश्वर, डॉ. वानखेडे, अचला** : घटक-२० : *'समाज कल्याण विभाग'*, प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, विसा बुक्स, नागपूर-२०१०, पृष्ठ-२८७.

१२. **श्रीमती सातव, रजनी** : *'आदिवासींचे आरोग्य'*, लोकराज्य, १ मे, १९८८, पृष्ठ-१२.

१३. **सिंग, भूपिंदर** : *'भारतातील आदिवासींचे शिक्षण आणि विकास'*, शिक्षण आणि समाज, संपादक-डॉ. नाईक चित्रा, प्रकाशन-इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन, पुणे, वर्ष-२२, अंक-३, एप्रिल-जून, १९९९, पृष्ठ-२६.

१४. **कुलकर्णी, शरद** : *'आदिवासींच्या जमिनींचे पुनर्प्रस्थापन'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-१२ वे, अंक-३, जुलै-सप्टेंबर, १९९१, पृष्ठ-६.

१५. **डॉ. मनोहरन् एस.** : *'आदिवासी विकास आणि औपचारिक शिक्षणासाठी मातृभाषेचा वापर'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-११ वे, अंक-१, जानेवारी-जून, १९९०, पृष्ठ-६६.

१६. **वाघ, अनुताई** : *'आदिवासी विकास आणि शिक्षण'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-९ वे, अंक-३, जुलै-डिसेंबर, १९८८, पृष्ठ-४९.

१७. **हाकारा** : *'विविध स्पर्धा परीक्षा'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-१० वे, अंक-३ व ४, जुलै-डिसेंबर, १९८९, पृष्ठ-२४.

१८. **हाकारा** : *'आदिवासी विकास योजना'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-२० वे, अंक-२, एप्रिल-जून, १९९९, पृष्ठ-३.

१९. **प्रा. गिरासे, एस. पी.** : *शासकीय योजना राबविण्यात आदिवासींच्या 'अंधश्रध्दा, अडसर'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-१३ वे, अंक-२, जाने-जून, १९९२, पृष्ठ-४२.

२०. **भोळे, भास्कर लक्ष्मण** : *'मानवशास्त्रीय दृष्टीची गरज'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-८ वे, अंक-१, जानेवारी-मार्च, १९८७, पृष्ठ-३२.

२१. **भुस्कुटे, रा. वि.** : *'जमीन, वन आणि संरक्षित क्षेत्रांचे प्रश्न'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-२२ वे, अंक-१ व २, जानेवारी-जून, २००१, पृष्ठ-८३.

२२. **हाकारा** : *'आरोग्य संस्कृती'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-१९ वे, अंक-३ व ४, जुलै-डिसेंबर, १९९८, पृष्ठ-७७.

२३. **पोतनीस, मुग्धा** : *'आरोग्य, अनारोग्य व आहार'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-१६ वे, अंक-१ व २, जानेवारी-जून, १९९५, पृष्ठ-४७.

२४. **खदळकर, शिल्पा** : *'आरोग्यविषयक जाणीव जागृती प्रकल्प, व्हेळे'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-१९ वे, अंक-२, एप्रिल-जून, २०००, पृष्ठ-२३.

२५. **वाघ, अनुताई** : *'ग्राम आरोग्य प्रकल्प कोसबाड'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-१३ वे, अंक-३ व ४, जुलै-डिसेंबर, १९९२, पृष्ठ-८.

२६. **आगाशे, पुरुषोत्तम** : *'कुपोषण : समस्या आणि उपाय'*, हाकारा, प्रकाशक : रा. के. मुटाटकर, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, वर्ष-१६वे, अंक-३, जुलै-सप्टेंबर, १९९५, पृष्ठ-२९.

२७. **डॉ. खडसे, भा. कि.** : घटक-१३ : *'भारतीय आदिवासींच्या समस्या व उपाययोजना'*, सामाजिक मानवशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर-१९९९, पृष्ठ-१९९.

२८. **Dr. Kumar** : Unit-23 : *"Tribal Problems and Welfare",* Anthoropology : Social and Cultural, Laxmi Narayan, Agarwal Educational Publishers, Agra-3, 1992, Page-252.

❀ ❀ ❀

घटक–४

# महाराष्ट्रातील आदिवासी समुदाय : भिल्ल

**घटक संरचना**


४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.३.१ भिल्लांचे सामाजिक–सांस्कृतिक जीवन : परंपरा आणि परिवर्तन

४.३.२ भिल्लांचे आर्थिक जीवन : परंपरा आणि परिवर्तन

४.३.३ भिल्लांचे धार्मिक जीवन : परंपरा आणि परिवर्तन

४.४ सारांश

४.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

४.६ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी प्रश्न

४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ४.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनामुळे आपणास पुढील बाबी समजून घेता येतील.

१. भिल्लांचे सामाजिक–सांस्कृतिक जीवन समजून घेता येईल.

२. भिल्लांचे आर्थिक जीवनाचे अध्ययन करता येईल.

३. भिल्लांचे धार्मिक जीवन समजून घेता येईल.

## ४.२ प्रास्ताविक

१९व्या शतकात मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी किंवा आदिवासी समुदाय ही संज्ञा विकसित केली. या संज्ञेनुसार एकाच भूमागावर निवास करणाऱ्या, सर्वसामान्यपणे एकच नाव किंवा ठरावीक आडनावे, कुळ लावणाऱ्या, एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या विवासंबंध आणि व्यवसायाच्या बाबतीत एकाच प्रकारचे नियम पाळणाऱ्या कुटुंब समुदायाला आदिवासी समुदाय, समाज, जमात असे म्हणतात.

भारतात आदिवासी म्हणून संबोधल्या गेलेल्या समूहांना अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे. भारतात ४६१ आदिवासी जमातींचा उल्लेख अनुसूचित जमातीत केला आहे. आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात महाराष्ट्र हा ६व्या क्रमांकावर असून राज्याच्या लोकसंख्येत हे प्रमाण ८.८५% इतके आहे. राष्ट्रपतींच्या अधिसूचनेनुसार राज्यातील आदिम क्षेत्र ाणि आदिवासी बहुल जिल्हे निश्चित करण्यात येतात. महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यात आदिवासी समाज असून एकूण ४० आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रात भिल्ल, गौंड, कातकरी, कोरकू, ठाकूर, कोलाम, वारली इत्यादी आदिवासी जमाती आढळून येतात. आपण या पाठात भिल्ल या आदिवासी जमातीचा अभ्यास करणार आहोत.

## ४.३ विषय विवेचन

भिल्ल ही महाराष्ट्रातील एक प्रमुख आदिवासी जमात आहे. या पाठात आपण भिल्ल आदिवासींच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनातील परंपरा आणि परिवर्तनाचे अध्ययन करणार आहोत. तसेच त्यांच्या आर्थिक आणि धार्मिक जीवनाचा अभ्यास करणार आहोत.

### ❐ भिल्लांचे परंपरागत सामाजिक-सांस्कृतिक जीवन :-

भिल्ल ही महाराष्ट्रातील ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आणि संख्येने एक प्रमुख जनजाती आहे. भारतातील प्राचीन शिलालेखात आणि प्राचीन वाङ्मयात भिल्लांचे उल्लेख सापडतात. म्हणजेच भिल्ल ही जमात अत्यंत प्राचीन जमात आहे. प्रभु रामचंद्र जेव्हा दंडकारण्यात आले तेव्हा त्यांना शबरी नावाची भिल्लीन भेटली, असा उल्लेख पुराणकथांमध्ये सापडतो. त्याकाळी या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना 'शबर', 'किरात', 'निषाद' या नावाने ओळखले जाई. हे लोक दुसरे तिसरे कोणी नसून सातपुड्यातील भिल्लच होत. त्यांच्या पूर्वजांच्या संदर्भात एक अशी पारंपारिक श्रध्दा आहे की, महादेवाने जिचे प्रियाराधन केले अशा एका विलक्षण स्त्रीपासून भिल्लांची वंशावळ सुरू केली.

भिल्लांचे मूळ अबु आणि असिरगढच्या डोंगराळ प्रदेशातील असून ते पश्चिम आणि दक्षिण दिशेला असलेल्या पठारी प्रदेशात तसेच गुजरात आणि पश्चिमेच्या दखखन भागात स्थलांतरित झाले.

युध्दकालीन स्थितीमुळे ते सिंध प्रांतात देखील स्थलांतरित झाले. मध्य भारतात त्यांची संख्या लक्षणीय आहे.

'सातपुडा प्रदेश' हा प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो. सातपुडा पर्वतात लहान-मोठ्या अनेक नद्या उगम पावत असल्या तरी हा प्रदेश प्रामुख्याने तापी आणि नर्मदा नद्यांच्या खोऱ्यातील प्रदेश म्हणून ओळखला जातो. या दोन नद्यांच्या मधील प्रदेश 'भिलवाड' (भिल्लांचा प्रदेश) या नावाने ओळखला जातो.

महाराष्ट्रातील भिल्लांचा अभ्यास करताना प्रामुख्याने नंदूरबार, धुळे, जळगाव आणि वेरूळ अजिंठ्यातील पर्वतरागांमधील भिल्ल जमाती व तिच्या उपशाखांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. भिल्लांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन समजून घेण्यासाठी प्रथम नंदूरबार, धुळे व जळगांव या जिल्ह्यातील जमातींचा आपण विचार करणार आहोत.

'भिल्ल' या शब्दाची उत्पत्ती 'भिलेवावर' या तमिळ शब्दापासून झाली असावी. याचा अर्थ 'धनुष्यधारी' असा होतो. विल्सन यांच्या म्हणण्याप्रमाणे 'भिल्ल' हा शब्द 'बिली' या मूळ शब्दापासून तयार झाला. 'बिली' हा तमिळ शब्द असून त्याचा अर्थ 'धनुष्य' असा होतो. धनुष्य हे भिल्लांचे वैशिष्ट्यपूर्ण हत्यार आहे. तर संस्कृत भाषा तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार भिल्ल म्हणजे 'कापणे' असा अर्थ होतो.

महाराष्ट्रात १९८१ साली ९.९३ लाख भिल्ल असल्याचे आढळून आले आहे. त्यांची जिल्हावार लोकसंख्या धुळे ५.३१ लाख, नाशिक १.६७ लाख, जळगांव १.४१ लाख, अहमदनगर ०.७० लाख आणि औरंगाबाद ०.३६ लाख अशी आहे.

नंदूरबार, धुळे, जळगांव जिल्ह्यातील भिल्ल जमातीची लोकसंख्या १० लाख इतकी आहे. नंदूरबार, धुळे, जळगांव जिल्ह्यातील भिल्ल जमातीच्या अनेक शाखा आहेत. त्यात काही प्रादेशिक गटही आहेत. नंदूरबार, धुळे जिल्ह्यात भिल्ल (वळवी, वसावे, पाडवी, नाईक इत्यादी) गावीत तथा मावची, पावरा, ढाणका, तडवी भिल्ल, बरडे भिल्ल ह्या प्रमुख शाखा असून त्यात काही प्रादेशिक गटही आहेत. यामध्ये प्रामुख्याने कोटले भिल्ल, मथवारे भिल्ल, मेवासी भिल्ल, लाढ्या भिल्ल, बोंडे-गवाल भिल्ल, टेड भिल्ल, नायडे भिल्ल इत्यादी स्थानिक व प्रादेशिक गटांचा समावेश होतो. याशिवाय जळगांव जिल्ह्यात ढाणका-तडवी, तडवी भिल्ल (मुस्लीम) असे भिल्लांचे दोन प्रकार आढळून येतात.

नंदूरबार जिल्ह्यातील भिल्ल जमातीत वळवी, वसावे, पाडवी, नाईक, गावीत यांची मोठी संख्या आहे. भिल्ल आदिवासींमध्ये अनेक कुळे आहेत.

## ❒ भिल्लांमधील कुळांची आडनावे :-

बामणे, धानका, ठाकरे, नाईक, जांगळ, इंकात, पाडवी, वळवी, तडवी, पवार, पटल्या, गावीत, मोरे, वसावे, राहासे, पावरा, भिल्ल, कोकणी, धारपवार, मावची अशी कुळांची आडनावे आहेत.

यानंतर आपणास भिल्लांच्या विविध कुळांची आणि उपशाखांच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनासंदर्भात पुढील मुद्यांच्याआधारे अध्ययन करता येईल.

## १. भिल्ल : वसावे, वळवी, पाडवी आणि गावीत :-

वसावे, वळवी, पाडावी, नाईक आणि गावीत या भिल्लांच्या अलग पोटजमाती नसून ही भिल्ल जमातीतील महत्त्वाची कुळे (गण) आहेत. इतर भिल्ल शाखांपेक्षा ते उच्च दर्जाचे समजले जातात. भिल्ल प्रदेशातील पहाडात राहणारे पाडावी, वरच्या भागात राहणारे वळवी आणि वसाहती किंवा गावे करून राहिलेले वसावा, वसावे व गावाचे नेतृत्व करणारे नाईक तर मूळ समाजापासून तुटलेले, दूर झालेले ते तडवी अशी त्यांची स्थानपरत्वे कुळनावे आलेली असावीत. भिल्ल ही स्थानिक शेतकऱ्यांची जमात आहे. सामाजिक दृष्टीने हा पितृवंशीय समाज आहे. परंपरेने ही निष्णात तिरंदाजाची जमात समजली जाते. ब्रिटिश राजवटीत गुन्हेगार जमात म्हणून त्यांचे नाव कलंकित झाले होते.

सातपुड्यातील भिल्ल आदिवासी स्वयंपाकासाठी पूर्वी मातीची भांडी वापरत. भिल्ल आदिवासींच्या लसणाची चटणी फारच चटकदार असते. ठरावीक भाज्या तेल न वापरता तयार केल्या जातात. घरच्या उखळीत साळ कांडून भात करायचा व त्यात लसूण, मिरची तुरडाळ घालून तो भात शिजवून खायचा. हा पदार्थ सर्वांना खूप आवडतो याला लोक 'खिचडी' असे म्हणतात.

## २. बरडे भिल्ल :-

धूळ व साक्री तालुक्याच्या काही भागात बरडे भिल्लांची वस्ती आहे. त्यांची वस्ती अलग असते. त्यांना 'भिलाट्या' म्हणतात. स्त्रियांच्या पोषाखात आखूड अशा साडी चोळीचा वापर केलेला असतो. बायका डोक्यावर पदर घेतात. बरडे भिल्लांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे.

## ३. गावीत, मावची, गामीत :-

साक्री व नवापूर तालुक्यात हा समाज प्रामुख्याने राहणे. गावीत म्हणजे गावचे हे स्वत:ला भिल्लांचे वंशज मानतात. गावित, मावची, पडवी, वसावा ही त्यांची आडनावे आहेत. मुख्यत: खानदेश भागात त्यांची वस्ती मोठ्या प्रमाणावर आढळून येते. सपाट जमीन करून त्यावर ही घरे बांधतात. घराला तीन-चार दरवाजे असतात, पण खिडक्या नसतात. यांची वेषभूषा मराठमोळी असते. विविध प्रकारचे

दागिने वापरले जातात, स्त्रिया पाटल्या बांगड्या, कानात मुदया, पायात साखळ्या, जोडवी, गळ्यात गंठण इ. दागिने वापरात. शिवाय स्त्रिया कपाळावर, दंडावर हातावर गोंदवून घेतात.

### ४. नाईक भिल्ल :-

वळवी, वसावा, पाडवी यांच्या कुळातील लोक कारभारी समजले जात असत. त्यांच्याकडे एकदोन गावांचे अधिपत्य पूर्वी असल्याने त्यांना नाईक म्हणण्याची प्रथा रूढ झाली असावी, नाईक भिल्लांकडे भरपूर शेती आहे.

### ५. धानका :-

ही जमात भिल्लांचीच एक उपशाखा समजली जाते. त्यांची बोलीभाषाही भिल्लीच आहे. यांचे वास्तव्य महाराष्ट्र आणि गुजरात राज्याच्या सीमेवर आहे. धनकांची घरे चौकोनी किंवा आयाताकार असतात. अत्यंत साध्या रचनेच्या या घराची जमीन मात्र नेहमी सारवून स्वच्छ केलेली असते. धनका स्त्रियांना नटण्याची खूप आवड असते. त्याचा पोषाख साडी-चोळी असा असतो. त्या दागिन्यांची मढलेल्या असतात. कानात डूल, बोटात अंगठ्या, पायात तोरड्या, गळ्यात किडायु नावाचे आभूषण, हातात बांगड्या, कडी, वाक्या असे वेगवेगळे दागिने असतात. दंडावर, कपाळावर गोंदवून घेतले जाते. तर पुरुषांचा पोषाख धोतर, बंडी, फेटा असा असतो. शेतातून पिकलेल्या ज्वारीची भाकरी आणि तुरीचे वरण आहारात असते. अंबाडीच्या भाजीस विशेष स्थान असते. मांसाहारही केला जातो. धातू आणि मातीची भांडी वापरली जातात.

### ६. लाठ्या भिल्ल :-

तळोदा तालुक्याचा पश्चिम भाग आणि अक्कलकुण्याचा खालचा भाग या भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या पाडवी, वळवी, वसावे, गावीत वगैरे कुळातील भिल्लांना तळोदा तालुक्याच्या पूर्व भागातील सातपुड्यातील भिल्ल 'लाडक्या' किंवा 'लाठ्या भिल्ल' या नावाने ओळखतात. हा एक प्रादेशिक गट समजला जातो.

### ७. मथवाड्या भिल्ल :-

अक्कलकुवा तालुक्याचा उत्तर भागातील, मोलगी विभागातील व अक्राणी तालुक्यातील भिल्लांना तळोदे, शहादा, अक्कलकुवा, नंदूरबार भागातील भिल्ल 'मथवाडे' भिल्ल म्हणून ओळखतात. पूर्वी हे शिकार करून चरितार्थ चालवत असत.

### ८. पावरा भिल्ल :-

अक्राणी, शहादा, शिरपूर व तळोदा तालुक्यात पावरा भिल्ल आहेत. हे पावरी बोली भाषा

बोलतात. ही जमात मूळ पावागडाहून आलेला आहे असे लोक मानतात. हे भिल्ल उंच, धडधाकट, गोरे व नाकी डोळी सरस आहेत. काही पावरा भिल्ल मथवाड संस्थानातून आल्याचे सांगतात. मुख्य व्यवसाय शेती, जंगलकाम हे आहे. होळी, शिमगा, दसरा, दिवाळी, नाग दिवाळी हे सण साजरे करतात. त्यांच्यात दहेज, घरजावई, पुनर्विवाह, विधवाविवाह, बहुपत्नीत्व व त्याचबरोबर झगडा या प्रथा प्रचलित आहेत. भिल्लांची वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाची शाखा म्हणून पावरा भिल्ल ओळखले जातात.

### ९. बोंडे – गवाल :-

हा भिल्ल गट लोकसंख्येने अत्यंत कमी आहे. बोंडे भिल्ल देवादिकांचे मुखवटे बांधून कथा सांगत गावोगावी नाचत फिरतात व धान्य गोळा करतात, गुरे चारण्याचे व मयताच्या उत्तरक्रियेच्या वेळी वाद्ये वाजवितात. लग्न कार्यात हे भिल्ल वाजंत्रीचे काम करतात.

### १०. टेड (धेड) विणकर :-

हा भिल्ल गट अक्राणी तालुक्यात आहे. त्यांची संख्या फक्त १०० ते १५० एवढी आहे. भिल्लांच्या रंगीबेरंगी धोतर पट्ट्यासारख्या लंगोट्या विणून उदरनिर्वाह करतात.

### ११. कोटले भिल्ल :-

कोटला भिल्लांची वस्ती, शहादा, नंदूरबार, तळोदे, पांडवदा, प्रकाशा म्हसावद येथे आहे. शहराच्या आजूबाजूला राहून मोलमजूरी करून हा समाज चरितार्थ चालवितो. पुढारलेले समाज या भिल्लांना नयडे, नरोटा, बिवडा या तुच्छ नांवानी ओळखतात. गुलालासारखा अधीन झालेला हा समाज आहे. त्याचे शिक्षण झालेले नाही. हातभट्टीची दारू तयार करणे, सट्टा, बेटिंग खेळणे हा त्यांचा नित्याचा व्यवसाय झाला आहे.

### १२. मेवासी भिल्ल :-

जुन्या मेवासी इस्टेटमध्ये राहणाऱ्या भिल्लांना प्रादेशिकतेनुसार 'मेवासी भिल्ल' म्हणून ओळखले जाते. त्यात वळवी, वसावा, पाडवी, तडवी, ठाणका, पावरा इत्यादी भिल्लांमधील प्रचलित गणांचा समावेश आहे.

### १३. तडवी भिल्ल :-

तडवी भिल्ल हे जळगाव जिल्ह्याच्या उत्तरेला सातपुडा पर्वत असून दक्षिणेस अजिंठा पर्वत (सातमळा) पर्वत आहे. या दोन्ही पर्वताच्या पायथ्यालगत यावल रावेर, चीपडा तालुके येतात. यात

बहुसंख्य मुस्लीम धर्मीय 'जडवी भिल्लांची' वस्ती आहे. ही वस्ती असलेल्या गावांची ९ विभागात विभागणी झालेली आहे. या गावांची संख्या सुमारे १२० ते १४० च्या दरम्यान आहे. या गावाच्या प्रत्येक विभागाला गटाला बोऱ्हे असे नांव आहे. तडवी भिल्ल उंच बांध्याचे, तगडे, देखणे असतात. त्यांचा पोषाख खानदेशी शेतकऱ्यांप्रमाणे असतो. स्त्रिया 'नऊवारी लुगडी' काष्टा पध्दतीने नेसतात.

तडवी भिल्लामध्ये लग्नाचा मुहूर्त ब्राम्हणांकडून काढला जातो. निकाह मात्र 'काझी' लावतो. पूर्वी लग्नसोहळा अनेक दिवस चालत असे. आता मात्र सोहळा तीन दिवसात आटोपला जातो. हळदी समारंभ, मांडव घालणे आणि अनेक विधी पार पाडले जातात.

तसेच मूल जन्मल्यानंतर चाळीस दिवसांनी 'बारशासारखा' एक विधी केला जातो. त्यास 'छिल्ला' असे म्हटले जाते. मृत्युनंतर दफनाची प्रथा आहे. चाळीसाव्या दिवशी 'चेअलमन' करतात. तो 'बारावा' विधीप्रमाणे असतो. लोक 'नमाज व रोजा' ही व्रते करतात. 'रमजान ईद', 'बकरी ईद' व मोहरम हे सण साजरे करतात. त्याबरोबरीने हिंदूची 'दिपावली', 'होळी', 'अक्षय तृतीया व पोळा हेही सण साजरे करतात.

'तडवी म्हणजे बाटून मुसलमान झालेला भिल्ल' असे महाराष्ट्र शब्द कोशात (विभाग ४, पृ. १४६५) म्हटले आहे. भिल्लांच्या मुख्य शाखेपासून फुटून 'तड' म्हणजे दूर झालेल्या लोकांना 'तडवी' असे म्हणतात. तडवी भिल्ल चेहरपट्टीवरून सौराष्ट्रीय वंशात मोडत असल्याचा अनेक मानववंश शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. त्यांची बोलीभाषा 'तडवी' आहे.

विविध भिल्ल गटांना प्रादेशिक नांवे आहेत जसे ढोली भिल्ल, डोंगरी भिल्ल, रावळ भिल्ल, डोंगरी गरासिया वगैरे यांची नावे जरी भिन्न असली तरी त्यांची भाषा, संस्कृती, चालीरीती, धार्मिक विधी जवळजवळ सारखेच आहेत. जुन्या मुंबई राज्यातील अनुसूचित जमातींची यादी भाषिक प्रांत रचनेनंतर प्रदेशनिहाय स्विकारल्यामुळे प्रचलित महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यातीत ह्या जमातींचा समावेश झालेला दिसतो.

वरीलप्रमाणे भिल्लांच्या विविध शाखा अभ्यास करता येईल यानंतरच्या मुद्यामध्ये आपण सामाजिक सांस्कृतिक परिवर्तन अभ्यासणार आहोत.

## ४.३.१ भिल्लांचे सामाजिक-सांस्कृतिक जीवन : परंपरा आणि परिवर्तन

### ❑ भिल्लांची वेशभूषा आणि दागिने :-

भिल्ल हे दणकट बांध्याचे, लांब नाकाचे आणि आकर्षक चेहऱ्याचे असतात. पुरुषांचा पारंपारिक पोषाख लंगोटी, बंडी व पागोटे असते. काम करतेवेळी मात्र भिल्ल लोक फक्त कमतेभोवती पंचा

गुंडाळतात आणि डोक्यावर पटका बांधतात. स्त्रिया कमरेभोवती जुनेर गुंडाळतात. अंगात चोळी घालतात व डोईला मुंडासे बांधतात. पुरुष आणि स्त्रिया दोघेही कानात चांदीच्या बाळ्या व चांदीची वेढणी घालतात. स्त्रिया दंडावर बुलिया, कंगणा माला, नथणी आणि इतर प्रकारची दागदागिने घालून नटतात. मंगळसूत्र म्हणून एक किलो वजनाच्या गारखड्याच्या माळा स्त्रिया वापरत असत. अद्यापही काही वयोवृध्द स्त्रिया अशी मंगळसूत्र वापरतात. याशिवाय गळ्यात पूर्वीच्या रुपयाचा हार, कमरेला साखळी, तर कानात चांदीच्या बाळ्या, गोल वाळे व मोठ्या आकाराची बिजली हे दागिने वापरतात. नाकात सोन्याची नथ तर हातात चांदीच्या पाटल्या व दंडात तीन साखळ्यांचे कडे दंड, वाकी व वेल्टी हे दागिने स्त्रियांना फारच खुलून दिसतात. हातात चांदीच्या बांगड्या, मनगटात चोचरे व बोटात चांदीच्या अंगठ्या, पायात जोहरे, साखळ्या व पायच्या बोटात जोडवे आणि मासोळी वापरतात. त्याचप्रमाणे कमरेला चांदीचा आकडा, पायात घुंगरे असलेली पोकळ कर्णे व त्याचप्रमाणे एक किलो वजनाचे तोडे स्त्रिया वापरतात. भिल्ल पुरुष हातात कडे, कानात मोत्याचा अर्धा चाप असलेली पुढची (बिगबाळी) व कमरेला चांदीचा करगोटा वापरतात. पारंपारिक दागिन्यांवर या समाजाची श्रध्दा आहे.

## ❐ भिल्ल विवाहसंस्था :-

भिल्लांच्या चालीरीतीनुसार त्यांच्यात बहुपत्नीत्वाची व प्रौढ विवाहाची पद्धती रुढ आहे. त्यांना विधवा विवाहही संमत आहे. स्वजातीतील वधुवरांचे विवाह वडिलधाऱ्या मंडळीच्या सल्ल्याने होतात. भिल्ल मुलाला मामाच्या मुलीशी लग्न करता येते. परंतु आतेबहिणीशी किंवा मावस बहिणीशी लग्न करता येत नाही. पत्नीच्या मृत्यूनंतर भिल्ली पुरुष त्यांच्या मयत पत्नीच्या लहान बहिणीशी लग्न करू शकतो. ही पध्दत सक्तीची नसली तरी बहुधा तिचा स्वीकार केला जातो. एकपत्नीकत्व व बहुपत्नीकत्व या प्रथा प्रचलित असल्या तरी स्त्रियांना अनेक पुरुषांशी लग्न करण्यात मनाई आहे. या जमातीत घरजावईची प्रथा आहे. वराला घरी नोकरीला ठेवून त्याच्याकडून सेवा करवून घेतली जाते. तसेच जावयाला दत्तक घेण्याची प्रथा आहे. जोडीदाराबरोबर पलायन करून विवाह करण्याची प्रथाही आहे. विवाहाचे तंटे अथवा त्याला 'झगडा पध्दती' असे म्हणतात. या जमातीत विवाहाच्या वेळी 'वधुमूल्य' (शुल्क) देण्याची पध्दत आहे. तसेच काडीमोड घटस्फोट घेण्याचे स्वातंत्र्यही आहे.

सातपुड्यातील भिल्लांची पारंपारिक लग्न पध्दती मनोरंजक आहे. नवरा मुलगा मुलीला बाजारात किंवा यात्रेत पाहतो व लग्नाची मागणी घालतो. लग्न नाही जमले तर मुलगा तिच्या संमत्तीने तिला पळवून नेतो. विवाहासाठी मुहूर्त पाहिला जात नाही. फक्त शनिवार आणि अमावास्येच्या दिवशी लग्ने लावली जात नाहीत. लग्न गावातला भगत लावतो. लग्नानंतर वधुवर मांडवात ९ फेरे मारतात. लग्नात सर्वांना जेवण व दारू दिली जाते.

## ❒ जन्मासंबंधीच्या धारणा :-

भिल्लांच्या रीतीरिवाजाप्रमाणे, पाच महिन्यानंतर गर्भपात केल्यास तो गुन्हा समजण्यात येतो. बालकाच्या जन्माच्यावेळी सुईण बाळंत होणाऱ्या स्त्रीची देखभाल करते. भिल्लांची अशी ही धारणा आहे की, गरोदर स्त्रीच्या पोटात बरीच हालचाल होत असेल तर मुलाचा गर्भ आहे असे समजतात. परंतु जास्त त्रास आईला नाही झाला तर मुलीचा गर्भ समजण्यात येतो. बाळंतपणानंतर बाळाची नाळ विळीने किंवा बांबूच्या ढलपीने कापून ती घराबाहेरील खड्ड्यात पुरुन टाकली जाते. सुईणीला एक रुपया आणि दारूची बाटली दिली जाते. पाचव्या दिवशी पाचवी पुजतात आणि बाळाचे नाव ठेवले जाते. भिल्लाच्यामध्ये विविध प्रथा आणि परंपरा आहेत.

## ❒ भिल्लांच्या प्रथा आणि परंपरा :-

### ❀ झगडा पध्दत :-

भिल्लांच्यामध्ये घटस्फोटाप्रसंगी तसेच एखाद्या स्त्रीला पळवले असेल तर त्याप्रसंगी 'झगडा पध्दती' प्रकर्षाने आढळते. एखाद्या व्यक्तीची बायको दुसऱ्याने पळवून नेली तर अशाप्रसंगी सदर व्यक्ती त्याच्या गावातील पोलीसपाटील व प्रतिष्ठित लोकांकडे तक्रार करते आणि नंतर पंचायत बसते. त्यावेळी न्यायनिवाडा करतात. ज्याने बायको पळविलेली असते त्यास तिला तिच्या नवऱ्याकडे परत पाठविण्यास सांगतात. त्याने तसे नाही ऐकले तर लग्नाचाखर्च वसूल करून संबंधितांना दिला जातो. दुसऱ्याची बायको पळविणारा ती रक्कम मुकाट्याने भरतो, यास 'झगडा भरणे' असे म्हटले जाते. हा झगडा भरला नाही तर स्त्रिला पळवणाऱ्या व्यक्तीस समाजाकडून बहिष्कृत केले जाते.

झगडा भरणे याचा आणखी दुसरा भाग म्हणजे झगडा मोडणे असाही होतो. परस्परात मारामाऱ्या होणे, मालमत्तेबाबत भांडण-तंटे होणे, नुकसान भरपाई वसूल करणे अशावेळी चहापानाचा खर्च वजा जाता बाकी रक्कम नुकसानधारकास दिली जाते, यास 'झगडा मोडणे' असे म्हणतात.

### ❀ लाह्या :-

लाह्या ही आदिवासी भिल्ल व पावटा भिल्ल या समाजातील चांगली परंपरा आहे. 'लाह्या' या शब्दाचा मराठी अर्थ मदत किंवा सहकार्य असा आहे. ही मदत त्यांच्या शेती, घरबांधणी संदर्भात असते. एखादा भिल्ल बांधव जर मागे राहात असेल तर व त्याला मदतीची अपेक्षा असेल अशावेळी अनेक लोक एकत्र येवून कुठलीही आर्थिक अपेक्षा न बाळगता त्याला सर्वांबरोबरीने नेण्याचा प्रयत्न करतात. शेतातील नांगरणी, वखरणी, कोळपणी, निंदणी, कॉल पाडणे. या बाबतीत लाह्या बोलावून सर्व कामे करताना

आढळतात. एकमेकांना मदत करणारी ही लाह्या पध्दती आदर्श अशी पध्दत आहे. हळूहळू ही प्रथा कशी होताना दिला आहे.

### ❀ मयत विधी :-

अंत्यविधी संदर्भात अनेक पारंपारिक रितीरिवाज आहेत. भिन्न व पावरा भिल्ल माणूस मेल्यानंतर नातेवाईक व गावातील लोक जमतात. मसणवटीत नेण्याअगोदर मृत व्यक्तीच्या प्रेताचे दंतन (दात घालणे) केले जाते. नंतर प्रेतास अंधोळ घालून त्याला जेवू घातल्यासारख्या कार्यक्रम केला जातो. प्रेतास तिरडीवरून नेताना लहान मंडळ यात गोवरी घालून पेटवतात. हे मडके बाराव्याच्या दिवशी पंगतीत वाढणाऱ्याच्या हातात दिले जाते. त्याला 'आग्या' असे म्हणतात. 'आग्या' बनलेली व्यक्ती मृताच्या कुळातील असणे जरूरीचे असते. प्रेत स्मशानात (मसवावटीत) नेल्यानंतर मृताचे नातेवाईक जमलेल्या लोकांना ऐपतीप्रमाणे पैसे किंवा भांडी वाटतात नंतर प्रेतास अग्नी देतात. अंत्यविधीपूर्वीची महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रेत मसणवटीत नेण्यापूर्वी लग्नाच्या वेळेचे सर्व पूजाविधी, मंत्र-तंत्र सोपस्कार केले जातात. नंतर दुसऱ्या दिवशी 'मट्टयो धुवणे' हा कार्यक्रम असतो. त्यात मृताच्या अस्थी गोळा करून दहनाची जागा पाण्याने धुऊन काढतात.

अशा अनेक रूढी परंपरा भिल्लांमध्ये आढळून येतात.

### ❒ भिल्लांची भाषा :-

भिलोरी बोली भाषांमध्ये हिंदी, गुजराथी, मराठी, अहिराणी इ. भाषांमधील शब्द वापरात झालेले दिसतात. पावरी बोली भाषेवर हिंदी भाषेचे संस्कार आहेत. मावची बोली भाषेवर मराठी हिंदी आणि बहुसंख्य गुजराती भाषेचा प्रभाव जाणवतो. आदिवासी भिल्ल बोली भाषेचे वैशिष्ट्य असे की, 'भिलोरी बोलीभाषा ही या बोलीभाषांमध्ये मध्यवर्ती भाषा आहे.' धुळे, नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासी बोली भाषांमध्ये भिलोरी सर्वमान्य आहे. ही भाषा केंद्रस्थानी असल्याने ही भाषा बोलणाऱ्या लोकांना इतर बोलीभाषा शिकण्याची गरज नसते. ते तसा प्रयत्नही करीत नाहीत. या बोलीभाषा दैनंदिन व्यवहारापुरत्याच मर्यादित आहेत. त्याचप्रमाणे या भाषांना लिपी नसल्याने कोणतीही भाषा लिपीबद्ध करण्यासाठी देवनागरी लिपी उपयोगात आणली जाते.

### ❒ भिल्लांची होळी व दिवाळी :-

भिल्ल होळी आणि दिवाळी हे दोन्ही सण अत्यंत उत्साहात साजरे करतात. होळीच्या आधीच पहाडात जावून होळी तोडून गावात आणून ठेवतात. मुले-मुले जिथे असतील तेथे गाणी गुणगुणतात. रात्री ढोल वाजवून नाचतात. स्त्रिया आपला गट करून फाग मागायला गावोगावी फिरू लागतात. पुरुष

मंडळीही होळीच्या अगोदर 'गेर' बनवतात. सर्व गावची मिळून एकच होळी असते. भगत तिची पूजा करतो. डाळ्या गुळाचा नैवेद्य दाखवला जातो. होळीच्या दोन आठवडे अगोदर येणाऱ्या आठवड्याच्या बाजाराला 'गुलाल्या' बाजार म्हणतात, कारण या बाजारात तरुण मुले-मुली एक दुसऱ्याला गुलाल लावतात. हा आदिवासी संस्कृतीचा एक भाग आहे.

गुलाल्या बाजारानंतर जो बाजार भरतो त्याला 'भोंगऱ्या' किंवा 'भगोरिया' बाजार म्हणतात. या बाजारात भिल्ल गावागावातून ढोल व निरनिराळी वाद्ये घेऊन येतात. ढोलाच्या तालावर नाचतात. होळीच्या दिवशी अनेक प्रकारची वाद्ये वाजवून, दारू पिऊन रात्रभर नाचून काढतात. होळीची पूजा झाल्यावर गोड जेवण आणि पाचव्या दिवशी बकरे-कोंबडे मारतात. भरपूर दारू पितात आणि मनसोक्त भोजन करतात. आदिवासी कितीही गरीब असला तरी होळीसाटी तो आधीच काटकसर करून बचत करतो.

भिल्लांचा दुसरा सण उत्सव म्हणजे 'गांडी दिवाळी' आदिवासीची दिवाळी म्हणजे दारात पणती, फटाके, उडवणे अशी दिवाळी नाही तर 'गांडी दिवाळी' म्हणजे राजापनठा-गांडा ठाकूर आणि राणी काजळ यांच्या नावाने ही दिवाळी केली जाते. यात रात्रभर पारंपारिक पध्दतीचे नाटक करतात आणि सकाळी देवदेवतांच्या नावाने बकरा, कोंबडा बळी देतात. ही दिवाळी प्रत्येक गावात वेगवेगळ्या दिवशी साजरी केली जाते. नातेवाईक एकमेकांच्या गावी जातात. त्यांच्यासाठी मटणाची, दारूची सोय केली जाते. प्रत्येक आदिवासी ही दिवाळी साजरी करण्यासाठी आपले बजेट बसवण्याचा प्रयत्न करतो.

याचबरोबर 'भगोरिया' ही जत्रा होळीच्या निमित्ताने भरवली जाते. या मागचा उद्देश म्हणजे मुला-मुलींनी आपला साथीदार शोधून काढावा 'भगोरी'चा अर्थ 'भाग के ले जाना' अनेक मुले-मुली आपल्या गावातल्या साथीदाराबरोबर बाजाराच्या ठिकाणी बैलगाडी किंवा चालत जातात. परस्परांना गुलाल लावतात. एखाद्या मुलीला मुलगा आवडला तर ती त्याला गुलाल लावते मग दोघे बाजूला जावून गप्पा मारतात व तिला आपण पसंत आहोत का याची खात्री करून घेण्यासाठी भांग टाकलेली महुआची दारु, याला हे लोक 'माजूस' म्हणतात. आपण ती दारू उष्टावल्यानंतर तो तिला प्यायला सांगतो. तिने ती घेतली की होकार ठरतो नंतर बेधुंदपणे सगळी नाचतात. अशारितीने अत्यंत आनंदाने, स्वातंत्र्याने सर्व सणांचा आनंद भिल्ल आदिवासी घेताना दिसतो.

## ❒ सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन :-

धुळे, नंदूरबार जिल्ह्यातील भिल्ल आदिवासीत ५० वर्षात फार मोठे बदल घडले आहेत. बदलाबरोबरच संस्कृती संक्रमण ही सर्वच क्षेत्रात झालेले आहे. हा बदल अपरिहार्य आहे. त्यांच्या पोषाखात झालेला बदल लक्षणीय आहे. आधुनिक पोषाख ते वापरतात. पँट, शर्ट, साडी, ब्लाऊज

परिधान करतात. या आदिवासींना आज पूर्वी इतका संस्कृतीचा हव्यास राहिलेला नाही. विशेष म्हणजे शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीशिवाय बाहेरच्या जगाशी आपण स्पर्धा करू शकणार नाही याची त्यांना जाणीव झालेली आहे.

शैक्षणिक परिवर्तन घडवून आणण्याचे काम ६०-७० वर्षापूर्वी समाजसेवकांनी केलेले आहे. पुज्य ठक्करबाप्पांच्या आशिर्वादाने 'पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळ नंदूरबार' ही संस्था सुरू झाली. तसेच शिक्षणाच्या दृष्टीने आदिवासी भागात शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्यामार्फत धुळे, नंदूरबार जिल्ह्यात २५० आश्रमशाळांमधून ६०-७० हजार मुले शिक्षण घेत आहेत. तसेच दिवसेंदिवस तरुण उमेदवार स्पर्धात्मक परीक्षेत सुयश संपादन करत आहेत. राजकीय जागृतीही मोठ्या प्रमाणात झाली आहे. एके काळी शहरी लोकांना भिणारा आदिवासी भिल्ल आता शहरवासियांच्याबरोबरीने प्रगती करू लागलेला आहे.

## ४.३.२ भिल्लांचे आर्थिक जीवन : परंपरा आणि परिवर्तन

आर्थिकदृष्ट्या भिल्ल ही स्थायिक शेतकऱ्यांची जमात आहे. परंपरेने ही निष्णात अशी तिरंदाजाची जमात मानली जाते. विल्सन यांच्या म्हणण्याप्रमाणे, 'भिल्ल' ही संज्ञा 'बिल्लू', 'धनुष्य' या द्रविड शब्दापासून झाली आहे आणि तेच या लोकांचे परंपरागत आयुध आहे. त्याच आयुधाचा वापर ते शिकारीसाटी करतात. तीर-कामठा याबरोबरच जाळीचा व सापळ्याचा सुध्दा वापर ते रानडुकरे व इतर वन्य प्राणी पकडण्यासाठी करतात. पूर्वी भिल्ल ही शिकारी जमात होती, परंतु जसा जसा काळ गेला त्याप्रमाणे त्यांचा मुख्य व्यवसाय शेती झाला. शेती या व्यवसायातही सुरवातीला ते जमीन कुदळीने खणून 'स्थानपालट' पध्दतीने शेती करीत असत, नंतर त्यात बदल होवून एका जागी स्थिर होऊन फाळाच्या साहाय्याने नांगरट करून शेती करण्यास सुरवात केली. आज त्यांच्या स्वत:च्या जमिनी आहेत आणि ते त्याचा शेतीसाठी वापर करतात. ज्यांच्याकडे स्वत:च्या जमिनी नाहीत ते लोक दुसऱ्यांच्या शेतात रोजंदारीने काम करतात.

सुरुवातीला भिल्लांना जनावरांचे दूध काढण्याची कल्पना मानवत नसे. परंतु आजकाल त्यांच्यापैकी कित्येक जण दुधाचा अन्न म्हणून उपयोग करतात आणि त्यापासून तूप तयार करून ते बाहेरील लोकांना विकतात. तसेच गोमांस भक्षण परंपरेने निषिध्द ठरवले आहे. बहुतांशी भिल्ल हे मजूरी करतात. तसेच काहीजण जंगली माल गोळा करून त्याची विक्री करतात. शिकारीबरोबरच मासे पकडण्यात तरबेज आहेत. तसेच कंदमूळं फळं गोळा करणे आणि कधी-कधी ती फळे सुकवून भविष्याची बेगमीही करून ठेवतात. महुआच्या सुकवलेल्या फळांपासून तेल काढण्याचेही कसब त्यांना अवगत आहे. त्यांच्यापैकी काहीजण मध गोळा करण्याचा व्यवसायही करतात. याशिवाय ते कापूस आणि ऊस तोडणीचे कामही ते करतात. सध्या भिल्ल मोठ्या प्रमाणावर शेती हा व्यवसाय करतात. शेतीत वर्टी, ज्वारी, कोद्रा, तूर, कापूस, गहू ही पिके काढतात. नाईक भिल्लांकडे भरपूर शेती आहे व ते चांगले शेतकरी आहेत, त्यांचे

राहणीमान सुधारलेले आहे. एकूण पारंपारिक शेतीतून भिल्ल बाहेर पडले असून चांगली पीके ती घेत आहेत. तसेच विविध ठिकाणी मजूरी करताना दिसत आहेत.

### ❁ आर्थिक जीवन : परिवर्तन :-

धुळे, नंदूरबार जिल्ह्यातील भिल्लांचा मुख्य व्यवसाय शेती व शेतमजूरी आहे. या भागात कृषि क्षेत्रात फारशी प्रगती झालेली नसल्याने तेथे बारमाही उद्योगधंदे उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे शेतमजूरांना कायमस्वरूपी काम मिळविण्यासाठी सारखी धडपड करावी लागते. सध्या भिल्ल आदिवासी शेतीवर अवलंबून न राहता मजुरीचे काम करतात. शेतीशी संबंधित कामे, शेतमजूर म्हणून. तसेच साखर कारखान्यासाठी ऊसतोड भरपूर प्रमाणात होतात. तेथेही महाराष्ट्रातील स्थानांतरित झालेल्या मजूरांना सहजगत्या मजूरी उपलब्ध होते. त्यामुळे गुजरातमध्ये कारखान्यांसाठी लागणाऱ्या कामगारांचा व महाराष्ट्रातील बेरोजगारांचा प्रश्न सुटण्यास मदत होते. हे मजूर कारखान्याशी पूर्णपणे बांधलेले राहतात. तसेच काही शिक्षित तरुण स्पर्धात्मक परीक्षा देऊन विविध ठिकाणी अधिकारी म्हणून काम करताना दिसून येतात. तसेच विविध सामाजिक संस्थांमार्फत उद्योग केंद्र, दुग्धव्यवसाय, वृक्षवाटिका, रेशीम उद्योग या संस्थेच्या कामाचा विस्तार झालेला आहे. तसेच सध्या आदिवासी शेतकऱ्यांकरिता सामुदायिक जलसिंचन योजना सध्या राबवत आहे. एकूणच भिल्ल आदिवासींच्या आर्थिक जीवनात परिवर्तन होताना दिसत आहे.

## ४.३.३ भिल्लांचे धार्मिक जीवन : परंपरा आणि परिवर्तन

दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या व अज्ञानात रुतलेल्या भिल्लांच्या देवधर्माबद्दलच्या कल्पना त्याच्या स्वतंत्र अस्तित्वाला पोषक अशाच आहेत. वाघदेव, धानदेव, सर्पदेव, म्हसोबा, वेताळ, डोंगरदेव हे भिल्लांचे देव आहेत. तसेच इतर आदिवासींप्रमाणेच भिल्लसुद्धा निसर्गाचे उपासक आहेत. वनस्पती, प्राणी, देवाच्या अद्भुत शक्तीचे ते पूजा करतात. याशिवाय गाय, बैल, घोडा यांना समाजात महत्त्वाचे स्थान आहे. साप, वाघाची पूजा करतात. आंबा, पिंपळ, केळी यांना पवित्र झाडे मानली जातात. भिल्लांमध्ये स्वर्ग-नरक कल्पना नाही. परंतु ते आत्मा मानतात आणि त्यांचा पुनर्जन्मावरही विश्वास आहे. भुतेखेते यावरही त्यांचा विश्वास आहे.

सातपुड्यातील भिल्लांच्या वाघदेव, रीमदेव, नंदूरादेव, पालुडा देव, खेतरड्या देव, बडादेव, याहामोगी इत्यादी देवदेवतांचा पूजा करतात. प्रत्येक देवाची विशिष्ट कामासाठी पूजा केली जाते. पावसाळ्यात वाघ देवाचा सण साजरा केला जातो. या देवाला कोंबडी कापली जाते व पालेभाजीचा नैवेद्य दाखवला जातो, त्यानंतरच भिल्ल रानातील पालेभाज्या खाण्यास सुरुवात करतात.

**रीम** देवाचा सण शिवरात्रीला साजरा केला जातो. शिवाय पाऊस पडून गवत वर आले तर गवत काढावयास प्रारंभ करावयाच्या आधी नंदुरा देवीची पूजा केली जाते. सर्प, विंचू आदी भूचरांपासून संरक्षण मिळावे म्हणून नागपंचमीच्या दिवशी खेतरड्या देवाची पूजा करतात. तसेच प्रत्येक गावाच्या सीमेवर असणारा हिवारीया हा देव म्हणजेच भूतांचा राजा मानला जातो. तो गावच्या सीमेचे रक्षण करतो अशी एक समजूत आहे. हिवारीया या देवाला पुजेसाठी दारूचा नैवेद्य लागतो.

सातपुड्यातील आदिवासींचे मुख्य कुलदैवत 'यहामोगी' देवी आहे. या देवीचे देऊळ झोपडीत आहे. महाशिवरात्रीला या देवीची जत्रा भरते. यावेळी प्रचंड गर्दी असते. या देवीच्या झोपडीसमोर काकड वृक्षाचे एक झाड आहे. या झाडाला बहर आला तर पाऊस भरपूर पडेल. पीक चांगले येईल व वर्ष चांगले जाईल असे मानले जाते, अशी त्यांची धारणा आहे.

सातपुड्यातील भिल्ल आदिवासांचे दुसरे कुलदैवत तोरणामाळ येथील **गोरखनाथांचे** स्थान आहे. शिवरात्रीच्या आदल्यादिवशी गव्हाच्या पिठाचा रोडगा करून त्याला कच्चा दोरा गुंडाळतात व हा रोडगा गोवऱ्यामध्ये ठेवून भाजला जातो. तसेच भिल्लांची आणखी एक श्रध्दा म्हणजे 'अश्वत्थामा जिवंत आहे' त्याचे राहण्याचे ठिकाण सातपुड्यामध्ये अक्राणी तालुक्यातील अस्तंभा या ठिकाणी खोल दरीतील एका गुहेत असल्याचे लोक मानतात. दिवाळीच्या एक दिवस आधी अश्वत्थाम्याची यात्रा भरते. या खोल दरीत मशाल घेवून जावून पूजा केली जाते.

भिल्लांच्या धार्मिक जीवनामध्ये फारसे परिवर्तन झाल्याचे आढळत नाही. अद्यापही धर्माशी संबंधित सर्व परंपरांचे पालन ते करतात.

## ४.४ सारांश

सातपुडा हा प्रदेश प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो. भिल्लांमध्ये वळवी वसावे, तडवी, बरडे, गावीत, मावची, नाईक, धनका असे अनेक प्रकार आढळतात. त्यांच्या प्रत्येकाच्या विवाहाच्या प्रथा मनोरंजक असल्याचे दिसून येते. भिल्ल ही पूर्वी शिकारी जमात होती. परंतु जसा-जसा काळ गेला, त्याप्रमाणे त्यांचा मुख्य व्यवसाय शेती झाला. शेती ज्यांच्याकडे नाही ते लोक मजुरी करतात.

इतर काही आदिवासी जमातीप्रमाणे भिल्लसुद्धा निसर्गाचे उपासक आहेत. वनस्पती, प्राणी आणि देवाच्या अद्‌भूत शक्तींची ते पूजा करतात. हिंदू देवीदेवतांप्रमाणेच ते मुस्लिम पीरांनासुद्धा महत्त्व देतात. होळी, दिवाळी हे दोन सण मोठ्या भक्तीभावाने साजरे केले जातात. भिल्लांमध्ये स्वत:चा जोडीदार स्वत: निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. विविध अलंकाराचे शौकीन असल्याचे दिसून येते.

आज भिल्ल समाजावर आधुनिकता आणि शिक्षण यांचा प्रभाव पडला असून त्यांनी तो मान्यसुध्दा केला आहे. पण सांस्कृतिकदृष्ट्या ते अजूनही पारंपारिक आहेत आणि तीच त्यांची ओळख आहे.

## ४.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१. .................. हा प्रदेश महाराष्ट्रातील भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो.

२. धुळे जिल्ह्यात भिल्ल जमातीची लोकसंख्या .................. लाख एवढी आहे.

३. तडवी भिल्लांमध्ये मूल जन्मल्यानंतर चाळीस दिवसांनी बारशासारखा विधी केला जातो. त्याला ................. असे म्हणतात.

४. रीम देवाचा सण ................. दिवशी साजरा केला जातो.

५. सातपुड्यातील आदिवासींचे मुख्य कुलदैवत ................. देवी आहे.

## ४.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. सातपुडा.

२. १० लाख.

३. छिल्ला.

४. शिवरात्री.

५. यहामोगी.

## ४.७ सरावासाठी प्रश्न

१. भिल्लांच्या सांस्कृतिक जीवनाचे वर्णन करा.

२. भिल्लांच्या आर्थिक पारंपारिक जीवन आणि परिवर्तनासंदर्भात चर्चा करा.

३. भिल्लांच्या धार्मिक जीवनातील परंपरा स्पष्ट करा.

## ४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **डॉ. शौनक कुलकर्णी** : *'महाराष्ट्रातील आदिवासी'*, डायमंड प्रकाशन, पुणे.

२. **डॉ. गोविंद गारे** : *'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती'*, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

३. **डॉ. गोविंद गारे** : *'सातपुड्यातील भिल्ल'*, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे. (१९९७)

४. **सुदाम जाधव** : *'भिल्ल जीवन आणि आविष्कार'*, रिमझिम प्रकाशन, औरंगाबाद.

५. **दिलीप इंगळे** : *'सातपुड्याच्या सहवासात'*, प्रस्ताव प्रकाशन, नाशिक.